१५३८

शालोपयोगी संस्करण

# पूर्व आणि पश्चिम

व

# युरोपांतील प्रवासाचीं टिपणें

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ७३५

REFBK-0005713

स्वामी विवेकानन्द

किंमत १ रु.

११३८

[illegible] २१।१०.५८

[illegible]



स्वामी विवेकानंद.

# पूर्व आणि पश्चिम

व

# युरोपांतील प्रवासाचीं टिपणें.

स्वामी विवेकानन्द

REFBK-0005713

KARNATAK PRINTING PRESS
318 A, Thakurdwar, BOMBAY

Price Re. 1

४७१३

# पूर्व आणि पश्चिम

## प्रकरण १ लें

रुंद आणि खोल असा प्रवाह असलेल्या महानद्या दुथडी भरून चालल्या आहेत. या नद्यांच्या तटाकीं सुंदर उपवनें जागोजाग पसरलीं आहेत. आपल्या सौंदर्यानें तीं जणूं काय, नंदनवनाशीं स्पर्धा करूं पहात आहेत. भूलोकावरील या नंदनवनाच्या मध्यभागीं संगमरवरी दगडांचे भव्य प्रासाद आकाशाशीं आपलीं मस्तकें भिडवूं पहात आहेत. यांजवरील नक्षी काम दृष्टीस पडतांच पहाणारा थक्क होऊन जातो. या प्रासादांच्या आजूबाजूस नजर फिरविली असतां लहान-सहान झोंपडीं इकडेतिकडे विखुरलीं असल्याचें दिसून येतें. त्यांच्या त्या मातीच्या भिंतींना जागोजाग खिंडारें पडलीं आहेत. वरील आढीं चंद्रमौळी झालीं आहेत. त्यांतील बांबू मधून मधून प्रेक्षकाकडे डोकावून पाहात आहेत. या चंद्रमौळी झोंपड्यांतून वृद्ध आणि तरुण पुरुष इकडेतिकडे फिरतांना आढळतात. त्यांच्या आंगावर लंगोटीशिवाय दुसरें वस्त्र दिसत नाहीं. अन्नाच्या अभावीं त्यांच्या पाठी व पोटें हीं एकरूप झालेलीं आहेत. शेंकडों वर्षांच्या दारिद्र्याचा आणि हताश-पणाचा पूर्ण ठसा त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला दिसत आहे. गायी, बैल, म्हशी इत्यादि जनावरें जिकडेतिकडे संचार करीत आहेत. हाय ! हाय ! त्यांचेही डोळे त्यांच्या धन्यांच्या डोळ्यांप्रमाणेंच तेजशून्य दिसत आहेत. धन्याप्रमाणेंच त्यांच्याही शरिराचीं हाडें स्पष्टपणें मोजतां येतात. एखाद्या गांवाच्या आजूबाजूस पाहिलें तर केरकचरा आणि घाण यांचे ढीग जागोजाग दिसून येतात. सध्यांच्या भरतभूमीचें हें चित्र आहे !

एका बाजूस उत्तुंग राजवाडे; तर त्यांच्याच शेजारीं पडकीझडकीं झोंपडीं, एका बाजूस सुंदर देवालय आणि त्याच्या शेजारीं केरकचऱ्याचा प्रचंड ढीग ! एका बाजूस ओकारी येईपर्यंत जेवल्यामुळें ढेरपोट्या बनलेला आणि जरतारी

कपडे आंगांत घालणारा लक्ष्मीपुत्र तर त्याच्याच बाजूस फक्त लंगोटी घालून चालणारा आणि हाडांची काडें झालेला संन्यासी नजरेस पडतो. आमच्या भरतभूमीची सांप्रतची स्थिति अशी आहे !

प्लेग आणि महामारी यांच्या धडाक्यानें गांवेंचीं गांवें बेचिराख होत आहेत; विषारी ताप आमचीं काळजें पोखरून टाकीत आहे; दुष्काळ तर आमच्या पांचवीस पुजला आहे; कोणत्या ना कोणत्या भागांत दुष्काळाचें भेसूर तांडव नित्य सुरू आहे; आमची भूमि ही रोग आणि दुःख यांचें कुरुक्षेत्र बनून गेली आहे. जिकडेतिकडे स्मशानेंच स्मशानें आढळून येतात. या ठिकाणीं कित्येक भग्न हृदयांचीं हाडें पसरलीं आहेत आणि त्यांच्याच मध्यभागीं एकादा योगी गंभीर शांततेंत निमग्न होत्साता बसला आहे. मोक्षसाधनावांचून त्याला दुसरें कोणतेंच कर्तव्य दिसत नाहीं. एकादा युरोपीय फिरस्ता इकडे आला तर त्याच्या नजरेस हिंदुस्थानाचें असें चित्र दिसतें !

तीस कोटी मनुष्यें निव्वळ बाजारबुणग्यांसारखीं इकडेतिकडे धांवत आहेत. त्यांचें मनुष्यत्व आतां फक्त त्यांच्या बाह्य आकारांतच उरलें आहे. स्वकीयांच्या आणि परकीयांच्या पायांखालीं कित्येक शतकें हीं माणसें तुडविलीं गेल्यामुळें त्यांचें खरें मनुष्यपण नष्ट झालें आहे. त्यांच्या खुद्द देशबांधवांनीं आणि धर्मबांधवांनींच ही स्थिति त्यांस आणिली आहे. गुलामांच्या ठिकाणीं ज्याप्रमाणें स्वतंत्र बुद्धीचा अभाव असतो, त्याचप्रमाणें यांच्याही ठिकाणीं स्वतंत्र विचारशक्तीचा अभाव असून ठरलेलीं कामें करावीं आणि निमूटपणें दुःखें भोगावीं, अशा स्थितींत त्यांचा काळ जात आहे. भविष्यकाळाबद्दल त्यांच्या चित्तांत कसलीही आशा नाहीं. आपला पूर्वेतिहास तीं विसरलीं आहेत आणि त्यांचा भविष्यकाळही फारसा मनोहर दिसत नाहीं. जीव आणि शरीर यांची संगति चालू क्षणापुरती तरी तुटूं नये एवढीच त्यांची इच्छा दिसते. गुलामांच्या वृत्तीस शोभणारा मत्सर त्यांच्या हृदयांत घर करून बसला आहे. आपल्या शेजाऱ्याचें बरें झालेलें त्यांस पहावत नाहीं. त्यांचीं हृदयें श्रद्धाशून्य झालीं आहेत. त्यांचा आत्मविश्वास मरून गेला आहे. लुच्चेगिरी आणि विश्वासघात हे कोल्ह्याचे गुण त्यांच्या आंगीं पूर्णपणें मुरले असून तेच त्यांच्या बचावाचीं शस्त्रें होत. हे लोक शुद्ध आपलपोटे आहेत. प्रसंगीं समर्थांच्या चरणाची धूळ चाटण्यासही हे कमी करणार

नाहींत. एका बाजूला इतक्या प्रतीचा नम्रपणा दाखवीत असतां आपणाहून अशक्त असणारांवर मर्मप्रहार करून त्यांचा जीव घेण्यासही ते मागेंपुढें पाहाणार नाहींत. सडलेल्या प्रेतांत लक्षावधि किडे ज्याप्रमाणें वुजवुजत असतात, त्याचप्रमाणें भरतभूमीच्या देहावर तीस कोटी किडे वुजवुजले आहेत. एखाद्या परकीयाच्या नजरेनें दिसणारें आमचें चित्र अशा प्रकारचें आहे !

सत्तावारुणीचें आकंठ पान करून धुंद झालेले, विहित आणि अविहित यांचा विचार ज्यांच्या ठिकाणीं नष्ट झाला आहे, जंगली जनावरांप्रमाणें भयप्रद आणि कनककामिनीच्या मागें लागलेले, पावित्र्याची कल्पनाही ज्यांस शिवली नाहीं आणि गलिच्छपणांत जे सदा मुरलेले, जडवादाचे पूर्ण भक्त, जडवादाची आत्यंतिक उत्क्रांति हीच ज्यांची संस्कृति, परकीयांस लुवाडून स्वतःचीं घरें भरणारे, परलोकावद्दलचा विचारही ज्यांच्या चित्तास शिवत नाहीं, देह हाच ज्यांचा आत्मा आहे आणि इंद्रियांचा संतोष करावयाचा हीच ज्यांची इतिकर्तव्यता आहे असे लोक कोणी असतील तर ते युरोपीयच आहेत. एकाद्या हिंदूच्या नजरेनें पाश्चात्यांचें चित्र अशा प्रकारचें असतें ! पाश्चात्य लोक म्हणजे चालू काळचे असुरच आहेत असें त्यास वाटत असतें.

परस्परांबद्दल असणारी अपुरी माहिती अथवा पूर्ण अज्ञान आणि परस्परांबद्दल सद्विचाराचा अभाव यांजमुळें उभय पक्षीं अशा प्रकारचीं मतें प्रचलित आहेत. परकीय युरोपियन लोक हिंदुस्थानांत येतात, आणि शहरांतील अति स्वच्छ असणाऱ्या भागांतल्या टोलेजंग इमारतींत राहतात आणि तेथून 'नेटिव्ह' शहराच्या भागाची तुलना युरोपीय शहरांशीं करतात. त्यांच्याशीं ज्या हिंदी लोकांचा संबंध येतो ते लोक म्हटले म्हणजे बहुधा त्यांचे नोकर असावयाचे. आणि वास्तविक पाहातां हिंदुस्थानाइतकें दारिद्र्य आणि दुःख जगांत दुसऱ्या कोठेंही आढळावयाचें नाहीं. तसेंच आमच्या शहरांतून गलिच्छपणा सर्वत्र आढळतो हेंही खरें आहे. अशा प्रकारच्या घाणेरड्या परिस्थितींत, अशा प्रकारच्या गुलामगिरींत आणि अशा प्रकारच्या अवनतावस्थेंत एकाद्या तरी चांगल्या गुणाचा वास असूं शकेल ही गोष्ट बाहेरून आलेल्या युरोपीयाच्या चित्तास शिवतसुद्धां नाहीं.

उलटपक्षीं विहिताविहिताचा विचार न करतां युरोपीय लोक हातीं पडेल तें भक्षण करीत असतात, असें आपण पहात असतों. त्यांच्या स्वच्छतेच्या कल्पना

आमच्या कल्पनांहून भिन्न आहेत, असें आमच्या नजरेस येतें. त्यांच्यांत जातिभेदाला थारा नसून त्यांचीं स्त्रीपुरुषें एकत्र मिसळत असतात. दारू पिऊन एकमेकांच्या हातांत हात घालून तीं नाचत असतात, असें आपण पाहातों. या सर्व गोष्टींचें आपणास अत्यंत नवल वाटतें. अशा प्रकारच्या राष्ट्रांत चांगलें तें काय असणार, असा प्रश्न आपल्या मनांत साहजिक उद्भवतो.

केवळ बाह्य दृष्टि असल्यामुळें दोन्ही पक्ष अशा प्रकारच्या चुका करीत असतात. दोहोंपैकीं एकाच्याही दृष्टीस खोलपणा नाहीं. बाह्य देखाव्याच्या आंतील वस्तुस्थिति काय आहे, हें जाणण्याची तीक्ष्ण दृष्टि दोघांसही नाहीं. परकीय लोकांस आपण म्लेच्छ समजतों आणि आपल्या समाजांत आपण मिसळूं देत नाहीं. त्यांच्या बाजूनें तेही आपणास गुलाम समजून आपणासंबंधीं बोलतांना ' निगर ' असा तुच्छतादर्शक शब्द वापरतात. उभयपक्षीं बाह्यैकदृष्टीमुळें अशा प्रकारच्या चुका होत असल्या तरी दोघांच्याही मतांत थोडा फार सत्यांश असला पाहिजे हेंही उघड आहे.

प्रत्येक मनुष्यांत कोणत्या ना कोणत्या विशेष कल्पनेचा वास असतो. आपण मनुष्याचें जें कांहीं बाह्य रूप पाहतो तें त्याच्या अंतर्गत सूक्ष्म भावनांचें दृश्य रूप होय. अमूर्त विचार ज्याप्रमाणें शब्दरूपानें मूर्तपणास येतात, त्याचप्रमाणें मनुष्याच्या अंतर्गत भावना त्याच्या एकंदर चालचलणुकीच्या रूपानें प्रत्यक्षत्वास येत असतात. जी गोष्ट एका व्यक्तीस लागू आहे, तीच साऱ्या राष्ट्रासही लागू आहे. व्यक्तीप्रमाणेंच राष्ट्रालाही विशिष्ट राष्ट्रीय कल्पना असतात. प्रत्येक राष्ट्राची ही विशिष्ट कल्पना जगांत आपल्यापरी काम करीत असते आणि जगाच्या अस्तित्वासाठीं तिची आवश्यकता ज्या दिवशीं नष्ट होईल, त्याच दिवशीं ती व्यक्ति अथवा तें राष्ट्र नाश पावेल. आपल्या हिंदुस्थानांत अनंत प्रकारचीं दुःखें, अठरा विसवे दारिद्र्य आणि आंतून व बाहेरून जुलूम, अशा प्रकारची स्थिति असतांही आपण अजून जगलों आहों याचें कारण हेंच आहे. जी राष्ट्रीय कल्पना आमच्यामध्यें आहे, तिची आवश्यकता जगाला अद्यापि असल्यामुळें आमचा नाश होऊं शकत नाहीं. त्याचप्रमाणें युरोपीय राष्ट्रपुरुषाच्या कल्पनेचीही आवश्यकता जगाला आहे. तिच्या अभावीं जगाचें गाडें सुरळित चालूं शकणार नाहीं. युरोपीय राष्ट्राच्या सामर्थ्याचें बीज हें आहे. कोणत्याही मनुष्यप्राण्यांतील शक्ति सर्वथा नष्ट झाली

तर तो एक क्षणभर तरी जगूं शकतो काय ? अनेक व्यक्ति मिळून राष्ट्र बनलेलें असतें. त्या राष्ट्राची सर्व शक्ति आणि त्याचें सर्व चैतन्य नष्ट झालें तर तें राष्ट्र क्षणभर तरी जिवंत राहूं शकेल काय ? हजारों वर्षांच्या अवनतदशेच्या फेऱ्यांत सांपडलेलें हिंदुमानवकुल नष्ट कां झालें नाहीं ? आपल्या चालीरीती जर खरो-खरच इतक्या वाईट आहेत, तर पृथ्वीच्या पाठीवरून अजूनपर्यंत आम्ही नाम-शेष कसे झालों नाहीं ? आमचा पुरा नाश करण्याचे बाबतींत नाना प्रकारच्या परकीयांनीं कांहीं बाकी ठेविली आहे काय ? मग असें असतांही इतर मागसलेल्या देशांतील लोकांप्रमाणें आम्ही नष्ट कसे झालों नाहीं ? हिंदुस्थानांतील लोकसंख्येचा नाश होऊन तेथें मोठालीं अरण्यें अद्यापि कशीं बनलीं नाहींत ? असें झालें असतें तर हिंदुस्थानांत येऊन तेथें आपल्या वसाहती स्थापण्यास परकीयांनीं क्षणाचाही विलंब लावला नसता. अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि आफ्रिका या खंडांतील वसा-हतींप्रमाणेंच हिंदुस्थानाच्या सुपीक भूमींतही परकीयांच्या वसाहती झाल्या असत्या. पण तसें झाल्याचें दिसून येत नाहीं. माझ्या परकीय मित्रा, तुला वाटतें तितका तूं समर्थ नाहींस. ‘ कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् ’ असें सामर्थ्य आपणास आहे असें तुला वाटतें, पण तो तुझा निव्वळ भ्रम आहे. हिंदुस्थानालाही कांहीं विशिष्ट प्रकारचें सामर्थ्य आहे आणि अद्यापही कांहीं विशेष गुण त्याच्या ठिकाणीं आहेत, ही गोष्ट तूं प्रथम ध्यानांत आण. त्याचप्रमाणें जगाच्या संस्कृतींत भर टाकण्या-साठीं लागणाऱ्या वस्तूंपैकीं कांहीं वस्तु अद्यापि हिंदुस्थानाजवळ असल्यामुळेंच तो देश अद्यापि जगला आहे, हेंही ध्यानांत आण. त्याचप्रमाणें जे माझे देशबांधव अंतर्बाह्य युरोपीय बनूं पहात आहेत, त्यांनींही ही माझी सूचना लक्षांत ठेवावी. ‘ आम्ही अवनतीच्या पंकांत लोळत आहों, आम्ही पशूंच्या पंक्तींत जाऊन बसलों आहों, अहो युरोपीय सद्गृहस्थहो, तुम्ही आमचे सर्वतोपरी त्राते आहां, तुम्ही आम्हावर दया करा आणि या चिखलांतून आम्हांस बाहेर काढा ’ असा टाहो फोडणाऱ्या माझ्या देशबांधवांनींही वरील सूचना लक्षांत ठेवावी. त्याचप्रमाणें ‘ हिंदुस्थानाचा तारक येशू ख्रिस्त हिंदुस्थानांत आला असून, पर-मेश्वरी इच्छेची पूर्तता आतां होत आहे ’ अशी ओरड करणाऱ्या लोकांनींही ही सूचना ध्यानांत ठेवावी. छे, छे ! येथें येशू ख्रिस्त आला नाहीं आणि जिहोवाही आला नाहीं. ते बिचारे येथें येणारही नाहींत. स्वतःचीं जळतीं घरें विझवि-

ण्याचीच कामगिरी त्यांस पुरेशी आहे. आमच्या देशांत येण्यास त्यांस फुरसद तरी कोठें आहे? आमच्या येथें पूर्वीप्रमाणेंच आजही तोच वृद्ध शिव पूजिला जात आहे, तीच असुरमर्दिनी कालीमाता येथें अद्यापिहि पूज्य मानिली जात आहे. प्राचीन काळच्या सर्व थाटमाटानें तिचें पूजन आजही होत आहे. तोच गोपाल मुरलीधर श्रीकृष्ण अद्यापिहि येथें वास करीत आहे. एका काळीं याच वृद्ध शिवानें नंदीवर वसून आपल्या डमरूचा नाद करीत सुमात्रा, बोर्निओ, सेलेबिस्, ऑस्ट्रेलिया आणि अमेरिका येथवर प्रवास केला होता. त्याचप्रमाणें दुसऱ्या भागांकडे जाऊन तिबेट, चायना, जपान आणि सैवीरिया या मुलखांतही आपल्या नंदीवर बसून प्रवास केला होता. फार काय, पण आजमितीसही चीन आणि जपान या देशांतसुद्धां कालीमाता आपला पूजेचा हक्क वसूल करीत आहे. तिचेंच रूपांतर करून ख्रिस्तानुयायांनीं कुमारी मेरी निर्माण केली, आणि तिच्याच पोटीं येशू ख्रिस्ताला जन्मास घातलें. या उत्तुंग हिमनगराजाकडे पहा. याच्या उत्तर दिशेकडील भागांत कैलास असून वृद्ध शिवाचें हें प्राचीन निवासस्थान आहे. दशमुखी आणि वीस हाताच्या प्रचंड शक्तिमान् रावणालाही या स्थानाचें उच्चाटन करतां आलें नाहीं. आतां हें दुष्कर कृत्य परधर्मानुयायी उपदेशक करणार आहेत काय? ही गोष्ट त्यांनीं स्वप्नांतही आणूं नये. आमच्या हिंदुस्थानांत तोच शिव पूजिला जाईल; अनंत काळ लोटला तरी त्याच कालीमातेचें पूजन पशुहननासह केलें जाईल; आणि तोच मुरलीधर श्रीकृष्ण आपली बांसरी अनंत काळपर्यंत येथें वाजवीत राहील! हिमालयाप्रमाणेंच आमचीं हीं दैवतेंही स्थिर आहेत. ख्रिस्ती अथवा दुसऱ्या कोणत्याही धर्माच्या अनुयायांनीं कितीही अट्टाहास केला, तरी त्यांस स्थानभ्रष्ट करणें या अनुयायांस शक्य नाहीं. यांचा वास तुम्हांस सहन होत नसेल तर तुम्हीच दूर सरा. तुम्हां मूठभर लोकांच्या संतोषासाठीं दीर्घ काळपर्यंत सारें राष्ट्र तुमचा जाच सहन करील काय? हा जाच सहनशीलतेची सारी मर्यादा आतां उल्लंघूं पहात आहे. तुमच्या साऱ्या चैनी जेथें यथेष्टपणें चालवितां येतील, असा दुसरा एकादा भाग आतां तुम्ही शोधून काढा. हें विस्तीर्ण जग तुम्हांस अगदीं मोकळें आहे. पण हा उपदेश तुम्हांस कसचा रुचणार? ही गोष्ट करावयास लागणारें सामर्थ्य तरी तुम्हांपाशीं कोठें आहे? तुम्ही त्या वृद्ध शिवाचें अन्न खाऊन अशाच रीतीनें त्याच्याशीं दगलबाजी

करणार! अशाच रीतीनें तुम्ही त्याचा उपहास करणार आणि परकीय देवतांचें स्तोम येथें माजवीत सुटणार! "आम्ही अत्यंत क्षुद्र आहों, आम्ही हलके आहों, आम्ही अत्यंत अवनतावस्थेस पोहोंचलेले आहों, आमच्याजवळच्या सर्व चीजा सर्वथैव त्याज्य आहेत" अशी बडबड माझे जे कोणी देशबांधव परकीयांसमोर करीत आहेत त्यांस मी इतकेंच म्हणतों कीं तुमचें म्हणणें कदाचित् खरेंही असेल. तुम्ही सत्यवक्तेपणाचा तोरा ज्या अर्थी मिरवितां त्या अर्थी तुमचें म्हणणें आम्ही मान्य करितों. पण 'आम्ही' या शब्दांत स्वतःबरोबर आमच्या साऱ्या राष्ट्रास ओढण्याचा यत्न तुम्ही कां करतां? महाराज, आपल्यासारख्या सत्य-वक्त्यांस असें करणें शोभतें काय? आपणाबरोबर साऱ्या राष्ट्रासही वाईट ठरवावयाचें ही रीत कोठली?

उत्तमोत्तम सद्गुणांवर कोणत्याही एकाच राष्ट्राचा हक्क नाहीं, ही गोष्ट आपण प्रथम लक्षांत ठेविली पाहिजे. व्यक्तींत ज्याप्रमाणें सद्गुणदुर्गुणांची मिसळ सांपडते, त्याचप्रमाणें ही गोष्ट राष्ट्रांसही लागू आहे. एखाद्या राष्ट्रांत एखादा सद्गुण विशेषेंकरून आढळला, तर दुसऱ्यांत दुसरा एखादा सद्गुण परिणतावस्थेस गेल्याचें आढळून येईल.

आमच्या राष्ट्राचें अखेरचें साध्य मुक्ति हें आहे, त्याचप्रमाणें पाश्चात्यांचें अखेरचें साध्य धर्म हें आहे. आम्हांला मुख्यत्वेंकरून मुक्तीची लालसा असून त्यांना धर्म हवा आहे. या ठिकाणीं 'धर्म' हा शब्द मीमांसकांच्या अर्थानें योजिला आहे. धर्म म्हणजे काय? ऐहिक आणि पारत्रिक सुख ज्याच्यायोगें साध्य होईल तो धर्म. कर्म हें अशा प्रकारच्या धर्माचें मुख्य अधिष्ठान आहे. रात्रंदिवस एकसारखें काबाडकष्ट करीत असावें आणि सुखाच्या मागें पळत सुटावें, हीं कर्में मनुष्याकडून हा धर्मच करवीत आहे.

मुक्ति म्हणजे काय? ऐहिक सुखसुद्धां गुलामगिरीचाच एक भाग आहे, असें जी शिकविते ती मुक्ति. स्वर्गसुखही ऐहिक सुखाच्याच किंमतीचें आहे असें मुक्ति आम्हांस शिकविते. कारण, भूलोक काय अथवा स्वर्गलोक काय, प्रकृतीच्या कायद्याच्या पलीकडचे नाहींत. या दोघांसही प्रकृतीचा कायदा उल्लंघन करवत नाहीं. भूलोक आणि स्वर्गलोक यांत फरक म्हटला तर तो इतकाच कीं, भूलोक

लोखंडासारखा असून स्वर्गलोक सोन्यासारखा आहे. तसेंच सुख हें कोठेंही झालें तरी प्रकृतीच्या कायद्याच्या मर्यादेंत असल्यामुळें तें मरणास पात्र आहे, आणि याकरितां तें चिरकालीन होऊं शकणार नाहीं. याकरितां मुक्त होण्यासाठींच मनुष्यमात्रानें धडपड केली पाहिजे; देहाच्या बंधनापलीकडे त्यांनीं गेलें पाहिजे; त्यांनीं गुलामगिरीचा त्याग केला पाहिजे. मोक्षाचा मार्ग फक्त हिंदुस्थानांतूनच जातो, दुसऱ्या कोठेंही त्याचें अस्तित्व नाहीं. याकरितांच मुक्त पुरुष दुसऱ्या कोठेंही नसून फक्त हिंदुस्थानांतूनच आढळून येतात, असें म्हणतात तें सर्वथैव खरें आहे. आतां भविष्यत् कालीं इतर देशांतही ते जन्मास येतील ही गोष्ट खरी, आणि या गोष्टीचा आम्हांस संतोष आहे. धर्म आणि मुक्ति यांची सांगड असण्याचा काळ हिंदुस्थानांत पूर्वी एकवार येऊन गेला. युधिष्ठिर, अर्जुन, दुर्योधन, भीष्म, कर्ण इत्यादि कर्मवीरांबरोबरच व्यास, शुक, जनक इत्यादि मुक्तात्मेही आढळून येत असत. बौद्धधर्माच्या उदयाबरोबर धर्ममार्गाचा सर्वथा लोप होत चालला आणि मोक्षमार्गच विहित वाटूं लागला. याच अर्थानें गयासुर म्हणजे बुद्ध येथें अवतरून त्यानें जगाचा नाश करण्याचा यत्न केला, अशा वर्णनाचें रूपक अग्निपुराणांत आढळून येतें. त्यानें सर्व लोकांस मोक्षमार्गावर आरूढ केलें. शेवटीं देवांनीं सभा भरविली आणि कांहीं युक्तीनें त्याची ही चळवळ कायमची बंद पाडली. हें कसेंही झालें असलें तरी धर्माच्या अभावामुळें आमच्या राष्ट्रास उतरती कळा लागली ही गोष्ट मात्र खरी. सर्व राष्ट्र आज एकदम मोक्षाच्या मार्गास लागलें तर तें उत्तमच. तसें होणें ही गोष्ट फार चांगली आहे यांत संशय नाहीं; पण हें शक्य आहे काय ? इंद्रियजन्य सुखांचा आस्वाद घेतल्यावांचून संन्यस्तवृत्तीचा उदय होणें कधींच शक्य नाहीं. प्रथम या सुखांचा आस्वाद घ्या म्हणजे तुम्हांस त्यागाचा मार्ग सांपडेल. उलटपक्षीं सारें राष्ट्र आज जर संन्यासी होऊन बसलें, तर त्याला जें कांहीं हवें आहे त्याची प्राप्ति तर त्यास होणार नाहींच, पण उलट त्याजवळ जें कांहीं आहे तें मात्र गमावून बसण्याचा संभव आहे. तेल आणि तूप हीं दोन्ही जाऊन नुसतें धुपाटणें मात्र हातीं उरेल. बौद्धधर्माची येथें पूर्ण भरभराट होती तेव्हां प्रत्येक मठांत हजारों संन्यासी राहात असत; आणि त्याच वेळीं आमच्या देशाच्या अवनतीस झपाट्यानें सुरवात झाली. बौद्ध, ख्रिस्तानुयायी, मुसलमान आणि जैन हे सर्वांस

एकच कायदा सरसहा लागू करूं पाहतात; पण हें त्यांचें मोठें मूर्खपण आहे. असें करणें ही फार मोठी चूक आहे. शिक्षण, संवयी, चालीरीती, कायदे आणि बंधनें हीं प्रत्येक राष्ट्रास आणि प्रत्येक व्यक्तीस त्यांच्या स्वभावानुरूप वेगवेगळीं असलीं पाहिजेत. केवळ बळजबरीनें एकच कायदा सर्वांस सारखा लागू केला, तर त्याचा काय उपयोग? "मोक्षाहून अधिक श्रेयस्कर असें दुसरें कांहीं नाहीं; याकरितां सर्वजण मोक्षाच्या मागें लागा" असा उपदेश बौद्धांनीं केला; पण असें होणें शक्य तरी आहे काय? इतकाच माझा प्रश्न आहे. उलटपक्षीं आमच्या शास्त्रांनीं प्रत्येकास स्वतःच्या आश्रमधर्माप्रमाणें वागण्याची अनुज्ञा दिली आहे; आणि हें असेंच असलें पाहिजे. जो गृहस्थाश्रमी असेल त्यानें संन्यासधर्माकडे ढुंकूनही पाहूं नये असें आमचीं शास्त्रें सांगतात. ही आज्ञा सर्वथा योग्य आहे. हातभर उडी मारण्याचें सामर्थ्य ज्याला नाहीं, त्यानें एकाच उडींत समुद्रोल्लंघन करून लंकेंत उतरण्याचा यत्न करावा हें हास्यास्पद नाहीं काय? हें युक्तीला तरी धरून आहे काय? आपल्या कुटुंबाला पुरेसें अन्न घालण्याचें सामर्थ्यही तुम्हांस नाहीं. शेजारपाजारच्या दोन माणसांचे हातही तुमच्या घरीं कधीं भिजत नाहींत. चार लोकांच्या बरोबरीनें एखादें क्षुल्लकही सार्वजनिक काम धडपणें तुमच्यानें तडीस जात नाहीं. अशा प्रकारचे तुम्ही लोक मुक्तीच्या मागें धांवत असलेले पाहून एखाद्याला खरोखर हांसूंच लोटेल. धर्माहून मोक्ष अधिक श्रेयस्कर आहे यांत संशय नाहीं असें हिंदुशास्त्रेंही सांगतात; तथापि **'स्वधर्मे निधनं श्रेयः'** अशी त्यांची अनुज्ञा आहे हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे. याच बाबींत बौद्धांच्या डोक्यांत घोंटाळा माजल्यामुळें त्यांनीं अवनतीचा मार्ग मात्र खुला करून दिला. कोणालाही दुखवावयाचें नाहीं हें तत्त्व खरें आहे. दुष्टांचा हल्लाही निमूटपणें सहन करावयाचा हें तत्त्वसुद्धां फार मोठें आहे यांत संशय नाहीं; पण तुम्ही गृहस्थाश्रमी असलां तर हल्ल्यास प्रतिहल्ला करणें तुम्हांस भाग आहे, अशी आमच्या शास्त्रांची अनुज्ञा आहे. अशा स्थितींत योग्य प्रत्युत्तर तुम्हीं न दिलें तर मात्र तुम्ही मोठें पातक करतां असें आमच्या शास्त्राचें मत आहे. भगवान् मनु म्हणतात, "कोणी तुमचा वध करावयास आला तर त्याला ठार मारण्यांत पातक नाहीं. तो ब्राह्मण असला तरी त्याचा वध करावा." ही गोष्ट अगदीं खरी आहे. हें तत्त्व विसरून चालणार नाहीं. जे शूर असतात तेच पृथ्वीवरील भोग भोग-

तात. याकरितां आपलें शौर्य प्रकट करा. परिस्थितीप्रमाणें योग्य तऱ्हेचें धैर्य प्रकट करून साम, दाम, दंड आणि भेद या चतुर्विध नीतिमार्गांनीं आपल्या शत्रूस पादाक्रांत करून पृथ्वीचे भोग भोगा; असें तुम्हीं केलें तरच तुम्ही खरे धार्मिक. उलटपक्षीं लोकांच्या लाथा खाऊन तुम्ही स्वस्थ बसलां तर तुमच्या जिण्यास धिक्कार असो, असेंच म्हटलें पाहिजे. अशा स्थितींतलें तुमचें जीवित म्हणजे या लोकींचा प्रत्यक्ष नरकवासच होय; आणि अशा मार्गानें चालणारास त्याची ऐहिक यात्रा संपल्यावरही त्यास नरकाचीच प्राप्ति व्हावयाची. माझे प्रिय धर्मबांधवहो, माझें तुम्हांस हेंच सांगणें आहे. यावरून तुम्ही उगीच एखाद्यास त्रास देत सुटावा अथवा कोणाचा छळ करावा, असा मात्र माझ्या म्हणण्याचा आशय समजूं नका. लोकांचें बरें करण्याकरितां तुमच्यानें होईल ती खटपट तुम्ही अवश्य करा; परंतु लोकांनीं तुमचें वांकडें केल्यास त्याला निमूटपणें मान वांकविणें हें मात्र पातक आहे. जो गृहस्थाश्रमधर्मी असेल त्यानें दुष्टाचा प्रतिकार जागच्या जागींच केला पाहिजे. प्रत्येक गृहस्थाश्रमी मनुष्यानें उत्साहपूर्वक मोठे श्रम करून धन संपादन केलें पाहिजे. अशा रीतीनें द्रव्यार्जन करून आपल्या कुटुंबास आणि आपल्या आप्तेष्टांस सुखासमाधानांत ठेविलें पाहिजे. तसेंच त्यानें शक्य तितका आपल्या द्रव्याचा व्यय पुण्यकर्मांतही केला पाहिजे. हें तुमच्यानें होत नसेल तर मनुष्य म्हणविण्याचीही तुमची योग्यता नाहीं. ज्याला आपला आश्रमधर्म पाळवत नाहीं त्यानें मोक्षाची गोष्ट तोंडावाटेसुद्धां काढूं नये.

धर्मसंचय कर्मावर अवलंबून आहे, या तत्त्वाचा विचार आपण पूर्वी एकवार केलाच आहे. प्रत्येक कर्म उत्साहपूर्वक आणि सफाईनें पार पाडावयाचें असा खऱ्या धार्मिक मनुष्याचा स्वभाव असतो. ज्यांत कोणतेंही कर्म सांगितलें नाहीं असा वेदाचा भाग हा खरोखर वेदभागच नव्हे असें कांहीं मीमांसकांचें मत आहे.

'आम्नायस्य क्रियार्थत्वादानर्थक्यमतदर्थानाम्' असें श्रीजैमिनींचें एक सूत्र आहे. कर्ममार्ग सांगणें हा श्रुतींचा हेतु असल्यामुळें ज्या ठिकाणीं क्रिया सांगितली नाहीं, त्या ठिकाणीं वेदांचा हेतु निरर्थक होतो असा या सूत्राचा अर्थ आहे.

'ॐ या एकाच अक्षराच्या जपानें आणि त्याच्याच अर्थाच्या ध्यानानें सर्वार्थांची प्राप्ती होते;' 'परमेश्वराच्या नामस्मरणानें सर्व पापांचें क्षालन होतें;' 'परमे-

श्वराच्या इच्छेवर जो आपला सर्व भार सोंपवितो त्याला सर्व अर्थ प्राप्त होतात,' इत्यादि शास्त्रवचनें आहेत; आणि सत्पुरुषांनींही हेंच सांगितलें आहे हें खरें; पण आपणांपैकीं हजारों लोक सर्व जन्मभर ॐ'चा जप करीत असतात, परमेश्वराच्या नामस्मरणांत दंग असतात, आणि आपला सर्व भार त्याचे इच्छेवर टाकीत असतात; आणि असें असतांही याचा मोबदला त्यांना काय मिळतो? या प्रश्नाचें उत्तर 'कांहीं नाहीं' असेंच दिलें पाहिजे. तर मग हीं शास्त्रवचनें खोटीं आहेत का? या वस्तुस्थितीचें कारण काय आहे? याचा चांगला विचार करून तें कारण प्रथम चांगलें समजावून घेतलें पाहिजे. कोणाचें ध्यान खरें असतें व त्याचा काय उपयोग होतो हें प्रथम पाहिलें पाहिजे. खरोखर परमेश्वराच्या इच्छेवरच ज्यांनीं आपला भार सर्वथा अंतःकरणपूर्वक सोंपविला आहे असे लोक कितीसे सांपडतील? ज्यांच्या नामोच्चारांत वज्राघाताचें सामर्थ्य आहे असे लोक कितीसे आहेत? ज्याची चित्तशुद्धि झाली असेल तोच या गोष्टी करूं शकेल. कर्मावांचून चित्तशुद्धि होणें शक्य नाहीं, आणि चित्तशुद्धीवांचून धार्मिक बनणेंही शक्य नाहीं.

प्रत्येक व्यक्ति म्हणजे मूल शक्तीच्या स्पष्टीकरणाचें एक साधन होय. आपणांमध्यें पूर्व कर्माच्या योगानें या शक्तीचा सांठा तयार झालेला असतो. आपण जन्मास येतों त्या वेळीं हा सर्व सांठा आपल्याबरोबरच आलेला असतो. हा सर्व संचय फलाच्या रूपानें संपून जाईपर्यंत स्वस्थ बसणें अथवा कर्मत्याग करणें आपणांपैकीं कोणास तरी शक्य आहे काय? आपल्या पूर्व सत्कर्मांचे अथवा दुष्कर्मांचे जे कांहीं बरेवाईट परिणाम तयार झाले असतील त्यांचा उपभोग आनंदरूपानें अथवा दुःखरूपानें घेतल्यावांचून आपली सुटका होणें शक्य नाहीं. पूर्व कर्मांच्या परिपाकानुरूप जी प्रकृति आपणांपैकीं प्रत्येकाच्या ठिकाणीं वास करीत आहे ती आपणांस कर्म करावयास भाग पाडल्यावांचून राहाणार नाहीं. **'यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे। मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति॥'** असें जें भगवान् श्रीकृष्णांनीं अर्जुनास म्हटलें आहे तें आपणापैकीं प्रत्येकानें नित्य लक्षांत ठेविलें पाहिजे. याकरितां कर्म करणें जोंपर्यंत आपणांस भाग आहे, तोंपर्यंत दुष्कर्म आचरण्यापेक्षां सत्कर्म आचरून दुःखाचा निरास करणें व सुख भोगणें अधिक इष्ट नाहीं काय? जगांत चांगलें आणि वाईट असे



नो. ५५६
२९/१०/२६

दोन प्रकार आहेत. यांपैकीं चांगलें स्वीकारणें अधिक बरें असें श्रीरामप्रसाद या नांवाचे एक बंगाली साधू म्हणत असत.

आतां ' चांगलें ' म्हणजे काय ? याचाही विचार करणें अवश्य आहे. जो कोणी मोक्षाची इच्छा करितो त्याच्या दृष्टीनें चांगला असणारा मार्ग वेगळा आणि धर्मार्थी मनुष्याच्या दृष्टीनें चांगला मार्ग वेगळा असतो. भगवान् श्रीकृष्णांनीं गीतेंत याच महत्त्वाच्या मुद्द्याचें विवरण उत्तम रीतीनें केलें आहे. याच तत्त्वाच्या अनुरोधानें वर्णाश्रमधर्माची स्थापना झाली असून याच तत्त्वावर स्वधर्माचीहि उभारणी झाली आहे. ' **निर्वैरः सर्वभूतानां मैत्रः करुण एव च । निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ।** ( गीता १२–१३ ) ज्याला कोणीही शत्रू नाहीं, जो सर्वांचा मित्र असून सर्वांबद्दल ज्याच्या हृदयांत करुणा आहे, ज्याच्या ठिकाणीं मी आणि माझें यांचा लोप झाला आहे, ज्याचा अहंकार नष्ट झाला आहे आणि सुखदुःखांच्या ठिकाणीं ज्याची समवृत्ति झालेली आहे तो मोक्षाची इच्छा करणारा असून भगवंताचे हे शब्द फक्त त्यालाच लागू आहेत; आणि ' **क्लैब्यं मास्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते । क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ।** ' व त्याचप्रमाणें ' **तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व जित्वा शत्रून् भुंक्ष्व राज्यं समृद्धम् । मयैवैते निहताः पूर्वमेव निमित्तमात्रं भव सव्यसाचिन्** " इत्यादि भगवंतांचा गीतेंतील उपदेश धर्मार्थी मनुष्यांकरितां आहे. धर्मसाधनाचा खरा मार्ग कोणता याचा उपदेश भगवंतांनीं अशा प्रकारें केला आहे. आतां कर्म म्हटलें म्हणजे त्यांत बरें आणि वाईट या दोहोंचीही सरमिसळ असावयाची हेंही खरें असून प्रत्येक कर्म करणारास कमी अधिक प्रमाणानें पापाचा अधिकारी व्हावें लागतें हेंही खरें आहे; पण असें असलें म्हणून काय झालें ? कांहींच न करतां काष्ठलोष्ठवत् होऊन पडण्यापेक्षां थोड्या पापाचाही स्वीकार करणें अधिक बरें नव्हे काय ? अगदींच उपाशीं मरण्यापेक्षां थोडें कमी अन्न असलें तरी बरें नव्हे काय ? कोणतेंही कर्म न करतां सारा जन्म आळसांत घालवून दगडासारखें होऊन पडण्यापेक्षां बऱ्यावाइटाची सरमिसळ असलेलें कर्म करणें अधिक बरें नाहीं काय ? एखादा बैल साऱ्या जन्मांतही खोटें बोलत नाहीं अथवा एखादा घोंडा कधींच चोरी करीत नाहीं, पण बैल तो बैल आणि घोंडा तो घोंडा, हेंही खरें नाहीं काय ? मनुष्यें चोऱ्या करतात आणि मनुष्यें खोटेंही बोलतात; पण मनुष्येंच

मोक्षही मिळवितात हें खरें नाहीं काय ? सत्त्वगुणाचें प्राधान्य झालें म्हणजे मनुष्य कर्म करीत नाहीं आणि अत्यंत गूढ अशा ध्यानांत मग्न होऊन बसतो. रजोगुणाचें आधिक्य असलें म्हणजे तो वरीं आणि वाईट अशीं दोन्हीं प्रकारचीं कर्में करितो आणि तमोगुणांचें आधिक्य झालें म्हणजे तो स्तब्ध आणि निष्कर्म होऊन बसतो. आतां अशा रीतीनें स्तब्ध असलेल्या मनुष्याच्या ठिकाणीं सत्त्वगुणाचें आधिक्य आहे कीं तमोगुणाचें आधिक्य आहे हें आपणास केवळ बाह्यदृष्ट्या पाहून कसें ठरवितां येईल ? सत्त्वगुणाचें आधिक्य असल्यामुळेंच आपण सर्व शांततेच्या स्थितीस प्राप्त झालों आहों काय ? आपण सुखदुःखातीत झालों आहों काय ? आणि यामुळेंच कर्मत्यागाचा अधिकार आपणास प्राप्त झाला आहे काय ? अथवा तमोगुणाच्या आधिक्यामुळें आपण निर्जीव आणि धोंड्यासारखे स्तब्ध पडलेले आहों ? काम करण्याचें सामर्थ्यच नष्ट झालेलें असल्यामुळें आपण निष्कर्म झालों आहों काय ? असें झालें असेल तर हळू हळू सडण्याच्या मार्गास आपण लागलों आहों असें म्हटलें पाहिजे. प्रिय बांधवहो, हे प्रश्न अत्यंत कळकळीनें आणि मनःपूर्वक मी आपणांस विचारीत आहें. हा विषय थट्टेचा नव्हे. या प्रश्नांचीं उत्तरें तुम्हीं मला अवश्य दिलीं पाहिजेत. या प्रश्नांची चर्चा तुम्ही आपल्या मनाशींच करा; म्हणजे वस्तुस्थिति काय आहे याचा उलगडा तुम्हांस होईल; पण या प्रश्नांच्या उत्तरांसाठीं वाट पाहण्याची तरी आवश्यकता कोठें आहे ? झाडाची परीक्षा फळावरूनच होते. ज्याच्या ठिकाणीं सत्त्वगुणाचें प्राबल्य झालें आहे तो मनुष्य निष्कर्म आणि शांत असतो ही गोष्ट खरी; पण प्रचंड शक्तींच्या केंद्रीकरणामुळेंच ही शांतता आलेली असते. या बाह्य शांततेच्या पोटीं प्रचंड सामर्थ्य एकवटलेलें असतें. आपणा सामान्य मनुष्यांस आपल्या हस्तपादादि अवयवांनीं ज्याप्रमाणें कर्में करावीं लागतात, त्याप्रमाणें सात्त्विक मनुष्यास तीं अवयवांनीं करावीं लागत नाहींत. इंद्रियांचा उपयोग करण्याचें कारणच त्याला नसतें. ज्याच्या ठिकाणीं असा मूर्तिमंत सत्त्वगुण अधिष्ठित झालेला असतो तो खरा ब्राह्मण असून तो सर्वांची पूजा घेण्यास योग्य असतो. अशा ब्राह्मणाची प्रत्येकानें पूजा केली पाहिजे असें जणूं काय प्रकृतिमातेनें त्याच्या भालीं स्वहस्तें लिहिलेलें असतें. प्रकृतीचा हा लेख सर्व जगास स्पष्ट दिसतो, आणि प्रकृतिमातेची ही आज्ञा शिरसावंद्य मानून अशा सत्पुरुषाच्या पदकमलीं जग लोटांगण

घालीत असतें. 'निर्वैरः सर्व भूतानां' इत्यादि विशेषणें अशाच पुरुषाला मात्र पूर्णपणें लागू पडतात; आणि तुम्ही हेंही लक्षांत ठेवा कीं, जे लोक क्लीबत्वाची भाषा बोलतात, आठपंधरा दिवस पोटाला न मिळाल्याप्रमाणें ज्यांचा आवाज अतिशय खोल गेला आहे, भिजलेल्या चिंधीप्रमाणें ज्यांचा ताठरपणा समूळ नष्ट झालेला आणि कोणीं लत्ताप्रहार केला असतांही ज्यांच्या तोंडांतून चकार शब्द-सुद्धां निघत नाहीं ते लोक तमोगुणांत बुडालेले आहेत. हीं चिन्हें मृत्यूचीं आहेत. हीं लक्षणें जिवंतपणाचीं नव्हत. यांत सत्त्वगुणाचा लवलेशही नाहीं. अशा लोकांचे अंतरात्मे सडण्याच्या मार्गास लागलेले आहेत असें पक्कें समजावें. अर्जुनही अशाच प्रकारच्या लोकांच्या पंक्तीस बसण्याच्या बेतांत आला होता; आणि याकरितांच भगवंतांनीं गीतारूपानें त्याला इतका विस्तृत उपदेश केला. अर्जुनाची स्थिति अशीच झाली नव्हती काय? भगवंतांनीं पहिले उच्चारलेले शब्दच या गोष्टीची साक्ष देत आहेत. भगवान् म्हणतात, '**क्लैब्यं मास्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते।**' 'पार्था, असें क्लीबत्व धारण करूं नको. हें तुला शोभत नाहीं.' पुढें अकराव्या अध्यायांत भगवान् म्हणतात, '**तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व**' 'याकरितां तूं उठ; आणि यशाचा लाभ करून घे.' जैन, बौद्ध आणि त्यांच्याच पंक्तीचे इतर मतवादी वगैरे लोकांची छाप आपणांवर पडल्यामुळें आपण या तमोगुणप्रधान लोकांच्या स्थितीस येऊन पोहोंचलों. गेलीं हजार वर्षें आपला सारा देश परमेश्वराच्या नामस्मरणानें दुमदुमून गेला आहे. हजार वर्षें तो एकसारखी प्रार्थना करीत आहे; आणि चमत्कार हा कीं, परमेश्वर आपले कान अगदीं बहिरे करून बसला आहे. पण त्यानें तरी आमची प्रार्थना कां ऐकावी? एखाद्या मूर्खाच्या ओरडीकडे आपण सामान्य मनुष्येंसुद्धां जर दुर्लक्ष करतों तर परमेश्वरानें दुर्लक्ष केल्यास काय नवल? आतां या दुर्गतिपंकांतून आपणास बाहेर पडावयाचें असेल तर '**क्लैब्यं मास्म गमः**' या भगवंतांच्या उपदेशाकडे लक्ष देणें एवढाच मार्ग आपणास मोकळा आहे. असो.

आतां हें विषयांतर बाजूस ठेऊन आपण आपल्या चालू विषयाकडे वळूं. आपला चालू विषय पूर्व आणि पश्चिम असा आहे. येशू ख्रिस्त हा युरोपियनांचा देव असून तो काय उपदेश करीत आहे पहा. "कोणाशींही शत्रुत्व करूं नका. जे तुम्हांला शाप देत असतील त्यांना तुम्ही आशीर्वाद द्या. कोणीं तुमच्या उजव्या

गालावर मारलें तर दुसरा गालही त्याच्यापुढें करा. ऐहिक कर्मे टाकून देऊन परलोकसाधन करा. जगाचा शेवट जवळ आला आहे." आतां भगवान् श्रीकृष्ण गीतेंत काय म्हणतात पहा. "सदोदित उत्साहपूर्वक कर्मे करा. आपल्या शत्रूंस मारून राज्य भोगा." पण या दोन उपदेशांचे परिणाम दोन ठिकाणीं अगदीं वेगवेगळे झाले आहेत. ख्रिस्ताच्या मनांत जें करावयाचें होतें त्याच्या उलट युरोपांत घडून आलें आणि आमच्या देशांत भगवान् श्रीकृष्णांच्या उपदेशाचा परिणामही अगदीं उलट झाला. भगवान् येशू ख्रिस्ताच्या उपदेशाकडे युरोपीय लोकांनीं मनापासून कधींही लक्ष दिलें नाहीं. ते जन्मतःच कर्मपरायण आणि प्रकृतिस्वभावानें अत्यंत राजसी असल्यामुळें मोठा खटाटोप करून साऱ्या जगांत उपलब्ध होणारे चैनीचे पदार्थ मोठ्या अट्टाहासानें ते प्राप्त करून घेत आहेत आणि त्यांचा यथेच्छ उपभोगही घेत आहेत आणि उलटपक्षीं आम्ही कोंपऱ्यांत बसून राहिलों आहोंत. आम्ही रात्रंदिवस मृत्यूचें चिंतन करीत असून **'नलिनीदलगतजलमतितरलम् तद्वज्जीवितमतिशयचपलम्'** हें गाणें गात आहों. सदोदित मृत्यूचें चिंतन करीत राहिल्यामुळें आमचें सारें रक्त थंड होऊन गेलें असून यमाच्या भीतीमुळें आमचे स्नायूही गार पडले आहेत. जणूं काय मृत्यूच्या त्या अधिपतीनें ही आमची प्रार्थना ऐकिली ! आणि प्लेग, महामारी आणि दुसरे आपले हजारों दूत आपल्या देशांत पाठवून दिले ! गीतेच्या उपदेशाप्रमाणें कोण वर्तत आहे ? असें वर्तन करणारे लोक युरोपीयच होत. आणि भगवान् ख्रिस्ताचा उपदेश जर कोणाला पटला असेल तर तो आम्हां श्रीकृष्णाच्या वंशजांसच होय. मोक्षाचा मार्ग प्रथम शोधून काढून तो सर्वांपुढें उघडपणें मांडण्याचें कार्य प्रथम श्रुतींनींच केलें हें नीट ध्यानांत ठेवा. बुद्ध, ख्रिस्त अथवा दुसरे कोणीही महात्मे झाले तरी त्यांच्या उपदेशाचा मूळ झरा श्रुतींतच आहे. बुद्ध आणि ख्रिस्त इत्यादि महात्मे संन्यासी असल्यामुळें ते अजातशत्रु होते आणि यामुळेंच सर्व भूतांच्या ठिकाणीं ते सकरुणही होते. त्यांच्या दृष्टीनें त्यांचा मार्ग उत्तम होता यांत शंका नाहीं. त्यांच्या स्थितींतल्या पुरुषांस त्यांचा उपदेश योग्यच होता; पण साऱ्या जगाला या मोक्षमार्गावर आरूढ होण्याचा जुलूम करणें योग्य आहे काय ? हा प्रयत्नच फुकट आहे. गाढवाला कितीही धुतलें आणि मर्दन केलें तरी त्याचा घोडा होईल काय ? जुलमानें अथवा प्रार्थनेनें कोणाला मोक्षमार्गाला लावतां येईल काय ?

पण मोक्षमार्गावर आरूढ होण्याची ज्यांची इच्छा नाहीं अथवा तसें करण्यास जे योग्य नाहींत अशा प्रकारच्या लोकांची सोय बुद्धानें अथवा ख्रिस्तानें कशी केली आहे याचाही विचार केला पाहिजे. त्यांची सोय त्यांनीं कांहींच केली नाहीं. ‘एक मोक्ष तरी मिळवा अथवा खुशाल मरून जा’ असाच त्यांचा उपदेश आहे. मोक्ष अथवा संपूर्ण नाश या दोहोंशिवाय तिसरा मधला मार्ग त्यांनीं मुळींच दाखविलेला नाहीं. मोक्षाशिवाय इतर कशाचीही खटपट तुम्ही करूं लागलां तर बुद्ध व ख्रिस्त तुमचे हातपाय तावडतोब बांधून टाकतात. अल्प काळ तरी लौकिक सुखें कशीं भोगावीं याचा मार्ग त्यांनीं मुळींच दाखविलेला नाहीं. या मार्गावर कांटेरी कुंपणें घालून त्यांनीं तो पक्का बंद करून टाकिला आहे. एवढेंच नव्हे तर त्या मार्गास जाऊं पहाणाराच्या वाटेंत जागोजाग त्यांनीं खड्डेही खणून ठेविले आहेत. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थांची प्राप्ति करून घेण्याचा रस्ता फक्त श्रुतींनींच दाखविला आहे. बुद्धानें आमचें वाटोळें मात्र केलें. त्याचप्रमाणें ग्रीसचें आणि रोमचें ख्रिस्तानें वाटोळें केलें. यानंतर कालेंकरून युरोपीय लोकांच्या सुदैवानें प्रॉटेस्टंट अथवा ख्रिस्तीधर्मसुधारकांचा पंथ उदयास आला. या पंथानें पोपगुरूच्या उपदेशास धुडकावून लाविलें. या पंथाच्या उदया-मुळें युरोपीय लोकांच्या छातीवरील मोठी धोंड उचलली गेली. हिंदुस्थानांत कुमारिल भट्टाचा जन्म होऊन त्यानें कर्ममार्गाचें पुनरुज्जीवन केलें आणि श्रीशंकरा-चार्य आणि श्रीरामानुज यांनीं सनातनधर्माचा पाया पक्का करून धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थांचे परस्पर संबंध समतोल आणि समप्रमाण केले. या महापुरुषांच्या उद्योगामुळें आर्यभूमीचा गेलेला जीव पुन्हां परत येण्याच्या मार्गास लागला; पण हिंदुस्थान हा तीस कोटी जीवांचा देश असल्या-मुळें या कार्याला थोडा अवधि लागत आहे. तीस कोटी लोकांत जागृति आण-ण्याचें कार्य एका दिवसांत होऊं शकेल काय ?

बौद्ध आणि वैदिक या दोन्ही धर्मांचें अंतिम कार्य एकच आहे. पण तें साध-ण्यासाठीं बौद्धधर्मानें स्वीकारलेला मार्ग मात्र चुकीचा आहे. बौद्धधर्माचा मार्ग बरोबर असता तर आज आपली इतकी निराशाजनक दशा कां झाली असती ? केवळ कालावधीमुळें ही दुर्दशा घडून आली आहे असें म्हणणें सयुक्तिक होणार नाहीं. कार्यकारणभावाचे कायदे उलंघन करून कोणतेंही कार्य काल करूं शकतो काय ?

यामुळें बौद्धधर्माचें साध्य वैदिक धर्मासारखेंच असलें तरी त्याचा मार्ग चुकीचा असल्यामुळें हिंदुस्थानास त्यानें अवनति मात्र प्राप्त करून दिली. माझ्या या म्हणण्यामुळें माझ्या बौद्धबंधूंस कदाचित् राग येईल आणि ते आकाशपाताळ एक करून सोडतील हेंही खरें; पण असें म्हणण्यावांचून गत्यंतर काय आहे ? जें सत्य असेल तें बोललेंच पाहिजे; मग त्याचा परिणाम कांहींही झाला तरी त्याची पर्वा मी करीत नाहीं. वेदांनीं सांगितलेला जातिधर्माचा अथवा वर्णाश्रम-धर्माचा मार्गच बरोबर आहे. तो प्रत्येक वर्णाचा स्वधर्म आहे. या आंखून दिलेल्या मार्गाप्रमाणें प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या परिस्थितीप्रमाणें आणि सामर्थ्यास अनुरूप अशीं कर्तव्यें लावून दिलीं आहेत. वैदिक धर्माचा आणि त्याच्या अनुयायी समाजाचा मूळ पाया वर्णाश्रमधर्म हाच आहे. मी आपल्या स्वदेशबांधवांची आणि स्वधर्मबांधवांची मिथ्या स्तुति करीत आहें अशा भ्रमानें माझ्या कित्येक मित्रांस राग येईल हेंही मी जाणून आहें; पण प्रश्न इतकाच कीं अशा प्रकारची खोटी स्तुति करून मला काय फायदा आहे ? माझे बांधव मला कांहीं द्रव्यदान करीत आहेत का ? अथवा दुसऱ्या कोणत्याही रीतीनें ते माझ्या उपयोगीं पडत आहेत का ? उलट बाह्य देशांत भिक्षा मागून जो पैसा मी मिळवितों तो माझ्यापासून उपटण्याचा यत्न मात्र ते करीत आहेत. हिंदुस्थानांतील पोरकीं पोरें आणि दुष्काळग्रस्त लोक यांचीं पोटें माझ्या भिकेच्या पैशावर भरावीं अशी माझ्या देशबांधवांची खटपट आहे. आणि हा पैसा त्यांना मीं न दिला तर माझी नालस्ती करून मला शिव्या देण्यासही ते मागेंपुढें पाहात नाहींत. माझ्या सुशि-क्षित बांधवांनो ! माझे देशबंधु अशा प्रकारचे लोक आहेत. त्यांची खोटी स्तुति करून अखेरीस माझ्या पदरीं काय पडणार हें मी पक्कें जाणून आहें. ते भ्रमिष्ट आहेत असें समजूनच त्यांच्याशीं वागलें पाहिजे. एखाद्या वेड्याला आपण औषध पाजूं लागलों तर लाथांची आणि चावण्याची बक्षिशी घेण्याची तयारी आपण ठेविली पाहिजे. लाथा सोसूनही जो कोणी त्याच्या घशांत औषध ओतील तोच त्याचा खरा मित्र होय.

जातिधर्म अथवा स्वधर्म हाच मार्ग अंतिम साध्यास पोंचविण्यास युक्त आहे असें सर्वत्र आढळून येईल. जगांतील सर्व समाजांत हाच मार्ग कल्याणप्रद असून मुक्तिमार्गाची ही एक शिडी आहे. या स्वधर्माचा विसर आपणास पडल्यामुळेंच

आपण सांप्रतच्या अवनतदशेस आलों आहों; पण स्वधर्म या शब्दाचा जो अर्थ सांप्रतच्या उच्चवर्णीयांत रूढ झाला आहे तोही मूर्खपणाचा आहे; त्याच्यासंबंधीं सावधगिरी बाळगणें अवश्य आहे. जातिधर्माचें प्रत्येक अंग आपणास पूर्णपणें माहित आहे अशी उच्चवर्णीयांची समजूत आहे; पण वास्तविक पाहतां या ज्ञानाचा गंधही त्यांस नाहीं. आपल्या खेड्यांत चालू असलेल्या रीतीभाती हाच श्रुतीचा वर्णाश्रमधर्म आहे अशी आपली ठाम समजूत करून घेऊन आणि सर्व प्रकारचे हक्क बळकावून बसून हे उच्चवर्णीय लोक विनाशाच्या पंथास झपाट्यानें लागले आहेत. गुणकर्मविभागानें उत्पन्न होणाऱ्या जातींबद्दल हें माझें म्हणणें नसून जन्मसिद्ध जातिभेदाबद्दल मी बोलत आहें. जातिभेदाचा मूळ पाया गुणकर्मविभाग हाच होय हें मी कबूल करतों. पण हे गुण दोनतीन पिढ्यांच्या अवधींत आनुवंशिक होऊन बसतात हेंही आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. आपल्या सामाजिक जीवनाच्या अत्यंत नाजुक भागासच कीड लागत चालली आहे. तसें नसतें तर आपण सांप्रतच्या अवनतावस्थेस कां पोंहोंचलों असतों ? ' संकरस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः ' असें भगवंतांनीं गीतेंत म्हटलें आहे. हा वर्णसंकर कसा घडून आला ? सांप्रत सर्व जातींची खिचडी बनली असून गुणकर्मविभाग संपूर्ण नाश पावला आहे. असें कां झालें ? आपल्या प्राचीन पूर्वजांचा गौर वर्ण नष्ट होऊन आपला सांप्रतचा काळा वर्ण त्या जागीं कोठून आला ? पूर्वीचा सत्त्वगुण नष्ट होऊन त्या जागीं थोड्याशा रजोगुणानें युक्त असा तमोगुण सर्वत्र कोठून पसरला ? या प्रश्नांचीं उत्तरें देणें म्हणजे एक मोठें महाभारत सांगण्यासारखें आहे. याकरितां तीं देण्याचें काम मी पुढें एखाद्या प्रसंगीं करीन. सध्यां इतकेंच लक्षांत ठेवा कीं, जातिधर्म बरोबर आणि मनःपूर्वक पाळला गेला तर राष्ट्राचा नाश कधींही होत नाहीं. हें खरें असेल तर आमची अवनति कशी झाली याचाही विचार केला पाहिजे. आपण सांप्रतच्या वाईट दशेस येऊन पोहोंचलों आहों यावरूनच जातिधर्माच्या आपल्या मूळ पायांत कांहीं घोटाळा झाला असला पाहिजे हें उघड आहे. यावरून सांप्रत ज्याला आपण जातिधर्म असें नांव देतों तो खरा जातिधर्म नसून खऱ्या जातिधर्माहून तो अगदीं वेगळा आहे. प्रथम आपल्या शास्त्रांचा उत्तम अभ्यास करा. आपलीं शास्त्रें शब्दशः वाचून त्यांचा अर्थ नीट ध्यानीं आणा; म्हणजे त्यांत सांगितलेल्या जातिधर्माचा समूळ नाश झाला

आहे असें आपणांस आढळून येईल. आपल्या साऱ्या देशांत त्या प्राचीन जातिधर्मांचा मागमूसही सांप्रत कोठें उरलेला नाहीं. हा खरा जातिधर्म पुन्हां परत आणण्याचा खटाटोप तुम्हीं केला तर देशावर तो एक महदुपकार होईल यांत शंका नाहीं. मला जें कांहीं समजलें आहे तें तुम्हांपुढें स्पष्ट बोलून दाखविण्याचें कार्य मी करीत आहें. तुमच्या कोणत्याही मूर्खपणाच्या चालीरीतीची वाहवा करून तिला सशास्त्र स्पष्टीकरणाचा पाठिंबा देण्यास मी तयार नाहीं. तुम्हांला तारण्याचा आव घालून जे परदेशीय लोक येथें येतात त्यांनाच हें करणें शोभतें. असें करण्यांत त्यांच्या पदरची दीडदमडी खर्च होत नसल्यामुळें तुमच्या कोणत्याही वेडगळ चालींची वाहवा करणें त्यांस परवडतें. त्यांच्या या अघळपघळ स्तुतीनें भुलून जाऊन तुम्हीही त्यांची स्तुति करतां. तुमच्याकडून वाहवा मिळाली म्हणजे त्यांचेंही काम संपलें. तुमच्यावर खोट्या निंदेचा चिखल मीं उडविला तर तो माझ्याही तोंडावर पडत नाहीं काय ? मी तुमचाच देशबांधव असल्यामुळें तुमची निंदा ती माझीच निंदा होते याची वाट काय ?

प्रत्येक राष्ट्राला त्याचें राष्ट्रीय ध्येय म्हणून असतें हें मीं दुसरीकडे सांगितलेंच आहे. प्रत्येक राष्ट्राच्या प्रकृतिस्वभावास अनुसरून अथवा त्यांतील महापुरुषांच्या अनुसंधानानें त्या राष्ट्रांतील चालीरीती बनत असतात; आणि याचमुळें त्या राष्ट्राचें ध्येय सिद्ध होण्याच्या मार्गास लागलेलें असतें. प्रत्येक राष्ट्राचें हें ध्येय अथवा साध्य सिद्ध करण्याकरितां ज्या चालीरीतींचा उपयोग होतो त्यांखेरीज इतर चालीरीती निरुपयोगी असतात. या इतर चालीरीती वाढत गेल्या अथवा मुळींच नामशेष झाल्या तरी राष्ट्रीय जीवितावर त्याचा कांहीं परिणाम होत नाहीं; पण एखाद्या राष्ट्राच्या अंतिम साध्याला धक्का बसला म्हणजे मात्र तें राष्ट्र निश्चयेंकरून मृत्युपंथास लागेल.

"कोणी एका गांवीं एक चेटकीण रहात होती. तिचा मृत्यु एका पक्ष्याच्या देहांत होता. तो पक्षी मरेपर्यंत तिला मरण येणें शक्य नव्हतें." अशा प्रकारच्या गोष्टी आपल्या लहानपणीं आपण पुष्कळ ऐकल्या असतील. राष्ट्रीय जीवितही याच प्रकारचें आहे. त्याचप्रमाणें आपल्या साध्याच्या विरुद्ध न येणारे असे कांहीं हक्क एखाद्या राष्ट्राकडून हिरावून घेतले तर त्याबद्दल तें राष्ट्र फारशी

तक्रार करणार नाहीं ही गोष्टही आपल्या निरीक्षणांत आली असेल. अशा प्रकारचे त्यांचे सगळे हक्क नष्ट झाले तरी त्याबद्दल त्या राष्ट्रांत यत्किंचितही चळवळ व्हावयाची नाहीं; पण ज्या मूळ ध्येयावर अथवा हेतूवर त्या राष्ट्राचें जीवित अवलंबून आहे, त्या हेतूला यत्किंचितही धक्का लागतांच साऱ्या राष्ट्रांतून प्रतिक्रियेचा प्रचंड ध्वनि उद्भवूं लागतो, हेंही आपल्या अवलोकनांत आलें असेल.

सांप्रतच्या तीन राष्ट्रांचें उदाहरण आपण घेऊं. या तिन्ही राष्ट्रांचा थोडा फार इतिहास आपणा सर्वांस अवगत आहेच. हीं तीन राष्ट्रें म्हणजे फ्रान्स, इंग्लंड आणि हिंदुस्थान हीं होत. राजकीय स्वातंत्र्य हा फ्रेंच राष्ट्राचा जीवितहेतु आहे. अनेक प्रकारचे जुलूम झाले तरी फ्रेंच प्रजाजन ते निमूटपणें सोसतील. त्यांच्यावर अवजड करांचें ओझें लादलें तरी त्याबद्दल एक चकार शब्दसुद्धां त्यांच्या मुखावाटे निघणार नाहीं. लष्करी नोकरी करण्यास सर्व राष्ट्रास भाग पाडलें तरी त्याबद्दल फ्रेंच लोक तक्रार करणार नाहींत; पण त्यांच्या राजकीय स्वातंत्र्यावर घाला घालण्याचा यत्न कोणींही केला तर त्याच क्षणीं सारें राष्ट्र खवळून उठेल आणि एकदिलानें प्रतिकार करूं लागेल. आम्हांपैकीं कोणी विद्वान् असला अथवा अज्ञ असला, कोणी गरीब असला अथवा श्रीमंत असला आणि कोणी सरदार असला अथवा भिकारी असला तरी आमच्या देशाच्या राज्यकारभारांत आम्हां सर्वांस सारखाच हक्क असून कोणासही आम्ही तो हिरावूं घेऊं देणार नाहीं, असा फ्रेंच लोकांचा अट्टाहास आहे. त्यांच्या राष्ट्रीय जीविताचा हा मूळ हेतु आहे. या स्वातंत्र्यावर गदा घालण्याचा यत्न जो कोणी करील त्याजकडून योग्य दंड वसूल करून घेतल्याशिवाय फ्रेंच लोक कधींही स्वस्थ बसावयाचे नाहींत.

'दे वाण घे वाण' हा इंग्रजी राष्ट्राचा प्रकृतिस्वभाव आहे. वैश्यकर्माला अनुरूप असा हा स्वभाव आहे. हक्कांची समतोल प्रमाणानें वांटणी हें इंग्रज राष्ट्राचें जीवित आहे. राजाचे हक्क अथवा सरदार घराण्यांचे विशिष्ट हक्क इंग्रज लोक निमूटपणें कबूल करतील; पण त्यांच्या खिशांतून एक पै कोणीं मागितली तर तिचा हिशेब मागितल्यावांचून ते राहाणार नाहींत. इंग्लंडांत राजा आहे. ठीक आहे. तो असण्यास त्यांची हरकत नाहीं. त्याची आज्ञा पाळण्यास आणि

त्याचा वडेजाव करण्यास इंग्रज लोक तयार आहेत; पण त्या राजाला पैशाची जरूर लागली कीं ते पहिला प्रश्न असा विचारतील कीं, "ठीक आहे; पण हा पैसा कशाला पाहिजे आणि त्याचा उपयोग देशाला काय होणार हें आम्हांला प्रथम सांगा. दुसरें असें कीं, तो कोणत्या रीतीनें आणि कोणत्या कामीं खर्च होईल हेंही आम्हांस सांगा, म्हणजे तो आम्ही तुम्हांस देऊं." एका प्रसंगीं एका राजानें सक्तीनें पैसा वसूल करण्याचा यत्न केला असतां इंग्रज प्रजाजनांनीं त्याचा वध केला.

राजकीय स्वातंत्र्य आणि सामाजिक स्वातंत्र्य हीं आपापल्यापरी ठीक आहेत. पण मुक्ति ही या दोहोंहूनही श्रेष्ठ आहे असें हिंदुलोक म्हणतात. आमचा राष्ट्रीय हेतु मुक्ति हा आहे. तुम्ही एखाद्या वैदिकाला विचारा अथवा एखाद्या जैनाला, बौद्धाला, अद्वैतवाद्याला, विशिष्टाद्वैतवाद्याला, द्वैतवाद्याला अथवा दुसऱ्या कोणत्याही पंथवाल्याला प्रश्न करा, ते सारे हेंच उत्तर तुम्हांस देतील. या मूळ हेतूला धक्का न लावतां दुसऱ्या कोणत्याही बाबींत येथें कोणीं उलथापालथ केली तरी हिंदुलोक त्याकडे ढुंकूनही पाहाणार नाहींत; पण या जीवितहेतूला धक्का लावण्याचा यत्न जो कोणी करील त्यानें मात्र सांभाळून असावें. अशा आपल्या कृतीनें तो आपल्याच पायावर खचित धोंडा पाडून घेईल. हिंदुलोकांजवळ असेल नसेल तें सारें बुचाडून घ्या, त्यांना वाटेल तितक्या वाईट रितीनें वागवा, वाटल्यास त्यांना शिव्या द्या, अथवा प्रसंगीं लत्ताप्रहारही करा; या साऱ्या गोष्टींकडे ते कानाडोळा करतील. त्यांच्या जीवितहेतूला धक्का न लागेल याबद्दल मात्र काळजी घेणें अवश्य आहे. धर्माचा दरवाजा तुम्हीं मोकळा ठेवला म्हणजे बाकीच्या साऱ्या वाईट गोष्टी हिंदुलोकांस मंजूर आहेत. अनेक पठाण वंश हिंदुस्थानांत आले व आपलें साम्राज्य स्थापण्याचा यत्न त्यांनीं केला; पण हिंदुधर्मावर त्यांचा कटाक्ष असल्यामुळें त्यांपैकीं एकाचीही डाळ येथें शिजली नाहीं. उलटपक्षीं मोंगल साम्राज्याचा पाया येथें किती पक्का झाला होता याचाही विचार करा. हा फरक कशानें झाला? याचें कारण इतकेंच कीं मोंगल राजांनीं या मूळ जीवितहेतूला धक्का लावण्याचा यत्किंचितही यत्न केला नाहीं. फार काय सांगावें, पण मोंगल साम्राज्याचे आधारस्तंभ हिंदूच होते. जहांगीर आणि शहाजहान यांच्या माता हिंदु होत्या हें आपणांस माहीत नाहीं काय? आतां यानंतर काळ कसा एकदम

फिरला हेंही पहा. दुर्दैवी औरंगजेबानें हिंदुधर्माला बोट लावण्याचा यत्न करतांच मोंगल साम्राज्य स्वप्नवत् झालें. इंग्रजी रियासतीचा पाया येथें इतका पक्का रोंवला गेला याचें तरी कारण काय? याचें कारण हेंच कीं, आमच्या राष्ट्रीय जीवितहेतूस धक्का लावण्याचा यत्न इंग्रज लोक मुळींच करीत नाहींत. या हेतूला थोडासा स्पर्श करण्याचा यत्न एका ख्रिस्ती मिशनऱ्यानें १८५७ सालीं केला, आणि त्याचा परिणाम काय झाला हें आपणा सर्वांस विदित आहेच. आमचा राष्ट्रीय जीवितहेतु काय आहे हें पक्कें लक्षांत ठेऊन तदनुसार इंग्रज लोक जोंपर्यंत आपलें वर्तन ठेवतील तोंपर्यंत त्यांच्या हिंदी साम्राज्याला यत्किंचितही धक्का लागणार नाहीं. 'हिंदुस्थानांतील ४१ वर्षें' हें लॉर्ड रॉबर्टस् यांचें पुस्तक वाचून पहा, म्हणजे शहाण्या आणि दूरदर्शी इंग्रज लोकांस हें तत्त्व कसें पटलें आहे हें तुम्हांस दिसून येईल.

आतां या विवेचनावरून हिंदु राष्ट्राचा अंतरात्मा कशांत आहे याचा उमज तुम्हांस बरोबर पडला असेल. धर्म हा आमचा जीवितहेतु आहे. हा आमचा जीवितहेतु कोणासही नष्ट करतां न आल्यामुळें हिंदुराष्ट्र अद्यापि जिवंत आहे. हिंदुराष्ट्रावर अनेक आपत्ती कोसळल्या आणि अनेक अस्मानी सुलतानीचे प्रसंगही त्यानें पाहिले, पण इतक्या आपत्तींतूनही त्याचा जीवितहेतु जिवंत राहिल्यामुळें तें राष्ट्र काळाच्या उदरीं गेलें नाहीं. कित्येक हिंदु विद्वान असा एक प्रश्न करीत असतात कीं, धर्म हा हिंदुराष्ट्राचा जीवित हेतु असण्यांत काय उपयोग आहे? यापेक्षां सामाजिक अथवा राजकीय स्वातंत्र्याचें ध्येय त्यानें इतर राष्ट्रांप्रमाणें आपल्यापुढें कां ठेवूं नये? अशा प्रकारें बोलणें हें फार सोपें आहे. क्षणभर तुमचा मुद्दा गृहीत धरून धर्म, मुक्ति, आत्मा आणि परमेश्वर इत्यादि वस्तु निव्वळ थोतांड आहेत असेंही घटकाभर कबूल केलें, तरी तुमच्या या मताची वाट कशी लागते याचा विचार करूं. या विश्वांत जी एक मध्यवर्ति शक्ति आहे; तीच निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या रूपानें प्रकट होत आहे. फ्रान्सांत तिचें व्यक्त रूप राजकीय स्वातंत्र्य हें आहे. इंग्लंडांत तीच शक्ति वणिग्वृत्तीच्या द्वारानें प्रकट झाली असून हिंदुस्थानांत तीच मुक्तीच्या रूपानें प्रकट झाली आहे. फ्रेंच आणि इंग्रज यांच्या राष्ट्रीय दानतींत जो कांहीं विशेष आज दिसत आहे, तो या शक्तीच्या स्पष्टीकरणाचाच परिणाम आहे. फ्रेंच आणि इंग्रज राष्ट्रांवरही अनेक

शतकांच्या अवधींत अनेक आपत्ती कोसळल्या असतांही त्यांचा जीवितहेतु याच शक्तीच्या बळावर कायम राहिला, आणि याच शक्तीच्या बळावर हिंदूंची सांप्रतची राष्ट्रीय दानत बनली असून तिची वाढ हजारों शतकांपासून होत आली आहे. आतां मी एकच प्रश्न असा विचारतों कीं, हजारों शतकांच्या अवधीमध्यें जी दानत बनत आली आहे तिचा त्याग करणें सोपें आहे काय? परकीयांची वाढ फारच झालें तर कांहीं शतकांपुरतीच आहे. तिचा त्याग करणें सोपें कीं हजारों वर्षांच्या वाढीचा त्याग करणें सोपें, याचें उत्तर नीट विचार करून द्या. आपल्या सर्व क्षात्रवृत्तीचा त्याग करून व लढाया आणि रक्तपात सोडून देऊन इंग्रज लोक एकदम धर्माच्या मार्गे कां लागत नाहींत, या प्रश्नाचें उत्तर आपण द्याल काय?

यांतील मुद्दा इतकाच कीं, आमची ही राष्ट्रीय नदी आपल्या उगमापासून हजारों मैल लांब वहात आली आहे. ती आतां आपल्या उगमस्थानास कधीं तरी परत जाईल काय? अथवा ती परत जाणें शक्य तरी आहे काय? परत जाण्याचा यत्न तिनें केलाच तर तिच्या या उलट्या मार्गांत लक्षावधि ठिकाणीं ती विभागली जाऊन मध्येंच कोरडी ठणठणीत होईल. कसेंही झालें तरी ही नदी अखेरीस समुद्रास मिळणार यांत शंका नाहीं. तिला आपला मार्ग कदाचित् खडकाळ प्रदेशांतून मोठ्या कष्टानें काढावा लागेल अथवा कदाचित् तिच्या मार्गांत सुंदर सपाट भूमिही मिळेल. हजारों वर्षांचें आपलें राष्ट्रीय जीवित ही खरोखरच मोठी चूक असेल तर या गोष्टीस आतां कांहीं उपाय नाहीं; आणि आतां आपल्या राष्ट्रीय ध्येयांत आणि राष्ट्रीय दानतींत कांहीं फरक करण्याचा यत्न आपण केला तर या प्रयत्नाची अखेर एकच होईल. अखेरीस आपण नामशेष होऊं.

आज हजारों वर्षें ज्या मार्गानें आपण चालत आलों तो मार्ग चुकीचा आहे असें आपणास वाटत असेल तर आपला समज कोता आहे अथवा आपण शुद्ध वेडपे आहां असेंच म्हटलें पाहिजे. माझ्या या स्पष्टोक्तीबद्दल मी आपली क्षमा मागतों. परदेशांबद्दल तुम्हांस माहिती करून घ्यावयाची असेल तर तुम्ही स्वतः तेथें जा आणि तेथील लोकांच्या चालीरीती आणि त्यांची परिस्थिति यांचें प्रत्यक्ष अवलोकन करा. या गोष्टीबद्दल दुसऱ्यांनीं पुरविलेल्या माहितीवर अवलंबून राहणें चुकीचें आहे. अशा प्रकारची माहिती प्रत्यक्ष गोळा करून तुम्हांला

कांहीं शहाणपण असेल तर तिचा उपयोग करून या माहितीचा पूर्ण विचार करा. परदेशांबद्दल एवढी तयारी झाल्यानंतर तुम्ही आपले स्वतःचे जुने ग्रंथ वाचा आणि हिंदुस्थानभर प्रवास करून निरनिराळ्या भागांतील लोकांच्या चालीरीतींचें अवलोकन करा. मात्र असें करतांना आपल्या बुद्धीचे डोळे पूर्णपणें उघडे ठेवण्यास विसरूं नका. हें तुम्हीं केलें म्हणजे हिंदुराष्ट्र अद्यापि पूर्णपणें जिवंत असून त्याच्या सर्व नाड्यांच्या ठिकाणीं उष्ण रक्त वाहात आहे असें तुमच्या प्रत्ययास येईल. बाह्यतः दिसणाऱ्या राखेच्या खालीं राष्ट्रीय जीविताचा अग्नि अद्यापिही जिवंत आहे असेंच तुम्हांस स्पष्ट दिसेल. हा अग्नि धर्माच्या रूपानें वास करीत आहे. त्याची भाषा आणि त्याची कल्पना हींसुद्धां धर्मरूपच आहेत. तुमची राजकीय गडबड, तुमची समाजसुधारणा, म्युनिसिपालिट्या, प्लेगचीं कामें आणि दुष्काळनिवारणाचीं कामें इत्यादि गोष्टी तुम्हांस कर्तव्य असतील तर त्याही एकाच मार्गानें करणें या देशांत शक्य आहे. आजपर्यंत या साऱ्या गोष्टी या एकाच मार्गानें होत आल्या आहेत; तो मार्ग म्हणजे धर्म. यावांचून इतर कोणत्याही मार्गानें तुम्हीं कितीही कंठशोष केला तरी त्याचा परिणाम अखेरीस शून्य हाच होणार. मित्र हो, माझी ही सूचना आपण अवश्य लक्षांत ठेवा.

तुम्ही कोणताही देश पहा. त्यांत '**महाजनो येन गतः स पंथाः**' हा नियम सर्वत्र लागू पडत असल्याचें दिसून येतें. देशांतील बुद्धिमान् आणि शक्तिमान् लोक हेच देशाचे खरे नेते असून सामान्य जनता त्यांच्यामागें मेंढरांसारखी जात असते. एखाद्या देशांत पार्लमेंटची सत्ता असली अथवा दुसऱ्या एखाद्या देशांत सिनेटची सत्ता असली तरी अंतीं परिणाम एकच. लोकांना मतांचा हक्क असला आणि मताधिक्यानें काम चालत असलें तरी परिणाम तोच. माझ्या मित्रांनो, सर्व देशांतील सामान्य जनता जवळ जवळ एकाच योग्यतेची असते. देशांतील सत्ताधारी लोक त्यांना वाटेल त्या मार्गानें समाजाला इकडून तिकडे नेत असतात, आणि बाकीची जनता मेंढरांसारखी त्यांच्या मागें जात असते. आतां हिंदुस्थानांत ही सत्ता कोणाच्या हातांत आहे इतकाच काय तो मुद्द्याचा प्रश्न आहे. येथें ही सत्ता धर्मवीरांच्या हातीं आहे. धर्मवीर हेच आमच्या समाजाचे खरे नेते होत. आमच्या देशांत कांहीं सामाजिक कायद्यांची घडामोड व्हावयाची असली तरी ती करणारे लोकसुद्धां हेच. लोकांच्या चालीरीतींत बदल

व्हावा अशा प्रकारची परिस्थिति निर्माण झाली म्हणजे हे धर्मवीर नुसता हुकूम सोडतात आणि आमची सामान्य जनता निमूटपणें तो हुकूम पाळते. इतर देशांत 'मतें,' 'मताधिक्य,' 'सभा' इत्यादि जी गडबड असते ती आमच्या येथें दिसून येत नाहीं ही गोष्ट मात्र खरी; दोहोंमध्यें वस्तुतः परिणाम एकच, पण एकामध्यें गडबड आणि गवगवा अधिक व दुसऱ्यामध्यें शांतता अधिक, हाच काय तो फरक.

आतां युरोपीय पद्धतीनें तेथील सामान्य जनतेस ज्या शिक्षणाचा लाभ होतो, तें शिक्षण आमच्या सामान्य जनतेस मिळत नाहीं ही गोष्ट खरी. पण राजकारणाच्या नांवाखालीं युरोपांतील सामान्य जनतेस लुटणारा व तिचें सर्व रक्त शोषण करणारा असा एक वर्ग तिकडे निर्माण झालेला आहे, तसा तो इकडे नाहीं हेंही खरें आहे. सामान्य जनतेस लुटून युरोपांतील हा वर्ग स्वतःचे खिसे भरीत आहे. माझ्या मित्रांनो, युरोपांतील या बोलघेवड्या राजकारणी लोकांच्या त्या नाटकी हावभावाच्या मागें वस्तुस्थिति काय आहे ती तुमच्या दृष्टीस पडली तर मनुष्यप्राणी किती अवनतावस्थेस जाऊं शकतो याचें उत्तम चित्र तुमच्या नजरेस पडेल. निवडणुकीसारख्या प्रसंगीं लांचलुचपतीचे आणि दिवसाढवळ्या दरवडेखोरपणाचे जे प्रकार राजरोसपणें सुरू असतात, ते तुमच्या नजरेस पडले तर तुमची छाती दडपून जाईल. 'दुधाला कोणी विचारीत नाहीं आणि दारूच्या दुकानांत माणसांचा थवा जमलेला असतो. सच्चरित्र अशा स्त्रीला धडपणें आंगभर वस्त्रही मिळावयाचें नाहीं आणि वेश्येच्या आंगावर सूपभर जवाहीर असावयाचें' अशा प्रकारचें संसाराचें वर्णन एका कवीनें केलें आहे. तुम्ही कोणत्याही देशांत गेलां तरी तेथलें संसारचित्र अशाच प्रकारचें असल्याचें आढळून येईल. ज्यांच्या हातांत लक्ष्मी खेळत आहे, त्यांच्याच हातांत सरकारचीं सारीं सूत्र असून ते आपल्याच तंत्रानें तेथील सरकारास चालावयास लावीत असतात. सामान्य जनतेपाशीं असेल नसेल तो जीवभाव हे लोक बुचाडून घेतात; तेथील सामान्य जनतेस हेच लोक शिपायांच्या रूपानें परदेशीं लढावयास आणि मरावयास पाठवितात. बाह्य देशीं या गरीब लोकांनीं जय मिळविला तर या सत्ताधाऱ्यांचे खिसे अधिकच पिंवळे होतात. सामान्य जनतेच्या रक्ताची किंमत देऊन त्यांनीं हें सुवर्ण विकत घेतलेलें असतें; आणि या साऱ्या खटाटोपांत या सामान्य

जनतेच्या पदरीं काय पडतें म्हणाल तर मृत्यु हेंच. याचें नांव राजकारण! माझ्या मित्रांनो, माझें हें वर्णन ऐकून घाबरून जाऊं नका. राजकारणाचें खरें स्वरूप हेंच. त्याच्या गुंतागुंतीच्या जाळ्यांत फसून जाऊं नका.

प्रथम तुम्हांला मी इतकेंच विचारतों कीं, मनुष्य कायदे करतो किंवा कायदे माणसें करतात? मनुष्य पैशाला निर्माण करतो कीं पैसा मनुष्याला निर्माण करतो? मनुष्य कीर्ति निर्माण करतो कीं कीर्ति मनुष्याला निर्माण करते?

प्रथम खरे पुरुष व्हा; म्हणजे या साऱ्या वस्तु तुमच्यामागें आपोआप कशा धांवत येतात हें तुम्हांस दिसेल. कुत्र्याप्रमाणें शेंपूट हालविण्याची वृत्ति सोडून द्या आणि एकमेकांवर भुंकत बसूं नका. सत्कार्य करण्याचा निश्चय करा. तो पार पाडण्यास लागणारीं योग्य साधनें जमवा. सत्कार्यभावनेचें धैर्य चित्तांत असूं द्या, आणि शौर्यानें पुढें चला. परमेश्वरानें तुम्हांस पुरुषाचा जन्म ज्या अर्थी दिला आहे, त्या अर्थी कांहीं पुरुषार्थ करून त्याची सतत राहणारी खूण मागें ठेवा. “ हे तुलसी, तूं या जगांत प्रथम आलास त्या वेळीं इष्टमित्रांनीं आनंद केला आणि तूं रडलास; आतां अशा प्रकारचीं कृत्यें कर कीं तूं हें जग सोडून जाशील, त्या वेळीं सारें जग रडेल आणि तूं मात्र आनंदी राहशील!” अशा प्रकारचीं कृत्यें तुमच्या हातून घडलीं तरच तुमच्या जन्माचें सार्थक्य; तरच तुम्ही खरे पुरुष. नाहीं तर जगाच्या घडामोडींत तुमची काय किंमत आहे?

मित्र हो, आपणास इतर देशांपासून पुष्कळ गोष्टी शिकावयाच्या आहेत, हें आपण ध्यानांत ठेविलें पाहिजे. आपणास शिकण्यासारखें असें कांहीं उरलें नाहीं असें ज्या मनुष्याला वाटतें, असा मनुष्य मृत्यूच्या दरवाजापाशींच बसलेला आहे असें समजावें. आपण सर्वज्ञ आहों असें जें राष्ट्र म्हणतें तें विनाशाच्या अगदीं समीप आलें आहे असें समजण्यास हरकत नाहीं. देहांत जीव आहे तोंपर्यंत कांहीं ना कांहीं नवी गोष्ट आपण शिकत राहिलें पाहिजे; पण येथें आणखीही एक मुद्दा लक्षांत ठेवण्यासारखा आहे. आपण परक्यांपासून जेव्हां एखादी नवी गोष्ट घेत असतों तेव्हां आपल्या परिस्थितीस अनुरूप असें तिचें रूप पालटून नंतर ती घेतली पाहिजे. इतरांपासून नवें ज्ञान शिकत असतां आपणापाशीं जो मूळचा संग्रह असेल तो कायम राखण्याबद्दल आपण नेहमीं खबरदारी घेतली

पाहिजे. उदाहरणार्थ आपलें अन्न युरोपीय पद्धतीवर असावें अशी एखाद्याला इच्छा झाली. युरोपीय लोक जेवणाच्या वेळींही खुर्चीचा उपयोग करतात. जेवतांना जमिनीवर बसण्याची संवय आपणास आहे. आतां युरोपीय पद्धतीचें अनुकरण करण्यासाठीं आपणही खुर्चीचा उपयोग करूं लागलों तर सुमारें तासभर आपले पाय लोंबते राहिल्यामुळें ते ताठतील. जेवतांना आपणास अत्यंत कष्ट होऊं लागतील; अशा स्थितींत तें जेवणही गोड लागणार नाहीं. मग या पद्धतीचा आपणास काय उपयोग ? युरोपीय पद्धतीचे पदार्थ खावयाचे झाले तरी जमिनी-वर बसणेंच आपणास अधिक योग्य आहे. अशाच रीतीनें परक्यांपासून कांहीं गोष्टी उचलावयाच्या झाल्या तरी आपल्या पद्धतीस साजेसें त्यांचें रूपांतर करून व आपल्या राष्ट्रीयत्वाशीं त्यांचा एकजीव करून मग त्या घेतल्या पाहिजेत. मनुष्य पोषाखाच्या सोयीसाठीं आहे कीं पोषाख मनुष्याच्या सोयीसाठीं आहे या प्रश्नाचें उत्तर मला द्या. खरें नाणें कोणत्याही पोषाखांत असलें तरी त्याची किंमत कमी होत नाहीं. एखाद्या मूर्खानें कितीही ऐटबाज पोषाख केला, तरी तेवढ्यानें त्याची किंमत वाढते असें नाहीं. गाढवाच्या पाठीवर उंची पोषाखाचें ओझें लादलें तरी तो गाढवच. माझा मुख्य विषय बाजूस राहून लांबतां लांबतां ही प्रस्तावनाच फार लांबली; तथापि एवढी लांबलचक प्रस्तावना केली म्हणून आतां दोन राष्ट्रांची परस्पर तुलना करण्यास आपणास बरेंच सोपें जाईल. परकी राष्ट्रें चांगलीं आहेत पण आपलें राष्ट्रही चांगलें आहे, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. एका-वर स्तुतीचा वर्षाव करावा आणि दुसऱ्याला निंदेच्या भडिमाराखालीं चिरडून टाकावें, अशी कोणाचीही योग्यता नाहीं. न्यायाच्या पारड्यांत दोन्ही एकाच तोलाचीं भरतात. आतां फारच झालें तर गुणांचा थोडाबहुत कमीअधिकपणा असल्यामुळें त्यांची पायरी कमीअधिक लागेल इतकेंच.

मनुष्यप्राणी हा मुख्यतः तीन वस्तूंचा संघ आहे. जड देह, मन आणि आत्मा या तीन वस्तु मिळून मनुष्यप्राणी बनला आहे. जड देह ही अगदीं बाहेरची वस्तु आहे. याकरितां प्रथम या बाह्य वस्तूच्या विचारापासूनच सुरवात करूं. केवळ शरिराकडे पाहिलें तरी त्यांत किती निरनिराळ्या तऱ्हा आढळून येतात ! नाक, चेहरा, केंस, उंची, शरीराचा वर्ण आणि लठ्ठपणा अथवा रोडकेपणा इत्यादि वस्तूंमुळें अनेक प्रकारची भिन्नता उत्पन्न झाली आहे.

## पूर्व आणि पश्चिम.

निरनिराळ्या वंशांच्या मिश्रणामुळें शरिराच्या वर्णांत अनेक प्रकारची भिन्नता उत्पन्न झाली आहे असें अर्वाचीन पंडितांचें म्हणणें आहे. कोणत्याही विशिष्ट भागांतील थंड अथवा उष्ण हवेचा परिणाम शरिराच्या रंगावर होतो ही गोष्ट खरी; तथापि या वर्णोत्पत्तीचें मुख्य कारण आनुवंशिक आहे. जगाच्या अत्यंत थंड प्रदेशांतही अत्यंत काळ्या वर्णाचे लोक आढळतात, आणि उलटपक्षीं उष्ण भागांत गोरे लोकही आढळतात. कानडा आणि अमेरिका यांतील मूळचे रहिवाशी व उत्तरध्रुवाजवळील एस्किमो लोक यांचा वर्ण गोरा नाहीं. उलटपक्षीं वोर्निओ, सिलेबिस् इत्यादि बेटांतील समशीतोष्ण कटिबंधांत राहणाऱ्या मूळच्या रहिवाश्यांचा वर्ण गोरा आहे.

हिंदुशास्त्राप्रमाणें ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य हे हिंदुस्थानांतील तीन वर्ण आणि हिंदुस्थानावाहेरील चीन, हूण, दरद, पल्हव आणि यवन हे सारे वंश आर्य आहेत. आपल्या शास्त्रांत चीन या नांवानें उल्लेखिलेला प्रदेश म्हणजे हल्लींचा चीन नव्हे. आपलीं शास्त्रें लिहिलीं गेलीं त्या वेळीं सांप्रतचे चिनी लोक आपणास चिनी म्हणवीत नव्हते. आपला जुना चीन हा देश काश्मीरच्या ईशान्य भागांत होता; आणि हिंदुस्थान आणि अफगाणिस्थान यांच्या दरम्यान जेथें सांप्रत कांहीं डोंगरी जाती राहत आहेत, तेथें दरदांची वस्ती होती. जुन्या चीन देशाच्या कांहीं खुणा अद्यापिही उपलब्ध असून दरदिस्तानही अद्याप अस्तित्वांत आहे. दरदराजाच्या शौर्याबद्दल आणि सार्वभौमत्वाबद्दल राजतरंगिणींत कांहीं उल्लेख जागोजाग आढळतात. राजतरंगिणी हा काश्मीर देशाचा इतिहास आहे. हिंदुस्थानच्या वायव्य प्रांताच्या भागांत हूण लोक बराच काळपर्यंत राज्य करीत होते. सांप्रतचे तिबेटी लोक आपणांस हूण म्हणवितात; पण भगवान् मनूंनीं सांगितलेले हूण लोक म्हणजे सांप्रतचे तिबेटी नव्हत. तथापि पूर्वीचे आर्य, हूण आणि मध्य आशियांतून तिबेटांत गेलेल्या मोंगल लोकांच्या कांहीं टोळ्या यांच्या मिश्रणापासून सांप्रतच्या तिबेटी लोकांची उत्पत्ति झाली असण्याचा संभव आहे. तिबेटांत आर्य लोकांच्या नमुन्याचे चेहरे व नेत्र अद्यापिही सांपडतात असें जेवालस्की व डक द आर्यन्स या रशियन व फ्रेंच प्रवाशांनीं नमूद केलें आहे. जुन्या ग्रीक लोकांस आम्हीं यवन असें नांव दिलें होतें. या नांवाबद्दल पंडितांत बराच वाद आहे. आयोनिया या प्रांतांत राहणाऱ्या ग्रीक लोकांस यवन हें नांव दिलें

होतें असें कित्येक म्हणतात. अशोक राजानें लिहिलेल्या पालिभाषेंतील ग्रंथांत याच ग्रीक लोकांना योन या नांवानें उल्लेखिलें असून याचाच अपभ्रंश यवन असा झाला, असें कित्येकांचें म्हणणें आहे. दुसऱ्या कित्येकांच्या मतें यवन हें नांव ग्रीक लोकांचें निदर्शक नाहीं; पण हीं सर्वच मतें निखालस चुकीचीं दिसतात. यवन हा शब्द मूळचाच आहे; तो दुसऱ्या शब्दाचें अपभ्रष्ट रूप नाहीं. जुन्या ग्रीक लोकांना यवन हें नांव केवळ हिंदूनींच दिलें असें नसून जुन्या इजिप्शियन व बाबिलोनियन लोकांनींही यवन हेंच नांव ग्रीक लोकांस दिलें होतें. पल्हव म्हणजे पारशी. ते पल्हवी भाषा बोलत असत. सांप्रत ही अर्धवट संस्कृत अशी खश या नांवाची एक आर्य जात हिमालयाच्या प्रदेशांत राहते. ही आर्य जात पूर्वी अगदीं असंस्कृत स्थितींत होती. सांप्रतचे युरोपियन लोक या खश जातीचेच वंशज असावेत.

अर्वाचीन पंडितांच्या मतें आर्य लोक तांबूस गोऱ्या वर्णाचे असून त्यांचे केंस काळे अगर तांबडे असत; तसेंच ते सरळ नाकाचे आणि रेखीव डोळ्यांचे लोक होते. शुद्ध आर्यांच्या रक्तांत कृष्णवर्णीय लोकांची भेसळ झाली, तेव्हां आर्यांत काळ्या रंगाचे लोक आढळूं लागले. हिमालयाच्या सरहद्दीवर अद्यापिही कांहीं शुद्ध आर्यांचें बीज असून बाकीच्या जाती मिश्र आहेत, असें कांहीं अर्वाचीन पंडितांचें मत आहे. त्यांच्या मतें सांप्रतच्या कृष्ण वर्णाची उपपत्ति अन्य तऱ्हेनें लावतां येत नाहीं; पण हिंदुस्थानच्या दक्षिण भागांत कित्येक मुलांचे केंस जन्मतः तांबडे असून तीं दोनतीन वर्षांचीं झाल्यानंतर त्यांच्या केंसांचा रंग काळा होतो, ही गोष्ट अर्वाचीन युरोपीय पंडितांनीं ध्यानांत ठेविली पाहिजे. तसेंच हिमालयाच्या प्रदेशांतील लोकांत तांबडे केस आणि निळे अथवा घारे डोळे आढळून येतात, इकडेही त्यांनीं लक्ष पुरविलें पाहिजे.

आपल्या देशांत दांत आणि केंस यांचे विकार फारच कमी प्रमाणावर आढळून येतात. पाश्चात्य देशांत चांगले दांत असलेले लोक फारच थोडे आढळतात, आणि टकले शिलेदार तर जिकडे तिकडे आढळून येतात! आमच्या देशांतील स्त्रिया नाकाकानांस भोंकें पाडून त्यांत दागिने घालतात. पाश्चात्य देशांत उच्चवर्णीय स्त्रिया अशा प्रकारें दागिने घालीत नाहींत हें खरें, पण आपली कंबर त्या

इतकी आंवळून टाकतात कीं त्यामुळें पाठीचा कणा वांकडा होतो. कांहीं कालानें काळीज आणि प्लिहा यांचे रोग उत्पन्न होतात. शरीरयष्टीचा सर्व आकार वांकडातिकडा होऊन जातो. अशा रीतीनें शरीरयष्टि सुरेख दिसावी म्हणून केलेल्या यत्नाचा परिणाम जिवंतपणीं मरणाच्या यातना निर्माण करण्याकडे होतो. यांतच ओझेंभर कपडे त्यांना आंगावर वागवावे लागतात. पाश्चात्य पोषाख कामाधामाच्या वेळीं फार उपयोगीं पडण्यासारखा आहे. एखाद्या समारंभाच्या वेळीं उच्चवर्णीय पाश्चात्य स्त्रिया फारच सुंदर पोषाख करतात; पण बाकीच्या सामान्य स्त्रियांच्या पोषाखांत वेढबपणा पूर्णपणें भरलेला असतो. आमच्यांतील स्त्रीपुरुषांचे पोषाख त्यांच्याहून कितीतरी अधिक शोभादायक आहेत. सौंदर्याच्या बाबतींत अघळपघळ पोषाखाची बरोबरी घट्ट पोषाख कधींही करूं शकणार नाहीं; तथापि आमचा हा अघळपघळ पोषाख कामाकाजाच्या वेळीं फारसा उपयोगीं पडत नाहीं हेंही खरें आहे. तो लौकर खराब होतो आणि त्यामुळें त्याचा टिकाऊपणाही जातो. पाश्चात्य देशांत 'फॅशन' म्हणजे लोकरूढी हिचें विलक्षण प्राबल्य आहे. त्यांची फॅशन कायती सगळी पोषाखांत आणि आमची फॅशन दागदागिन्यांत; तथापि पोषाखाची फॅशन आमच्यांत हळू हळू प्रवेश करीत आहे. स्त्रियांच्या पोषाखाच्या फॅशनची अधिष्ठात्री देवता परिस ही असून पुरुषांच्या पोषाखाची देवता लंडन ही आहे. स्त्रियांच्या पोषाखांतील फॅशनचा उगम पॅरिस येथील नटीवर्गांतून होत असतो. एखाद्या सुप्रसिद्ध नटीनें नव्या फॅशनचा पोषाख केला कीं युरोपीय जगांतील साऱ्या बायका त्या पोषाखाचें अनुकरण करतात. मोठमोठीं शिंप्यांचीं दुकानेंही रोज रोज नव्या नव्या तऱ्हा काढून गिऱ्हाइकांस भुलवीत असतात. पाश्चात्य देशांत केवळ पोषाखाप्रीत्यर्थ दरसाल किती कोट रुपये खर्चीं पडत असतील याची कल्पनाही आपणास होणार नाहीं. तिकडे कपडे बनविणें हें एक शास्त्रच होऊन बसलें आहे. एखाद्या स्त्रीच्या रंगाला कोणत्या रंगाचा कपडा वापरला पाहिजे, तिच्या केंसांच्या रंगाला कोणतें शिरोभूषण शोभेल इत्यादि हजारों बाबींचा विचार तिकडील शिंप्यांस करावा लागतो. उच्च परिस्थितींतील स्त्रियांनीं पोषाखाची एखादी नवी टूम काढली कीं इतर लोकांस तिचें अनुकरण करणें भागच पडतें. त्यांनीं तसें न केलें कीं त्यांची जात बाटलीच! याचें नांव फॅशन!! आणि ही फॅशनसुद्धां रोजच्या रोज बदलत असते.

किमान पक्षीं चार ऋतूंत चार वेळां तरी ती वदलतेच. श्रीमंत लोक अगदीं नव्या फॅशनप्रमाणें आपले कपडे मोठमोठ्या शिंप्यांकडून शिवून घेतात. मध्यम वर्गांतील लोक हीं कामें खासगी रीतीनें स्त्रियांकडून करून घेतात. फॅशन वदलली कीं पहिला पोषाख निकामी होऊन नव्याची योजना त्याच्या जागीं करावी लागते. एका फॅशनचे दिवस संपले कीं श्रीमंत लोक जुने कपडे आपल्या नोकरांस अथवा हुजऱ्यांस देऊन टाकतात. श्रीमंत स्त्रियांच्या कुणविणी हे पोषाख विकतात आणि तेथून ते आस्ट्रेलिया, आशिया, आफ्रिका इत्यादि खंडांतील युरोपियन वसाहतींत जातात. ज्यांच्यावर लक्ष्मीची पूर्ण कृपा आहे अशा स्त्रिया आपले पोषाख थेट पॅरिसहून मागवितात; आणि लक्ष्मीच्या मध्यम कृपेंतील मंडळी आपले पोषाख त्या नमुन्यावरहुकूम देशांतच करवितात; तथापि स्त्रियांच्या टोप्या मात्र अस्सल फ्रेंच कारागिरीच्याच असल्या पाहिजेत. सामान्यतः पाहतां इंग्रज आणि जर्मन स्त्रियांचा पोषाख फारसा चांगला नसतो. त्यांच्यांत पॅरिस फॅशनचें वंड फारसें नाहीं; तथापि थोड्याशा श्रीमंत लोकांत हें वंड आतां शिरूं पहात आहे. या पोषाखाच्या बाबतींत इंग्लिश स्त्रियांची आणि जर्मन स्त्रियांची थट्टा इतर युरोपियन स्त्रिया करीत असतात.

इंग्रज पुरुष मात्र सुंदर पोषाख करतात. अमेरिकन स्त्रीपुरुषें नेहमींच फॅशनेवल पोषाख वापरतात. परक्या मालाचा प्रवेश आपल्या देशांत होऊं नये म्हणून अमेरिकन सरकारनें लंडन व पॅरिस येथून येण्याऱ्या कपड्यांवर फार जबर कर बसविले आहेत; तथापि वायकांचे पोषाख परिस येथून व पुरुषांचे लंडन येथून येतातच. रेशमी, लोंकरीचें आणि इतर प्रकारचें कापड लोकप्रिय करण्याच्या कामावर हजारों स्त्रीपुरुषांची योजना झाली असून इतर हजारों स्त्रीपुरुषें नाना प्रकारचे कपडे बनविण्यांत गुंतलेलीं असतात. अगदीं अखेर तागायतच्या फॅशनचा पोषाख एखाद्यानें केला नसला तर रस्त्यावर जाणारे फॅशनेबल लोक तावडतोब त्याच्यावर टीका करूं लागतात. कपड्याच्या फॅशनचा इतका प्रभाव आपल्या इकडे दिसून येत नाहीं; तथापि दागिन्यांचें वंड इकडे बरेंच आहे. लोकांना कोणत्या प्रकारचा कपडा आवडतो आणि कोणत्या प्रकारच्या कपाडाची चहा लोकांत विशेष आहे, इकडे युरोपीय व्यापाऱ्यांची सदोदित वारीक नजर असते. कित्येक वेळां हे व्यापारी आपल्याच सुपीक डोक्यांतून एखादी नवी फॅशन सुरू करतात आणि

या फॅशनकडे लोकांचें एकवार लक्ष वेधलें, कीं त्या व्यापाऱ्याची जन्माची ददात जाते. फ्रान्सचा बादशहा तिसरा नेपोलियन याच्या वेळीं त्याची राणी यूजिनी ही फॅशनचा मूर्तिमंत अवतार समजली जात असे. काश्मीरच्या शाली ही राणी प्रथम पांघरूं लागली. यामुळें कोट्यवधि रुपयांच्या शाली काश्मिरांतून युरोपांत जाऊं लागल्या. यानंतर राज्यक्रांति होऊन तिसरा नेपोलियन बादशहा पदच्युत झाल्यानंतर काश्मीरच्या शालींचें बंड मोडलें. आमच्या देशी व्यापाऱ्यांविषयीं म्हटलें तर ते नेहमींच बेफिकीर असावयाचे. बापदाद्यांनीं घालून दिलेल्या मार्गा-पलीकडे पाहणें त्यांच्या ध्यानांतच कधीं येत नाहीं. यामुळें एखादी नवी तऱ्हा काढून पाश्चात्य लोकांस झुलविण्याची कला त्यांस कधींही साधली नाहीं. अखेरीस या शालींचा व्यापार साफ बंद होऊन काश्मीरच्या पुष्कळ श्रीमंत व्यापाऱ्यांचें दिवाळें निघालें. जग कसें चाललें आहे, हें जाणण्याची कला ज्याला आहे, त्यालाच जगा-पासून पुष्कळ फायदा करून घेतां येईल. तुम्हांला ही कला न साधली तर जगाचा ताबा माझ्याकडे यावा यांत नवल नाहीं. जगांत कोणी कोणासाठीं वाट पहात बसलेलें नाहीं. जगांतलीं सर्व प्रकारचीं सुखें युरोपांत नेऊन भरण्याचा उद्योग पाश्चात्य लोक एकसारखा करीत आहेत. हा चैनीचा प्रवाह अखंड चालावा म्हणून नाना प्रकारच्या योजना करण्यांत ते सदोदित चूर असतात. जगाकडे जणूंकाय दहा डोळ्यांनीं ते पहात असतात आणि दोनशें हातांनीं काम करीत असतात. आम्ही मात्र शास्त्रकारांनीं घालून दिलेल्या मर्यादेबाहेर न जाण्याचा निश्चय केल्या-मुळें त्याच जुन्या पद्धतीस चिकटून बसलों आहों. कांहीं तरी नवा मार्ग काढावा अशी बुद्धीच कधीं न झाल्यामुळें आमच्यांतून योजकतेची शक्ति नष्ट झाली आहे. बुभुक्षितांच्या आरोळ्यांनीं हिंदुस्थानचें सारें आकाश आज दुमदुमून गेलें आहे. हजारों लोक प्रत्यहीं भुकेनें प्राण सोडीत आहेत. पण यांत अपराध कोणाचा ? आम-चाच ! असल्या प्रकारच्या परिस्थितींतून बाहेर पडण्यासाठीं एखादा मार्ग शोधून काढ-ण्याची खटपट आम्हीं कितीशी केली आहे ? यासाठीं आम्हीं किती साधनें शोधून काढलीं आहेत ? शून्य. फारच झालें म्हणजे सभा भरवाव्या आणि बडीं बडीं पण पोकळ भाषणें करावीं, एवढेंच आम्हांस समजतें. तोंडाचा खूपसा गोंगाट करण्या-पलीकडे आम्ही अधिक कांहींही करीत नाहीं. आपल्या अंधाऱ्या बिळांतून बाहेर येऊन जग कसें चाललें आहे हें पाहाण्याची वेळ आतां आली नाहीं काय ? अशा

रीतीनें जगाचें अवलोकन आम्हीं न केलें तर आमची विचारशक्ति आणि आमचें कर्तृत्व हीं केव्हां परत येतील? देव आणि असुर यांची गोष्ट तुम्हांस ठाऊक आहेच. देवांना आत्मविश्वास असून परमेश्वरावरही त्यांचा विश्वास होता. असुर हे केवळ जडवादी असून चालू आयुष्यांत मिळेल तितकें सुख भोगण्यावरच त्यांचा कटाक्ष होता. देव व असुर यांपैकीं अधिक चांगले कोण याचा विचार येथें आपणांस कर्तव्य नाहीं; पण पुराणांतर्गत वर्णनें वाचून पाहतां असुर हे खरोखर पुरुषार्थवादी होते असें दिसतें. त्यांच्यांत देवांपेक्षां पौरुष अधिक प्रमाणावर असल्याचें आढळून येतें. पुष्कळ गोष्टींत देवांची योग्यता असुरांहून निःसंशय कमी प्रतीची दिसून येते. आतां याच गोष्टीचें तात्पर्य पूर्व व पश्चिम या देशांत लागू करावयाचें म्हटलें तर हिंदू लोक देवांचे वंशज असून पाश्चात्य लोक असुरांचे वंशज आहेत असें म्हटलें पाहिजे.

आतां स्वच्छपणाबद्दल पाश्चात्यांच्या व आमच्या कल्पनांत काय फरक आहे याचा विचार करूं. शुचिता म्हणजे अंतर्बाह्य स्वच्छपणा. जलादिकांच्या साहाय्यानें बाहेरचा स्वच्छपणा राखतां येतो. हिंदू लोक पाण्याचा उपयोग मनमुराद करीत असल्यामुळें त्यांच्या इतकी बाह्य शुद्धि जगांत दुसऱ्या कोठेंही आढळून येणार नाहीं. बुड्या मारून स्नान करणारे लोक जगांत दुसऱ्या कोठें फारसे आढळत नाहींत. या बाबींत हिंदू लोकांचें अनुकरण इंग्रज लोक आतां करूं लागले आहेत. स्नानासंबंधींची सोय इंग्लंडांत किती अपुरी असते हें तिकडे राहिलेल्या आपल्या विद्यार्थ्यांस विचारा. पाश्चात्य लोक बहुधा आठवड्यास एकदां स्नान करतात; आणि त्याच वेळीं आंतील वस्त्रेंही बदलतात. आतां कांहीं श्रीमंत लोक रोज स्नान करूं लागले आहेत. अमेरिकन लोकांत रोज स्नान करणारे बरेच आढळतात. जर्मनींत हा प्रघात हळुहळू वाढत आहे. फ्रेंच लोक बहुधा रोज स्नान करीत नाहींत. स्पेन आणि इटली या देशांतील हवामान वास्तविक उष्ण असतांही रोज स्नान करणाऱ्यांची संख्या या दोन देशांत सर्वांहून कमी आहे. या लोकांच्या खाण्यांत कांदा आणि लसूण यांचें प्रमाण पुष्कळ. हवामान उष्ण असल्यामुळें आंगांतून घामाच्या धारा चालावयाच्या; आणि अशा स्थितींतही स्नानाची आठवण त्यांस होत नाहीं त्या अर्थीं त्यांची धन्य म्हणावयाची. त्यांच्या आंगाच्या घाणीला भिऊन भुतेंसुद्धां पळावयाचीं, मग माणसांची काय

कथा ? स्नान म्हणजे काय ? हात, तोंड आणि डोकें धुतलें कीं स्नान झालें. लोकांच्या नजरेस येणारा शरिराचा भाग धुतला म्हणजे अधिक कांहीं करण्याची आवश्यकता त्यांस वाटत नाहीं. पॅरीस येथल्या एका लक्ष्मीपुत्रानें मला आपल्या घरीं बोलाविलें होतें. पॅरीस शहर हें अर्वाचीन संस्कृतीचें माहेरघर आहे असा या शहराचा लौकिक आहे. चैन, फॅशन आणि उडाऊपणा हीं सारीं या शहरांत एकत्र सांपडावयाचीं. पॅरीस म्हणजे इहलोकींचा स्वर्ग. जगांतील सारीं शास्त्रें आणि सारें कलाकौशल्य तेथें नांदतें, असा या शहराचा लौकिक. या शहरांतल्या एका राजशाही हॉटेलांत माझ्या उतरण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. या ठिकाणची भोजनाची व्यवस्था एकाद्या राजवाड्यासही लाजविण्यासारखी होती; पण स्नानाची व्यवस्था काय म्हणाल तर तिचें नांवही नाहीं. या यातना दोन दिवस मीं कशावशा भोगल्या. अखेर जीव अगदीं नकोसा होऊन मीं आपल्या मित्रास म्हटलें, " गड्या, हा राजकीय थाट तुझा तुलाच लखलाभ असो. खरोखर मला तर रडण्याची पाळी आली आहे. उकाड्यानें जीव घाबरा होत आहे आणि स्नानाची सोय येथें मुळींच नाहीं. आणखी थोडे दिवस हें असेंच चाललें तर माझी स्थिति खरोखर पिसाळलेल्या कुत्र्यासारखी होईल." माझें हें भाषण ऐकून माझ्या मित्राला फार वाईट वाटलें आणि दुसऱ्या कोठेंतरी बिऱ्हाड पाहण्याच्या विचारास आम्ही लागलों. मुख्य मुख्य बारा हॉटेलें मीं पाहिलीं, पण स्नानाची सोय यांपैकीं एकांतही आढळून आली नाहीं. कोणाला स्नान करावयाचें झालें तर त्यासाठीं स्नानगृहाची वेगळी सोय असून पांच चार रुपये खर्च केल्यास तेथें एकदां स्नान करावयास मिळतें. ही स्थिति पाहून देवा, आतां तूंच त्राता असें म्हणण्याची पाळी मला आली. अशा प्रकारच्या एका स्नानगृहांत एक वृद्ध स्त्री स्नानासाठीं गेली असतां तेथल्या पिंपांत बुडी मारतांच तिचें प्राणोत्क्रमण झाल्याची हकीगत त्याच दिवशीं एका वर्तमानपत्रांत मीं वाचली. तिच्या मृत्यूला काय कारण झालें असावें याची मीमांसा अश्विनीकुमार कोणत्याही प्रकारें करोत, पण जन्मांत इतक्या पुष्कळ पाण्याचा प्रसंग तिला पहिलाच असावा व त्यामुळें एवढ्या पाण्याच्या एकदम झालेल्या आघातानें तिची तनु कोलमंडली असावी असा माझा समज आहे. यांत कांहीं अतिशयोक्ति मी करीत आहें असें कोणींही मानूं नये. रशियन आणि इतर युरोपीय लोक हे तर

या बाबतींत घाणीचे मूर्तिमंत पुतळेच होत. अमेरिकेंतल्या प्रत्येक खाणावळींत मात्र स्नानाची खोली असून तींत पाण्याचा नळही असतो.

आतां आपल्या व त्यांच्या पद्धतींत मुख्य फरक कोठें आहे तें पाहूं. आपण हिंदु लोक स्नान कां करतों ? स्नान न केलें तर पाप लागेल अशी आपली समजूत आहे म्हणून. पाश्चात्य लोक केवळ स्वच्छतेसाठीं तोंड धुतात. डोक्या-वरून पाणी ओतलें कीं आपलें स्नान झालें; मग तेल आणि दुसरा मळ हीं शरिरावर राहिलीं तरी फारशी हरकत नाहीं. स्नानानंतर दक्षिण हिंदुस्थानांतले आमचे बंधु आपल्या ज्ञातीची निशाणी कपाळावर एवढ्या ढळढळीतपणें लाव-तात कीं, ती काढून टाकण्यास वज्रीचाच उपयोग केला पाहिजे. कोठेंही एखादी बुडी मारली म्हणजे आपलें स्नान आटोपतें. पण पाश्चात्य देशांत स्नान हाही एक मोठा विधीच आहे. आधीं कपड्यांचें भलें मोठें एक ओझें शरिरावरून काढलें पाहिजे. त्यांत गुंड्या किती, हूक किती व गुंड्यांचीं भोंकें किती याचा पत्ताच नाहीं. आपल्या शरिराचा कांहीं भाग उघडा राहिला तर त्याची आपणास क्षिति वाटत नाहीं. पण पाश्चात्य लोकांस हें मोठें अघोर पातक वाटतें; तथापि पुरुषांच्या समोर शरीर उघडें राखण्यास हरकत नाहीं, पण स्त्रियांसमोर मात्र सर्व शरीर झांकूनच गेलें पाहिजे.

रूढि म्हटली कीं तिचें जूं पुष्कळ वेळां असह्य होत असतांही ती आपणास टाकवत नाहीं. आचारदृष्ट्या जें तिचें मूळचें खरें रूप असतें तें नाहींसें होऊन केवळ बाह्य विधि मात्र शिल्लक उरतो व बदललेल्या परिस्थितींत कित्येक वेळां तो जाचकही होतो. बाह्य शुद्धीची गोष्ट अशीच आहे. शरीरशुद्धि करावयाची ती अगदीं गुप्त रीतीनें केली पाहिजे, अशी युरोपियांची रूढि आहे. लोकांसमोर थुंकणें अथवा चूळ भरून तोंडांत पाणी खुळखुळावणें या गोष्टी ते लोक असभ्य-तेच्या समजतात. यामुळें लोकापवादास भिऊन जेवणानंतर ते लोक तोंड धूत नाहींत. यामुळें अन्नाचे कण दांतांच्या पोकळींत राहून कांहीं दिवसांनीं दांत कुजूं लागतात. या ठिकाणीं लोकरूढीच्या भीतीमुळें स्वच्छतेकडेही कसें दुर्लक्ष होतें हें आपल्या लक्षांत येईल. या बाबतींत आपण दुसरें टोंक गांठलें आहे. तोंड धुतांना इतक्या मोठ्यानें खांकरावयाचें व नाक शिंकरावयाचें कीं इतर लोकांस त्याचा किळसच यावा. असें करणें हासुद्धां लोकांवर एक प्रकारचा

जुलूमच आहे. लोकांच्या भीतीमुळें तोंड न धुणें जसें वाईट तसेंच इतरांस किळस येईल अशा रीतीनें स्वच्छतेच्या गोष्टी करणें हेंही वाईटच आहे.

निरनिराळ्या हवामानाप्रमाणें ज्या कांहीं गोष्टी करणें अवश्य असतें, त्या बाबतींतल्या चालीरीती येथील लोक निमूटपणें सांभाळतात. आपला देश उष्ण असल्यामुळें पेलेच्या पेले पाणी आपणांस प्यावें लागतें व यामुळें वारंवार लघवीस जाणेंही भाग पडतें. लघवीस जाणें ही गोष्ट पाश्चात्य देशांत असभ्यतेची समजतात; पण जेवतांनासुद्धां हातरुमाल बाहेर काढून त्यांत मोठ्यानें शिंकरणें हें तिकडे असभ्यतेचें समजलें जात नाहीं. आमच्या इकडे अशा वेळीं कोणीं नाक शिंकरलें तर पंक्तींतल्या इतर लोकांस त्याची किळस वाटल्यावांचून रहाणार नाहीं. पाश्चात्य देशांची हवा थंड असल्यामुळें वारंवार नाक शिंकरणें त्यांस भागच पडतें.

आपणा हिंदू लोकांस घाणीचा मोठा किळस आहे. तथापि पुष्कळ वेळां आपण स्वतःच गलिच्छ असतों. घाणीचा नुसता स्पर्श झाला तर आपण स्नान करतों; पण आपल्या घराच्या उंबरठ्याजवळ घाणीचा डोंगर सांचला तरी त्याचें आपणांस कांहीं वाटत नाहीं. फक्त त्या घाणीला शिवलें नाहीं म्हणजे झालें. अशा रीतीनें एका बाजूनें स्वच्छतेची पराकाष्ठा करीत असतांही आपल्या आजूबाजूस उकिरड्याचे पर्वत सांचवून प्रत्यक्ष नरकांत आपण खुशाल राहत असतों. अशा रीतीनें एका प्रकारची अशुद्धता नाहींशी करून त्याहून अधिक प्रतीची अशुद्धता आपण जवळ करीत असतों. आपल्या घराभोंवतीं उकिरडे सांचूं देणारा मनुष्य खरोखर पापीच गणला पाहिजे; आणि या पापाचें प्रायश्चित्त भोगण्यास त्याला दुसऱ्या लोकीं जावयास नको. तें त्याला येथल्या येथेंच आणि याच जन्मीं मिळतें.

सध्यांच्या काळीं लक्ष्मी आणि सरस्वती या दोघींचीही कृपा पाश्चात्य देशांवर दिसते. केवळ चैनीचे पदार्थ जमा करूनच ते लोक राहात नाहींत; तर त्यांचा उपभोग घेण्यांत सौंदर्य, नीटनेटकेपणा, आणि कौशल्य यांजकडेही ते पूर्ण लक्ष पुरवीत असतात. जेवणाखाण्याच्या पद्धतींतही घरांत आणि आजूबाजूस नीटनेटकेपणा राखण्याकडे त्यांचा विशेष कटाक्ष आहे. लक्ष्मीची कृपा आपणांवर होती तेव्हां आपणही या बाबतींत नीटनेटकेपणानें राहात होतों. आतां अठरा विसवे दारिद्र्यामुळें ही गोष्ट आपणांस अगदींच अशक्य झाली आहे. त्यांतून

एकादशीच्या घरीं शिवरात्र या म्हणीप्रमाणें आपण वर्तणूक चालविली आहे. आपल्या चालीरीती टाकून देण्याची इच्छा आपण करीत असून परक्यांच्या चालीरीतींचें अनुकरण करण्याची व्यर्थ धडपड आपण चालविली आहे. यामुळें आपले राष्ट्रीय सद्गुण हळुहळू ऱ्हास पावत असून पाश्चात्यांचे सद्गुण मात्र त्या जागीं दृष्टीस पडत नाहींत. बसण्या उठण्यांत, चालण्यांत, बोलण्यांत आणि अशाच प्रकारच्या एकंदर क्रियांत कांहीं राष्ट्रीय लक्षण म्हणून पूर्वी असे. हें लक्षण आतां नष्ट झालें आहे; पण त्या जागीं पाश्चात्य पद्धतीही आलेल्या नाहींत. पूर्वीचे धार्मिक विधि, आचार आणि अध्ययनपद्धति हीं सारीं नष्ट झालीं. पश्चिमेकडून आलेल्या लाटेंत आपण हीं सारीं सोडून दिलीं, पण त्या जागीं नव्या परिस्थितीस अनुरूप अशी नवी योजना आपण कोणतीच केली नाहीं. आपली स्थिति दोन डगरींवर हात ठेवण्यासारखी झाली आहे. घड्याळाच्या लंबकासारखे आपण हेलकावे खात असल्यामुळें आपले पाय कोठेंच स्थिरावत नाहींत. आपल्या सध्यांच्या शोचनीय स्थितीचें मुख्य कारण हेंच; आपली तरुण पिढी स्वावलंबनाचा धडा अद्यापिही शिकलेली दिसत नाहीं. आमचें सारें कलाकौशल्य अगदीं नष्ट झालें आहे. आमच्या स्त्रिया कणारांगोळी काढण्याचेंही विसरून गेल्या आहेत. जेवणाच्या पानापुढें सुंदर रांगोळीही कोणास काढतां येत नाहीं. या सामान्य कलासुद्धां नाहींशा होत चालल्या आहेत.

आपणास नव्यानव्या गोष्टी इकडे चालू केल्या पाहिजेत ही गोष्ट खरी, पण असें करतांना जुन्या गोष्टी केवळ जुन्या म्हणूनच टाकून द्यावयाच्या कीं काय याचाही विचार केला पाहिजे. वास्तविक पाहातां आज आपण नवीन असें काय शिकलों आहों ? शब्दपांडित्याशिवाय आपण नवीन असें कांहींच पैदा केलेलें नाहीं. एकादें उपयुक्त असें आधिभौतिक शास्त्र अथवा एकादी कला आपण शिकलों आहों काय ? एकाद्या खेडेगांवांत जाऊन तेथील सुतारांचा अथवा गवंड्यांचा उद्योग पहा. मध्यमशा गांवांतील आपल्या सुतारांना सुबक दरवाजेसुद्धां करतां येत नाहींत. त्यांनीं केलेलीं दारें झोंपडीच्या उपयोगीं पडतील कीं राजवाड्याच्या उपयोगीं पडतील हें सांगणेंसुद्धां कठीण. त्यांचें कौशल्य कायतें परकीयांचीं हत्यारें विकत घेण्यांतच दिसून यावयाचें. हर हर ! सर्व बाबतींत आमच्या देशांत आज ही स्थिति आढळून येते. आपणांजवळ जें कांहीं जुनें होतें

तें निःसंशय नष्ट होत आहे आणि त्याच्या जागीं नवें असें कांहीं येत नाहीं. पाश्चात्यांकडून आपण जें कांहीं शिकलों तें वाक्पांडित्य. भाराभर शब्द लिहावे आणि ओझेंभर पुस्तकें वाचावीं याहून अधिक कांहीं करावयाचें म्हटलें तर लांबलचक भाषणें करावीं. इतक्यानें आमचा सारा कारभार संपतो. युरोपांतील आयरिश लोक आणि हिंदुस्थानांतील बंगाली हे सख्खे भाऊच दिसतात. एक-सारखी बडबड. शब्दपांडित्यावांचून या दोघांस दुसरें कांहीं सुचत नाहीं. प्रचंड वाग्जाल कसें पसरावें ही कला या दोन राष्ट्रांपासून शिकावी; पण प्रत्यक्ष काम करण्याची पाळी आली कीं मग मात्र कवडीचें कामही त्यांच्या हातून होणार नाहीं. याशिवाय आणखीही एका कलेंत हे लोक निष्णात आहेत. ती कला म्हणजे आपापसांत मारामाऱ्या करण्याची. परस्परांत कलह माजवून एकमेकांवर तुटून पडण्यांत आपलें सारें आयुष्य ते खर्ची घालतील.

आपणांसभोंवतीं नीटनेटकेपणा असावा याबद्दल पाश्चात्य लोक फार दक्षता बाळगतात. त्यांच्यांतले अत्यंत दरिद्री लोकही नीटनेटकेपणाचे भक्त आहेत. गरीब लोकांनाही बाह्य स्वच्छता राखणें जरूरीचेंच असतें. कारण आंगावर स्वच्छ कपडे नसतील तर त्यांना कोण नोकरीसही ठेवीत नाहीं. त्यांचे चाकर, दाया, आ-चारी इत्यादि सर्व प्रकारचे नोकरलोक नेहमीं अगदीं स्वच्छ पोषाख करतात. तिक-डील लोक आपलीं घरें झाडून झटकून आणि धुऊन पुसून नेहमीं स्वच्छ आणि नीटनेटकीं राखतात. प्रत्येक वस्तु जागच्या जागीं ठेवण्याचें वळण त्यांना लहान-पणापासूनच मिळालेलें असतें. ज्यांच्या घरांत वस्तूंचा फापट पसारा पडला असेल, अशा मनुष्याला चांगली शिस्त लागलेली नाहीं असें तिकडे समजतात. त्यांचीं स्वयंपाकघरें स्वच्छ आणि व्यवस्थेशीर असतात. भाज्यांचीं डेंखें अगर सालपटेंही इकडे तिकडे न टाकतां एकाद्या निराळ्या टोपलींत ठेवतात, आणि अशा प्रकारचा कचरा टाकण्याच्या नेमलेल्या जागीं ती टोपली नेऊन ओततात. घरांतील कचरा घराच्या आवारांत अथवा रस्त्यांत ते लोक फेंकीत नाहींत.

श्रीमंत लोकांचीं घरें म्हणजे एक प्रेक्षणीय चीजच असते. टापटीप आणि स्वच्छता यांचा नमुना येथें पाहून घ्यावा. निरनिराळ्या देशांतून कलाकुसरीचे पदार्थ जमविण्याचा नाद पाश्चात्यांतील श्रीमंत लोकांस असतो. अशा रीतीनें जमविलेल्या वस्तु व्यवस्थित रीतीनें आपल्या घरांत मांडून ठेवतात. अशा रीतीनें

कलाकुसरींचे पदार्थ जमविण्याची सध्या तरी आपली सोय नाहीं हें खरें; पण असें असलें तरी आपणांजवळ जें कांहीं आहे तें तरी जतन करून ठेवावयास नको काय ? चित्रकला आणि मूर्तिकाराचें काम या कलांत पाश्चात्यांच्या इतका तरबेजपणा आपल्या अांगीं यावयास अद्यापि पुष्कळ काळ लोटला पाहिजे. या दोन कलांत आपण कधींच तरबेज नव्हतों. युरोपियांचें अनुकरण करतां करतां फारच झालें तर एखाददुसरा रविवर्मा निर्माण करण्यापलीकडे आपली मजल अद्यापि गेली नाहीं. रविवर्मा अथवा आपल्यांतील दुसरे कांहीं चित्रकार यांची कला पाहून आपणांस खरोखर लाजच वाटली पाहिजे. यापेक्षां जयपूरचीं सोनेरी चित्रें शतपट अधिक चांगलीं. असो; या बाबीसंबंधीं मी पुन्हां केव्हां तरी लिहीन. यासंबंधीं येथें अधिक चर्चा करण्याचें सध्यां प्रयोजन नाहीं.

पाश्चात्य लोकांत स्वयंपाक करण्याची व्यवस्था कशी असते, याचा आतां थोडा विचार करूं. या बाबींत आमच्या देशांतल्या इतकी स्वच्छता दुसऱ्या कोठेंही आढळणार नाहीं. तथापि पात्रांची आणि पंक्तीची रचना या बाबींत जी स्वच्छता आणि टापटीप पाश्चात्यांत आढळते, ती आपल्याइकडे आढळत नाहीं. स्वयंपाकघरांत शिरण्यापूर्वी आमचा आचारी रोज प्रथम स्नान करतो आणि वस्त्रें बदलतो. स्वयंपाकाचीं भांडीं स्वच्छ घांसून तो तीं धुतो. आंगाला अथवा नाकाला हात लावण्याचा प्रसंग आला तर आमचा आचारी हात धुतल्याशिवाय तो पदार्थास लावणार नाहीं. पाश्चात्य आचारी बहुधा स्नान करीत नाहीं. कोण-ताही पदार्थ तयार झाला म्हणजे प्रथम चमच्यानें तो त्याची चव पाहतो; आणि तो उष्टा चमचा तसाच त्या पदार्थांत बुडवितो. आपला हातरुमाल बाहेर काढून त्यांत जोरानें तो नाक शिंकरतो आणि तशाच शेंबड्या हातानें कणीक तिंबतो. बाहेरून आल्यावर हात धुण्याचें त्याच्या मनांत कधींच येत नाहीं; तथापि त्याच्या आंगावरचे कपडे मात्र ताज्या परीटघडीचे असावयाचे. कणीक चांगली तिंबली जावी म्हणून प्रसंगीं तो तिच्यावर नाचतोसुद्धां ! या वेळीं आंगावरचा घाम त्या कणकींत पडला तरी त्याची त्यास क्षिति वाटत नाहीं. पाश्चात्य लोकांचें भाग्य कीं आतां या कामासाठीं यंत्राचा उपयोग होऊं लागला आहे. अशा रीतीनें एकदां भाकरी तयार झाली कीं एका स्वच्छ बशींत मांडून तिच्यावर तो बर्फा-सारख्या शुभ्र वस्त्राचें आच्छादन घालतो. यजमानाकडे खाण्याचे पदार्थ नेणाऱ्या

चाकराचा पोषाखही अगदीं स्वच्छ असून त्याच्या हातांत पांढरे मोजे असावयाचे. त्याचा उघडा हात खाण्याच्या वस्तूला लागूं नये म्हणून त्यानें मोजे चढविलेच पाहिजेत !

आतां आपली पद्धत पहा. आपला ब्राह्मण आचारी प्रथम स्नान करतो आणि नंतर स्वच्छ धुतलेल्या पात्रांत स्वयंपाक तयार करतो; पण जेवणाच्या वेळीं पात्रें मांडण्याची जागा मातीच्या आणि शेणाच्या सारवणानें ओली झाली असली तरी हरकत नाहीं. आमच्या वाढप्याचें नेसावयाचें वस्त्र असें असतें कीं जणूं काय, त्यास पाण्याचा स्पर्श कधीं झालाच नाहीं ! जेवणास केळीचें पान असलें तर कित्येक वेळां तें मध्येंच कोठें फाटलेलें असावयाचें; आणि त्या फटींतून जमिनीची माती पदार्थांत येऊन मिसळावयाची. अशा रीतीनें भाजी किंवा आमटी यांस शेणाचाही सुंदर वास लागावयाचा.

स्नानानंतर घाणेरडे कपडे घालण्यास आपणांस कांहीं दिकत वाटत नाहीं, आणि पाश्चात्य लोक घाणेरड्या शरिरावर स्वच्छ कपडे घालतात. पाश्चात्य आणि पौर्वात्य यांच्या चालीरीतींत असलेला फरक येथें लक्षांत येतो. हा मुद्दा महत्त्वाचा असल्यामुळें विशेषेंकरून लक्षांत ठेवण्यासारखा आहे. पाश्चात्यांची बाह्यवर्ती बुद्धि जशी त्यांच्या साऱ्या चालीरीतींत दिसून येते, त्याप्रमाणें पौर्वात्यांची अंतर्वर्ती बुद्धि त्यांच्या चालीरीतींत प्रतिबिंबित होते. हिंदूंना प्रत्येक गोष्टींतील अंतरंग पाहण्याची ज्याप्रमाणें संवय असते, त्याचप्रमाणें पाश्चात्यांची नजर केवळ बाह्याकडे असते. एकादा हिरा ठेवावयाचा झाला तर हिंदु मनुष्य तो एकाद्या चिंधींत बांधून ठेवील. उलटपक्षीं पाश्चात्य गृहस्थ एकादें मातीचें ढेंकूळही सोन्याच्या पेटींत ठेवील. शरीर स्वच्छ असावें या दृष्टीनें प्रत्येक हिंदु स्नान करतो, पण आंगावरच्या कपड्यांविषयीं फारशी पर्वा तो बाळगीत नाहीं. आपले कपडे स्वच्छ असावे याविषयीं पाश्चात्य गृहस्थ खबरदारी घेतो, पण त्या कपड्यांतील शरीर घाणेरडें असलें तरी याची क्षिति त्याला वाटत नाहीं. जमिनीवर सुंदर गालिचे आणि सत्रंज्या पसरण्याची दक्षता पाश्चात्य लोक ठेवतात; पण या अस्तरणाखालीं कितीही धूळ सांचली असली तरी हरकत नाहीं. ती धूळ लोकांच्या नजरेस पडूं नये इतकीच त्यांची इच्छा असते. हिंदु लोकांच्या घरांतील मोऱ्या रस्त्यावर आणून सोडलेल्या असतात; आणि त्यांच्या घाणीनें सगळें वातावरण भरून गेलें तरी

हिंदूंना त्याची खंत वाटत नाहीं ! पाश्चात्य देशांतील घराच्या मोऱ्या जमिनी-खालच्या गटारांत सोडलेल्या असतात. ती घाण तेथें मुरून तेथें सन्निपात-ज्वरासारखे भयंकर आजार उद्भवतात. या पद्धतींतही हिंदूंची अंतर्वर्ती दृष्टि आणि पाश्चात्यांची बाह्यवर्ती दृष्टि दिसून येते.

शरीर ज्याप्रमाणें स्वच्छ असलें पाहिजे, त्याचप्रमाणें कपडेही स्वच्छ पाहिजेत. घरें आंतून स्वच्छ असावींत आणि बाहेरील उघडे रस्तेहि स्वच्छ असले पाहि-जेत. स्वयंपाक्यानें शरीर स्वच्छ ठेवण्याची जितकी आवश्यकता आहे, तितकीच आपले कपडे ठेवण्याचीहि आहे. आचार ही धर्माची पहिली पायरी आहे; आणि शरीर आणि मन स्वच्छ ठेवणें ही आचारांतील अत्यंत महत्त्वाची बाब आहे. ज्याला आचारशुद्धि नाहीं असा मनुष्य कधींही धार्मिक होऊं शकणार नाहीं. याकरितां आचार चांगल्या रीतीनें पाळणें हें आपलें पहिलें महत्त्वाचें कर्तव्य आहे. महामारी, हिंवताप, प्लेग, इत्यादि रोग हिंदुस्थानांत आपलें कायमचें ठाणें देऊन बसले असून लक्षावधि लोक मृत्यूच्या मुखांत ते ढकलीत आहेत. हा सारा अपराध आमचाच आहे. आम्ही आचाराला सर्वथा पारखे झालों आहों.

' आहारशुद्धौ सत्त्वशुद्धिः सत्त्वशुद्धौ ध्रुवास्मृतिः । ' हें सुप्रसिद्ध वचन हिंदु-स्थानांतील सर्व पंथांनीं मान्य केलें आहे. आहारशुद्धीनें अंतर्गत शुद्धि होते आणि अंतर्गत शुद्धीनें आत्म्याच्या पूर्णत्वाची ओळख होते, या तत्त्वाबद्दल कोणत्याही पंथानें वाद घातला नाहीं. या बाबतींत थोडासा मतभेद इतकाच आहे कीं, आहार याचा अर्थ इंद्रियें असा श्रीशंकराचार्य करितात; आणि श्रीरामानुज आहार म्हणजे अन्न म्हणतात. हे दोन्ही अर्थ मान्य करून इंद्रिय आणि अन्न या दोहोंचीही शुद्धि असली पाहिजे असें म्हटलें म्हणजे मतभेदाचें कारणच उरत नाहीं. या दोन्ही गोष्टींत शुद्धीची आवश्यकता सारखीच आहे, हें मत सर्व पंथांस मान्य झालें आहे. अन्न शुद्ध नसेल तर इंद्रियांसही आपापलीं कामें योग्य रीतीनें करतां येणार नाहींत. अन्न अशुद्ध असेल तर इंद्रियांचें सामर्थ्य क्षीण होतें आणि कित्येक वेळां इंद्रियें भडकून जाऊन इच्छाशक्तीला विरोध करूं लागतात, हा अनुभव थोड्याफार प्रमाणानें सर्वांस आहे. अजीर्ण झालें तर दृष्टीचीहि शक्ति बिघडते आणि त्याचप्रमाणें अन्न मुळींच न मिळालें तर दृष्टि आणि इतर सारीं इंद्रियें क्षीण होतात. विशिष्ट प्रकारच्या अन्नाचे परिणाम देहावर विशिष्ट प्रकारचे

होतात असें आढळून आलें आहे. अन्नग्रहणाच्या बाबतींत हिंदुसमाजांत जे इतके कडक नियम घालून दिले आहेत, त्यांच्या मुळाशींही हेंच तत्त्व आहे. कोणतें अन्न ग्राह्य आणि कोणतें त्याज्य याची निवड याच तत्त्वानुरोधानें झाली आहे. आतां यांतील मुद्दा अथवा तत्त्व आपण विसरून गेलों असून केवळ बाहेरच्या फोलकटावरच आपण रणें माजवीत असतों. हीं फोलकटें सांभाळून ठेवण्यांतच आपलें सारें सामर्थ्य खर्ची पडत आहे.

रामानुजाचार्यांच्या मतें अन्न तीन प्रकारांनीं दूषित होत असून असें दूषित अन्न त्यांच्या मतें त्याज्य आहे. पहिला जातिदोष. कांदा, लसूण वगैरे पदार्थांच्या आगीं उपजतच जो दोष असतो तो जातिदोष. असले पदार्थ मनोभावना उच्छृंखल करण्यास कारणीभूत होत असतात. यामुळें मनाचा समतोलपणा बिघडतो आणि बुद्धि भ्रष्ट होते. दुसरा आश्रयदोष. ज्या मनुष्याकडून अन्न आलें असेल, त्याच्या स्वभावदोषाच्या संपर्कामुळें अन्नांत आश्रयदोष उत्पन्न होतो. दुष्टाकडून आलेल्या अन्नानें तें सेवन करणाराची बुद्धि अशुद्ध आणि दुष्ट होते. उलटपक्षीं सज्जनाचें अन्न चांगले विचार उत्पन्न करतें. तिसरा निमित्तदोष. धूळ, आळया, केंस इत्यादि घाणेरडे पदार्थ अन्नांत पडल्यामुळें निमित्तदोष उत्पन्न होतो. असल्या प्रकारच्या अन्नसेवनानेंही मन अशुद्ध होतें. या तीन दोषांपैकीं जातिदोष आणि निमित्तदोष हे कोणासही टाळतां येण्यासारखे आहेत; पण आश्रयदोष काढून टाकणें इतकें सोपें नाहीं. आपल्यांत विटाळाचें जें इतकें खूळ माजलें आहे त्याच्या मुळाशीं आश्रयदोष नाहींसा करणें हेंच तत्त्व आहे; पण पुष्कळ प्रसंगीं हें तत्त्व आपण विसरून जातों आणि कालेंकरून आपल्या वर्तणुकीला खुळसटपणाचें स्वरूप येतें. अशा प्रकारच्या स्थितींत केवळ लोकाचाराचें अनुवर्तन करण्यापेक्षां मोठ्या आचार्यांनीं दाखविलेला आचारमार्ग अनुसरणें अधिक हितावह आहे. श्रीचैतन्य देव आणि इतर महापुरुष यांच्या चरित्राचा अभ्यास आपण करावा, आणि या महापुरुषांची वागणूक या बाबतींत सामान्य जनतेशीं कशा प्रकारची होती, हेंही आपण अवलोकन करावें. जातिदोषासंबंधीं पाहतां हिंदुस्थानांत या दोषाचें जसें साम्राज्य चहूंकडे आढळतें, तसें जगांतील दुसऱ्या कोणत्याही देशांत आढळावयाचें नाहीं. आपल्या अन्नांत या दोषानें सांप्रत इतका धुमाकूळ माजविला आहे कीं त्याचे भयंकर परिणाम आपणास प्रत्यक्ष जाणवूं लागले आहेत. पक्का-

न्नवाल्यांच्या दुकानांतून खाण्याचे पदार्थ विकत घेण्याची रूढि सर्वत्र पडली आहे. असल्या प्रकारचें अन्न निमित्तदोषानें किती युक्त असेल, हें तुमचें तुम्हांस पाहातां येण्यासारखें आहे. हे पदार्थ वहुधा खुल्या जागीं मांडण्यांत येतात. रस्त्यांतील धूळ आणि कचरा यांचें मुवलक मिश्रण त्यांत होत असतें, आणि मुंग्या वगैरे किती क्षुद्र कीटक त्यांत मरून पडलेले असतात. हें अन्न पुष्कळ वेळां आंवलेलें अथवा वरेंच शिळें झालेलें असतें. अग्निमांद्याच्या रोगाचा जो फैलाव सांप्रत दिसत आहे त्याचें कारण हें वाजारी अन्नच होय. या अन्नामुळें मधुमेहासारखे भयंकर विकारही उद्भवतात. असल्या प्रकारचे रोग खेडवळ लोकांस पछाडीत नसून त्यांचें प्रावल्य वहुधा शहरवासीयांतच कां आढळून येतें, हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. लूची, कचोरी वगैरे वाजारांतले विषारी पदार्थ खेडवळांच्या पोटांत जात नसल्यामुळें वऱ्याचशा रोगांपासून त्यांचा वचाव होतो. असो; यासंवंधीं अधिक सविस्तर विवेचन पुढें केव्हां तरी मी करीन.

अन्नग्रहणासंवंधीं आपल्या जुन्या नियमांचें सामान्य स्पष्टीकरण मीं येथपर्यंत केलें. तथापि यासंवंधीं पूर्वीं वरेच मतभेद होते आणि सांप्रतही आहेत. मांसान्न अधिक श्रेयस्कर कीं शाकाहार अधिक चांगला, याबद्दल पूर्वकाळीं जसे तंटे होते, तसेच ते सांप्रतही आहेत. अन्नासाठीं कोणत्याही प्राण्याचा जीव घेणें योग्य आहे कीं नाहीं, या प्रश्नावर पूर्वी ज्याप्रमाणें रणें माजत असत, त्याचप्रमाणें तीं सांप्रतही माजतात. कोणत्याही प्राण्याचा जीव घेणें हें पातक असल्यामुळें, तसें करणें दूषणीय आहे असें एका पक्षाचें म्हणणें आहे. उलटपक्षीं कोणालाही मारल्यावांचून आपणांस जगणेंच अशक्य आहे, असें दुसरा पक्ष म्हणतो. यासंवंधीं शास्त्रवचनेंही वेगवेगळीं असून त्यांमुळें या प्रश्नासंवंधीं अधिकच घोंटाळा झाला आहे. यज्ञांत पशुहत्या करावी असें शास्त्रांत एके जागीं म्हटलें असून दुसऱ्या जागीं पशुहनन केव्हांही करूं नये असें सांगितलें आहे. यज्ञप्रसंगीं पशुहनन करणें युक्त आहे असें हिंदूंचें मत आहे. तथापि यज्ञप्रसंगीं मात्र पशुहनन करावें असें ते म्हणतात. श्राद्धादि प्रसंगीं गृहस्थाश्रमी पुरुषांनीं पशुहनन केलेंच पाहिजे असा नियम शास्त्रांनीं सांगितला आहे. अशाच प्रकारच्या विशिष्ट प्रसंगीं पशुहनन न करील तो गृहस्थाश्रमी पापी होय असेंही शास्त्रें म्हणतात. श्राद्धादि प्रसंगीं भोजनास बोलाविलेल्या गृहस्थांपैकीं जो कोणी मांसान्न सेवन करणार नाहीं, तो पुढील

जन्मीं पशूच्या जन्मास जाईल असें मनूनें म्हटलें आहे. उलटपक्षीं जैन, बौद्ध आणि वैष्णव हे पंथ पशुहननाच्या अगदीं विरुद्ध असून, अशा प्रकारच्या शास्त्राज्ञा त्याज्य आहेत असें ते म्हणतात. त्यांच्या मतें कोणत्याही प्रसंगीं केलेलें पशुहनन सर्वथा गर्हणीय आहे. अशोक राजा बौद्ध धर्माचा होता. यज्ञयागादि क्रिया करणारांस अथवा इतर कोणत्याही प्रसंगीं मांसान्नाचें भोजन देणारास तो शिक्षा करीत असे. या बावतींत अर्वाचीन वैष्णवांची मोठी चमत्कारिक स्थिति झाली आहे. राम आणि कृष्ण या ईश्वरावतारी पुरुषांनीं मदिरापान करून मांसान्न सेवन केल्याचे दाखले रामायणांत आणि महाभारतांत सांपडतात. '**उभौ मध्वासवक्षीवावुभौ चन्दनरूषितौ । स्रग्विनौ वरवस्त्रौ तौ दिव्याभरणभूषितौ ॥**' (महाभा० उद्योगपर्व-अ० ५८-५) सीतादेवीनें मांस, भात आणि मदिरा यांचा नवस गंगेला केल्याचा उल्लेख आहे. ( **सुराघटसहस्रेण मांसभूतौदनेन च । यक्ष्ये त्वां प्रीयतां देवि पुरीं पुनरुपागता** । रामायण ).

मांसाहाराबद्दल पाश्चात्य देशांतही अशाच प्रकारचे वाद चालू आहेत. कोणी म्हणतात कीं, मांसाहार मनुष्याच्या प्रकृतीस अपायकारक आहे. याच्या उलट शाकाहारापेक्षां मांसाहार अधिक बलदायक आहे असेंही कोणी म्हणतात. मांसाहारापासून अनेक प्रकारचे शारीरिक रोग उद्भवतात, असें एका पक्षाचें म्हणणें आहे. यावर दुसरा पक्ष असें उत्तर देतो कीं हें खरें असतें तर हिंदू लोक सर्व जगांत अधिक सुदृढ प्रकृतीचे असते आणि इंग्रज, अमेरिकन इत्यादि मांसाहारी जाती अनेक प्रकारच्या रोगांस बळी पडून नष्ट झाल्या असत्या. बकऱ्याचें मांस खाल्ल्यानें बकऱ्यासारखी बुद्धि होते व डुकराचें आणि माशाचें मांस खाल्ल्यानें डुकराचे आणि माशाचे बुद्धिधर्म आंगीं येतात असें एक पक्ष म्हणतो. यावर दुसरा पक्ष उत्तर देतो कीं, बटाटे खाऊन बटाट्यासारखा मेंदू होईल. अशा प्रकारें निर्जीव अन्न खाऊन आपला मेंदू निर्जीव बनवून घेण्यापेक्षां कोणत्याही जिवंत प्राण्यासारखा मेंदू असणें अधिक बरें नाहीं काय? शाकान्नांत जे रासायनिक पदार्थ असतात तेच पशूच्या मांसांतही असतात असें एक पक्ष म्हणतो. यावर दुसरा पक्ष त्याची थट्टा उडवून म्हणतो कीं, हे पदार्थ हवेंतही असतात; मग तुम्ही हवेवरच कां राहात नाहीं? शाकाहारी लोक अधिक कष्टाळू आणि अधिक सोशिक असतात असें एका पक्षाचें म्हणणें आहे. यावर दुसरा

पक्ष म्हणतो कीं तसें असतें तर शाकाहारी राष्ट्रें आज सर्वांच्या पुढें असतीं. हिंदु आणि चिनी या लोकांची आज काय दशा आहे ती पहा. हे लोक मांसभक्षण करीत नाहींत. डाळ तांदुळासारख्या शाकान्नावर ते आपला उदरनिर्वाह करतात. ते आज किती हीन दशेस पोहोंचले आहेत? पूर्वीं जपानी लोकांचीही हीच दशा होती; पण ते मांसान्न भक्षण करूं लागल्यापासून त्यांची स्थिति सुधारली. मांसाहारापासून अग्निमांद्य उद्भवतें असें एक पक्ष म्हणतो, तर दुसरा पक्ष शाकान्नापासूनच पोटाच्या व्याधी उद्भवतात असें म्हणतो. शाकान्नांत सारकपणा अधिक असला तरी तेवढ्याकरितां सर्व जगाला शाकाहारी बनविण्याचा तुम्हांस काय अधिकार आहे असेंही एक पक्ष म्हणतो.

यांपैकीं कोणत्याही पक्षाचें म्हणणें खरें असलें तरी मांसाहारी राष्ट्रें शूर, निधड्या छातीचीं आणि विचारवंत असतात ही गोष्ट मात्र खरी. हिंदुस्थानांत यज्ञयागांचा धूर आकाशास जाऊन मिळत होता आणि हिंदु लोक पशूंचें मांस सेवन करीत होते, त्याच वेळीं विशाल बुद्धीचे लोकोत्तर पुरुष तेथें निर्माण झाले असें मांसाहारी लोक म्हणतात; पण हिंदू लोकांनीं मांसाचा त्याग करून ते शाकाहारी बनल्यानंतर त्यांच्यांत एकही महापुरुष उत्पन्न झाला नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे. आपल्या देशांत आर्यसमाजांतही याच प्रश्नावर दुफळी झाली आहे. आर्यसमाजाचा एक पक्ष मांसाहार अवश्य आहे असें म्हणतो आणि दुसरा पक्ष ती गोष्ट अन्याय्य आणि पापमूलक आहे असें समजतो. अशा रीतीनें या प्रश्नावर उलटसुलट वादविवाद चालू असून कित्येक वेळां या पक्षांच्या मोठ्या खड्याजंग्याही झाल्या आहेत. या प्रश्नाचा सर्व बाजूंनीं विचार करून आणि हेकेखोरपणा एका बाजूस ठेवून विचार करतां हिंदुशास्त्रांचें म्हणणें बरोबर आहे असें माझें मत झालें आहे. निरनिराळ्या वर्णांस आणि विशिष्ट धंद्यांच्या लोकांस इतर गोष्टींप्रमाणेंच अन्नही निरनिराळ्या प्रकारचें असावें असें आमच्या शास्त्रांचें मत आहे. वास्तविक विचार करतां हें मत सर्वथैव ग्राह्य दिसतें. पण सांप्रतचे हिंदू लोक शास्त्रासही अनुसरत नाहींत अथवा मोठमोठ्या आचार्यांच्या आज्ञाही मानीत नाहींत.

मांसान्न भक्षण करणें हें रानटीपणाचें लक्षण असून शाकाहार अधिक पवित्र आहे हें कोण नाकबूल करील? ज्या कोणाला शुद्ध धर्ममार्गाचें अवलंबन करा-

वयाचें असेल त्यानें शुद्ध शाकाहारच सेवन केला पाहिजे; पण या जगांतील अहमहमिकेंत पडून त्यांत नित्य घडून येणाऱ्या तंट्याभांडणांत ज्याला विजय मिळवावयाचा असेल, त्यानें मांसान्न अवश्य सेवन केलें पाहिजे. संसारसमुद्राच्या खडकाळ प्रदेशांतून आपल्या प्रपंचाचें तारूं पैलतीरीं सुरक्षित नेण्याची जवाबदारी ज्याच्या शिरावर असेल, त्याला मांसान्नावांचून गति नाहीं. ' बळी तो कान पिळी ' हा न्याय मानवजातींत जोंपर्यंत शिल्लक असेल, तोंपर्यंत मांसान्नाचा प्रचार बंद करणें शक्य नाहीं. अशा स्थितींत मांसान्नाचा त्याग करणें अवश्य असेल, तर त्याच्या जागीं त्याच गुणधर्मांनीं युक्त असा एकादा दुसरा पदार्थ शोधून काढला पाहिजे. असें न झालें तर बलिष्ठांचें साम्राज्य सर्वत्र होऊन अशक्त लोक सर्वकाळ त्यांच्या पायांखालीं तुडविले जातील. एकाद्या विशिष्ट व्यक्तीवर एकाद्या विशिष्ट अन्नाचा परिणाम काय झाला, हें पाहून त्यावरून सर्वसाधारण नियम बांधणें चुकीचें आहे. अशा वेळीं एका सबंध राष्ट्राची तुलना दुसऱ्या सबंध राष्ट्राशीं करून अनुमानें काढिलीं पाहिजेत.

खुद्द शाकाहारी लोकांविषयीं विचार करतां त्यांच्यांतही अनेक प्रकारचे मतभेद दिसून येतात. तांदूळ, बटाटे, गहूं वगैरे धान्यें ' स्टार्च ' पदार्थानें युक्त असल्यामुळें निरुपयोगी आहेत असें कित्येक म्हणतात. असल्या प्रकारच्या अन्नामुळें नाना प्रकारचे रोग उद्भवतात असें त्यांचें म्हणणें आहे. या अन्नापासून शरिरांत शर्करा अधिक उत्पन्न होते आणि शरिरावर तिचा वाईट परिणाम होतो. गहूं आणि तांदूळ यांसारखे पदार्थ गाईस अथवा बैलास घातले आणि त्यांस मोकळेपणीं चरूं दिलें नाहीं तर हीं जनावरें रोगट होतात; पण अशा रोगट जनावरांस कुरणांत मोकळें सोडून त्यांस यथेष्टपणें चरूं दिल्यास तीं सुधारतात. गवत आणि इतर हिरव्या वनस्पती स्टार्चयुक्त नसतात. ओरँग ओटँग या नांवाचा पशू गवत आणि बदामासारख्या बिया यांजवर उदरनिर्वाह करतो. बटाटे अथवा गहूं तो खात नाहीं. असले पदार्थ खावयाचेच झाले तर पक्क दशेस येण्यापूर्वी तो ते खातो. हे पदार्थ कच्चे असतात तेव्हां त्यांत स्टार्च उत्पन्न झालेला नसतो. भाजलेलें मांस, फळें आणि दूध हीं भक्षण केलीं असतां आयुष्य वाढतें असेंही कित्येकांचें म्हणणें आहे. जे लोक पुष्कळ फळें नित्य खातात त्यांचें तारुण्य लौकर नष्ट होत नाहीं असा अनुभव

आहे. फळांतील आम्लाचा परिणाम हाडांवर जो बुरा असतो त्यावर होत असतो. या बुऱ्यामुळेंच मनुष्याला वृद्धावस्था प्राप्त होत असते. फळांतील आम्लांत हा बुरा विरघळून जातो.

असल्या प्रकारचे वादविवाद कधींही संपणारे नव्हत. आजपर्यंत ते जसे चालत आले आहेत, तसेंच ते पुढेंही चालू राहतील. आतां खाण्याच्या पदार्थासंबंधीं सर्वांस संमत झालेला असा एकच नियम सांगतां येईल. तो हा कीं खाण्याचे पदार्थ सात्त्विक आणि पुष्टिदायक असून ते सहज पचले जातील असे असावे. अगदीं थोड्या प्रमाणांत पुष्कळ पुष्टिदायक गुण ज्या अन्नांत असेल तें अन्न सेवन करावें. तसेंच तें अन्न पचण्यास आणि आंगीं लागण्यांत फार वेळ लागू नये असें असावें. ज्या अन्नांत बलदायक गुण कमी प्रमाणावर असतो, तें अन्न पुष्कळ खावें लागतें; आणि यामुळें त्या अन्नाचें पचन होण्यास सारा दिवस लागतो. सारें शरीरसामर्थ्य केवळ अन्न पचविण्यांतच खर्च होऊं लागलें तर दुसरीं कामें आपणाकडून कशीं होतील ?

सर्व प्रकारचे तळलेले पदार्थ हे खरोखर विषारी आहेत असें म्हटलें पाहिजे. हलवायाच्या घराचा दरवाजा म्हणजे यमाच्या घराचें दारच होय. उष्ण कटिबंधांतील प्रदेशांत तेल आणि तूप यांचा उपयोग जितक्या कमी प्रमाणावर करतां येईल तितका करावा. तुपापेक्षां लोणी हें पचनास अधिक हलकें आहे. गव्हांतील मैदा अथवा रवा हा दिसण्यास शुभ्र दिसला तरी त्यांत बलदायक भाग फार थोडा असतो. सगळे गहूं दळून केलेली कणीक अन्नदृष्ट्या अधिक चांगली. सध्यांच्या काळींही अन्न तयार करण्याची खेड्यापाड्यांतील पद्धत शहरांतील पद्धतीहून अधिक चांगली आहे. लूची आणि कचोरी यांसारख्या पदार्थांचा प्रवेश वायव्य प्रांतांतून बंगाल्यांत झाला आहे; तथापि त्या प्रांतांतही या पदार्थांचे सेवन क्वचित् प्रसंगींच केलें जातें. तिकडील लोकही तुपांत तळलेले पदार्थ नेहमीं खात नाहींत. लूची आणि पेढे बर्फी असल्या प्रकारच्या मिष्टान्नाचा शोक मथुरेच्या चोब्यांत ( मल्ल ) आढळतो; तथापि थोड्याच वर्षांच्या अवधींत या चोब्यांची पचनशक्ति बिघडून जाते आणि नंतर जठराग्नि प्रदीप्त करणारीं चूर्णें भक्षण करून त्यांना दिवस कंठावे लागतात.

खायाला पुरेंसें मिळत नाहीं म्हणून दरिद्री लोक अन्न अन्न करून प्राण सोडतात; उलटपक्षीं श्रीमंत लोक असेच उपासमरीनें मरतात; कारण ते जें अन्न खातात तें त्यांस पचत नसल्यामुळें त्यांची उपासमार होते. आपण पोटांत जे सारे पदार्थ भरतों ते सारेच खरें अन्न या नांवास पात्र नसतात. ज्याचें पूर्ण पचन होऊन जें आंगीं लागेल तेंच खरें अन्न होय. वाटेल तो पदार्थ खात सुटण्यापेक्षां कडकडीत उपास करणें अधिक बरें. हलवायाच्या दुकानांतील पदार्थांत पुष्टिदायक असे पदार्थ वहुधा कोणतेही नसतात. उलटपक्षीं ते विषारीच असतात असें म्हटलें पाहिजे. असल्या प्रकारच्या पदार्थांचें सेवन पूर्वकाळीं लोक क्वचितच करीत असत; पण अलीकडे शहरवासी लोक आणि विशेषत: खेड्यांतून शहरांत नुकतेच रहावयास गेलेले लोक या पदार्थांचें सेवन नित्य करीत असतात. अशा स्थितींत अग्निमांद्याच्या आजारानें ते लवकर मृत्युमुखीं पडतात यांत काय नवल आहे? फार भूक लागली तर असले मिष्ट पदार्थ न खातां पैशाभऱ्याचे चुरमुरे घेऊन खाणें अधिक चांगलें. हें अन्न अधिक स्वस्त आणि अधिक पुष्टिकारकही आहे. भात, वरण, कोंडा असलेली कणकेची चपाती, भाज्या, दूध आणि मासे एवढें अन्न मनुष्यास पुरेसें आहे; पण वरण घ्यावयाचें तें दक्षिण हिंदुस्थानांतील लोकांप्रमाणें अगदीं पातळ करून घ्यावें. ज्याला मांसान्न भक्षण करण्यास हरकत नसेल त्यानें मांस घ्यावें. पण त्यांत उष्ण मसाल्यांचा उपयोग करूं नये. मसाले हे अन्नांत येत नाहींत; केवळ संवयीमुळें मसालेदार पदार्थांची चटक लागते. पण असली संवय परिणामीं घातक आहे. डाळही फार पुष्टिदायक आहे; पण ती पचण्यास फार कठीण आहे. वाटाण्यांचें सार हें पचण्यास हलकें असून फार रुचकरही असतें. वाटाण्यांचें सार हें पॅरिस शहरांत मोठ्या पक्वानांत गणलें जातें. प्रथम वाटाणे चांगले शिजवावे आणि नंतर त्यांत थोडें पाणी घालून ते वाटावे. नंतर फडक्यांतून पाणी घालून तें पीठ गाळून घ्यावें. मग त्यांत थोडी हळद, काळीं मिरीं व मीठ चवीप्रमाणें घालून तें सार उकळावें. वर थोड्याशा तुपाची फोडणी द्यावी. हें सार पचण्यास हलकें आणि स्वादिष्ट असतें. ज्यांना मांस खाण्यास हरकत नसेल त्यांनीं त्यांत बकऱ्याचें मांस अथवा मासे घालावे.

हिंदुस्थानांत मधुमेहाच्या रोगाचा प्रसार इतका सार्वत्रिक होण्याचें मुख्य

कारण अपचन हेंच होय. आतां मेंदूच्या अत्यंत परिश्रमानेंही कित्येकांस हा रोग होत असेल; तथापि वहुतेक लोकांस हा रोग अपचनानेंच होतो यांत शंका नाहीं. लठ्ठ पोट हें अपचनाचें निदर्शक आहे. अन्न खाणें म्हणजे पोतें भरणें आहे काय ? जेवढें अन्न आपणास पचतें व अंगीं लागतें तेवढेंच खरें अन्न होय. लठ्ठ-पणा आणि कृशता हीं दोन्ही अपचनाचीं फळें होत. मधुमेहाचीं कांहीं चिन्हें आपणांत दिसूं लागलीं तरी घावरून निराश होण्याचें कारण नाहीं. फक्त आपल्या अन्नासंबंधीं अधिक काळजी घेऊन अपचन न होईल अशावद्दल खवरदारी घ्यावी. शक्य तितकें उघड्या हवेवर दूरवर रहावें, पायीं फिरत जावें आणि सडकून काम करावें. पायाच्या पोटऱ्या लोखंडासारख्या कठीण झाल्या पाहिजेत. तुम्ही नोकरीवर असल्यास शक्य तितकी लवकर रजा घेऊन हिमालयांतील वद्रि-काश्रमाची यात्रा करा. या डोंगराळ प्रदेशांतील दोनशें मैलांचा प्रवास तुम्हीं पायीं केला तर मधुमेहाचें हें भूत त्वरित पळून जाईल. डॉक्टरांच्या आणि वैद्यांच्या वाऱ्यासही उभे राहूं नका. नाना प्रकारचीं औषधें पाजून हे लोक तुमची प्रकृति अधिक बिघडवून मात्र टाकतील. होतांहोईल तों कोणतेंही औष-धच घेऊं नये. असल्या प्रकारच्या रोगांत रोगापेक्षां औषधच अधिक लौकर प्राण घेतें. आपल्या देशांत श्रीमंती आणि आळस यांची पुरी गट्टी जमली आहे. श्रीमंत लोक बहुधा परावलंबी असावयाचे. कोणीं हात दिल्याशिवाय चालतां येऊं नये अथवा कोणीं भरविल्याशिवाय जेवतां येऊं नये अशा प्रकारची स्थिति असणें हें मोठें पातकच होय. वेळीं दहावारा कोसांची मजल ज्याला मारतां येत नाहीं तो मनुष्य कसला ? आपण होऊन रोग आणि मृत्यु यांना पाचारण कर-णाऱ्या मनुष्यास कोण वांचवूं शकणार आहे ?

आंबवलेल्या कणकेपासून केलेले पाव हेंही दुष्टान्नच होय. आम्ल पदार्थ घालून कणिक आंबविली कीं ती अपायकारक होते. आंबलेले कोणतेही पदार्थ कधींही खाऊं नयेत. असले पदार्थ न खाण्यावद्दल आपल्या शास्त्रांचीही अनुज्ञा आहे. मिष्ट पदार्थ आंबला म्हणजे त्यास शुक्त असें म्हणतात. असे पदार्थ खाऊं नयेत असें शास्त्रवचन आहे. आमलेल्या पदार्थांपैकीं फक्त दहीं मात्र चांगलें आणि हितकर आहे. पाव खाणें असेलच तर प्रथम विस्तवावर चांगला भाजून नंतर खावा. अस्वच्छ पाणी आणि घाणेरडें अन्न हींच सर्व रोगांचीं प्रमुख कारणें

आहेत. पिण्याचें पाणी शुद्ध करण्यासाठीं अमेरिकेंत इतक्या प्रकारच्या योजना अस्तित्वांत आल्या आहेत कीं तिकडे तें एक आतां खूळच झालें आहे. एके काळीं पाणी फिल्टरांतून शुद्ध करीत असत; पण ही रीत आतां निरुपयोगी ठरली आहे. कारण, त्यांतून पाणी नुसतें गाळलें जात असल्यामुळें कॉलरा, प्लेग इत्यादि रोगांचे सूक्ष्म जंतु जसेच्या तसेच त्यांत राहातात. याशिवाय कांहीं दिवसांनीं त्या फिल्टरच्या भांड्यांतच अनेक प्रकारचे रोगजंतु उत्पन्न होऊं लागतात. कलकत्त्यांत फिल्टर प्रथम आले, त्यानंतर पांच वर्षेपर्यंत महामारीचा आजार तेथें उद्भवला नाहीं, असें म्हणतात; पण त्यानंतर ही सांथ नेहमींप्रमाणेंच चालू आहे. ते प्रचंड फिल्टर रोगबीजांचें घरच होऊन बसले आहेत. तीन मडकीं एकावर एक ठेवून पाणी गाळून घेण्याची आपली साधी पद्धत सर्वोत्कृष्ट आहे; पण या मडक्यांत धान्याची वाळू आणि कोळसे हीं द्रव्यें दर एक दोन दिवशीं बदललीं पाहिजेत अथवा तीं चांगलीं तापवून मग त्यांचा उपयोग केला पाहिजे. तुरटी किंवा फटकी पाण्यांत टाकून तें पाणी गाळून घेण्याची जी पद्धत कलकत्त्याच्या आजूबाजूच्या खेड्यांत आहे तीही उत्तम आहे. पाण्यांतील सर्व गाळ आणि रोगबीजें तुरटी आपणाकडे ओढून घेते आणि शेवटीं हा सर्व मळ भांड्याच्या तळाशीं बसतो. परदेशांतून आणलेले सर्व फिल्टर आपल्या या साध्या रीतीपुढें रद्द आहेत. पाण्यांत तुरटी टाकण्यापूर्वीं तें पक्कें उकळून घेतलेलें असलें तर अधिक चांगलें. अमेरिकेंत आणखी निराळीच एक पद्धत प्रचारांत आहे. पाण्याची प्रथम वाफ करून नंतर त्या वाफेचें पुन्हां पाणी करतात. मग त्या पाण्यांत शुद्ध हवा मिसळतात. पाणी उकळत असतां जी हवा त्यांतून निघून गेलेली असते तिच्या जागीं ही शुद्ध हवा येते. हें पाणी अगदीं शुद्ध असतें.

आमच्या देशांतील साधारण खाऊनपिऊन सुखी लोकसुद्धां नाना प्रकारचे मिष्ट आणि तुपांत तळलेले पदार्थ आपल्या मुलांस चारीत असतात. आपल्या मुलांना नुसतें साधें अन्न खाऊं घातलें तर लोक आपल्या श्रीमंतीला हंसतील, याची भीति त्यांस वाटत असते; मग असल्या प्रकारच्या अन्नावर पोसलेल्या मुलांची वाढ वेडीवांकडी झाली तर त्यांत नवल काय ? असलीं मुलें बहुधा आळशी, मूर्ख आणि परावलंबी असावयाचीं. इंग्रज लोक जात्याच सुदृढ प्रकृतीचे आहेत. ते उद्योगांत रात्रंदिवस चूर असतात. तशांतून त्या देशाचें हवा-

१५९३



मानही अत्यंत शीत असतें. अशा स्थितींतही तुपांत तळलेल्या पदार्थांची भीति त्यांस वाटत असते. अशा पदार्थांस ते स्पर्शही करावयाचे नाहींत. आमच्या देशाचें हवामान इतकें उष्ण आहे कीं तेथें सदोदित जणूं काय आग पेटलेली. रोजच्या कामासाठीं बाहेर फिरण्याचेंही आपल्या जिवावर येतें. अशा स्थितींत लुची, कचोरीसारखे तुपांत अथवा तेलांत तळलेले पदार्थ आपण खात सुटावें हें नवल नव्हे काय ? पूर्वकाळीं आपल्यांतील श्रीमंत लोकही दहापंधरा कोसांची मजल सहज मारीत असत. ते अगदीं साधें अन्न खात असत. असे ते आपले पूर्वज शतायु होते. आतां त्यांचेच नातूपणतू मोठमोठ्या शहरांत जाऊन घमेंड-खोर मात्र बनले आहेत. अल्पवयांतच चष्म्यावांचून त्यांना दिसेनासें झालें आहे. चार पावलांच्या अंतरावर जाण्यासही त्यांस गाडी लागूं लागली आहे. थोड्या चवर्षांच्या अवधींत या तरुण बांडांस मधुमेहासारखा एकादा भयंकर रोग जडतो आणि ते अल्पायु होतात. शहरांत जाऊन ' जंटलमन ' होण्याचें हें फळ आहे. विलायती डॉक्टर आणि गांवठी वैद्य नाना प्रकारचीं रसायनें आणि काढे पाजून त्यांच्या आयुष्याची दोरी अधिक आंखूड मात्र करीत असतात. आमचे वैद्य आणि डॉक्टर जणूं काय सर्वज्ञ बनले आहेत. आपल्या औषधि-क्रियेनें हवा तो रोग आपण बरा करूं असें त्यांस वाटत असतें. कोणाचें पोट थोडें मोठें झालें असलें तर त्याला हे औषधें ढोसूं लागतात; पण आपल्या रोग्याला निदान चार पांच मैलांची रोजची रपेट करण्यास सांगण्याचें त्यांच्या डोक्यांत कधींही येत नाहीं.

मीं पुष्कळ देश पाहिले आहेत आणि अन्न तयार करण्याच्या अनेक पद्धतीही माझ्या अवलोकनांत आल्या आहेत; पण आपल्याकडील साध्या पद्धतीची बरोबरी करणारी अशी दुसरी एकही पद्धत मला कोठें आढळली नाहीं. आमच्या इकडच्ें साधें अन्न खाण्यासाठीं पुनःपुनः जन्म घ्यावा असें वाटतें. अन्नाच्या बाबतींत पाश्चात्यांची पद्धत आपण कां उचलावी हें मला तरी निदान कळत नाहीं. त्यांची पद्धत आपणांपैकीं कितीकांस परवडेल हेंही पाहिलें पाहिजे. आपणाकडे प्रचारांत असलेलें अन्न स्वस्त, शुद्ध आणि पुष्टिदायक असें आहे. आपण पाश्चात्यांच्या पद्धतीजवळ जों जों अधिक जाऊं तों तों आपलें अन्न अधिक विघडत मात्र जाईल. मोठमोठ्या शहरांत राहणारे लोक तेलकट आणि गोड पदार्थ अधिक

प्रमाणावर खात असतात. यामुळें त्यांनीं आपल्या जन्माचें मातेरें करून घेतलें असून खेड्यापाड्यांतील लोकांसही ते आपलें अनुकरण करण्यास लावीत आहेत. आपण शहरवासी असल्याबद्दल त्यांस मोठी घमेंड वाटते. खेड्यांतले लोकही सध्या इतके मूर्ख बनत चालले आहेत कीं, ते आंधळेपणानें शहरवासीयांचें अनुकरण करतात. त्यामुळें त्यांच्यांतही रोगाचें प्रमाण वाढत आहे.

येथवर अन्न आणि इतर चालीरीती यांच्यांतील गुणदोषांचें थोडक्यांत वर्णन केलें. आतां पाश्चात्यांचा सामान्य आहार कोणता आहे आणि त्यांत आतां हळूहळू बदल कसा होत आहे हें सांगतों.

सर्व देशांतील गरीब लोकांचें मुख्य अन्न म्हटलें म्हणजे कसल्या तरी प्रकारचें धान्य हेंच असतें. वनस्पती, शाकभाजी, मासे आणि मांस हे पदार्थ चैनीच्या जिनसांत गणले जात असून त्यांचा उपयोग चटणीसारखा अथवा भाजीसारखा अल्प प्रमाणावर मात्र होतो. देशांत जें धान्य मोठ्या प्रमाणावर पिकत असेल, तेंच येथील गरीब लोकांचें मुख्य अन्न असतें. बंगाल, मद्रास, ओरिसा आणि मलबार किनारा या भागांतील सामान्य लोकांचें मुख्य अन्न म्हटलें म्हणजे तांदूळ, डाळ आणि भाजीपाला हेंच होय. मासे आणि मांस यांचा उपयोग फक्त चटणीसारखा अथवा भाजीसारखा होतो. इतर प्रांतांत गहूं, बाजरी, ज्वारी इत्यादि धान्यें हेंच मुख्य अन्न आहे.

भाजीपाला, डाळ, मासे आणि मांस या पदार्थांचा उपयोग हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांत फक्त तोंडीं लावण्यापुरताच होतो. भाताला अथवा चपातीला चव आणण्यापुरताच त्यांचा उपयोग होतो. पंजाब, राजपुताना, आणि दक्षिण हिंदुस्थान या भागांतील श्रीमंत लोक आणि राजेरजवाडे नाना प्रकारचीं मांसान्नें खातात; तथापि त्यांचें मुख्य अन्न म्हटलें म्हणजे चपाती अथवा भात हेंच आहे.

याचप्रमाणें पाश्चात्य देशांतही दरिद्री लोकांचें मुख्य अन्न म्हटलें म्हणजे रोटी आणि बटाटे हेंच आहे. तिकडील गरीब लोकही मांस क्वचितच खातात. स्पेन, पोर्तुगाल, इटली आणि दुसरे उष्ण प्रदेश यांत द्राक्षें पुष्कळ उत्पन्न होतात. आणि या द्राक्षांचें आसव तिकडे पुष्कळ स्वस्तही असतें. हीं आसवें मादक नसतात; इतकेंच नव्हे तर तीं पुष्टिदायकही असतात. यामुळें या देशांतील गरीब

लोक मासे आणि मांस यांच्याऐवजीं द्राक्षासवाचा उपयोग करतात. युरोपाच्या उत्तरेकडील रशिया, स्वीडन आणि नॉर्वे या देशांतील गरीब लोकांचें मुख्य अन्न राय नांवाचें धान्य हें होय.

युरोपांतील श्रीमंत लोकांचें व अमेरिकेंतील सर्व लोकांचें मुख्य अन्न मासे आणि मांस हें असून, रोटी, भात आणि इतर पदार्थ केवळ चटणीसारखे उपयोगांत येतात. अमेरिकन लोक रोटी अगदीं थोडी खातात. मासे अथवा मांस यांचे पदार्थ हेंच त्यांचें मुख्य अन्न होय. खाण्याचे जितके पदार्थ तयार केले असतील, तितके सारे प्रत्येकीं निरनिराळ्या ताटलींत घालून वाढले जातात. यामुळें अनेक पदार्थांची थोडी थोडी चव घेतां येते आणि एकच पदार्थ अधिक प्रमाणावर पोटांत जात नाहीं. फ्रेंच लोक सकाळच्या न्याहारीसाठीं कॉफी घेतात व त्यावरोबर रोटी आणि लोणी खातात. दुपारच्या वेळीं अल्प प्रमाणावर ते मासे आणि मांस खातात. त्यांचें मुख्य जेवण रात्रीं होतें. इटालियन आणि स्पॅनिश लोक यांची पद्धति अशाच प्रकारची आहे. जर्मन लोक दिवसांतून पांच-सहा वेळ बरेंच अन्न खातात; आणि प्रत्येक वेळीं त्यांच्या भोजनांत थोडेंबहुत मांस असतेंच. इंग्रज लोक दिवसांतून तीन वेळ खातात. त्याचप्रमाणें अमेरिकन लोकही तीन वेळ जेवतात; पण प्रत्येक वेळच्या जेवणांत मांसाचा बराच भाग असतो. या सर्व देशांत मुख्य जेवण संध्याकाळीं होतें. श्रीमंत लोकांकडे फ्रेंच आचारी असतात आणि त्यांचे पदार्थही फ्रेंच पद्धतीनेंच केलेले असतात. प्रथम थोडेसे खारे मासे किंवा एकादी चटणी किंवा भाजी वाढतात. यामुळें क्षुधा प्रदीप्त होते. यानंतर मांसरस येतो. नंतर कांहीं फळें व मांसाचे पदार्थ येतात. नंतर कांहीं भाजीपाला व मांस असें वाढलें जातें. यानंतर कांहीं पक्ष्यांच्या मांसाचे पदार्थ वाढले जातात व शेवटीं एकाददुसरें गोड पक्कान्न व आइसक्रीम येतें. जेवतांना श्रीमंत लोक अनेक प्रकारच्या द्राक्षासवांचा उपयोग करतात. जेवण संपल्यानंतर श्रीमंत लोक अगदीं लहान भांड्यांतून दुधाशिवाय कॉफी घेतात. द्राक्षासवाचे जितके अधिक प्रकार जेवणाच्या वेळीं येतील तितकी यजमानाची श्रीमंती अधिक समजली जाते. तिकडच्या एकाद्या मेजवानीलाही इतका पैसा लागतो कीं, अशा प्रकारची एकादी मेजवानी आपलेकडील मध्यमशा श्रीमंतानें दिली तर त्याचें खचित दिवाळें निघेल !

पाटावर मांडी घालून बसून व समोर दुसऱ्या एका पाटावर एक ताट ठेवून आर्यलोक जेवीत असत. हीच पद्धत राजपुताना, पंजाब, महाराष्ट्र आणि गुजराथ या भागांत अद्यापिही चालू आहे. बंगाल, ओरीसा, तेलंगण आणि मद्रास या प्रांतांतील लोक ताटाखालीं पाट ठेवीत नाहींत. ताट अथवा केळीचीं पानें जमिनीवर ठेवून त्यावर ते जेवतात. म्हैसूरच्या महाराजांचें भोजनही अशाच प्रकारें नुसत्या जमिनीवर होतें. मुसलमान लोक एक मोठी सफेत चादर आंथरून तिच्यावर बसून जेवतात. जपानी आणि ब्रम्ही लोक ताटें जमिनीवर ठेवतात आणि खुरमांड्या घालून जेवतात. चिनी लोक युरोपियां-प्रमाणें टेबल आणि खुर्ची यांचा उपयोग करतात. युरोपियन लोक पूर्वी हातानें जेवीत असत; पण आतां ते चमचे आणि कांटे यांचा उपयोग करतात. चिनी लोक लांकडाच्या दोन काटक्यांनीं आपलें अन्न खातात. अशा रीतीनें पदार्थ खाण्यास पुष्कळच चतुराई पाहिजे.

प्रत्येक देशांतील लोकांचे प्राचीन पूर्वज अन्न मिळेल तेथें खात असत असें म्हणतात. एकाद्या प्रसंगीं एकादा मोठा प्राणी त्यांनीं मारला तर त्याच्या मांसाचा संग्रह ते महिनाभर करून ठेवीत. अशा स्थितींत तें मांस कुजलें तरी तें ते टाकून देत नसत. यानंतर ते हळू हळू संस्कृतावस्थेंत येऊं लागले आणि शेत-कीची विद्या शिकले. प्राचीन काळीं शिकार रोज मिळत नसे, यामुळें शिकार मिळाली म्हणजे अजीर्ण होईपर्यंत खावें आणि पुढें पांच चार दिवस सबंध उपोषण करावें असा त्यांचा क्रम असे. शेतकीचा काल सुरू झाल्यानंतर अन्न रोज मिळूं लागलें, तथापि पूर्वीची सडक्या मांसाची लागलेली चट त्यांच्यांतून गेली नाहीं. यामुळें रोजच्या अन्नाबरोबर थोडेंसें सडलेलें मांसही ते खात असत. उत्तरध्रुवाच्या अत्यंत शीत प्रदेशांत एस्किमो नांवाचे लोक राहातात. हा प्रदेश बारा महिने बर्फाच्छादित असल्यामुळें तेथें कोणत्याही प्रकारचें धान्य पिकविणें शक्य नाहीं. यामुळें त्यांचा उदरनिर्वाह मासे आणि मांस यांजवरच होतो. त्यांची क्षुधा कधीं काळीं मंदावली तर ती पुन्हां प्रज्वलित करण्याकरितां ते थोडेंसें सडकें मांस खातात. सांप्रतकाळीं मारलेल्या पक्ष्यांचा उपयोग युरोपीय लोक तावडतोब करीत नाहींत. या पक्ष्यांचें मांस थोडेंसें सडूं लागेपर्यंत त्यांस टांगून ठेवतात. कलकत्त्यांतही हरणाच्या सडक्या मांसावर लोकांच्या उड्या पड-

तात. तसेंच कांहीं जातींचे मासे थोडेसे सडले म्हणजे ते या लोकांस अधिक आवडतात. शुद्ध वनस्पतींचा आहार करणारे लोकसुद्धां कांदा आणि लसूण खातात. दक्षिण हिंदुस्थानांतील ब्राह्मणाला कांदा आणि लसूण यांवांचून घांस गिळावयाचा नाहीं. कांदा, लसूण आणि मांस यांचा निषेध हिंदुशास्त्रानें केला असून यांचा उपयोग करणें हें त्यांनीं पातकांत गणलें आहे. अर्थात् हा प्रतिबंध फक्त ब्राह्मणांपुरताच आहे. यामुळें अगदीं जुन्या मताचे ब्राह्मण कांदा आणि लसूण खात नाहींत; पण त्याच्याऐवजीं त्यांनीं हिंगाची योजना केली आहे. हिंगाची घाण इतकी तीव्र असते कीं ती कांदा आणि लसूण यांस खचित गप्प बसवील. हिमालयांतील पुराणमतवादी ब्राह्मण कांदा-लसूण खात नाहींत, पण त्याच्याऐवजीं एका जातीच्या गवताचा उपयोग ते करतात. या गवताला थेट लसणीसारखी घाण येते. शास्त्रांनीं लसूण वर्ज्य केली हें खरें, पण त्यांनीं या गवतावर वहिष्कार घातला नाहीं हेंही खरें आहे.

प्रत्येक धर्मांत अन्नभक्षणासंबंधीं कांहीं ना कांहीं नियम असतातच. या नियमांस एक खिस्ती धर्म मात्र अपवाद आहे. जैन आणि बौद्ध हे लोक मासे आणि मांस यांस कधींही स्पर्श करावयाचे नाहींत; जैन लोक तर बटाटे किंवा दुसरे कंदही भक्षण करावयाचे नाहींत; कारण ते खणून काढतांना भूमींतले किडे मारले जातात. सूर्यास्तानंतरही ते कांहीं खात नाहींत; कारण अंधारांत एकादा कीटक तोंडांत जाण्याचा संभव असतो. यहुदी लोक बिन खवल्यांचे मासे खात नाहींत. तसेंच ते डुकराचें मांस अथवा ज्या प्राण्यांना गेळें नाहींत, आणि जे प्राणी रवंथ करीत नाहींत अशांचें मांस ते खाणार नाहींत. माशाचे अथवा मांसांचे पदार्थ तयार होत असतां यहुद्यांच्या स्वयंपाक घरांत कोणीं दूध अथवा दहीं नेलें तर तो सारा स्वयंपाक खाण्यास नालायक ठरतो. यामुळें जुन्या मताचे यहुदी लोक परक्याच्या हातचें अन्न खात नाहींत. त्याचप्रमाणें ज्या मांसान्नाचा नैवेद्य ईश्वरास अर्पण केला नसेल असें मांसही ते खात नाहींत. बंगाल्यांतील लोक ज्याप्रमाणें देवीला अर्पण केलेलें मांसान्न महाप्रसाद म्हणून भक्षण करतात, त्याचप्रमाणें यहुदी लोकही फक्त महाप्रसाद मात्र भक्षण करतात; त्यामुळें त्यांस वाटेल त्या दुकानांतून मांस विकत घेण्याची परवानगी नाहीं. अशाच प्रकारचे कांहीं नियम मुसलमान लोकांतही आहेत; पण यहुद्यांप्रमाणें या गोष्टीचा ते अतिरेक

करीत नाहींत. मासे अथवा मांस यांच्या अन्नाबरोबर ते दूध खात नाहींत. पण या पदार्थांस दुधाचा स्पर्श झाल्यास ते त्याचा विटाळ मानीत नाहींत. अन्नाच्या बाबतींत हिंदु आणि यहुदी या लोकांच्या नियमांत बरेंच साम्य आहे; तथापि हिंदु लोक रानडुकराचें मांस खातात, पण यहुदी तें भक्षण करीत नाहींत. पंजाबांत हिंदु आणि मुसलमान या जातींचें मोठें वैमनस्य असल्यामुळें अन्नाच्या बाबींतही हे लोक परस्परांच्या अगदीं विरुद्ध वागत असतात. यामुळें रानडुकराचें मांस पंजाबी हिंदु हटकून खातात. रानडुकराची शिकार करून त्याचें मांस खाणें हा आपला धर्मच आहे असें रजपूत लोकांस वाटतें. दक्षिणेंत ब्राह्मण लोकांशिवाय इतर जातींचे बहुधा सारे हिंदु लोक गांवडुकराचें मांसही खातात.

बंगाल्यापासून नेपाळापर्यंत व काश्मीरच्या हद्दीपर्यंत हिमालयाच्या भागांतील सर्व हिंदु लोकांचे यासंबंधाचे नियम साधारणपणें सारखेच आहेत. भगवान् मनूंनीं घालून दिलेले नियम अद्यापपर्यंत जवळ जवळ जसेच्या तसेच पाळले जातात; तथापि बंगाल, बहार, अलाहाबाद किंवा नेपाळ या प्रांतांपेक्षां कुमान प्रांतांत या जुन्या नियमांचें प्राबल्य विशेष आहे. उदाहरणार्थ बंगाली लोक कोंबडें किंवा कोंबडीचें अंडें खात नाहींत. त्याचप्रमाणें नेपाळीही तें खात नाहींत; पण बंगाली अथवा नेपाळी लोक बदकांचीं अंडीं खातात; पण कुमान प्रांतांतील लोक हीं अंडीं निषिद्ध मानतात.

अन्नासंबंधीं शास्त्रांनीं जे नियम घालून दिलेले आहेत, त्यांचा मुख्य हेतु प्रकृति चांगली रहावी हाच आहे, यांत संशय नाहीं; तथापि अमुक एक पदार्थ प्रकृतीस हितावह आहे आणि अमुक दुसरा अपायकारक आहे हें निश्चयानें ठरविणें शक्य नाहीं. डुकरें आणि कोंबडीं वगैरे प्राणी सांपडेल ते पदार्थ खात असतात. तसेंच हीं जनावरें स्वाभाविकपणें घाणेरडींही असतात. याकरितां शास्त्रांनीं त्यांस बहिष्कार घातला आहे. रानटी पशुपक्षी कोणते पदार्थ खातात हें कोणासही ठाऊक नसतें; यामुळें त्यांजवर कोणीं बहिष्कारही घातला नाहीं. दूध स्वभावतःच पचनास जड आहे; विशेषतः पोटांत आम्लाची व्यथा असली तर दुधाचें पचन चांगलें होत नाहीं. घाईघाईनें दूध प्याल्यामुळें जीवितासही अपाय पोंचण्याची वेळ आली, अशीं उदाहरणें कित्येक वेळां नजरेस आलीं

आहेत. दूध पिणें असेल तेव्हां मुलें स्तनपान करतात त्या रीतीनें तें प्यावें. दूध थोडें थोडें घेतलें असतां सहज पचलें जातें. तें एकदम घटाघट प्याल्यास पचनास फार जड आहे. यामुळें मांसान्न आणि दूध हीं एकाच वेळीं भक्षण करूं नयेत अशी आज्ञा यहुदी शास्त्रांनीं दिली आहे.

आपल्या मुलाच्या घशांत घाईघाईनें दूध ढकलणाऱ्या आईला थोड्याच महिन्यांच्या अवधींत रडण्याचा प्रसंग येतो. मोठ्या मनुष्यानेंही दूध थोडें थोडें आणि हळू हळू घ्यावें असें वैद्यशास्त्राचें मत आहे. मुलांना दूध पाजतांना बाटलीचा उपयोग अवश्य करावा. आपल्याकडे मुलांना बोंडल्यानें दूध पाजतात; आणि तेंही अगदीं घाईघाईनें. अशा प्रकारच्या आततायीपणामुळें मुलांना लवकरच काळजाचा रोग जडतो. अशा रीतीनें पाजलेलें दूध प्राणरक्षक होण्याऐवजीं प्राणभक्षक बनतें. ज्या मुलाच्या अंगीं मुळांतच चांगला चिवटपणा असेल अशीं मुलेंच अशा प्रकारच्या तडाख्यांतून निभावयाचीं. आमच्या बाळंतिणींच्या खोल्या आणि त्यांतील शेकशेगड्यांचे प्रकार पाहिले म्हणजे इतक्या स्त्रिया आणि इतकीं मुलें या आगीच्या खाणींतून निभावतात ही परमेश्वराची मोठीच कृपा म्हटली पाहिजे.

---

## प्रकरण २ रें.

## पोषाखाच्या पद्धती.

पोषाखावरून मनुष्याच्या सामाजिक दर्जाची परीक्षा करावयाची चाल बहुतेक सर्व देशांत आहे. एकादा मनुष्य वरच्या दर्जाचा गृहस्थ आहे कीं नाहीं हें त्याच्या पोषाखावरून सामान्यपणें ठरविलें जातें. नुसतें धोतर नेसून कोणीही सभ्य बंगाली रस्त्यांतून चालणार नाहीं. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील इतर भागांतले लोक डोक्यावर पागोटें अथवा फेटा असल्यावांचून बाहेर पडावयाचे नाहींत. पाश्चात्य देशांत खाण्यापिण्याच्या आणि पोषाखाच्या बाबतींत फ्रेंच राष्ट्र इतर देशांच्या गुरुस्थानीं आहे. या बाबतींत इतर सारीं राष्ट्रें फ्रेंच लोकांचें अनुकरण करीत असतात. प्रत्येक राष्ट्रांत त्या त्या राष्ट्राची पोषाखाची विशिष्ट पद्धत अमलांत

असली तरी एकादा मनुष्य पुष्कळ पैसे मिळवून 'जंटलमन्' बनला कीं आपली राष्ट्रीय पद्धत टाकून देऊन फ्रेंच तऱ्हेचा पोषाख करूं लागतो. डच शेतकरी काबुली लोकांप्रमाणें पायजमा वापरतात. रशियन लोकांचा पोषाख जवळ जवळ तिबेटी लोकांसारखा असतो; तथापि हेच शेतकरी 'जंटलमन्' बनले कीं फ्रेंच पद्धतीचा कोट आणि विजार वापरूं लागतात. पाश्चात्यांच्या स्त्रीवर्गासंबंधानें तर बोलावयाच नको. त्यांच्या खिशांत थोडाबहुत पैसा खेळूं लागला कीं पॅरिसच्या पोषाखाशिवाय त्यांस चैनच पडावयाचें नाहीं. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स आणि जर्मनी हीं राष्ट्रें सध्या फार श्रीमंत झालीं आहेत; आणि पोषाखाच्या बाबतींत हीं सारीं फ्रेंचांचें अनुकरण करतात. हाच प्रकार युरोपांतील इतर गरीब राष्ट्रांतही सुरू होऊं लागला आहे. सारें युरोप खंड फ्रेंचांची प्रतिमा बनत आहे. पुरुषांच्या पोषाखाच्या बाबतींत सध्यां लंडन पुढें आलें असून स्त्रियांच्या पोषाखाच्या बाबतींत पॅरिस हें गुरुस्थानीं आहे. श्रीमंत लोक आपले पोषाख खुद्द त्या त्या शहरांतून आणवितात. बाह्य देशांतून येणाऱ्या पोषाखावर अमेरिकन सरकारांनीं जबर कर बसविला आहे; तथापि तेवढा जबर कर देऊनही अमेरिकन स्त्री-पुरुषें पॅरिस आणि लंडन येथील कपडे वापरतात. अमेरिका ही सध्यांच्या काळची कुबेरनगरी असल्यामुळें त्या लोकांस असली चैन परवडते.

प्राचीन आर्य लोक धोतर आणि चादर एवढ्याच वस्त्रांचा उपयोग करीत असत. क्षत्रिय लोक युद्धाच्या प्रसंगीं विजारी आणि लांब आंगरखे वापरीत असत. इतर प्रसंगीं क्षत्रियही धोतर आणि उत्तरीय वस्त्र वापरीत असत. याशिवाय ते शिरस्त्राण घालीत. हीच पद्धत बंगाल्याशिवाय इतर प्रांतांत अद्यापिही आढळून येते. डोक्याला फेटा अथवा पागोटें घालण्याची चाल बंगालशिवाय इतर सर्व प्रांतांतून रूढ आहे. इतर वस्त्रांबद्दल फारशी फिकीर कोणी बाळगीत नाहीं; तथापि शिरोभूषण हें मात्र आवश्यक मानलें जातें. प्राचीन काळीं स्त्रिया आणि पुरुष हीं दोघेंही शिरोभूषणें घालीत असत. बुद्धकाळचीं जीं चित्रें आज पाहाण्यांत येतात, त्यांत स्त्रिया आणि पुरुष या दोघांसही एकाच जातीची कौपीन घातली आहे. बुद्धाचा बाप स्वतः राजा असतांही फक्त कौपीन परिधान करून सिंहासनावर बसल्याचें दाखविलें आहे. बुद्धाच्या मातेचाही पोषाख त्याच प्रकारचा आहे. फक्त तिच्या मूर्तीच्या हातांत आणि पायांत दागिने आढळून येतात;

पण या दोहोंसही शिरोभूषणें आहेतच. बौद्धधर्मांचा राजा धर्माशोक हा एका डमरूच्या आकाराच्या आसनावर बसल्याचें दाखविलें असून त्याचा पोषाख फक्त धोतर आणि उत्तरीय एवढाच आहे. त्याच्यासमोर वारांगनांच्या नृत्याचा देखावा दाखविला आहे. या वारांगनांच्या शरिरावरही नेसावयाच्या वस्त्रावांचून इतर वस्त्रें नाहींत. पण मौज ही कीं, त्या वारांगनांच्या डोक्यांवरही पागोटीं आहेतच. दरबारांत जे मोठे सरदार दाखविण्यांत आले आहेत, त्यांनीं विजारी घातल्या असून त्यांच्या आंगांतही लांब चोगे अथवा आंगरखे आहेत. ऋतुपर्णाचा सारथी म्हणून नलराजा रथ घेऊन जात असतां त्यानें तो इतका त्वरेनें हांकला कीं ऋतुपर्णाचें उत्तरीय वस्त्र आंगावरून पडलें तें क्षणार्धांत कित्येक योजनें मागें राहिलें. राजा ऋतुपर्ण स्वयंवरासाठीं जात होता; तेव्हां अशा समारंभास धोतर आणि उत्तरीय वस्त्र हीं आवश्यक मानलीं जात असत. धोतर आणि उत्तरीय वस्त्र अथवा चादर हा आर्यांचा प्राचीन काळापासूनचा पोषाख आहे. यामुळें कोणत्याही प्रकारच्या शुभ प्रसंगीं फक्त धोतर आणि उपरणें इतक्यांचाच उपयोग हिंदुलोक आजमितीसही करीत असतात. प्राचीन काळच्या ग्रीक आणि रोमन लोकांचा पोषाखही धोतर आणि चादर हाच होता. कित्येक प्रसंगीं ग्रीक आणि रोमन लोक सदराही वापरीत असत; आणि लढाईच्या वेळीं ते आंगरखे आणि विजारी घालीत. स्त्रियांचा पोषाख बराच लांबरुंद असून तो चतुष्कोणाकृति असे. वस्त्राचे दोन तुकडे एकमेकांशीं जोडले असतां जसा आकार होईल, तशा आकाराचा हा कपडा असे. हा कपडा सदऱ्याप्रमाणें आंगांत घालून छातीभोंवतीं आणि कंबरेभोंवतीं स्त्रिया तो बांधून टाकीत. या लहान झग्यावरून त्या चादर पांघरीत असत. हा पोषाख अगदीं साधा असून दिसण्यांतहि फार सुबक असे.

इराणी लोक मात्र फार प्राचीन काळापासून निरनिराळ्या आकारांचे कपडे वापरीत आले आहेत. ही पद्धत त्यांनीं कदाचित् चिनी लोकांपासून उचलली असेल. सुखसोई आणि चैन या इतर बाबतींत चिनी लोक हे प्राचीन संस्कृतीचे आद्यगुरु होत. फार प्राचीन काळापासून चिनी लोक जेवतांना टेबल आणि खुर्चीं यांचा उपयोग करीत आले आहेत. त्याचप्रमाणें फार प्राचीन काळापासून अनेक प्रकारचे कपडेही ते वापरीत आले आहेत.

इराण देश जिंकल्यानंतर पूर्वीचा ग्रीक पद्धतीचा पोषाख टाकून देऊन शिकंदर विजार घालूं लागला. यामुळें त्याच्या ग्रीक शिपायांस त्याचा इतका राग आला कीं ते बंड करण्याच्या बेतांत आले; पण शिकंदर बादशहा कोणा-पुढेंही वांकणारा नसल्यामुळें त्यानें केवळ आपल्या अधिकाराच्या जोरावर अंग-रखा आणि विजार हा पोषाख चालू केला.

उष्ण हवेंतील प्रदेशांत वस्त्रांची जरूर फारशी भासत नाहीं. केवळ सदाचार म्हणून एक कौपीन घातली तरी पुरते. बाकीचीं वस्त्रें हीं केवळ शोभादायक म्हणून वापरलीं जातात. थंड प्रदेशांतील रानटी लोक जनावरांच्या चामड्यांचे पोषाख अंगांत घालतात; आणि हवामानामुळें तसें करणें त्यांस भागच असतें. हेच लोक सुधारत गेले म्हणजे लोकरीचीं जाड वस्त्रें आणि निरनिराळ्या आकाराचे इतर कपडे घालावयास शिकतात. मोकळ्या अंगावर दागिने घालून मूळच्या सौंदर्याची शोभा वाढविणें त्यांस शक्यच नव्हतें. दागिने घालण्याच्या निमित्तानें अंग उघडें पडलें तर थंडीनें आंकडा वळावयाचा. यामुळें दागिन्यांची सगळी हौस पोषाखांत शिरून बसली असून ते लोक अनेक प्रकारचे पोषाख घालून सौंदर्य-वृद्धीची आपली हौस भागवून घेतात. हिंदुस्थानांत दागिन्यांच्या नव्यानव्या तऱ्हा जशा वारंवार बदलतात, त्याचप्रमाणें पाश्चात्य देशांत पोषाखाच्या तऱ्हांत हर-घडी बदल होत असतो.

आनखशिखाग्र आपलें शरीर वस्त्रांनीं झांकून टाकल्यावांचून चार चौघांसमोर हिंडूं नये अशी पद्धत पाश्चात्य देशांत पडण्यास तेथील हवामान हेंच कारण होय. लौकिक चालीरीतीचा पोषाख अंगावर घातल्यावांचून लंडनांतील एकही स्त्री अथवा पुरुष बाहेर पडूं शकावयाची नाहीं. चार चौघांसमक्ष स्त्रीनें आपले पाय उघडे टाकणें हें अविनीतपणाचें लक्षण समजलें जातें; पण नाचाच्या वेळीं तोंड, खांदे आणि शरीराचा वरचा भाग उघडा टाकणें हें मात्र विहित समजलें जातें. उलटपक्षीं आपल्या देशांत स्त्रियांनीं तोंड दाखविणें हें अविहित मानलें जातें, पण पाय उघडे टाकण्याला आमची हरकत नाहीं. राजपुताना आणि हिमालयांतील कांहीं पुरुष व स्त्रिया कमरेशिवाय बाकीचें सर्व शरीर वस्त्रांनीं झांकून टाकतात.

पाश्चात्य देशांतील नर्तकी आणि नाटकांतील स्त्रिया अत्यंत झिरझिरीत पोषाख घालतात. पुरुषांचें लक्ष आपणाकडे ओढून घेण्याची त्यांची ही युक्ति आहे.

पाश्चात्य देशांत दिवसा स्त्रियांचें सर्व शरीर झांकलेलें असतें. यामुळें अत्यंत झिरझिरीत पोषाख आपोआपच मोठा लक्षवेधक होऊन बसतो. मलबारांतील स्त्रीपुरुषांच्या अंगावर नेसण्याच्या वस्त्रावांचून दुसरें कोणतेंच वस्त्र असत नाहीं. बंगाल्यांतही जवळ जवळ अशीच पद्धत आहे. पण पुरुषांसमोर मात्र स्त्रिया बुरखा घेतात आणि आपलें सर्व शरीर झांकून टाकतात.

चीनवांचून इतर सर्व देशांत पोषाखाच्या बाबतींतील सभ्यपणाच्या कल्पना फार निरनिराळ्या आहेत असें मला आढळून आलें. कित्येक वेळां या कल्पनांचा अतिरेक झाल्याचेंही आढळून येतें. कोणताही एकादा विशिष्ट पोषाख लोकांस सभ्य अथवा असभ्य कां वाटतो याचें कारण सांगतां यावयाचें नाहीं. एकाद्याला एकादा पोषाख अत्यंत असभ्य वाटला तरी पुष्कळांना तो मुळींच असभ्य वाटत नाहीं.

चिनांतील स्त्रिया आणि पुरुष डोक्यापासून पायांपर्यंत आपलें सर्व शरीर झांकून टाकतात. कन्फ्यूशस आणि बुद्ध यांच्या धर्मांचा चीन देशानें स्वीकार केला आहे. चिनी लोकांच्या नीतिविषयक कल्पना फार कडक, शिस्तीच्या आणि अत्यंत संस्कृत अशा आहेत. असभ्य भाषण, असभ्य पुस्तकें, असभ्य चित्रें अथवा असभ्यपणाची कोणतीही चाल चिनी लोकांस तिरस्कारार्ह वाटते. असली एकादी असभ्य गोष्ट त्यांच्या निदर्शनास आली तर तिचा प्रतिकार ते तेथल्या तेथेंच करतात. ख्रिस्ती प्रचारकांनीं चिनी भाषेंत बायबलचें भाषांतर केलें आहे. बायबलांत कित्येक वर्णनें इतकीं बीभत्स आहेत कीं हिंदूंच्या एकाद्या बीभत्स पुराणांतही तसलीं वर्णनें आढळावयाचीं नाहींत. हीं वर्णनें वाचून चिनी लोकांचें पित्त इतकें खवळून गेलें कीं, बायबलाचा प्रसार आपल्या देशांत होऊं न देण्याचा निश्चय त्यांनीं केला. यांतच कांहीं मिशनरी बायांनींही त्यांच्या निश्चयास जणूं काय हातभार लावला. कित्येक चिन्यांस त्यांनीं आपल्या घरीं कांहीं समारंभा-करितां पाचारण केलें होतें. हे साधेभोळे चिनी गृहस्थ तेथें जाऊन पहातात, तों त्यांच्या दृष्टीनें अत्यंत असभ्य असा प्रकार त्यांस तेथें आढळून आला. आपला सायंकाळचा पोषाख परिधान करून मिशनरी स्त्रिया पुरुषांत राजरोसपणें मिसळत असल्याचें त्यांनीं पाहिलें. आपल्या तरुण मुलांच्या हातांत बायबल-

सारखें बीभत्स पुस्तक देऊन आणि असल्या प्रकारच्या अर्धवट पोषाखानें त्यांच्यांत मिसळून हे ख्रिस्ती लोक त्यांच्या जन्माचा नाश करणार असें या चिनी लोकांस वाटलें. ख्रिस्ती म्हटला कीं चिनी मनुष्याच्या कपाळास पित्त चढतें, याचें कारण हेंच होय. वास्तविक पाहातां चिनी लोक इतर धर्मीयांशीं फार सहानुकंपेनें वागत असतात. परधर्मीयांचा द्वेष ते कधींही करीत नाहींत; पण ख्रिस्ती धर्मा-बद्दल मात्र त्यांच्या चित्तांत पुरा तिरस्कार वाणला आहे. आतां असल्या प्रकारचीं वर्णनें काढून टाकून बायबलाची नवी आवृत्ति ख्रिस्ती धर्मप्रचारकांनीं छापली असल्याचें माझ्या ऐकण्यांत आलें आहे; पण यामुळें चिनी लोकांचा संशय पूर्वी-पेक्षांही अधिक दुणावला आहे.

पाश्चात्य देशांतही देशकालपरत्वें सभ्यपणाच्या आणि चालीरीतींच्या कल्पना वेगवेगळ्या आहेत. या बाबतींत इंग्रज आणि अमेरिकन लोक यांच्या कल्पनांत बरेंच साम्य आहे. फ्रेंचांच्या कल्पना याहून वेगळ्या असून जर्मनांच्या त्याहूनही आणखी निराळ्या आहेत. रशियन लोकांच्या कल्पना तिबेटी लोकांच्या कल्प-नांच्या बऱ्याच जवळ जवळ आहेत. तुर्की लोकांच्या कल्पना आणि चालीरीती या सर्वांहून अगदींच भिन्न आहेत.

---

## प्रकरण ३ रें.

# सभ्यपणाच्या चालीरीती.

युरोप आणि अमेरिका या खंडांतील लोक प्रत्येक गोष्टींत आडपडदा राखण्या-विषयीं आपणांपेक्षां फार दक्ष असतात. शाकाहारी असल्यामुळें आपण बरेंचसें शाकान्न खातों. तसेंच आपल्या देशांतील हवामान उष्ण असल्यामुळें आपण बरेंचसें पाणीही पितों. उत्तर हिंदुस्थानांतील शेतकरी दोन पौंड वजनाची भाकरी खाऊन वारंवार विहिरींतून पाणी काढून पीत असतात. हवामान फार उष्ण असल्यामुळें इतकें पाणी प्याल्याशिवाय त्यांचें चालावयाचेंच नाहीं. तान्हेल्या लोकांस पाणी पाजण्याकरितां पाणपोयांची योजना आपल्या देशांत गांवोगांवीं

आढळून येते. अशा गोष्टी करण्यास आपण आडपडदा मुळींच ठेवीत नाहीं. अशा गोष्टींत आडपडदा ठेवणें आपणांस शक्यच नसतें. पाश्चात्यांचें मुख्य अन्न मांस हें होय; आणि त्यांच्या देशांतील हवामान थंड असल्यामुळें ते फार करून पाणी पीत नाहींत. पुरुष छोट्या ग्लासांतून थोडीशी दारू पितात. फ्रेंच लोकांना पाण्याचा तर मोठा तिटकारा आहे. अमेरिकेंतील उन्हाळ्यांतलें हवामान पुष्कळ उष्ण असल्यामुळें तेथील लोक मात्र पाणी पुष्कळ पितात. न्यूयॉर्क येथें तर उन्हाळ्यांत कलकत्त्याहूनही उष्णता अधिक असते. जर्मन लोक बीर नांवाचें मद्य बरेंचसें पितात.

थंड प्रदेशांतील लोकांस सर्दीचा विकार वारंवार होण्याचा संभव असतो. यामुळें शिंकणें आणि नाक शिंकरणें या गोष्टींचें त्यांस कांहीं वाटत नाहीं. उष्ण प्रदेशांतील लोक पाणी पुष्कळ पीत असल्यामुळें वारंवार लघुशंका करणें त्यांस जरूर पडतें. आतां या बाबींतील सभ्यपणाच्या चालीरीती पहा. पाश्चात्य देशांत लघुशंकेचें नांव काढणेंसुद्धां मोठें पातक गणलें जातें. पण आपला हातरुमाल बाहेर काढून त्यांत जोरानें नाक शिंकरणें हें अगदीं सभ्यतेचें लक्षण मानलें जातें. उलटपक्षीं आपल्या इकडे जेवतांना कोणीं नाक शिंकरलें तर तें मोठें असभ्यतेचें लक्षण समजलें जातें.

अपचन अथवा पोटांतील दुसरा कोणताही विकार यांचा उल्लेख स्त्रियांसमोर करणें हें इंग्लंडांत आणि अमेरिकेंत मोठें असभ्यतेचें गणलें जातें. आतां एकादी स्त्री म्हातारी असली अथवा एकाद्या स्त्रीची व तुमची दाट मैत्री असली तर मात्र गोष्ट वेगळी. फ्रान्स देशांत असल्या प्रकारच्या गोष्टींस फारसें महत्त्व देण्यांत येत नाहीं; आणि जर्मन लोक तर असल्या चालीरीतींची मुळींच पर्वा करीत नाहींत.

स्त्रियांसमोर बोलतांना इंग्रज आणि अमेरिकन लोक फारच जपून बोलत असतात. पाय अथवा तंगडी या शब्दाचा नुसता उच्चारही ते करावयाचे नाहींत. या बाबतींत फ्रेंच लोक आपल्या लोकांसारखेच अगदीं अघळपघळपणें बोलत असतात. जर्मन आणि रशियन लोक स्त्रियांची अथवा दुसऱ्या कोणाचीच पर्वा न करतां वाटेल ती ग्राम्य भाषा खुशाल वापरतात; तथापि प्रेमाची भाषा मात्र उघडपणें वापरण्यास युरोपांत कोणासही हरकत वाटत नाहीं. आई आणि मुलें

अथवा बहीणभावंडें यांजमध्यें प्रेमाचें भाषण अगदीं मोकळेपणें होत असतें. आपल्या मुलीला तिच्या नवऱ्याबद्दल हवे ते प्रश्न बाप विचारतो आणि तिची वाटेल तशी थट्टाही करीत असतो. अशा प्रसंगीं फ्रेंच कुमारिका लज्जेनें अधोमुख होतात; पण अमेरिकन मुली बापाच्या तोंडावरही त्यास फडाफड जबाब देतात. चुंबन अथवा आलिंगन याजबद्दल तिकडे फारसा विधिनिषेध नाहीं. या बाबतींत चारचौघांसमोर भाषण करणें असभ्यपणाचें मानलें जात नाहीं. आपल्या देशांत या बाबींत अगदीं उलट प्रकार आढळून येतो. या गोष्टींची उघडपणें चर्चा कोणी करीत नाहीं; इतकेंच नव्हे तर वाडवडिलांसमोर अशा गोष्टींचा अप्रत्यक्षपणें उल्लेख करणेंसुद्धां आपण गर्हणीय मानतों.

पाश्चात्य लोक सध्यां श्रीमंतींत लोळत आहेत. पोषाख अत्यंत स्वच्छ आणि लौकिक चालीरीतींस पूर्णपणें अनुसरून असल्यावांचून कोणासही चार मंडळींत जातां यावयाचें नाहीं. असा पोषाख नसलेला मनुष्य सभ्य या विशेषणास तिकडे पात्र समजला जात नाहीं. गळपट्टी आणि सदरा हीं दिवसांतून दोनतीन वेळ अवश्य पालटलींच पाहिजेत. गरिबांना असल्या प्रकारचे चोंचले करणें परवडत नाहीं हें उघडच आहे. बाहेरील कोटावर कसलाही डाग असतां उपयोगी नाहीं, अथवा त्यास सुरकुती असूनही चालावयाचें नाहीं. उकाडा कितीही होत असला तरी हातमोजे घालणें अवश्य मानलें जातें. रस्त्यांतील धुळीनें हात खराब होतां उपयोगी नाहीं. मळकट हातानें एखाद्या स्त्रीशीं हस्तांदोलन करणें हें मोठें असभ्यपणाचें लक्षण मानलें जातें. चूळ भरणें, थुंकणें अथवा दांत कोरणें हीं लक्षणेंही असभ्यपणाचीं मानलीं जातात. अशा गोष्टी करणारा मनुष्य पाश्चात्यांच्या दृष्टीनें चांडाळांच्या म्हणजे अस्पृश्यांच्या वर्गांत जाऊन पडतो.

शक्तीची उपासना करणें हा पाश्चात्यांचा धर्म आहे. आपल्या इकडे शाक्तपंथांत जो वामाचाराचा धर्म आहे, तोच जवळजवळ पाश्चात्यांचाही धर्म आहे. 'डाव्या बाजूला स्त्री, उजव्या बाजूला मदिरेची सुरई, समोर मांसान्न' अशा प्रकारचा हा धर्म आहे. तांत्रिकांचा धर्म योग्यांनासुद्धां अगम्य आहे अशी एक जुनी म्हण आहे. पाश्चात्य देशांत अशा प्रकारची शक्तीची उपासना राजरोसपणें सर्वत्र चालू आहे. माता आणि पुत्र हें जें स्त्रीपुरुषांचें परस्पर नातें त्याची ही छाया पाश्चात्य देशांत शक्ति आणि उपासक यांच्या संबंधांत बरीच आढळून

येते. सुधारलेल्या प्रॉटेस्टंट पंथाचें वजन युरोपांत फारसें आढळून येत नाहीं. तेथें अद्यापिही वस्तुतः रोमन कॅथोलिक मताचेंच प्रावल्य आहे. या धर्मांत जिहोवा, येशु ख्रिस्त अथवा त्रैमूर्ति यांचें फारसें महत्त्व नाहीं. या पंथाचें मुख्य उपास्य दैवत माता हें आहे. या मातेनें आपलें लेंकरूं म्हणजे येशु ख्रिस्त यास हातांत घेतलें आहे. या पंथाचे वादशहा प्रसंगीं मातेलाच हांक मारतात. त्याचप्रमाणें लढाईंत गेलेले शिपाई अथवा खलाशी मातेच्याच नांवानें संबोधितात. रस्त्यांतील शिपायींही 'माते' म्हणूनच हांक मारतात. राजवाड्यांतून, झोंपड्यांतून, देवळांतून आणि दुसऱ्या लक्षावधि जाग्यांतून 'आव्ह मराया' म्हणजे 'माते' असा उच्च ध्वनि उमटत असतो.

यानंतर शक्तिपूजेचें दुसरें स्वरूप कुमारीपूजन हें आहे. आपल्याकडील शक्त्युपासक कांहीं विशेष प्रसंगीं आणि ठरलेल्या जागीं मात्र शक्तीची आराधना करतात; पण पाश्चात्य देशांत ही आराधना सर्व काळ, सर्व दिवस आणि साऱ्या वर्षभर सर्वत्र चालू असते. स्त्रियांच्या स्थितीचें चिंतन ते लोक सदोदित करीत असतात. तिचा पोषाख, तिची बसण्याची जागा, तिचें अन्न, तिच्या गरजा आणि तिच्या सुखसोई या सर्व बाबींत तिचें मनोरंजन करण्यासाठीं हे लोक सदैव धडपडत असतात. प्रत्येक प्रसंगीं पहिला मान स्त्रियांस मिळण्याविषयीं ते फार दक्ष असतात. हा मान केवळ सरदार घराण्यांतील स्त्रियांसच मिळतो असें नाहीं; तसेंच तो तरुण आणि सुंदर स्त्रियांस मिळतो असेंही नाहीं. स्त्री तरुण असो अथवा म्हातारी असो, श्रीमंत असो अथवा गरीब असो, तुमच्या ओळखीची असो अथवा परकी असो, ती कुरूप असो अथवा सुरूप असो, तिला नेहमीं आद्यस्थान देण्यास युरोपीय सदैव उत्सुक असतात. महंमदानुयायी मूरलोकांनीं स्पेनदेश जिंकून तेथें आठशें वर्षें राज्य केलें. त्या वेळीं ही शक्तीची उपासना त्यांनीं प्रथम तेथें अमलांत आणली. शक्तीची उपासना आणि पाश्चात्यांची संस्कृति यांचें पहिलें बीजारोपण युरोपखंडांत मूरलोकांनीं प्रथम केलें. यानंतर मूरलोक ही उपासना विसरले. त्यांचें युरोपांतलें प्रावल्य हळुहळू कमी होत गेलें. त्यांची सत्ता, संस्कृति आणि कीर्ति यांचा हळूहळू नाश होत जाऊन युरोपखंड सोडून ते आफ्रिकेच्या एका कोंपऱ्यांत जाऊन पडले. त्यांच्या हातून गेलेली सत्ता आणि संस्कृति यांचा लाभ युरोपखंडास झाला. मूरलोकांच्या हातून

निघून गेलेल्या शक्तीनें ख्रिस्ताच्या अनुयायांस आशीर्वाद दिला आणि त्यांच्या घरांत ती प्रकाशमान होऊं लागली.

---

## प्रकरण ४ थें.

# फ्रान्स–पारिस.

—:०:—

हें युरोपखंड म्हणजे आहे तरी काय? काळे, पिंवळे, तांबडे इत्यादि सगळ्या वर्णांच्या लोकांवर युरोपीय लोक आज राज्य करीत आहेत. आशिया, आफ्रिका आणि अमेरिका हीं तिन्ही खंडें त्यांनीं आज पादाक्रांत करून टाकिलीं आहेत. या कलियुगांत त्यांनाच राज्यपद मिळाल्याचें दिसतें. असें कां? युरोपखंडा-बद्दल बरोबर ज्ञान आपणास करून घ्यावयाचें असेल, तर तें करून घेण्याकरितां आपण फ्रान्सकडे वळलें पाहिजे. पाश्चात्य देशांच्या संस्कृतींत जें कांहीं उत्तमो-त्तम म्हणून गणलें जातें, त्या साऱ्यांचें आदिस्थान फ्रान्स देश हा आहे. जगांतील सर्व सत्ता युरोपांत एकवटली असून युरोपांतील सत्ता पॅरिसमध्यें एकवटली आहे. पाश्चात्य संस्कृतीचा मध्यबिंदु पॅरिस हा आहे. नीतितत्त्वें, चालीरीती, विज्ञान आणि इतर जें कांहीं बरेंवाईट युरोपांत असेल, त्या साऱ्याचा उगम पॅरिस येथें होत असून तेथेंच त्याला परिणतावस्थाही प्राप्त होते. पॅरिस हें एकाद्या मोठ्या प्रचंड समुद्रासारखें आहे. प्रचंड समुद्राच्या पोटांत ज्याप्रमाणें नानाविध रत्नें, पोंवळीं आणि मोतीं वास करतात, त्याचप्रमाणें त्यांत मगर आणि प्रचंड परभक्षी प्राणीही वास करतात. साऱ्या युरोपखंडाचें मध्यवर्ती कर्मक्षेत्र फ्रान्स हें आहे. फ्रान्स देश निसर्गसौंदर्यानें पुष्ट आहे. हा देश अत्यंत शीत नाहीं अथवा अत्यंत उष्णही नाहीं. तसेंच तो फार सुपीक असून हवेंत सर्दी फारशी नसते अथवा हवा अगदीं शुष्कही नसते. स्वच्छ आकाश, सुंदर प्रकाश, एल्म आणि ओक या झाडांचें वैपुल्य, सुंदर आणि विस्तीर्ण कुरणें, लहानमोठ्या टेंकड्या आणि त्यांच्या बाजूनें वाहणारे लहानमोठे जलप्रवाह इत्यादि प्रकारच्या सृष्टिसौंदर्यामुळें फ्रान्स देश नयनमनोहर भासतो. चीन देशाच्या एका भागावांचून फ्रान्सइतका सौंदर्यसंपन्न देश पृथ्वीतलावर दुसरा एकही नाहीं. जमिनीवर अथवा जल-

पृष्ठाच्या भागावर आणि हवेंत व आकाशांत सर्वत्र रमणीयता भरून राहिली आहे. सृष्टीचें सौंदर्य अशा प्रकारचें आणि तेथील मनुष्येंही सौंदर्याचीं भोक्तीं आहेत. तेथील गरीब व श्रीमान् लोक आपलीं घरेंदारें, आपल्या खोल्या, आपले रस्ते, आपलीं पटांगणें, आपलीं उद्यानें आणि उद्यानांतील पदपथ अत्यंत नीटनेटके आणि स्वच्छ ठेवीत असतात. सारा देश म्हणजे जणूं काय सृष्टीच्या देखाव्याचें एकादें सुंदर चित्रच रंगवून ठेविलें आहे. तेथील लोकही सृष्टिसौंदर्याचे कट्टे भक्त आहेत. सृष्टिसौंदर्याबद्दलची इतकी आवड जपानी लोकांवांचून दुसऱ्या कोणत्याही लोकांत मला आढळून आली नाहीं. फ्रान्स देशांतील इमारती राजवाड्यांसही तुच्छ करतात. तेथील उद्यानें इंद्राच्या नंदनवनाची बरोबरी करतात. मोठमोठ्या वृक्षांच्या राया आणि सामान्य शेती जमिनीही सौंदर्यसंपन्न करण्यासाठीं ते लोक झटत असतात आणि या दृष्टीनें त्यांच्या कार्यास यशही आलें आहे.

गॉलॉय, रोमन्, फ्रांक आणि इतर राष्ट्रें यांचे हजारों तंटे या भूमीवर प्राचीन काळीं निकालास लागले आहेत. रोमन साम्राज्याचा विनाश झाल्यानंतर युरोपचें अधिराज्य फ्रांक लोकांकडे आलें. त्यांच्या शार्लमान् नांवाच्या राजानें आपल्या तलवारीच्या जोरावर ख्रिस्ती धर्माचा प्रवेश युरोपखंडांत करविला. या फ्रांक लोकांमुळेंच युरोपखंडाची ओळख आशियाखंडास झाली. यामुळेंच युरोपीय लोकांस फ्रांकी, फिरंगी, फ्रांकी, फिलिंगा इत्यादि नांवें आशियाखंडांतील लोकांनीं दिलीं.

पाश्चात्य संस्कृतीचें पहिलें माहेरघर जुना ग्रीक देश होय. ग्रीक साम्राज्य नामशेष झालें, आपल्या अत्युच्च शिखरापासून तें पतन पावलें, रानटी लोकांच्या हल्ल्यांमुळें रोमन साम्राज्याचे तुकडे तुकडे झाले आणि युरोपखंडाचा दीप मालविला गेला. या संधीस आशियाखंडांतील दुसरें एक रानटी मानवकुल उदयास आलें. या कुलाचें नांव आरब हें होय. जगाच्या निरनिराळ्या भागांवर आरबांची लाट विलक्षण झपाट्यानें पसरत गेली. शक्तिमान् इराण देशही आरबांनीं पादाक्रांत केला आणि त्यास महंमदी धर्माची दीक्षा दिली. यामुळें मुसलमानी धर्माचें स्वरूप अगदीं पालटलें. आरबांचा धर्म आणि इराण देशाची मूळची संस्कृति यांचा मिलाफ झाला.

## पूर्व आणि पश्चिम.

आरबांच्या तलवारीच्या प्रतापानें इराणची जुनी संस्कृति सर्व दिशांस पसरूं लागली. इराणी संस्कृति ही प्राचीन ग्रीक आणि हिंदु संस्कृति या दोहोंपासून बनलेली आहे. पश्चिमेकडून आणि पूर्वेकडून महंमदी स्वाऱ्यांच्या लाटा युरोपा-वर जोरानें जाऊन आदळल्या; आणि या लाटांबरोबरच तत्त्वज्ञान आणि संस्कृति यांचे प्रकाशकिरण तेथें फांकूं लागले. या काळापर्यंत युरोपखंड रानटी अवस्थेंत होतें. मुसलमानांच्या स्वाऱ्यांनंतर युरोपखंडाची ही रानटी अवस्था नाहींशी होऊं लागली. प्राचीन ग्रीक लोकांचें तत्त्वज्ञान आणि त्यांच्या कला यांचा प्रवेश इटलींत झाला, यामुळें एका काळीं सर्व जगाची राजधानी म्हणून नाणावलेलें जें रोम शहर तें नवजीवनकला धारण करूं लागलें. मुख्यतः फ्लॉरेन्स शहरीं हें नवजीवन चांगलेंच फोंफावलें, आणि यामुळें पुराण आणि मृत झालेला इटली पुन्हां सजीव होऊं लागला. याच कालास पुनरुज्जीवनाचा काल असें म्हणतात. वास्तविक पाहातां या कालापूर्वी इटलीशिवाय इतर सारें युरोपखंड अज्ञानतिमिरांत बुडून गेलें होतें. युरोपखंडांत ज्ञानरवीचा प्रकाश या वेळींच प्रथम फांकला. सोळाव्या शतकांत युरोखंडाचा जन्म झाला असें म्हटलें पाहिजे. याच सुमारास अकबर, जहांगीर, शहाजहान आणि इतर मोंगल बादशहा यांनीं हिंदुस्थानांत आपलें साम्राज्य स्थापिलें होतें.

इटली हें जुनाट राष्ट्र आहे. पुनरुज्जीवनाच्या वेळीं इटली देश जागृत झाला आणि त्यानें या नव्या हांकेस प्रत्युत्तर दिलें; पण जणूं काय आपला निद्राभंग होऊं नये म्हणून तो पुन्हां दुसऱ्या कुशीवर वळला आणि पुन्हां त्याला गाढ झोंप लागली. अनेक कारणांच्या संयोगामुळें हिंदुस्थानांतही नव्या जागृतीचीं चिन्हें थोडींशीं दिसूं लागलीं होतीं. अकबरानंतर तीन पिढ्यांपर्यंत तत्त्वज्ञान आणि कलाकौशल्य यांस येथें बराच मान होता. पण हिंदुस्थान हाही फार वृद्ध देश आहे. इटलीप्रमाणें तोही पुन्हां गाढ झोंपेंत निमग्न झाला.

युरोपांत जें हें पुनरुज्जीवन झालें, त्याची विशेष जाणीव नवीन, तरुण आणि शक्तिमान् अशा फ्रांकांच्या राष्ट्रांत विशेष तऱ्हेनें जाणवूं लागली. फ्लॉरेन्समध्यें सुधारणा सर्व दिशांनीं एकवटूं लागली आणि तेथें सुधारणेच्या सर्व बाजूंचें एकीकरण होऊन तिला नवें स्वरूप येऊं लागलें; पण सुधारणेचा एवढा

जोमदार प्रवाह स्वतःपाशीं सांठवून ठेवण्यास लागणारें सामर्थ्य इटलीपाशीं नव्हतें. यामुळें हिंदुस्थानाप्रमाणेंच या पुनरुज्जीवनाचा अंत युरोपांतही झाला असता; पण युरोपखंडाच्या चांगल्या नशिबामुळें या संस्कृतीस तरुण फ्रांक लोकांचा आश्रय मिळाला. त्यांनीं ही संस्कृति आपलीशी केली. आपल्या राष्ट्राचें तारूं मोठ्या जोमानें त्यांनीं या संस्कृतीच्या लाटेंत ढकललें. हळूहळू या संकृतीचा सांठा वाढत चालला आणि कालेंकरून याचे लहान लहान प्रवाह सर्वत्र वाहूं लागले. युरोपां-तील इतर राष्ट्रांनीं हे प्रवाह आपापल्या देशांत नेले आणि तेथें आपल्या तरुण आणि जोमदार अशा जीवनकलेनें त्यांचें पोषण केलें. यामुळें या संस्कृतीस अधि-काधिक भरती येऊं लागली. कालेंकरून या भरतीची लाट हिंदुस्थानच्या किना-ऱ्यास येऊन आदळली; व पुढें प्रवास करून जपान देशासही तिनें स्नान घातलें. या भरतींत स्नान करून जपान देश पुन्हां ताजातवाना झाला. जपान हें आशियाखंडांतील नवें राष्ट्र आहे.

गंगानदीचें आद्य स्थान ज्याप्रमाणें गोमुखी हें आहे, त्याचप्रमाणें युरोपीय संस्कृतीचें आदिस्थान पॅरिस हें आहे. पॅरिस ही सदानंद नगरी आहे. या पृथ्वी-तलावर जर कोठें स्वर्गाचा देखावा दिसत असेल, तर तो याच शहरीं दिसतो. अशा प्रकारची, चैन, अशा प्रकारचें सुखसोईचें वैपुल्य आणि इतका आनंदी-आनंद लंडन किंवा बर्लिन येथें आढळावयाचा नाहीं. लंडन शहरीं कुबेराचें भांडागार आहे हें खरें; न्यूयॉर्क शहर संपत्तींत लोळत आहे हेंही खरें; तसेंच बर्लिन शहर सरस्वतीचें माहेरघर आहे हेंही खरें; पण फ्रेंचांच्या राजधानींत जी मजा आणि जी बुद्धीची चमक दिसून येते, ती या तिन्ही शहरीं सांपडा-वयाची नाहीं. पैसा पुष्कळ असेल, तत्त्वज्ञानाचा भरपूर सांठाही असेल आणि एकाद्या देशांत सृष्टिसौंदर्याचें वैपुल्यही असेल; पण या सर्वांचा खरा भोक्ता सांपडणें मात्र दुर्मिळ आहे. ग्रीक लोकांचें प्राचीन वैभव आणि त्यांची प्राचीन दानत आज फ्रेंचांपाशीं आहे. मेलेल्या ग्रीक देशानें फ्रान्सांत जणूंकाय पुन-र्जन्म घेतला. फ्रान्स देश सदा आनंदी आणि सदा उत्साहपूर्ण असा आहे. फ्रेंच लोकांत बुद्धीचा खोलपणा आणि गांभीर्य यांचा अभाव असावा असें वरवर पाहाणारास वाटतें. पण ते लोक बाह्यतः जितके उच्छृंखल तितकेच अंतः-करणाचे गंभीरही आहेत. कोणतेंही कार्य ते उत्साहानें आणि निश्चयानें पार

पाडतात, पण थोड्याशा अडचणीबरोबर ते हतबलही होतात; पण ही दुर्बलता केवळ क्षणिक टिकणारी आहे. दुसऱ्याच क्षणीं त्यांचें मुख नव्या आशेनें आणि नव्या उत्साहानें पुन्हां प्रफुल्ल होतें.

पॅरिसच्या विश्वविद्यालयाच्या नमुन्याबरहुकुम युरोपांतील इतर विश्वविद्यालयें उभारलीं गेलीं आहेत. जगांतील शास्त्रीय शोधांचीं ज्ञानमंदिरें हीं फ्रेंचांच्या ज्ञान-मंदिरांच्या नकला आहेत. इतर खंडांत आपल्या वसाहती स्थापण्यास फ्रेंचांनींच प्रथम सुरवात केली. लष्करी भाषेंतील पारिभाषिक फ्रेंच शब्दही इतर भाषांत अद्यापि वापरले जातात. फ्रेंचांच्या लेखनपद्धतीचें अनुकरण युरोपखंडांतील इतर सर्व भाषांनीं केलें आहे. भौतिक शास्त्रें, तत्त्वज्ञान आणि कलाकौशल्य यांची खाण पॅरिस शहर हें आहे. या सर्व बाबतींत फ्रेंचांचें अनुकरण इतर सर्व राष्ट्रें करतात. युरोपांत फ्रेंच लोक हे एकटेच जणूं काय शहरवासी असून इतर राष्ट्रें त्यांच्या तुलनेनें खेडवळशीं भासतात. कोणत्याही गोष्टीला फ्रेंचांनीं प्रथम सुरवात करून दिली कीं जर्मन, इंग्रज आणि इतर राष्ट्रें त्यांचें अनुकरण करूं लागतात. कित्येक राष्ट्रांत हें अनुकरण दहावीस वर्षांनीं सुरू होतें अथवा दुसऱ्या कित्येकांत तें शेंपन्नास वर्षांनीं सुरू होतें. पण विद्या, कलाकौशल्य आणि समाजरचना या साऱ्या बाबींत फ्रेंचांचें अनुकरण इतर राष्ट्रें करतात ही गोष्ट मात्र खरी. फ्रेंचांच्या संस्कृतीनें स्कॉटलंड देशांत प्रवेश केला आणि स्कॉटलंडचा राजा जेव्हां इंग्लंडाच्या गादीवर बसला, तेव्हां तो देशहि जागृत झाला. स्कॉटलंडचें स्टुअर्ट घराणें इंग्लंड देशावर राज्य करीत होतें, त्याच काळीं रॉयल सोसायटी वगैरे संस्था इंग्लंडांत स्थापल्या गेल्या.

फ्रान्स हें स्वातंत्र्याचें माहेरघर आहे. प्रजेच्या स्वातंत्र्याचा उदय प्रथम पॅरिस येथें होऊन पुढें तें साऱ्या युरोपभर पसरलें. फ्रान्सांत उदय पावलेल्या या कल्पनेनें सारें युरोपखंड पायापासून हालवून टाकलें. स्वतंत्रता, समता आणि बंधुता या ब्रीदत्रयीचा उच्चार फ्रान्समध्यें आतां फारसा ऐकूं येत नाहीं. कारण तेथें आतां नव्या कल्पनांचा उदय होत असून फ्रेंच लोक नव्या ध्येयांच्या मागें लागले आहेत. तथापि फ्रान्सांत घडून आलेल्या राज्यक्रांतीचा प्रतिबंध युरोपां-तील इतर देशांत अद्यापिही उमटत आहे.

## प्रकरण चवथें.

पॅरिस हा सगळ्या जगाचा मध्यबिंदु असून जें राष्ट्र पॅरिसशीं आपला निकट संबंध जोडतें, त्याचा राष्ट्रीय जीविताचा हेतु अधिक लौकर सफल होतो, असें मला एका इंग्रज पंडितानें नुकतेंच सांगितलें. पॅरिस शहरला इतकें महत्त्व आहे असें समजणें थोडेंसें चुकीचें असलें तरी ज्या कोणास आपल्या एकाद्या नव्या कल्पनेचा प्रसार जगभर करावयाचा असेल त्यानें प्रथम पॅरिस येथें खटपट करावी हें मात्र खरें. कोणत्याही कल्पनेला पॅरिस येथील रहिवाशांचें पाठबळ मिळालें तर साऱ्या युरोपभर तिचा प्रतिध्वनि तावडतोब उमटूं लागतो. एकादा शिल्पकलाविशारद, चित्रकार, गवई अथवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारचा कला-पंडित पॅरिस येथें नाणावला गेला, कीं इतर देशांत त्याची प्रतिष्ठा आपोआप वाढते.

आपल्या देशांत पॅरिसबद्दल जीं वर्णनें आपणांस ऐकूं येतात, तीं बहुधा एकतर्फी असतात. त्या वर्णनांवरून पॅरिस शहर म्हणजे इहलोकींचा नरक असावा असा आपला गैरसमज होतो. कित्येक इंग्रज लोकांचाही असाच गैरसमज आहे. त्याच-प्रमाणें केवळ इंद्रियजन्य सुखाच्या मागें हात धुऊन लागलेल्या परस्थ लक्ष्मीपुत्रासही पॅरिस म्हणजे चैनीचें आणि अनीतीचें निवासस्थान असावें असें वाटतें; पण वास्तविक पाहतां लंडन, बर्लिन, व्हिएन्ना किंवा न्यूयॉर्क यांच्यासारखीं कोणतींही मोठीं शहरें या आरोपांतून मुक्त होत नाहींत. पॅरिस येथील चैनबाजींत आणि इतर देशांतील मोठ्या शहरांत फरक इतकाच कीं, इतर शहरांतील चैनीचीं साधनें अगदीं सामान्य प्रतीचीं आणि ग्राम्य असतात; पॅरिस शहरांतील चिखलसुद्धां वरून सुवर्णपत्रानें मढविलेला असतो. उपमेच्या दृष्टीनें बोलावयाचें म्हटलें तर पॅरिस शहरांतील चैन ही मयूरनृत्यासारखी असून इतर शहरांतील चैन म्हणजे डुकराचें डबक्यांतील लोळणें होय.

चैन करूं नये असें वाटणारीं राष्ट्रें जगांत कितीशीं सांपडतील ? चैनीचा तिटकारा लोकांस खरोखरच इतका असता, तर श्रीमान लोक बाकीचीं शहरें सोडून पॅरिस येथेंच कां धडपडतात ? मोठमोठे राजेरजवाडेही आपले राजमुकुट क्षणभर बाजूस ठेऊन आणि सामान्य नांवें धारण करून पॅरिस येथील चैन भोगण्याकरितां कां येऊन राहातात ? चैनीची इच्छा सर्व लोकांस सारखीच आहे. चैन भोगण्यांत कोणीही कसूर करीत नाहीं. फरक इतकाच कीं, फ्रेंच लोकांनीं चैनीला सुद्धां

शास्त्रीय रूप देऊन टाकलें आहे. या कलेला सुद्धां त्यांनीं पूर्णत्व दिलें आहे. फ्रेंच लोक खरे भोक्ते आहेत. चैन कशी करावी ही विद्या फक्त त्यांनाच अवगत असून या बाबतींत सर्व जगाचे ते आद्यगुरु बनले आहेत.

यांत आणखीही एक खुबी लक्षांत ठेवण्यासारखी आहे. पॅरिस शहरीं चैनीचे जे कांहीं ग्राम्य प्रकार चालतात, त्यांचे मुख्य भोक्ते म्हटले म्हणजे परकीय लोकच होत. या कामीं फ्रेंच लोक स्वतः फार धोरणी आहेत. आपला पैसा ते निष्कारण कधींही उधळावयाचे नाहींत. तीं राजवाड्यासारखीं हॉटेलें आणि तीं उपहारगृहें श्रीमंत पण मूर्ख अशा परकीय लोकांकरितांच आहेत. या हॉटेलांत एक वेळची मेजवानी म्हटली कीं मध्यमशा सुखवस्तु गृहस्थाचें दिवाळेंच निघावयाचें. फ्रेंच लोक चालीरीतींनीं अत्यंत सभ्य आहेत. परकीयाचा मानमरातब कसा ठेवावा, ही विद्या त्यांना चांगली अवगत आहे. परकीयांस खुष ठेवून त्यांच्या खिशाला कात्री कशी ठेवावी, हें फ्रेंच लोकांस कोणीं शिकवावयास नको. या परस्थ लक्ष्मीपुत्रांचा पैसा एकवार त्यांच्या खिशांत गेला, कीं त्यांच्या पाठीमागें मूर्खपणाबद्दल त्यांची चेष्टा करून फ्रेंच लोक गालांतल्या गालांत हंसत असतात.

याशिवाय आणखीही एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. अमेरिकन, जर्मन आणि इंग्रज या राष्ट्रांची सांप्रतची समाजरचना इतकी उघड आहे कीं, तिच्यांतील बरेवाईट गुण कोणाही परकीयास सहज पाहातां येतात. एकाद्या परकीयाचा थोडासा परिचय झाला कीं अमेरिकन लोक त्याला आपल्या घरीं रहावयास बोलवतात. जर्मन लोकांचीही अशीच पद्धत आहे. इंग्रज लोक बऱ्याच परिचयानंतर परकीयास आपल्या घरीं बोलावतात; पण फ्रेंच लोकांची पद्धत वेगळी आहे. अत्यंत दाट मैत्रीवांचून कोणाही मनुष्यास ते आपल्या कुटुंबांत राहावयास बोलवावयाचे नाहींत. एकाद्या परकीयाला अशा प्रकारची संधि मिळून त्याचा प्रवेश एकाद्या फ्रेंच कुटुंबांत झाला म्हणजे डोळ्यांत आणि कानांत किती अंतर असतें हें त्याच्या लक्षांत येतें. फ्रेंच लोकांबद्दल ज्या कांहीं गोष्टी त्याच्या कर्णपथावर आलेल्या असतात, त्या वस्तुस्थितीला धरून नसतात असें त्याला आढळून येतें. कलकत्त्यासारख्या एकाद्या मोठ्या शहरांतील एकादा हलकट वस्तीचा भाग पाहून त्यावरून एकंदर हिंदु राष्ट्राच्या दानतीबद्दल वाटेल तें मत ठोकून देण्याचें जें धाष्टर्य कित्येक परकीय लोक करीत असतात, तें किती मूर्खपणाचें आहे, हें यावरून लक्षांत

येईल. पॅरिससंबंधींही वस्तुस्थिति अशाच प्रकारची आहे. आपल्या देशांत कुमारिकांच्या वर्तणुकीसंबंधीं जितकी काळजी आपण घेतों, तितकीच फ्रेंच लोकही आपल्या कुमारिकांबद्दल घेत असतात. समाजांत अघळपघळपणें वावरण्याची त्यांस मनाई असते. विवाहानंतर फ्रेंच स्त्रिया आपल्या पतीबरोबर मात्र मोकळेपणानें समाजांत हिंडतात. आपणांप्रमाणें फ्रेंच लोकांतही वधूवरांची निवड त्यांचीं आईबापें करतात. फ्रेंच लोक जात्याच फार आनंदी स्वभावाचे असल्यामुळें कोणत्याही उत्सवप्रसंगीं नाच करण्याची पद्धत त्यांच्यांत आहे. केवळ नाच करणाऱ्या धंदेवाईक स्त्रिया तेथें असतात. कलकत्त्यांत दुर्गापूजेच्या दिवसांत ज्याप्रमाणें नाच करण्याची पद्धत आहे, त्याचप्रमाणें ती फ्रान्स देशांतही आहे. इंग्लंडांतील हवामान अशा प्रकारच्या आनंदोत्सवप्रसंगांस स्वभावतःच अनुकूल नसल्यामुळें इंग्रज लोकांची वृत्ति उदास बनली आहे; यामुळें अशा प्रकारचे नाच घरीं करविणें अयोग्य आहे असें ते म्हणतात; पण हेच इंग्रज लोक नाटकगृहांत जाऊन असल्याच प्रकारचे नाच पाहाण्यास कमी करीत नाहींत. आतां अशा प्रकारचे नाच आपल्या डोळ्यांस अयोग्य वाटतील हें मात्र खरें, पण संवयीमुळें त्यांच्या दृष्टीला त्यांत कांहीं वावगें दिसत नाहीं. मान आणि खांदे उघडे टाकून स्त्रीनें नाचणें त्यांस वावगें दिसत नाहीं. इंग्रज अथवा अमेरिकन लोकही अशा प्रकारच्या नाचांस जातात; पण घरीं गेल्यावर मात्र फ्रेंचांच्या चालीरीतीचे वाभाडे काढण्यास चुकत नाहींत.

स्त्रियांच्या पातिव्रत्याबद्दलच्या कल्पना सर्वत्र सारख्याच आहेत, हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे. समाजानें आंखून दिलेल्या मार्गापासून त्या थोड्याशाही घसरल्या तरी सर्वत्र त्यांची सारखीच नालस्ती होते; पण पुरुषांविषयीं मात्र इतका कटाक्ष कोणी दाखवीत नाहींत. फ्रेंच लोक या बाबतींत जरा अधिक मोकळे आहेत इतकें मात्र खरें. कोणत्याही देशांतला श्रीमंत म्हटला कीं तो लोकांच्या टीकेची फारशी पर्वा कधींच करीत नाहीं. सामान्यपणें पाहातां पुरुषांच्या नीतिमत्तेबद्दल युरोपांतील कल्पना फारशा कडक दिसत नाहींत. विशेषतः अविवाहित पुरुषांच्या वर्तणुकीबद्दल कोणीही फारशी चर्चा करीत नाहीं. एकादा तरुण विद्यार्थी स्त्रीसमाजापासून दूर दूर राहूं लागला, तर त्याच्या आईबापांस उलट तें वाईट मात्र वाटतें. अशा प्रकारच्या वर्तणुकीनें तो पौरुषहीन होईल असें त्यांस वाटतें. मनुष्याचा सर्वोत्कृष्ट गुण

पाश्चात्यांच्या दृष्टीनें धैर्य हा आहे. सद्गुण आणि वीरत्व हे शब्द त्यांच्या दृष्टीनें समान अर्थाचे आहेत. सद्गुण ( Virtue ) या शब्दाचा धात्वर्थ पाहिला असतां माझें म्हणणें तुमच्या लक्षांत येईल. स्त्रियांस पातिव्रत्य अवश्य पाहिजे असें पाश्चात्य लोकांसही वाटतें, यांत शंका नाहीं. एका पुरुषानें एकाच वेळीं अनेक स्त्रिया केल्या तर त्यामुळें समाजाची जी कांहीं हानी होईल, त्यापेक्षां एका स्त्रीनें अनेक पती करण्यानें ती किती तरी अधिक होईल. एका स्त्रीनें अनेक पती करण्याची चाल रूढ झाली तर त्या मानववंशाची वाढ खुंटून हळूहळू तो विनाशपंथास लागेल; यामुळें स्त्रियांच्या पातिव्रत्यासंबंधीं सर्वांचा सारखाच कटाक्ष असतो. जगांतील सर्व प्रकारच्या समाजांत पातिव्रत्यासंबंधीं इतकी काळजी दिसून येते हें खरोखर ईश्वरी सूत्रच होय. लोकसंख्या वाढत जावी असा सृष्टीचा हेतु आहे, आणि स्त्रियांचें पातिव्रत्य या हेतूला पोषक आहे. यामुळें या गोष्टींत पुरुषांपेक्षां स्त्रियांवर अधिक कटाक्ष ठेविल्यानें सृष्टिकार्याची पूर्तता होत असते.

या गोष्टीसंबंधीं इतकी चर्चा येथें करण्यांत माझा हेतु इतकाच कीं, परस्परांनीं परस्परांच्या चालीरीती नीट रीतीनें समजावून घ्याव्या. प्रत्येक राष्ट्राला एक विशिष्ट नैतिक ध्येय असतें; आणि त्या राष्ट्राच्या चालीरीतींसंबंधीं विचार करतांना तें ध्येय मनांत धरून त्या दृष्टीनें त्यांचा विचार केला पाहिजे. पाश्चात्यांच्या चालीरीतींसंबंधीं विचार करावयाचा असेल, तेव्हां तो पाश्चात्यांच्या ध्येयदृष्टीनें केला पाहिजे. त्याचप्रमाणें पाश्चात्यांनींही आमच्या दृष्टीनें आमच्या चालीरीतींकडे पाहिलें पाहिजे. आपण आपल्या दृष्टीनें त्यांच्या चालीरीतींचें परीक्षण करणें जसें चुकीचें आहे, तसेंच पाश्चात्यांनींही आमच्या चालीरीती आपल्या दृष्टीनें पाहाणें चुकीचें आहे. आमच्या आणि पाश्चात्यांच्या जीवनहेतूंत जमीन-अस्मानाचें अंतर आहे. त्यांचे आणि आमचे जीवनहेतु परस्परांस अगदीं विरुद्ध आहेत. संस्कृतांत विद्यार्थ्याला ब्रह्मचारी असें नांव आहे. ब्रह्मचारी आणि कामजित् हे शब्द समानार्थी आहेत. ज्यानें काम जिंकला तो ब्रह्मचारी. मोक्ष संपादन करणें हें आमचें अखेरचें साध्य आहे. ब्रह्मचर्यावांचून हें साध्य कधीं तरी सिद्ध होऊं शकेल काय ? याकरितां विद्यार्थिदशेंत असे तोंपर्यंत आमच्या विद्यार्थ्यांस ब्रह्मचर्यव्रत पाळणें अवश्य मानलें गेलें आहे. पाश्चात्यांचें ध्येय भोग हें आहे; यामुळें ब्रह्मचर्यव्रताचें महत्त्व आमच्याइतकें त्यांच्यांत मानलें जात नाहीं.

आतां आपण पुन्हां पॅरिस शहराकडे वळूं. सांप्रतच्या पॅरिस शहराशीं तुलना करतां येण्यासारखें दुसरें एकही शहर नाहीं. पॅरिस शहराच्या पूर्वीच्या आणि सांप्रतच्या स्थितींत जमीन अस्मानानें अंतर झालें आहे. जुन्या पॅरिस शहरांत नागमोडी वळणाचे रस्ते आणि गल्ल्याकुच्या जिकडे तिकडे होत्या. मागें झालेल्या एका प्रदर्शनांत जुन्या पॅरिस शहराचा एका नमुना मांडला होता; पण हळूहळू या शहराचें पूर्वीचें रूप आतां साफ पालटलें आहे. नेहमीं चालणारीं युद्धें आणि अंतर्गत राज्यक्रांत्या यांच्या तडाख्यांत शहराचा कोणता ना कोणता भाग सांपडून उद्ध्वस्त होऊन जात असे. शत्रूची अथवा राज्यक्रांतीची संक्रांत ज्या भागावर फिरली, त्या भागांत एकादें घरसुद्धां उभें राहात नसे. अशा रीतीनें कालेंकरून सांप्रतचें नवें शहर बनलें आहे.

सांप्रतच्या पॅरिस शहराची रचना मुख्यत्वेंकरून तिसऱ्या नेपोलियन बादशहाच्या हस्तें झाली आहे. तिसरा नेपोलियन गादीवर येण्याच्यापूर्वीच पूर्वीचें शहर मोडकळीस येत चाललें होतें. हा नेपोलियन बादशहा गादीवर आल्यानंतर त्यानें नव्या शहराची रचना केली. फ्रान्सांतील प्रसिद्ध राज्यक्रांति घडून येण्यापूर्वी फ्रान्सच्या बादशहांनीं प्रजेस कसें छळलें हें इतिहासज्ञांस सांगावयास नकोच. खुद्द तिसरा नेपोलियनसुद्धां रक्ताच्या नदींतूनच चालत जाऊन आपल्या सिंहासनावर विराजमान झाला. फ्रान्सांतील पहिली राज्यक्रांति झाली तेव्हांपासूनच फ्रेंच लोकांची चंचलवृत्ति सर्व जगाच्या नजरेस येऊं लागली. त्यांच्या अशा वृत्तीमुळें साम्राज्यास धोका येतो कीं काय अशी भीति नित्य उत्पन्न होत असे. आपल्या प्रजेस खुष ठेवण्याकरितां तिसऱ्या नेपोलियन बादशहानें पॅरिस शहराची पुन्हां नवी रचना करण्यास सुरवात केली. नवे प्रचंड रस्ते बांधण्यांत आले, व नव्या कमानी उभारण्यांत आल्या, जागोजाग त्यानें नाटकगृहें बांधविलीं व जुन्या पॅरिस शहराचीं विशिष्ट स्मृतिचिन्हें कायम राखून त्यानें पॅरिस शहरास अगदीं नवें स्वरूप दिलें. सर्व शहरभर नुसते लांबरुंद रस्ते करण्यांत आले, एवढेंच नव्हे तर या बादशहानें शहराभोंवतीं तटबंदी करून शहराचा परिघ दुप्पट वाढविला. नवे रस्ते अगदीं सरळ, रेखींव आणि रुंद असून त्यांच्या दोन्ही बाजूंस सुंदर आणि भव्य इमारती बांधण्यांत आल्या. अशाच रीतीनें बुलेवर्द, शाम्स, एलिसी वगैरे जागा निर्माण करण्यांत आल्या. असल्या जागांची प्रतिमा जगांत

दुसऱ्या कोठेंही आढळून यावयाची नाहीं. शाम्स, एलिसी या भागांतील रस्ता इतका रुंद आहे कीं रस्त्याच्या मध्यभागांतून आणि त्याच्या दोहों कडांनीं एक-सारखीं उद्यानें निर्माण केलीं आहेत. या रस्त्याचा शेवटचा भाग वाटोळा आहे. या शेवटच्या भागास प्लेस द ला कॉंकॉर्द असें म्हणतात. या जागीं फ्रान्सांतील आठ मुख्य शहरांच्या निदर्शक अशा स्त्रीप्रतिमा उभारल्या आहेत. यांपैकीं एक प्रतिमा स्ट्रॉसबर्ग शहराची आहे. १८७२ सालीं हा प्रांत जर्मनीनें फ्रान्सापासून युद्धांत हिरावून घेतला. हा प्रांत हातचा गेल्याबद्दल झालेलें दुःख फ्रेंच लोक अद्यापि विसरले नाहींत. स्ट्रॉसबर्गच्या पुतळ्याच्या गळ्यांत फुलांच्या माळा ते लोक अद्यापि घालीत असतात. तो भाग जणूं काय मृत झाला आहे असें त्यांस वाटतें. मृत मनुष्याच्या थडग्यावर फुलांच्या माळा घालण्याची पद्धत युरोपांत आहे. याच पद्धतीस अनुसरून फ्रेंच लोक स्ट्रॉसबर्गच्या पुतळ्याच्या गळ्यांत फुलांच्या माळा घालीत असतात.

दिल्ली येथील चांदणी चौक पॅरिसमधील प्लेस द ला कॉंकॉर्दसारखाच एके काळीं असावा असें मला वाटतें. त्या ठिकाणीं जयस्तंभ आणि कमानी जागोजाग उभ्या केल्या असून स्त्रीपुरुषांचे प्रचंड पुतळेही त्या जागेस शोभा देत आहेत.

बाराशें तोफांचा रस करून त्यांतून एक प्रचंड जयस्तंभ पहिल्या नेपोलियनच्या स्मरणार्थ प्लेस व्हेन्दोन् येथें उभारण्यांत आला आहे. या स्तंभावर नेपोलियन बादशहाच्या पराक्रमाचें वर्णन कोरलेलें असून त्याच्या डोक्यावर त्या बाद-शहाची प्रतिमा उभी केली आहे. इसवी सन १८३० च्या जुलई महिन्यांत फ्रान्समध्यें जी मोठी राज्यक्रांती घडून आली, तिच्या स्मरणार्थ प्लेस द ला बास्तिलमध्यें एक स्तंभ उभारला आहे. याच ठिकाणीं पूर्वींचा बास्तिल किल्ला होता. राजकीय कैदी ठेवण्याकडे या किल्ल्याचा उपयोग पूर्वीं करीत असत. कोणा एकाद्यावर राजाची गैरमर्जी झाली कीं ते त्याला उचलून या किल्ल्यांत टाकीत असत. हल्लींप्रमाणें त्या वेळीं चौकशी अथवा न्याय मुळींच केला जात नसे. राजानें आपल्या मर्जीनुरूप कोणासही केवळ एका आज्ञापत्रानें बास्तिलमध्यें टाकावें. एकाद्यानें कांहीं लोकोपयोगी काम केलें आहे कीं काय, अथवा त्याजवर एकादा गुन्हा शाबीत होतो कीं काय इत्यादि कोणतीही चौकशी न करतां केवळ राजाच्या

मर्जीमुळें या किल्ल्यांत कित्येकांस कुजत पडावें लागत असे. राजाच्या मर्जीतल्या स्त्रियांचा रोष एकाद्यावर झाला, तर त्या राजाकडून आज्ञापत्र मिळवून त्या बिचाऱ्यास या किल्ल्याची हवा दाखविण्यास चुकत नसत. या किल्ल्यांत एकवार गेलेला दुर्दैवी मनुष्य फार करून पुन्हां जिवंत बाहेर पडत नसे. अशा प्रकारच्या जुलमी सत्तेविरुद्ध प्रजेनें प्रचंड बंड उभारलें. सर्वांस स्वातंत्र्य असून सर्वांची योग्यता एकसारखीच आहे, असें फ्रेंच प्रजा म्हणूं लागली. अमुक उच्च दर्जाचा आणि अमुक कमी प्रतीचा हा भेदभाव मोडून टाकण्याचा निश्चय फ्रेंच प्रजेनें केला. खवळून गेलेल्या फ्रेंच लोकांनीं राजा आणि राणी यांजवर चाल केली. या जुलमी सत्तेचें आधिदैवत जो बास्तिल किल्ला तो त्यांनीं प्रथम मोडून टाकला. या जाग्यावर फ्रेंच लोकांनीं ती रात्र गाण्यांत आणि खाण्यापिण्यांत मजेनें घालविली. राजा पळून जाण्याचा यत्न करीत असतां लोकांनीं त्याला पकडलें. आस्ट्रियाचा बादशहा त्या राजाचा सासरा होता. तो आपल्या जांवयाला मदत करण्यासाठीं सैन्य पाठवीत आहे, अशी बातमी पसरतांच प्रजाजन रागानें आंधळे बनून जाऊन त्यांनीं राजा आणि राणी यांचा वध केला. स्वातंत्र्य आणि समता यांच्या नांवावर सर्व फ्रेंच राष्ट्र त्या वेळीं अगदीं वेडें बनून गेलें होतें. त्यांच्या हातीं सांपडलेल्या सर्व सरदार घराण्यांचा निःपात त्यांनीं केला. पुष्कळ सरदार घराण्यांनीं आपला मोठेपणा आणि आपल्या पदव्या हीं झुगारून देऊन ते सामान्य नागरिक बनले. फ्रेंच लोक इतकेंच करून थांबले नाहींत. युरोपांतील सर्व राष्ट्रांनीं उठून आपापल्या राजांस मारून टाकावें आणि त्यांच्या जुलमी सत्तेपासून आपली सुटका करून घेऊन सर्वांनीं सारखे हक्क मिळवावे अशी द्वाही त्यांनीं फिरविली. या वेळीं युरोपांतील सर्व राजांची अगदीं पांचावर धारण बसली. फ्रान्सांतील हें वेड आपल्या देशांतही पसरतें कीं काय, अशी भीति त्यांस वाटूं लागली. यामुळें फ्रेंचांच्या बंडाचा मोड करण्याकरितां आजूबाजूच्या राजांनीं फ्रान्सवर चोहोंकडून हल्ले केले. उलटपक्षीं फ्रेंच लोकही खवळून उठले. फ्रान्स रसातळास जाण्याच्या बेतास आहे, याकरितां सर्वांनीं उठून त्याचें रक्षण करावें, अशी द्वाही चहूंकडे फिरली. सर्व फ्रान्स देशांतून सर्व आबालवृद्ध स्त्रीपुरुषें आपलें राष्ट्रीय गीत गात गात स्वदेशाच्या रक्षणार्थ धांवून आलीं. थंडी मी म्हणत होती, पुष्कळांच्या आंगावर पुरेसा कपडाही नव्हता, पुष्कळसे अर्धपोटी असून पुष्कळांच्या पायांत

पादत्राणही नव्हतें. अशा स्थितींत खांद्यावर बंदुका सरसावून शत्रूंशीं दोन हात करण्यास फ्रेंच लोक मोठ्या धैर्यानें सिद्ध झाले. अशा प्रकारें सज्ज झालेल्या फ्रेंच सैन्यापुढें युरोपांतील मोठमोठ्या राजांचाही पाड लागला नाहीं. या फ्रेंच सैन्याचें आधिपत्य नेपोलियन नांवाच्या वीराकडे होतें. त्यानें एक बोट उचललें तर सर्व जगानें थरथरां कांपावें अशी ही व्यक्ति होती. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचा प्रसार आपल्या संगिनीच्या जोरावर त्यानें साऱ्या युरोपभर केला. पुढें थोड्या काळानंतर नेपोलियन हा फ्रान्सचा बादशहा झाला आणि फ्रेंच साम्राज्यास त्यानें सुसंघटित रूप आणलें.

नेपोलियनच्या पहिल्या पत्नीचें नांव जोसेफाइन असें होतें. तिजपासून त्याला पुत्रसंतति झाली नाहीं, म्हणून त्यानें तिच्याशीं घटस्फोट करून आस्ट्रियाच्या राजकन्येशीं दुसरा विवाह केला; पण जोसेफाइनच्या त्यागाबरोबर नेपोलियनच्या सद्दीसहि जणूं काय उतरती कळा लागली. रशियाविरुद्ध त्यानें केलेल्या स्वारींत त्याच्या सर्व सैन्याची वाताहात झाली. युरोपानें या संधीचा फायदा घेऊन त्याला सिंहासनावरून खालीं काढलें आणि एका बेटांत त्याची रवानगी करून देऊन जुन्या राजघराण्यांतला एक वंशज फ्रान्सच्या सिंहासनावर बसविण्यांत आला. नेपोलियन या बेटांतून सुटून आला आणि फ्रान्स देशांत त्यानें पुन्हां प्रवेश केला. सर्व फ्रेंच लोक मोठ्या उत्साहानें त्याच्या मदतीस धांवले. अशा परिस्थितींत सिंहासनावरील राजा पळून गेला; पण नेपोलियनचें नशीब एकवार फिरलें तें फिरलेंच. सर्व युरोप त्याजविरुद्ध पुन्हां एकवटलें आणि वाटर्लूच्या लढाईत नेपोलियनचा पुरा मोड झाला. एका इंग्रजी गलबतावर बसून नेपोलियन इंग्रजांस शरण आला. सेंट हेलिना बेटांत इंग्रज लोकांनीं त्याला जन्मभर कैदेंत ठेवलें होतें. नेपोलियनची वाट लागल्यानंतर जुन्या राजघराण्यांतील एक वंशज फ्रान्सच्या सिंहासनावर पुन्हां आरूढ झाला. थोड्या कालानंतर फ्रेंच लोक या जुलमी राज्यपद्धतीस त्रासून गेले. त्यांनीं पुन्हां बंड उभारलें आणि राजास हांकून देऊन प्रजासत्ताक राज्यपद्धतीची स्थापना केली. यानंतर आणखी थोड्या काळानें नेपोलियनचा एक पुतण्या लोकांचा मोठा आवडता होऊन फ्रान्सच्या सिंहासनावर आरूढ झाला. याचें नांव तिसरा नेपोलियन असें होतें. कांहीं कालपर्यंत हा मोठ्या बलिष्ट राजांत गणला जात असे; पण फ्रांको-जर्मन

युद्धांत त्याचा पुरा मोड होऊन तो पळून गेला. फ्रान्स देशांत प्रजासत्ताक राज्यपद्धति पुन्हां स्थापिली गेली. त्या वेळेपासून चालू काळापर्यंत फ्रान्सांत प्रजासत्ताक राज्यपद्धतच चालत आहे.

हिंदुस्थानांतील सर्व तत्त्वदर्शनांच्या मुळाशीं उत्क्रांतिवाद हाच पाया आहे. या उत्क्रांतिवादाचा प्रवेश युरोपांतील भौतिक शास्त्रांत आतां झाला आहे. प्रत्येकीं भिन्नस्वभाव अशा पदार्थांपासून हें विश्व निर्माण झालें आहे, असा जगांतील इतर सर्व धर्मांचा समज आहे. फक्त हिंदुधर्म मात्र या बाबतींत अपवाद आहे. परमेश्वर, प्रकृति, मनुष्य इत्यादि सारे पदार्थ प्रत्येकीं भिन्नस्वभाव आहेत. त्याचप्रमाणें पशु, पक्षी, किडे, झाडें आणि दगड वगैरे जड पदार्थ हेसुद्धां मूलतःच भिन्नस्वभाव असून परमेश्वरानें त्यांस आरंभापासूनच तसें निर्माण केलें आहे, असा समज हिंदुधर्माशिवाय इतर सर्व धर्मांत प्रचलित आहे.

चराचर सृष्टींत आढळून येणाऱ्या विविधतेंतही असलेली एकरूपता शोधून काढणें याचें नांव ज्ञान. बाह्यतः भिन्नरूप भासणारे सर्व पदार्थ वस्तुतः एकरूपच आहेत असें सिद्ध करणें याचें नांव ज्ञान. ज्या बंधनाच्या योगानें ही एकरूपता मनुष्याच्या लक्षांत येते, त्या बंधनास प्रकृतिनियम अथवा प्रकृतीचा कायदा असें म्हणतात.

आमच्या देशांतील शिक्षणपद्धत, बुद्धिविकास आणि विचारपरंपरा हीं सारीं धर्ममार्गाकडे धांवतात, हें मीं पूर्वी एकवार सांगितलेंच आहे. या सर्वांचें स्पष्ट स्वरूप आमच्या धर्मांत आढळून येतें. युरोपांतील त्यांचें स्पष्ट स्वरूप बाह्यवर्ती असून तें पदार्थविज्ञानशास्त्रांत आणि सामाजिक बाबींत आढळून येतें. भिन्नभिन्न पदार्थांत दिसून येणारी विविधता केवळ भ्रामक स्वरूपाची आहे, ही गोष्ट हिंदुस्थानांतील प्राचीन तत्त्ववेत्त्यांच्या ध्यानीं हळूहळू आली. बाह्यतः भिन्न दिसणाऱ्या पदार्थांचा एकमेकांशीं संबंध असून सर्व विश्वाच्या मुळाशीं एकरूपता आहे, ही गोष्ट त्यांच्या लक्षांत आली. काष्ट, पाषाण, झाडेंझुडपें, जलचर आणि भूचरप्राणी, मनुष्यें, देव व प्रत्यक्ष परमेश्वरसुद्धां या एकरूपतेंतच आहेत, हें त्यांच्या ध्यानीं आलें. एकाचेच हे अनेक आकार झाले आहेत, ही गोष्ट अद्वैतसिद्धांतानें जगास प्रथम सांगितली. सर्व धर्मशास्त्रांचा शेवट येथें झाला.

सूक्ष्म विश्व आणि जड विश्व हीं वस्तुतः एकरूपच असून हें एकरूप ब्रह्म हेंच होय असा सिद्धांत अद्वैतवाद्यांनीं जगास प्रथम सांगितला. विविधता भासणें हें अविद्येचें अथवा मायेचें कार्य आहे असें ते म्हणाले. सर्व ज्ञानाचा शेवट जेथें झाला "यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते।" तें ज्ञान हें.

हिंदुस्थानाच्या बाहेर हा सिद्धांत जोंपर्यंत कोणाच्याही लक्षांत आला नाहीं, तोंपर्यंत तिकडील कोणाही विद्वानास पंडित असें नांव कसें देतां येईल ? तथापि पाश्चात्य देशांतील विद्वानांच्या लक्षांत भौतिक शास्त्रांच्या द्वारें हा सिद्धांत हळूहळू येऊं लागला आहे; पण हें मूळचें एकरूप विविधतेस कसें पावलें हें ज्याप्रमाणें आम्हांस समजत नाहीं, त्याचप्रमाणें पाश्चात्य पंडितांसहि तें कळत नाहीं. आपली बुद्धि मर्यादित असल्यामुळें ही गोष्ट आपल्या बुद्धिकक्षेच्या बाहेरची आहे, अशा उत्तरानें आम्हीं या प्रश्नाचें समाधान केलें. पाश्चात्य पंडितांनींही या प्रश्नाला अखेर हेंच उत्तर दिलें आहे. एकरूप अनेकविध कसें झालें, हें जाणण्याची पात्रता आपल्या बुद्धीस नसली तरी या निरनिराळ्या रूपांत असलेले फरक आणि त्यांच्या निरनिराळ्या जाति हीं जाणण्याची पात्रता तिला आहे. हीं जाणण्याकरितां केलेली खटपट म्हणजेच भौतिक शास्त्रें.

अशा रीतीनें उत्क्रांतिवाद पाश्चात्य देशांतील बहुतेक पंडितांस आतां मान्य झाला आहे. लहान लहान प्राणी क्रमाक्रमानें मोठ्या स्वरूपांत रूपांतर पावतात. त्याचप्रमाणें मोठे प्राणी कित्येक वेळां अधोगामी होऊन आकारानें लहान व अशक्त होत जातात आणि कालांतरानें नष्ट होत जातात. त्याचप्रमाणें मनुष्यप्राणीही एकदम सुसंघटित आणि संस्कृत स्थितींतच निर्माण झाला आहे असें नाहीं. याच्या उलट कोणीं कितीही ओरड केली, तरी तिच्याकडे पाश्चात्य देशांत आतां कोणीही लक्ष देत नाहीं. विशेषतः खुद्द पाश्चात्यांचे पूर्वजच थोड्याशा शतकांपूर्वी रानटी स्थितींत होते, ही गोष्ट सर्वांस ठाऊक आहेच. याच स्थितीचें रूपांतर होत होत थोड्याशा शतकांच्या अवधींत पाश्चात्यांच्या राष्ट्रांस त्यांचें सांप्रतचें भव्य स्वरूप प्राप्त झालें आहे. याचप्रमाणें सर्व मनुष्यजातही आरंभींच्या रानटी स्थितींतून निघून सांप्रतच्या सुव्यवस्थित स्वरूपास प्राप्त झाली आहे असें पाश्चात्य पंडित म्हणतात.

आरंभीं रानटी मनुष्यें आपलीं सर्व कार्यें दगडाच्या आणि लांकडाच्या उपकरणांनीं करीत असत. झाडांचीं पानें आणि पशूंचीं कातडीं हींच त्यांचीं प्रावरणें होतीं. त्यांचीं निवासस्थानें म्हणजे बहुधा गुहा किंवा पक्ष्यांच्या घरट्यांसारखीं बांधलेलीं पानांचीं झोंपडीं. अशा रीतीनें हीं मनुष्यें कशींतरी कालक्रमणा करीत असत. एके काळीं सर्व देशांत अशा प्रकारची स्थिति होती, याचा पुरावा प्राचीन भूगर्भशोधकांनीं पुष्कळ मिळविला आहे. कांहीं थोड्याशा ठिकाणीं अशा स्थितींतील माणसें अद्यापिही आढळतात. यानंतर मनुष्यजाती तांबें, जस्त इत्यादि नरम धातू प्रथम वापरण्यास शिकले. या धातूंचीं हत्यारें हळूहळू ते बनवूं लागले. प्राचीन ग्रीक लोक व बाबिलोनियन व इजिप्शियन् लोक यांस लोखंडाचा उपयोग पुष्कळ काळपर्यंत ठाऊक नव्हता. त्यांस सामान्यतः बऱ्याच प्रकारची संस्कृति प्राप्त झाली होती. हे लोक ग्रंथ लिहीत असत व सोनेंरुपेंही वापरीत असत; तथापि अशा स्थितींतसुद्धां लोखंडाचा उपयोग त्यांस ठाऊक नव्हता. या वेळीं मेक्सिको, पेरू वगैरे दक्षिण अमेरिकेंतील देश अधिक सुसंस्कृतीस प्राप्त झाले होते. हे लोक मोठमोठ्या इमारती, देवळें वगैरे बांधीत असत. सोन्यारुप्याचा उपयोग त्यांच्या अगदीं आंगवळणी पडून गेला होता. त्यांची सोन्यारुप्याची संपत्ति पाहूनच स्पॅनियर्ड लोकांनीं त्यांजवर स्वाऱ्या करून त्यांचा नाश केला. पण अशा वेळींही या लोकांस लोखंड ठाऊक नव्हतें. लोखंडाचें त्यांनीं नुसतें नांवही ऐकलें नव्हतें. त्यांचीं सर्व हत्यारें गारगोटीपासून केलेलीं असत.

धनुष्यबाणांनीं रानटी पशूंची शिकार करावी व पाण्यांत जाळें टाकून मासे धरावे, हाच पूर्वकाळीं मनुष्यांच्या उपजीविकेचा मार्ग होता. पुढें त्यांस हळूहळू शेतीची कला प्राप्त झाली व ते गुरेंढोरें बाळगूं लागले. त्यांनीं रानटी पशूंस माणसाळविलें. गाय, घोडा, डुकर, हत्ती, उंट, मेंढरूं, बकरें इत्यादि पशु व कोंबडीं, बदकें वगैरे सर्व पक्षी माणसाळून मनुष्याच्या संगतींत राहूं लागलीं. या सर्वांत कुत्रा हा मनुष्याचा आद्यमित्र होय.

मनुष्यें हळूहळू शेतकी करण्यास शिकलीं. सांप्रत मनुष्याच्या खाण्यांत जीं फळेंमुळें आणि भाजीपाला इत्यादि येतात, तीं सर्व आपल्या पूर्वीच्या रानटी स्थितीहून अगदीं भिन्न प्रकारचीं आहेत. मनुष्याच्या परिश्रमामुळें आणि त्यांची

लागवड करण्याच्या पद्धतीमुळें फळांचा आकार मोठा होऊं लागला आणि चवही उत्तम झाली. केवळ गवतापासून मनुष्यप्राण्यानें उंची चवदार तांदुळांची उत्पत्ति केली आहे. आतां प्रकृतीच्या राज्यांतही अनेक प्रकारच्या घडामोडी नित्य सुरू आहेत हेंही खरें आहे. प्रकृतीच्या राज्यांत नवीन नवीन जातींचीं झाडेंझुडपें आणि पशुपक्षी नित्य निर्माण होत असतात. काल, परिस्थिति आणि इतर कारणें यांच्या योगानें ही घडामोड नित्य सुरू आहे. मनुष्यप्राणी निर्माण होण्यापूर्वी झाडेंझुडपें आणि पशुपक्षी यांच्यांत हळूहळू बदल होत होताच; पण मनुष्य-प्राणी निर्माण झाल्यावरोवर या क्रियेस फार झपाट्यानें सुरवात झाली. एका देशांतलीं झाडेंझुडपें आणि पशुपक्षीं तो दुसऱ्या देशांत नेऊं लागला आणि तेथें त्यांची जोगवण करण्यास त्यानें सुरवात केली. तसेंच निरनिराळ्या झाडांचीं एक-मेकांशीं कलमें करून त्यानें नवी झाडांची सृष्टि निर्माण केली.

आरंभींच्या स्थितींत विवाह ही संस्था अस्तित्वांत नव्हती; पण त्यानंतर हळूहळू विवाह व त्याचीं वंधनें हीं अस्तित्वांत येऊं लागलीं. आरंभीं सर्व मानव-जातींत वैवाहिक संवंध फक्त मातेपुरताच ओळखला जात होता. मुलांचीं नांवें ठेवणें वगैरे कामें माताच करीत असत. सर्व संसार स्त्रियाच करीत. संपत्तीची जोपासनाही त्यांच्याच हातांत असे. कारण मुलांची जोपासनाही त्यांसच करावी लागे. कालांतरानें ही सर्व संपत्ति आणि त्याजबरोवर स्त्रियाही पुरुषांच्या अंकित झाल्या. " ही सर्व संपत्ति आणि धान्य वगैरे मीं मिळविलें आहे, शेतकीचीं सर्व कामें मीं केलीं आहेत, लूट मिळवून मीं संपत्ति आणिली आहे, याकरितां या सर्वांवर माझाच हक्क आहे. हा हक्क कोणी हिरावून घेऊं लागल्यास त्याजवरोवर मी युद्ध करीन " असें पुरुष म्हणूं लागला. त्याच प्रमाणें स्त्रियांवरहि तो हक्क सांगूं लागला. अशा रीतीनें विवाहसंस्था अस्तित्वांत आली. गुरेंढोरें अथवा दास यांच्याप्रमाणेंच स्त्रियाही पुरुषांच्या मालकीच्या झाल्या. प्राचीन काळीं एका टोळींतील पुरुष दुसऱ्या टोळींतील स्त्रियांशीं विवाह करीत, आणि प्रसंगीं स्त्रियांस पळवूनही आणीत. अशा रीतीनें जवरदस्तीनें स्त्रिया पळवून नेण्याचा प्रघात हळू-हळू वंद झाला, व परस्परांच्या सम्मतीनें विवाह निश्चित होऊं लागले. तथापि या प्राचीन चालींचे अवशेष अद्यापिही कांहीं ठिकाणीं आढळतात. वंगाल्यांत आणि युरोपांत नवऱ्या मुलाला तांदूळ फेंकून मारतात आणि उत्तर हिंदुस्थानांत

वधूपक्षाकडील स्त्रिया वरपक्षाला गालिप्रदान करीत असतात. जबरीनें स्त्रिया पळवून नेण्याच्या प्राचीन चालींचे हे अवशेष आहेत.

यानंतर हळुहळू समाजांची संघटना होऊं लागली आणि निरनिराळ्या देशांच्या निरनिराळ्या परिस्थितीस अनुसरून त्यांच्या चालीरीतींत भेद पडूं लागला. समुद्रकांठीं राहाणारीं मनुष्यें आपला निर्वाह बहुधा मासे धरून करीत असत. सपाट जमिनीवरील मनुष्यें शेतकीवर उपजीविका करूं लागलीं. डोंगराळ मुलुखांतील मनुष्यें बकऱ्यांचे कळप पाळूं लागलीं आणि अरण्यवासीयांनीं उंटांची व मेंढरांची जोपासना केली. कित्येक अरण्यवासीय लोक आपला चरितार्थ शिकारीवर चालवीत असत. जे लोक सपाट भूभागावर वस्ती करून राहिले, त्यांस उपजीविकेचीं साधनें अरण्यवासीयांहून अधिक सुलभ झालीं. त्यांच्या विचारक्रियेस अवसर मिळूं लागला, बुद्धीला संस्कृति प्राप्त झाली आणि यामुळें ते लौकर सुधारत चालले; पण संस्कृतीचें पाऊल जों जों पुढें पडत गेलें, तों तों त्यांचें शरीरसामर्थ्य कमी होत गेलें. केवळ वनस्पत्याहारी व घरेंदारें करून राहणारे लोक आणि मांसाहारी व अरण्यांतल्या मोकळ्या हवेंत राहणारे लोक यांच्या शरीरसंपत्तींत अधिक अधिक अंतर पडूं लागलें. पारधी, कोळी इत्यादि डोंगरी व अरण्यवासी लोक हळूहळू दरोडेखोर व चांचे बनत चालले. त्यांजपाशीं अन्नसामुग्रीचा तुटवडा पडेल त्या वेळीं ते गांवें लुटूं लागले. आत्मसंरक्षणासाठीं गांवांतील रहिवाशांत एकी होऊन नंतर अनेक गांव एका सूत्रांत बद्ध होऊं लागले. अशा रीतीनें संघटित राज्यरचना अस्तित्वांत येऊं लागली.

देवजातीचीं मनुष्यें मुख्यतः शाकाहारी असून सुसंस्कृत स्थितींत होतीं. त्यांनीं गांवें आणि शहरें वसविलीं होतीं. विणलेलीं वस्त्रेंप्रावरणें देव वापरीत असत. असुर डोंगरांत आणि दऱ्याखोऱ्यांत रहात असत. त्याचप्रमाणें कांहीं असुर अरण्यवासीही होते. रानटी जनावरें आणि अरण्यांत सांपडणारीं फळेंमुळें हें त्यांचें अन्न होतें. याशिवाय देवांस जनावरांचीं कातडीं, गाई, बकरीं इत्यादि पदार्थ विकून त्यांजकडून कांहीं धान्यही ते मिळवीत असत. देव शरीरानें कमकुवत होते. अडचणी सोसण्याचें सामर्थ्य त्यांस नव्हतें. उलटपक्षीं असुर हाडापेरानें मजबूत असून त्यांस वारंवार उपासतापास सहन करावे लागत असल्यामुळें सर्व प्रकारचीं संकटें सोसण्याचा काटकपणा त्यांस प्राप्त झाला होता.

असुरांजवळ अन्नाचा तुटवडा पडला म्हणजे ते आपल्या अरण्यांतून व दऱ्याखोऱ्यांतून बाहेर पडून गांवें व शहरें लुटून फस्त करीत. प्रसंगीं देवांचा जमाव मोठा नसला म्हणजे असुरांच्या हातानें त्यांच्या लहान लहान टोळ्यांचा फडशा पडत असे; पण बुद्धिमत्तेनें देव अधिक वरिष्ठ असल्यामुळें अनेक प्रकारची युद्धसामग्री त्यांनीं निर्माण केली. ब्रह्मास्त्र, गरुडास्त्र, वैष्णवास्त्र, शैवास्त्र इत्यादि शक्तिमान् अस्त्रें देवांच्या हातीं होतीं. असुरांची युद्धसामग्री सामान्य प्रतीचीच होती; पण शरीरसंपत्तीनें ते अधिक श्रेष्ठ होते. देवांचा त्यांनीं अनेक वार पराभव केला, पण देवांची संस्कृति त्यांनीं केव्हांही ग्रहण केली नाहीं. तसेंच त्यांनीं जमिनीची मशागत केली नाहीं अथवा आपल्या बुद्धीचाही विकास केला नाहीं. कित्येक प्रसंगीं देवांस जिंकून त्यांच्या स्वर्गाचें राज्य असुरांनीं मिळविलें; पण देवांनीं आपल्या उच्चतर बुद्धिमत्तेनें आणि चातुर्यानें त्यांचा पाडाव करून त्यांस आपले दास बनविले. देवांचा मोठा समुदाय जेव्हां एकत्र जमे, त्या वेळीं असुरांस पराभव पावून दऱ्याखोऱ्यांचा आश्रय करावा लागे, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. हळूहळू दोघांचाही जमाव वाढत चालला. लक्षावधि देव आणि लक्षावधि दैत्य एकत्र होऊं लागले. त्यांच्यांत तुंबळ युद्धें होऊं लागलीं आणि कांहीं काळानें परस्परांची सरमिसळ होत चालली. या दोन निरनिराळ्या नमुन्यांच्या एकीकरणांतून नवा समाज आणि नव्या चालीरीती निर्माण होऊं लागल्या. नव्या कल्पनांचा उदय होऊं लागला आणि नवीं नवीं शास्त्रेंही जन्मास येऊं लागलीं. मनुष्याच्या सुखास लागणारीं साधनें निर्माण करण्याचा मक्ता समाजांतील एका वर्गानें आपल्याकडे घेतला. समाजाचें रक्षण करण्याचा भार दुसऱ्या एका वर्गानें उचलला, आणि अशा रीतीनें परस्परांच्या श्रमांचा विनिमय होत चालला. यांत एक वर्ग वस्तूंचा क्रयविक्रय करूं लागला आणि त्याद्वारें व्यापारी बनला. एक वर्ग शेतकी करूं लागला, आणि दुसरा वर्ग चोरांचिलटांपासून त्याचें रक्षण करूं लागला. या सर्वांत शेतकरी संपत्तीनें अगदीं कमी दर्जाचा राहिला. रक्षणकर्त्या वर्गानें जबरीनें त्याजपासून मिळेल तितकें धन काढावें असा क्रम सुरू झाला. व्यापारी आपल्या नफ्यापोटीं पुष्कळ संपत्ति मिळवूं लागला. रक्षणकर्त्या पुरुषाला राजा ही पदवी मिळाली. क्रयविक्रय करणाऱ्यास वैश्य म्हणूं लागले, संपत्ति निर्माण करण्यांत हे दोन्ही वर्ग स्वतः कांहीं खटपट करीत नसत.

तथापि इतरांनीं निर्माण केलेल्या संपत्तींतील बराचसा भाग त्यांच्या पदरीं पडत असे. अशा रीतीनें शेतकऱ्यांच्या श्रमांवर हे दोन वर्ग पुष्ट होत चालले. बिचाऱ्या शेतकऱ्यांच्या तोंडीं पुरासा अन्नाचा घांसही पडत नसे. त्याला परमेश्वरावांचून दुसरा कोणी त्राता नव्हता.

हळुहळू समाजरचनेंत अधिक अधिक अडचणी उत्पन्न होऊं लागल्या. समाज वाढत चालला तों तों त्याच्या अडचणीही वाढल्या, आणि अशा प्रकारच्या अनेकविध अडचणींच्या जाळ्यांतून आपला अर्वाचीन समाज उत्पन्न झाला. कालें-करून गत गोष्टींचें समूळ उच्चाटन कधींच होत नाहीं. त्या गोष्टी तत्त्वतः नष्ट होऊन गेल्या तरी त्यांचे विशिष्ट अवशेष मागें उरतात. अरण्यांत राहून व मेंढरां-बकऱ्यांची जोपासना करून जे लोक आपली उपजीविका पूर्वीं करीत असत, त्यांचा प्रवेश समाजाच्या संघटित रचनेंत झाल्यानंतर ते लोक लुटारू आणि चोर बनत चालले. अरण्यें गेलीं आणि त्यांजबरोबर शिकारीचीं साधनेंही गेलीं. त्यांचा दऱ्याखोऱ्यांतला वास संपला. संस्कृत समाजरचनेंत त्यांस नवा जन्म प्राप्त झाला. या नव्या परिस्थितींत त्यांच्या आंगच्या जुन्या गुणांस अवसर मिळेनासा झाला. यामुळेंच आपल्या प्रकृतिस्वभावास अनुसरून ते लुटारू आणि दरोडेखोर बनले. त्या बिचाऱ्यांनीं तरी काय करावें ? त्यांचा प्रकृतिस्वभावच तसा. अशा रीतीनें निरनिराळ्या स्वभावांचे आणि निरनिराळ्या मनोवृत्तींचे लोक एकत्र येऊं लागले. त्यांच्या दैवी आणि आसुरी अशा दोन्ही संपत्तींचें मिश्रण होऊं लागलें; आणि अशा रीतीनें अर्वाचीन समाज निर्माण झाला. यामुळेंच समाजांत दैवी आणि आसुरी अशा स्वभावांची विलक्षण खिचडी आपल्या नज-रेस पडत आहे. साधु, भोंदू आणि दरोडेखोर एकाच समाजांत आज एकत्र नांदत आहेत. ज्या समाजांत दैवी संपत्तीचें वैपुल्य असतें तो समाज देवांचा असून ज्यांत आसुरी स्वभाव अधिक नजरेस येतात तो समाज असुरांचा म्हण-विला जातो.

आशियाखंडांतील संस्कृतीचा उदय प्रथम सपाट जमिनीवर झाला. नद्यांचें वैपुल्य आणि जमीन सुपीक; गंगा, यांगत्सिकँग, युफ्रेटिस अशांसारख्या नद्यांच्या जलांचें वैपुल्य; अशा परिस्थितींत ही संस्कृति जन्मास आली. आशियाखंडांतील सर्व देशांत समाजरचनेचा मूळ पाया शेतकी हाच आहे. या देशांतील सर्व

समाजांत दैवी संपत्तीचें आधिक्य आढळतें. उलटपक्षीं युरोपीय संस्कृतीचा जन्म डोंगरांच्या दऱ्याखोऱ्यांत अथवा समुद्रतटाकीं झाला आहे. चांचेगिरी आणि लुटालूट हीं या संस्कृतीच्या मुळाशीं आहेत. यामुळें या संस्कृतींत आसुरी भाग अधिक आढळतो.

आशियाखंडाचा मध्यभाग आणि अरबस्थानांतील निर्जन अरण्यें हीं पूर्वकालीन असुरांचीं निवासस्थानें होतीं, असें उपलब्ध असलेल्या पुराव्यावरून अनुमान करतां येतें. आपल्या दऱ्याखोऱ्यांतून बाहेर पडून आसुरी वंशजांच्या टोळया संस्कृत स्थितींतील देवांच्या मागें लागल्या आणि यामुळें देवांस वाट फुटेल तिकडे जगभर पळत सुटावें लागलें.

युरोपखंडांतही असंस्कृत स्थितींतील मूळच्या रानटी लोकांची वस्ती होतीच. हे लोक दऱ्याखोऱ्यांत वस्ती करून राहात होते. त्यांच्यांतील अधिक बुद्धिमान् लोक लहानसहान खोपटें करून राहात असत. बाण, सुऱ्या आणि परशू हीं त्यांचीं आयुधें होतीं. हीं सर्व आयुधें गारगोटीपासून केलेलीं असत. एवढ्या शस्त्रसामुग्रीवर ते आपला सारा आयुष्यक्रम कंठीत होते.

हळूहळू आशियाखंडांतील मानवकुलांचा प्रवाह युरोपखंडाकडे वळूं लागला. ज्या ज्या भागांत त्यांनीं प्रवेश केला, ते ते भाग इतरांच्या मानानें अधिक सुसंस्कृत स्थितीस येत चालले. रशियाच्या एका भागांतील लोकांची भाषा जवळ जवळ दक्षिण हिंदुस्थानांतील भाषांसारखी आहे.

पण हे मूळचे रानटी लोक एवढ्यानेंच सुधारणेच्या पूर्ण मार्गास लागले नाहींत. आशिया मायनरमधील मानवकुलानें आपल्या नजीकचा युरोपखंडाचा भाग जिंकला आणि त्या ठिकाणीं उच्च प्रतीच्या समाजघटनेस त्यानें सुरवात केली. आशिया मायनरमधील या मानववंशास आपण यवन या नांवानें ओळखीत असून युरोपीय लोक त्यास ग्रीक या नांवानें संबोधितात.

यानंतर रोमन नांवाच्या रानटी मानववंशानें इटलींत प्रवेश करून तेथील ( Etruscans ) एट्रुस्कन् नांवाच्या लोकांस जिंकलें. या रोमन लोकांनीं इटलींतील संस्कृति आणि विद्या हीं आपलीशीं करून जित लोकांच्या मोडलेल्या

संस्कृतीच्या जागीं आपल्या संस्कृतीची उभारणी केली. हळूहळू रोमन लोक सर्व बाजूंनीं इतर प्रदेश जिंकीत चालले. दक्षिण आणि पश्चिम युरोपचा भाग पादाक्रांत करून त्यांनीं तेथील रानटी लोकांवर आपलें वर्चस्व स्थापिलें. फक्त उत्तरेकडील जंगलांतील रानटी लोक मात्र स्वतंत्र राहिले. कालेंकरून रोमन लोकांत संपत्तीमुळें चैनीची वाढ होत जाऊन त्यांची शक्ति क्षीण होत चालली. याच सुमारास आशियाखंडांतील असुरांच्या सैन्यांनीं युरोपांत पुन्हां प्रवेश केला. उत्तर युरोपांतील रानटी लोकांस या असुरांनीं हांकून लाविलें; तेव्हां या रानटी लोकांची टोळधाड रोमन साम्राज्यावर पडून तिनें त्याचा नाश केला. आशियांतून गेलेला असुरांचा मानववंश आणि युरोपीय रानटी लोक तसेंच रोमन आणि ग्रीक यांचे शिल्लक असलेले लोक इतक्यांच्या मिश्रणानें एक नवाच मानववंश तिकडे निर्माण झाला. त्या वेळीं यहुदी लोकांची वाताहात होऊन ते देशोधडीस लागले होते. हे यहुदी लोक युरोपांत जिकडे तिकडे पसरले. त्यांनीं आपला खिस्ती धर्म युरोपांत बरोबर नेऊन त्याचा तिकडे प्रसार केला. अशा रीतीनें निरनिराळीं मानवकुलें, त्यांचे निरनिराळे धर्म आणि त्यांच्या निरनिराळ्या कल्पना हीं सर्व महामायेच्या एकाच मुशींत ओतलीं जाऊन सतत चालणाऱ्या युद्धांच्या आंचीमुळें या सर्व मिश्रणांचा एकच रस बनला. अशा प्रकारच्या मिश्र रसापासून सांप्रतचा युरोपीय मानववंश निर्माण झाला आहे.

अशा रीतीनें एक नवा रानटी मानववंश युरोपांत निर्माण झाला. यांतील वंशजांच्या देहवर्णांत सर्व प्रकारचे रंग आढळून येतात. उत्तरेकडील शुभ्रवर्णीय लोकांपासून तों हिंदूंच्या सांवळ्या वर्णापर्यंत सर्व प्रकारचे वर्ण येथें आढळून येतात. हीच गोष्ट केसांच्या आणि डोळ्यांच्या वर्णांसही लागू आहे. केंसांत काळा, तपकिरी, तांबडा अथवा पांढरा इत्यादि वर्ण असून डोळ्यांत काळा, घारा, निळा इत्यादि वर्ण आढळून येतात. त्याप्रमाणें शरिराच्या रचनेंतही कांहींत हिंदूंच्या चेहऱ्याचें मिश्रण असून कांहींत चिनी लोकांच्या चपट्या चेहऱ्याचीही छटा दिसून येते. कांहीं काळपर्यंत हे लोक एकमेकांत लढाया करीत होते. उत्तरेकडील लोक चांचेगिरींत व लुटालुटींत प्रवीण असल्यामुळें आपल्याहून अधिक सुधारलेल्या पण दुर्बल अशा दाक्षिणात्यांवर हल्ले करून त्यांची लूट करूं लागले. याच संधीस खिस्ती धर्माचा मुख्य गुरु पोप आणि कॉन्स्टॅन्टिनोपलचा

पॅट्रिआर्क हे आपली सत्ता या रानटी लोकांवर गाजवूं लागले. त्यांची सत्ता रानटी लोकांच्या राजेराण्यांवरही चालूं लागली.

इकडे अरबस्थानच्या अरण्यांत महंमदी धर्माचा उदय झाला. अरब लोकांच्या टोळ्या धर्मोत्साहाच्या अतिरेकानें बेफाम होऊन पृथ्वीभर पसरत चालल्या. त्यांचा जोम आणि त्यांची शक्ति हीं अनिवार्य होतीं. अरब लोकांचा एक प्रचंड लोंढा युरोपांत शिरला; आणि याच लाटेबरोबर हिंदुस्थानांतील आणि जुन्या ग्रीक साम्राज्यांतील सुधारणेचा आणि विद्येचा प्रवेश युरोपांत झाला.

मध्य आशियांतील सेल्जूक तार्तर नांवाच्या लोकांनीं महंमदी धर्माचा स्वीकार करून आशियांतील आशिया मायनर व इतर प्रदेश पादाक्रांत केले. हिंदुस्थान जिंकण्याचा प्रयत्न अरबांनीं केला, पण त्यांत त्यांस यश आलें नाहीं. सर्व पृथ्वी जिंकण्यास निघालेली महंमदीयांची लाट हिंदुस्थानावर येतांच तेथें तिचा भंग झाला. त्यांनीं सिंध प्रांतावर हल्ला केला होता, पण तो प्रांत त्यांस ताब्यांत ठेवतां आला नाहीं. यानंतर हिंदुस्थान जिंकण्याचा नाद त्यांनीं सोडून दिला.

पण यानंतर तुर्क आणि इतर तार्तर वंश हिंदुस्थानांत आले आणि त्यांनीं तो देश जिंकला. तुर्क आणि तार्तर हे पहिले बौद्धधर्मानुयायी होते. त्यांनीं पुढें महंमदी धर्माचा स्वीकार केला. हिंदुस्थानाप्रमाणेंच इराण आणि अरबस्थान हे देशही त्यांनीं आपल्या अमलाखालीं आणले. हिंदुस्थानावर ज्या महंमदीयांनीं स्वाऱ्या केल्या त्यांत अरब किंवा इराणी एकही नव्हता. हिंदुस्थानदेश पादाक्रांत करण्याचें काम फक्त तुर्क आणि तार्तर यांनींच केलें. हिंदुस्थानावर स्वारी करणाऱ्या सर्व महंमदीयांस राजपुतान्यांत तुर्क असेंच नांव देण्यांत आलें आहे. ऐतिहासिक दृष्टया रजपुतांनीं दिलेलें तुर्क हेंच नांव बरोबर आहे. "तुरगाँको बढी जोर" अशा प्रकारचीं गाणीं राजपुतान्यांतील चारण लोक गाऊं लागले. कुतुबुद्दीनपासून तों थेट अखेरच्या मोंगल बादशहापर्यंत सर्व घराणीं तार्तरवंशाचींच होतीं. तिबेटी आणि तार्तर हे लोक एकाच मानववंशांतील होत. तार्तर लोकांनीं आपला बौद्ध धर्म सोडून महंमदी धर्माचा स्वीकार केला. त्याचप्रमाणें हिंदु आणि इराणी यांच्या वंशजांशीं त्यांचा वर्णसंकर झाल्यामुळें त्यांच्या चेहऱ्याचा चपटेपणाही नाहींसा झाला. प्राचीन काळच्या असुरांचेच हे वंशज आहेत. आजमितीसही काबूल, इराण, अरबस्थान आणि कॉन्स्टँटिनोपल येथें ते राज्य

करीत असून कंदाहारी आणि इराणी लोक यांजवर ते सत्ता गाजवीत आहेत. फक्त यांच्यांतील मांच्यू वंशानें मात्र आपला बौद्ध धर्म सोडला नाहीं. महंमदी धर्मांचा स्वीकार न करतां अद्यापि ते आपणास लामाचे शिष्य म्हणवितात. या असुरवंशांस विद्येची अथवा बुद्धिवर्धनाची गोडी कधींही लागली नाहीं. धनुर्विद्ये-वांचून दुसरी कोणतीही विद्या त्यांस समजत नाहीं. ज्यांच्या रक्तांत या तार्तरांचें बीज आहे, त्याच जाती अद्यापिही लष्करी बाण्याच्या आणि जोमदार आहेत. उत्तर युरोपांतील व विशेषतः रशियांतील लोकांच्या अंगांत बरेंचसें तार्तर रक्त अद्यापि खेळत असल्यामुळें या जाती कणखर आणि युद्धप्रिय आहेत. देव आणि असुर यांच्यांतील संग्राम यापुढेंही पुष्कळ काळपर्यंत असाच चालू राहावयाचा आहे. असुरकन्यांशीं देवांचे विवाह होतात व देवकन्यांस असुर पळवितात. अशा रीतीनें झालेल्या संकरांतून नव्या नव्या शक्तिमान् जाति निर्माण होतात.

तार्तर लोकांनीं अरबस्थानच्या खलिफास पदच्युत करून त्याची गादी बळ-काविली. ख्रिस्ती लोकांचें मोठें पवित्र स्थान जें जेरूसलेम तेंही त्यांनीं जिंकिलें. ख्रिस्ती लोकांचा जेरूसलेमांत प्रवेश होईनासा झाला. तार्तर लोकांनीं पुष्कळ ख्रिस्ती लोकांचा वध केला. तार्तर लोकांच्या या कृतीमुळें ख्रिस्ती धर्माधिकारी संतापानें अगदीं बेफाम होऊन गेले. त्यांनीं युरोपांतील आपल्या रानटी शिष्यांस जेरूसलेम जिंकण्यास प्रोत्साहन दिलें. ही लाट शेवटीं सर्व ख्रिस्ती राजे आणि नागरिक यांजमध्यें पसरली. युरोपांतील रानटी लोकांची प्रचंड टोळधाड मुसल-मानांच्या हातून जेरूसलेमाची मुक्तता करण्याकरितां आशिया मायनरमध्यें घुसली. या कांहीं टोळ्यांची आपसांतच मारामारी होऊन त्यांची त्यांत पुष्कळ प्राणहानि झाली. दुसरे बरेच लोक रोगांस बळी पडले. उरल्यासुरलेल्यांस मुसलमानांनीं कंठस्नान घातलें; तथापि या रानटी लोकांचा उत्साह कमी झाला नाहीं. एका टोळधाडीचा नाश मुसलमानांनीं केला न केला तोंच दुसरी टोळधाड पुन्हां येऊन आदळली. खावयास कांहीं न मिळालें तर हीं युरोपियन सावजें मुसलमा-नांचीं प्रेतेंही फाडून खाण्यास कमी करीत नसत. इंग्लंडच्या रिचर्ड राजाला मुसलमानांच्या मांसाची मोठी चटक लागली होती हें प्रसिद्धच आहे.

रानटी लोक आणि सुसंस्कृत लोक यांजमधील युद्धाचें पर्यवसान नेहमीं एक प्रकारेंच होत आलें आहे. जेरूसलेम ख्रिस्ती लोकांच्या हातीं गेलें नाहीं, तथापि

सुधारणेचा प्रवेश युरोपांत झाला. कातडीं पांघरणारे आणि कच्च्या मांसावर उदर-निर्वाह करणारे इंग्रज, फ्रेंच आणि जर्मन लोक संस्कृतीच्या मार्गास लागले. आमच्यांतील नाग लोकांप्रमाणें इटली आणि इतर देशांतील कांहीं ख्रिस्ती शिपायी गडी तत्त्वज्ञानाचा अभ्यास करूं लागले. यांपैकीं नाइट टेंपलर या नांवाचा एक पंथ तर पक्का अद्वैतवादी बनला, आणि अखेरीस हा पंथ ख्रिस्ती धर्माची उघड अवहेलना करूं लागला. या रानटी टोळ्यांनीं लुटींत पुष्कळ पैसा मिळविला होता. धर्माच्या नांवाखालीं पोपगुरूच्या आज्ञेनें युरोपांतील राजांनीं त्यांची सर्व संपत्ति लुटून त्यांस नामशेष करून टाकलें.

आशियांतील संस्कृतीचा प्रवेश युरोपांत दुसऱ्याही एका बाजूनें झाला. महंमदी धर्माच्या मूरलोकांनीं स्पेन देशांत आपलें राज्य स्थापिलें. तेथें त्यांनीं विद्येच्या अनेक शाखा ऊर्जितदशेस आणून युरोपांतील पहिल्या विश्वविद्यालयाची स्थापना केली. इटली, फ्रान्स इत्यादि जवळच्याच नव्हे तर इंग्लंडसारख्या दूरच्या देशां-हूनही हजारों विद्यार्थी विद्याभ्यासार्थ स्पेनमध्यें जाऊं लागले. चालीरीती, शिष्ट-संप्रदाय आणि युद्धकला यांचें शिक्षण घेण्याकरितां युरोपांतील राजेरजवाड्यांचीं मुलें स्पेनमध्यें आलीं. नव्या पद्धतीवर घरें, देवळें आणि इतर इमारती स्पेन देशांत बांधल्या जाऊं लागल्या.

तथापि यापुढें युरोपास हळूहळू प्रचंड लष्करी छावणीचें स्वरूप येऊं लागलें. आजमितीसही तेथें हीच स्थिति आहे. एकादें राज्य मुसलमानांनीं जिंकलें म्हणजे त्याचा बराचसा मोठा भाग राजाला मिळून बाकीच्यांची वांटणी त्याच्या सेना-पतींत होत असे. हे सेनापति राजाला कोणत्याही प्रकारचा कर देत नसत; तथापि गरजेच्या प्रसंगीं सैन्य पुरविण्याचा भार त्यांजवर असे. यामुळें राजाला नेहमीं तयार असें खडें सैन्य ठेवण्याचें कारणच नसे. युद्धाच्या प्रसंगीं सेनापतीं-कडून त्यास पुष्कळ सैन्य मिळत असे. आजही राजपुतान्यांत अशाच प्रकारची कल्पना अस्तित्वांत आहे. हीच युक्ति मुसलमानांनीं युरोपांत नेली. या बाबींत युरोपीयांनीं मुसलमानांचें अनुकरण केलें; पण या बाबींतल्या युरोपीय पद्धतींत आणि मुसलमानी पद्धतींत एक अंतर आहे. मुसलमानी पद्धतींत राजाच्या प्रत्येक हस्तकाचें सैन्य त्यास मिळून युद्धाचा भार बाकीच्या सामान्य प्रजेवर पडत नसे. उलटपक्षीं युरोपीय पद्धतीप्रमाणें राजा आणि त्याचे हस्तक हे एका बाजूस

होऊन प्रजेंतील सर्व लोकांस लष्करी पेशाची नोकरी करण्यास भाग पाडीत असत. यामुळें सामान्य प्रजाजन हे राजाचे आणि त्याच्या हस्तकांचे निवळ गुलाम होऊन गेले. कोणत्या तरी हस्तकाच्या अमलाखालीं त्याचा दास होऊन राहाणें प्रत्येकास भाग पडे. स्वतःचा जीव जगविण्यास यावांचून अन्य उपायच कोणास नव्हता. युद्धाच्या प्रसंगीं शिपायाचें काम याच गुलामांवर पडत असे.

" संस्कृतीची भरभराट " म्हणून युरोपीय लोक जी एवढी आढ्यता मिरवीत असतात, त्या त्यांच्या भरभराटीचा खरा अर्थ तरी काय ? भल्याबुऱ्या कोणत्याही साधनांनीं आपले इच्छित हेतू तडीस न्यावे, हाच या शब्दांचा अर्थ होय. आपला हेतु तडीस गेला कीं साधनें कोणतींही असलीं तरी तीं त्यांच्या दृष्टीनें पवित्र होतात. चोरी, लबाडी, खून इत्यादि कोणतींही अघोर कर्में विशिष्ट प्रसंगीं योग्य गणलीं जातात. एकाद्या ठिकाणीं त्यांस प्रवेश करावयाचा असला तर खुशाल तेथें जबरीनें घुसून ती जागा आपली म्हणणें त्यांच्या दृष्टीनें अयोग्य नाहीं. या माझ्या म्हणण्याचें सत्यत्व सिद्ध करण्यास इतिहासांतरीं भरपूर पुरावा मिळतो. युरोपीय लोकांनीं जेथें जेथें प्रवेश केला, तेथल्या तेथल्या मूळच्या जाती नामशेष होऊन गेल्या आहेत. विवाहाच्या पवित्र बंधनाचा भंग झाला तर या ' सुधारणेच्या भरभराटींत ' तें मोठें पातक समजलें जात नाहीं. या सुधारणेच्या दृष्टीनें या गोष्टी सामान्य चुकीच्या सदरांत पडतात. त्यांस पातकाचें भयंकर स्वरूप तिच्या दृष्टीनें नाहीं.

आतां पहिल्या तीन शतकांत मुसलमानी संस्कृतीचा प्रसार किती झपाट्यानें झाला याचा विचार करा आणि तेवढयाच अवधींत ख्रिस्ती सुधारणेशीं तिची तुलना करा. ख्रिस्ती शकास आरंभ झाल्यापासून पहिलीं तीन शतकें ख्रिस्ती धर्माचें नांवही जगास ठाऊक नव्हतें. यानंतर कॉन्स्टन्टाईन राजानें तो धर्म आपल्या राज्यांत प्रथम चालू केला; पण या काळापासून संस्कृतीच्या दृष्टीनें ख्रिस्ती धर्मानें तिला कितपत मदत केली आहे ? ऐहिक अथवा पारलौकिक बाबतींत मनुष्यांची स्थिति सुधारण्यास ख्रिस्ती धर्मानें कांहीं मदत केली आहे काय ? पृथ्वी हा फिरणारा ग्रह आहे हें प्रथम ज्या युरोपियन पंडितानें सिद्ध केलें, त्याला ख्रिस्ती धर्मानें काय बक्षिस दिलें ? कोणत्या भौतिक शास्त्रज्ञास ख्रिस्ती धर्मानें प्रोत्साहन दिलें आहे ? कायद्याच्या दृष्टीनें तरी ख्रिस्ती साहित्य

कधीं उपयुक्त झालें आहे काय ? कलाकौशल्य अथवा व्यापार यांच्या प्रसारास खिस्ती शास्त्रानें काय मदत दिली आहे ? अर्वाचीन विद्या आणि शास्त्रें यांचा अभ्यास ज्या कोणीं खोल बुद्धीनें केला असेल, तो मनःपूर्वक आपणास खिस्ती म्हणवूं शकेल काय ? ललितकला अथवा शास्त्रें यांस प्रोत्साहक असा एकादा शब्दही प्रत्यक्ष अथवा परंपरेनें नमूद केलेला नव्या करारांत आढळणार नाहीं. उलटपक्षीं सर्व कला आणि सर्व शास्त्रें यांस कुराणानें प्रत्यक्ष अथवा परंपरेनें प्रोत्साहन दिलेलें आहे. महंमदाच्या वचनांतही या गोष्टीचा पुरावा भरपूर सांपडतो. व्हॉल्टेअर, डार्विन, बुकनर, फ्लॅमेरियन्, व्हिक्टर ह्यूगो इत्यादि शेंकडों महापंडितांस खिस्तीधर्मानें शतशः शाप मात्र दिले आहेत. आजमितीसही अशा प्रकारच्या अर्वाचीन पंडितांवर कर्मठ खिस्ती लोक वाटेल तसें तोंडसुख घेत असतात. उलटपक्षीं अशा प्रकारचे लोक आस्तिक्य बुद्धीचे आहेत, असेंच इस्लामी धर्म समजतो. त्यांच्या मतें अशा शास्त्रांचा विश्वास फक्त महंमदाच्या ठिकाणीं मात्र नाहीं. मानवी संस्कृतीस महंमदी आणि खिस्ती या दोन धर्मांनीं जें साहाय्य केलें अथवा जे अडथळे आणले, त्यांची परस्परांशीं तुलना करतां असें आढळून येईल कीं, इस्लामी धर्म जेथें जेथें गेला तेथें तेथें मूळच्या रहिवाशांस त्यानें कायम राखिलें. तीं मानवकुलें आजमितीसही कायम असून त्यांचें विशिष्ट राष्ट्रीयत्व आणि त्यांची भाषा हीं अद्यापिही कायम आहेत.

अशा प्रकारचा एकतरी विजय खिस्ती धर्मास दाखवितां येईल काय ? स्पेन देशांत राहाणारे आरब अथवा अमेरिकेंतल्या मूळच्या जाती आज कुठें आहेत ? युरोपांत राहाणाऱ्या यहुदी लोकांस खिस्ती लोक कशा रीतीनें वागवीत आहेत ? परोपकाराकरितां म्हणून ज्या कांहीं संस्था निर्माण झाल्या आहेत, त्यांखेरीज बाकीची कोणतीही चळवळ खिस्ती धर्मशास्त्रास अनुसरून चालू असल्याचें आढळून येत नाहीं. युरोपची जी कांहीं सुधारणा आज दिसून येत आहे, ती सारी खिस्ती धर्माशीं झगडून झाली आहे. खिस्ती धर्मशास्त्र धाब्यावर बसवून आपलें पाऊल या सुधारणेनें पुढें टाकलें. खिस्ती धर्माची ज्योत पूर्वीइतकीच आजही युरोपांत प्रखर असती तर पाश्चूर, कोच इत्यादि अनेक शास्त्रज्ञांचा तिनें स्वाहा केला असता. डार्विन्सारख्या महापंडितास तिनें अग्निकाष्टांचें बक्षिस दिलें असतें. संस्कृति आणि खिस्ती धर्म यांचा परस्परांशीं कोणत्याही प्रकारचा मेळ

सध्यां युरोपांत नाहीं. ख्रिस्ती धर्मरूपी आपल्या जुनाट शत्रूस धुळीस मिळवून व ख्रिस्ती भटांचें उच्चाटन करून परोपकारी आणि शिक्षणविषयक संस्था आपल्या हातीं घेण्यास युरोपीय संस्कृति आतां सिद्ध झाली आहे. युरोपांतील खालचा वर्ग सध्यांप्रमाणें अज्ञानतिमिरांत बुडालेला नसता तर ख्रिस्ती धर्माची इतिश्री होण्यास क्षणही लागता ना. ख्रिस्ती धर्माचें हें जुनें खोड तेथून मुळापासून उपटलें गेलें असतें. आतां या हकीकतीशीं इस्लामी धर्माची तुलना करा. सर्व महंमदी देशांत समाजघटनेचा मूळ पाया इस्लामी धर्मावर पक्का उभारला गेला आहे. राज्यांतील सर्व अधिकारी वर्ग मुसलमानी मौलवींचा मोठा मान ठेवीत असतात आणि इतर धर्मांच्या पंडितांसही ते मानतात.

युरोपीय संस्कृतीची तुलना एखाद्या कापडाच्या तुकड्याशीं करावयाची म्हटली तर ती अशी करतां येईल. डोंगराळ मुलुख आणि समुद्रकांठ हा या वस्त्राचा माग; अनेक प्रकारांनीं संकीर्ण झालेला मानववंश हा या वस्त्राचा कापूस; नित्य लढाया करणें आणि धार्मिक बाबतींत व स्वसंरक्षणार्थ नित्य तंटेभांडणें करणें हा या कपड्याचा उभा धागा होय. जो कोणी तलवार गाजवितो तो मोठा आणि जो हातीं तलवार धरीत नाहीं त्याचें स्वातंत्र्य गमावलें जाऊन कोणातरी लढवय्याच्या हातचें खेळणें त्याला होऊन बसावें लागतें. व्यापार हा या वस्त्राचा आडवा धागा आहे. या सुधारणेच्या प्रसाराचें मुख्य साधन तलवार हें असून धैर्य आणि बळ हीं उपसाधनें होत. तिचें अखेरचें साध्य ऐहिक व स्वर्लौकिक सुख हें आहे.

आतां आमची स्थिति कशी आहे हें पहा. आर्य लोक शांततेचे चाहाते आहेत. शेतकी करावी आणि मुलांबाळांसह सुखासमाधानानें नांदावें, इतकीच त्यांची इच्छा. या बाबतींत त्यांस कोणाकडून उपसर्ग लागला नाहीं म्हणजे ते संतुष्ट आणि सुखी असतात. अशा प्रकारच्या आयुष्यक्रमांत त्यांना फुरसदीचा वेळ पुष्कळ सांपडतो आणि यामुळें विचार करण्याची आणि संस्कृतावस्थेस स्वतःस पात्र करून घेण्याची संधि त्यांस अधिक मिळते. आर्यांचा राजा जनक हा स्वहस्तें शेतकी करीत असे. त्याच्या काळीं त्याच्याइतकें सत्यवस्तूचें ज्ञान दुसऱ्या कोणासही नव्हतें. ऋषि, मुनी आणि योगी हे आम्हांमध्यें आरंभा-

पासूनच जन्मास आले आहेत. हें जग मायिक आहे ही गोष्ट आर्यांस प्रथमपासून समजली आहे. तुम्हीं कितीही लुटालूट केलीत अथवा युद्धं केलीं तरी खरा आनंद फक्त शांतींतच आहे. खऱ्या आनंदाचा वास इंद्रियजन्य सुखांचा त्याग करूनच मिळणारा आहे. इंद्रियजन्य सुखाचीं साधनें वाढवून खऱ्या सुखाची प्राप्ति व्हावयाची नाहीं. खरें सुख तुम्हांस प्राप्त करून घ्यावयाचें असेल तर मन आणि बुद्धि यांस तुम्हीं सुसंस्कृत केलें पाहिजे. या साऱ्या गोष्टींची ओळख आर्यांस प्रथमपासूनच पटली आहे. मोठमोठीं अरण्यें नाहींशीं करून ती जमीन शेतकीस योग्य अशी त्यांनीं तयार केली. यानंतर त्या स्वच्छ केलेल्या भूमीवर वैदिक स्थंडिलांची योजना त्यांनीं केली. भरतभूमीवरील निरभ्र आकाशांत यज्ञाचा पवित्र धूम भरून राहात होता, वातावरणांत शांति पसरली होती, वेदमंत्रांचे ध्वनि आणि प्रतिध्वनि चोहोंकडे दुमदुमून जात होते, पाळलेलीं आणि इतर जनावरें निर्भय चित्तानें इकडे तिकडे चरत होतीं, विद्या आणि धर्मसाधन यांच्या पायापाशीं तलवारीची योजना केली होती, धर्माचें, मनुष्याच्या जीविताचें आणि त्याच्या जनावरांचें रक्षण करावें इतकीच कामगिरी या तलवारीकडे सोंपविली होती. भयाच्या प्रसंगीं जो दुर्बळांचें रक्षण करील तोच शूर गणला जात होता. त्याला क्षत्रिय असें म्हणत. नांगर आणि तलवार या दोहोंवर धर्माचें साम्राज्य होतें. या दोहोंचें संरक्षण धर्मच करीत असे. धर्म हाच येथला राजाधिराज होता. सर्व जग झोंपीं गेलें तरी हा धर्म सदोदित जागा असे. धर्माच्या छत्राखालीं सर्वांचें संरक्षण होऊन त्यांस पूर्ण स्वातंत्र्य मिळत असे.

आर्यासंबंधीं युरोपीय पंडित काय म्हणतात पहा. आर्य लोक बाहेरून कोठून तरी आर्यावर्तांत आले; त्यांनीं तेथल्या मूळ रहिवाशांच्या जमिनी त्यांजपासून बुचाडून घेतल्या आणि मूळच्या रहिवाशांस नामशेष करून आर्यांनीं आपल्या वसाहती तेथें स्थापिल्या. या त्यांच्या मतांत मुळींच तथ्य नसून हें निव्वळ मूर्खपणाचें प्रदर्शन आहे. आमचे हिंदु पंडितही असल्या वचनांस माना डोलवितात हें खरोखरच मोठें आश्चर्य आहे. असल्या प्रकारच्या धडधडीत खोट्या गोष्टी आमच्या मुलांबाळांच्या डोक्यांत नित्यशः कोंबल्या जात आहेत, ही स्थिति खरोखरच फार शोचनीय आहे.

मी स्वतः कांहीं मोठा पंडित नाहीं. मी विद्वान् आहें अशा प्रकारची घमेंड मी मुळींच बाळगीत नाहीं; पण जें कांहीं थोडेंसें ज्ञान मला आहे तें सारें एकवटून पॅरीस येथील महासभेंत या मतावर मीं खरपूस टीका केली. पुष्कळ हिंदी आणि युरोपीय पंडितांशीं या विषयावर मीं चर्चा केली आहे. मला वेळ मिळाला तर त्यांच्या या उपपत्तीविरुद्ध बलवत्तर प्रमाणें उभीं करण्याची माझी आकांक्षा आहे. माझ्या देशांतील पंडितांस माझी इतकीच विनंति आहे कीं, विद्वज्जन हो ! आपले जुने ग्रंथ तुम्हीं स्वतः धुंडाळून पहा आणि जें काय ठरविणें असेल तें स्वतःच्या स्वतंत्र विचारानें ठरवा.

युरोपीय लोक कोणत्याही देशांत गेले म्हणजे संधि सांपडतांच तेथील मूळच्या लोकांचा निःपात करून त्यांच्या भूमीवर ‘ सुखेनैव ’ नांदतात. हा त्यांचा नित्यक्रम असल्यामुळें आर्यांनींही तसेंच केलें असावें अशी त्यांची कल्पना होते. आपल्या स्वतःच्या देशांत राहून तेथल्या तेथेंच जे कोणी युरोपीय उपजीविका चालवितात, त्यांची गणना तेथील दुर्वृत्त लोकांत होते. यामुळें बाहेर कोठें तरी जाऊन तेथें लूटफाट करण्याची संधि ते पाहात असतात. स्वतःच्या अशा प्रकारच्या वर्तनामुळें आर्यांबद्दलही त्यांची तशीच समजूत झाली असावी; पण या मताला कांहीं पुरावा आहे काय ? ही नुसतीच मनःकल्पना असेल तर ती तुम्ही आपली आपल्यापाशींच ठेवा.

आर्य लोक हिंदुस्थानांत बाह्य देशांहून आले असें कोणतें सूक्त तुम्हांला कोणत्या वेदांत सांपडलें ? हिंदुस्थानांतल्या मूळच्या रहिवाशांचा त्यांनीं निःपात केला ही कल्पना तुम्हीं कोठून काढली ? असल्या प्रकारच्या मूर्खपणाच्या प्रलापांनीं तुम्ही काय मिळवूं पाहात आहां ? रामायणाचा तुम्हीं केलेला अभ्यास सारा फुकट गेला आहे. असल्या प्रकारच्या निव्वळ दंतकथा त्यांतून तुम्ही कां निर्माण करूं पाहतां ?

रामायण म्हणजे दक्षिण हिंदुस्थानांतील मूळच्या रानटी जातींवर आर्यांनीं मिळविलेला विजय असा अर्थ तुम्ही करतां. खरोखर हा फार खासा अर्थ आहे ! रामचंद्र हा आर्यवंशांतील एक सुसंस्कृत राजा आहे असें रामायणावरून दिसून येतें. तो लंकेच्या रावणाबरोबर युद्ध करतो. आतां रामायण तुम्हीं नीटपणें

वाचून पाहिल्यास रावण हा रामचंद्राहूनही अधिक सुसंस्कृत होता असें तुम्हांस आढळून येईल. अयोध्येच्या राजाहून लंकेचें राज्य अधिक सुसंघटित होतें असें दिसून येतें. आतां दक्षिण हिंदुस्थानांतील वानरांस रामानें केव्हां जिंकलें ? ते तर उलटपक्षीं रामचंद्राचे स्नेही आणि मदतगार होते. कोणत्या वालीचें अथवा कोणत्या गूहकाचें राज्य रामानें आपल्या राज्यास जोडलें, हें तुम्ही दाखवूं शकाल काय ?

आतां कित्येक प्रसंगीं आर्य आणि रानटी लोक यांत प्रसंगविशेषीं लढाया होत असाव्या हें अगदीं शक्य आहे. एकाददुसरा लबाड मुनी आपल्या पर्णकुटींत बसून आपल्या यज्ञस्थंडिलावर राक्षस धोंडे अथवा हाडें केव्हां फेंकतात याची वाट पाहात बसला असावा हेंही शक्य आहे. अशा प्रकारें संधि सांपडतांच एकादा लबाड मुनी राजाकडे ओरड करीत असावा. शस्त्रास्त्रांनीं सिद्ध झालेले राजे आपल्या घोड्यावर बसून मुनीच्या मदतीस धांवत असत. अशा प्रकारच्या शस्त्रास्त्रांनीं सज्ज झालेल्या क्षत्रियांपुढें काठ्या आणि धोंडे असल्या प्रकारच्या आयुधांनीं सज्ज झालेल्या रानटी लोकांचा कितीसा टिकाव लागणार ? अशा प्रकारच्या लढायांत रानटी लोक पुष्कळ मारले जात असत. अशा प्रकारच्या कांहीं गोष्टी घडल्या असतील, पण एवढ्यावरून आर्यांनीं त्यांचा निःपात केला व त्यांच्या जमिनी हिरावून घेतल्या हें तुमचें म्हणणें सिद्ध होतें काय ? अशा प्रकारच्या मताला रामायणांत काय पुरावा आहे ?

उष्ण हवेचा पुष्कळ लांबरुंद आणि सपाट असा प्रदेश व मधून मधून लांबरुंद व खोल नद्या अशा प्रकारच्या भूभागावर आर्यसंस्कृतीचा जन्म झाला. या संस्कृतिपटांत उच्च प्रतीचे सुधारलेले, अर्धवट सुधारलेले आणि रानटी असे सर्व प्रकारचे मानववंश आहेत. हे सर्व वंश बहुधा आर्य आहेत. वर्णाश्रमाचार हा या पटाचा आडवा धागा आहे. प्रकृतीशीं चढाओढ करून तिजवर जय मिळविणें, हा या पटाचा उभा धागा आहे.

माझ्या युरोपीय मित्रांनो, कोणत्या देशाची स्थिति तुम्ही सुधारली असा प्रश्न मी तुम्हांस विचारूं काय ? ज्या ठिकाणी तुम्हांस दुर्बल मानववंश आढळले, त्या ठिकाणीं तुम्हीं ते समूळ नाहींसे केले आहेत. त्यांच्या भूमीवर तुम्हीं स्वतःची

स्थापना केली आहे आणि तीं बिचारी मानवकुलें कायमचीं नाहींशीं झालीं आहेत. अमेरिका, आस्ट्रेलिया, न्यू झीलंड, पॅसिफिक समुद्रांतील बेटें आणि दक्षिण आफ्रिका येथील इतिहास काय सांगत आहे ? या देशांतल्या मूळच्या जाती आज कोठें आहेत ? त्या आज नामशेष झाल्या आहेत. जीं राष्ट्रें नामशेष करण्याचें सामर्थ्यच तुमच्यांत नव्हतें, तेवढींच कायतीं अद्यापि जीव धरून आहेत.

हिंदुस्थानानें अशा प्रकारची वागणूक कधींही केली नाहीं. आर्य लोक दयार्द्र आणि उदार होते. त्यांचीं अंतःकरणें समुद्राप्रमाणें विस्तीर्ण आणि अमर्याद होतीं. त्यांच्या मेंदूंत सामान्य मानवी बुद्धीला अगम्य असें ज्ञान भरलें होतें. बाह्यतः दिसावयास गोड परंतु वस्तुतः पशूस साजणारे असे हे मार्ग त्यांच्या डोक्यांत कधीं शिरलेच नाहींत. आतां आपल्या देशांतील पढतमूर्खांसही मला एक प्रश्न विचारावयाचा आहे. तो हा कीं आर्यांनीं येथल्या मूळच्या रहिवाशांची कत्तल करून त्यांची भूमि बळकाविली असती तर वर्णाश्रम ही संस्था निर्माण झाली असती काय ?

स्वतःला राहाण्यास मुबलक जागा सांपडावी म्हणून सर्व जगाचा संहार करावा, असा युरोपचा हेतु आहे. उलटपक्षीं सर्वांस आपल्या बरोबरीचे करावे, किंबहुना आपणांहूनही अधिक श्रेष्ठ करावे हा आर्यांचा हेतु आहे. युरोपीय संस्कृतीचें साधन तलवार हें आहे; आणि वर्णरचना हें आर्यांचें साधन आहे. वर्णरचना करणें ही संस्कृतीची पहिली पायरी होय. अशा रीतीनें प्रत्येकाला आपली विद्वत्ता आणि मनोभूमिकेची संस्कृति यांस अनुरूप असें अधिक वरवरचें स्थान मिळत जातें. बलिष्ठाचा जय आणि कनिष्ठाचा घात हा युरोपचा कायदा आहे. दुर्बलाचें संरक्षण हा भरतभूमीचा सामाजिक कायदा आहे.

---

# युरोपांतील प्रवासाचीं टिपणें.

५८९३

# युरोपांतील प्रवासाचीं टिपणें.

ॐ नमो नारायणाय। अहो स्वामी! दुसऱ्या शब्दाचें शेवटचें अक्षर चांगलें जोरानेंच उच्चारा. हृषीकेशाकडे हीच पद्धत आहे. आज सात दिवस झाले, आम्ही बोटीवर आहों. तुम्हांस पत्र लिहावें म्हणून रोज बेत करतों. पण बंगाल्याचा प्रख्यात आळशीपणा माझ्या ठिकाणींही आहे. यामुळें सारे बेत जागच्या जागींच राहातात. लिहिण्याचें सामान भरपूर आणि वेळही पुष्कळ. तथापि त्यांचा उपयोग होत नाहीं. रोजनिशी कीं कायसें तुम्ही म्हणतां तेंसुद्धां रोज लिहिण्याचा बेत मी करतों, पण लिहूं उद्यांपासून हा विचार रोज चालू असतो. यामुळें या 'उद्यां'ला केव्हांच शेवट येत नाहीं, आणि माझें पाऊल तसूभरही पुढें पडत नाहीं. ही एक आळसाची गोष्ट झाली. दुसरें असें कीं, आतांशा तारीख वार माझ्या लक्षांत राहात नाहींत. तेव्हां कधीं काळीं एखादें पत्र मीं लिहिलें तर त्यावर तारीख वगैरे घालण्याची कृपा तुम्हींच केली पाहिजे. तुमची बुद्धि उदार आहे, यामुळें माझे अल्प गुण पर्वतासारखे करून तुम्ही कदाचित् असें म्हणाल कीं, '**ब्रह्मानंदीं लागली टाळी, मग तारीखवारासारख्या क्षुद्र गोष्टी कोण सांभाळी?**' पण वस्तुस्थिति अशी आहे कीं, हा परिणाम माझ्या मूर्खपणाचा व निव्वळ आळसाचा आहे. तेव्हां अनुभवाच्या भक्तीशीं माझ्या भक्तीची तुलना करण्यांत 'क्व सूर्यप्रभवो वंशः' इत्यादि कालिदासानें म्हटलें तेंच अनुभवाच्या आणि माझ्या भक्तीच्या तुलनेंत निःसंशय खरें ठरावयाचें. रामाशिवाय ज्याच्या अंतःकरणांत दुसरी वस्तूच नाहीं तो हनुमान कोठें आणि श्रीरामकृष्णांचा क्षुद्रांतला क्षुद्र भक्त मी कोठें? आपल्या भक्तीच्या जोरावर एकाच उड्डाणांत शंभर योजनांचा समुद्र त्यानें पार केला आणि तोच समुद्र या लाकडी घरांत बसून हेलकावे खात खात मी तरून जात आहें. त्यांत नुसतें सरळ उभें राहावयाचें म्हटलें तरी एखाद्या खांबाचा अथवा दांड्याचा आश्रय करावा लागतो. आतां, त्याच्यांत आणि माझ्यांत एक फरक मात्र अगदीं स्पष्ट आहे. लंकेला पोंचेपर्यंत राक्षस राक्षसींचें दर्शन हनुमानाला झालें नव्हतें; आणि मी तर त्यांच्या प्रत्यक्ष

सहवासांतच सगळा काळ गमतीनें काढीत आहें. मग या बावींत हनुमानापेक्षां मी श्रेष्ठ नव्हे काय ? जेवणाच्या वेळीं लखलखणाऱ्या त्या सुऱ्या आणि ते कांटे पाहून आपल्या टी—ला तर कांपरेंच भरलें. त्याची शुद्धबुद्ध जाणण्याची वेळ आली. शेजारीं बसलेली बिडालाक्षा ही सुरी आपल्याच छातींत भोंसकील कीं काय याची क्षणोक्षणीं भीति वाटून तो बिचारा चमकत असे. त्यांतून त्याचा देहही पुष्ट आणि लुसलुशीत; यामुळें या मांसभक्षक शेजाऱ्याला त्याच्या एकाद्या पक्वान्नाचा भास होण्याचा संभवही खराच. बेट्या, हनुमानाला समुद्र लागला होता काय रे ? तुझे जुने पुराणग्रंथ धुंडाळून याबद्दल कांहीं माहिती मिळते कीं काय पहा बरें ! तूं मोठा पंडित म्हणूनच तुला ही माहिती मीं विचारली. रामायणादि ग्रंथ तुला मुखोद्गत असल्यामुळें तुझ्यासारख्यानेंच या प्रश्नाचा निकाल लावला पाहिजे. आमचे अर्वाचीन पंडित या बाबतींत कांहींच माहिती देत नाहींत, यावरून त्याला समुद्र बहुधा लागला नसावासें वाटतें. तथापि शंकेचें एक स्थान आहेच. लंकेंत उडी मारतांना कोणाच्याशा तोंडांत तो शिरला होता असें म्हणतात. आमच्या बोटीची नाळ एका क्षणीं आकाशांत उडून इंद्राची भेट घेऊं पहाते, तर दुसऱ्या क्षणीं पाताळांत बुडून बळीच्या भेटीला जाते. असें झालें म्हणजे समुद्र आपला एकच घांस करतो कीं काय अशी भीति बिचाऱ्या टी—ला वाटते. मोठें कार्य करावें म्हणून इकडे तुम्हीं माझी रवानगी केली; पण पात्रापात्र विचार न करतां हें काम कसल्या व्यक्तीवर तुम्हीं सोंपविलें हें आतां तरी कळलें ना ? आतां सात दिवसांच्या समुद्रप्रवासाची हकीकत तुम्हांस लिहिली पाहिजे. ही हकीकत कोणीं नीट सजविलीं तर ती मोठी काव्यमय व चित्ताकर्षक होईल. पण ही कला माझ्या ठिकाणीं नसल्यामुळें मी ती कशीतरी भरकटीत आहें. त्या लिहिण्यांत कांहीं ताळतंत्रसुद्धां नाहीं. अरे, मी बोलून चालून संन्याशी. मायेची करवंटी फेंकून देऊन ब्रह्मरूप खोबरें मिळविण्याची खटपट करण्यांतच माझा सारा जन्म गेला. तेव्हां आतां सृष्टिदेवतेच्या लीलांची गोडी कळण्याइतकी रसिकता माझ्या ठायीं एकाएकीं कशी उत्पन्न होणार ? हिंदुस्थानभर भटकण्यांत सारा जन्म मीं काढला. काशींतून उठून काश्मिरला जावें आणि काश्मीरांतून गुजराथेंत यावें. एवढ्या प्रवासांत किती पर्वत, किती टेकड्या, किती दरींखोरीं, किती नद्या आणि किती ओढे मीं पाहिले असतील, पायांखालीं तुडविले असतील, आणि

पार केले असतील याचा हिशोब कोण सांगणार ? वनस्पतिशून्य रखरखीत डोंगर आणि बारा महिने बर्फानें आच्छादिलेलीं गिरिशिखरें मीं किती तरी पाहिलीं, तथापि माझ्यांत काव्यगुण फारसा आला नाहीं. उलटपक्षीं त्या कवि श्यामचरणाकडे पहा बरें ! बसण्यास फाटकी तुटकी खाट, राहाती जागा इतकी अंधारी कीं त्यांत दिवसा दिव्याची जरूर भासावयाची; भिंती पान तंबाखूच्या पिचकाऱ्यांनीं सुशोभित झालेल्या; पाली, उंदीर इत्यादि प्राण्यांचें संगीत चाललेलें; त्यांतच रस्त्यांतील ट्रॅमगाड्या, खटारे इत्यादिकांचा मधुर ध्वनी मिसळलेला. असल्या जागेंत बसून गुडगुडी ओढतां ओढतां त्यानें जें काव्य निर्माण केलें, त्यामुळें बंगाली लोकांचें नांव कायमचें उजळ झालें आहे. त्याची नक्कल करण्याचें धाष्टर्य माझ्यासारख्यानें कशास करावें ? लहानपणीं श्यामचरण एकदां आपल्या खेड्यावर गेला होता. तेथल्या ओढ्याचें पाणी इतकें पाचक कीं, जडान्नानें पोट तुडुंब भरलें असतां त्यावर एक दोन पंचपात्र्या पाणी प्यालें कीं त्या अन्नांतला कणान् कण भस्मीभूत होऊन कडकडीत भूक लागावयाची. खेड्याची आजूबाजूची वनश्रीही मनाला पुष्ट करणारी. श्यामचरणाची अलौकिक बुद्धि पहिल्यानें येथेंच जागृत झाली. वनश्रीची उदात्त आणि अनुपम सुंदर शोभा येथेंच त्याच्या हृदयांत प्रविष्ट झाली. वास्तविक पाहिलें तर श्यामचरणानें पुष्कळसा प्रवाससुद्धां केला नव्हता. त्याची अखेरची मजल बरद्वानपर्यंत पोहोंचली होती !

पण तुमच्या आग्रहास्तव मला या उद्योगाकडे वळावें लागत आहे आणि काव्यकल्पनांच्या बाबतींत मी अगदींच 'ढ' नाहीं हें सिद्ध करण्याकरितां देवाचें नांव घेऊन या उद्योगाला मी लागतों. तुम्हीही पण आतां खबरदार रहा.

रात्रीच्या वेळीं कोणत्याही बंदरांतून गलबतें बहुधा बाहेर पडत नाहींत. विशेषतः कलकत्त्याचें बंदर आणि हुगळीसारखी खाडी असली म्हणजे तर बोलावयासच नको. खाडीच्या मुखांतून बाहेर पडेपर्यंत गलबताचा सारा अधिकार वाटाड्याकडे असतो आणि सारें काम त्याच्या हुकमानें चालतें. मुखापासून बंदरापर्यंत आणि बंदरापासून मुखापर्यंत येणाऱ्याजाणाऱ्या साऱ्या आगबोटींची रहदारी त्याच्या हुकमतीखालीं असते. हुगळीच्या मुखाकडे जातांना वाटेंत धोक्याचीं स्थळें दोन आहेत. एक बजबजजवळील किनारा आणि डायमंड बंदराच्या तोंडाजवळ असलेला वाळूचा दांडा. भरती पूर्ण झाली असेल तेव्हां आणि

दिवसाचा चांगला उजेड असेल तेव्हां या स्थळांतून वाटाड्याला सुखरूपपणें जातां येतें. यामुळें हुगळींतून बाहेर पडण्यासच आम्हांला दोन दिवस लागले.

हृषीकेश येथील गंगाप्रवाह तुम्हांला आठवतो काय? पाण्याच्या पृष्ठभागाखालीं पांच फुटांवर असलेल्या माशांचे कल्लेसुद्धां स्पष्ट दिसावे इतकें तें स्वच्छ आणि नीलवर्ण पाणी तुम्हांला स्मरतें काय? 'छन्नं सूर्यकरप्रतापरहितं शंखेंदुकुन्दोज्ज्वलं' असें तें गंगाजल, त्याचा तो खळखळणारा प्रवाह जणूं काय 'हरहर' असा शब्दच काढीत आहे; आणि हाच नाद आसमंतांतील गिरिकुहरांतून प्रतिध्वनित होत असतो. माधुकरी मागून अरण्यांतील वृक्षांखालीं बसावें आणि ती भक्षण करावी असा आपण काढलेला काळ तुम्हांला स्मरत असेलच. गंगाप्रवाहांत असलेल्या लहान लहान खडकांवर बसून शीतल गंगाजलाचें पान आपण केलें. गंगाजलाचें पान एकवार ज्यानें केलें त्याला त्याच्या पावित्र्याचा प्रत्यय तेव्हांच येतो. गंगाजलाचें पान केल्याबरोबर मनाचे विकार दूर होतात. शरीराला त्याचा स्पर्श होतांच सर्व विकार नाहींसे होतात. अशी ती गंगा नदी हिमालयाच्या कड्यांवरून उड्या घेत घेत श्रीनगरादि शहरांतून वहात जाते. तेहरी, उत्तरकाशी आणि अखेरीस गंगोत्री इत्यादि पवित्र स्थलांचें दर्शन तुम्हांपैकीं पुष्कळांनीं घेतलें असेलच. गंगेचा उगम तुम्हीं पाहिला असेल. तथापि आमच्या कलकत्त्यांतील गंगाप्रवाहांत जो मोहकपणा आहे तो मी कधींही विसरणार नाहीं. तेथील प्रवाहाचा धूसर वर्ण शिवाच्या भस्मलेपनाची आठवण करून देतो. त्याला कोणी चिखल म्हणोत, पण शिवानें तेथें स्नान केल्यामुळें पाण्याला धूसर वर्ण आला असेंच मी म्हणेन. असें वाटण्याला माझा प्रांताभिमान कारण असो, कीं बालपणींच्या सुखमय आठवणी कारण असोत.

गंगा आणि आम्ही हिंदु लोक या दोहोंतील संबंध मोठा आश्चर्यजनक आहे. गंगा एवढें म्हटल्याबरोबर आमच्या मनांत मूर्तिमंत पावित्र्य उभें राहातें. हा सारा नुसता भोळसटपणाचाच परिणाम असेल काय? कदाचित् असेलही. 'गंगा भागीरथी' असें नामस्मरण करीत करीत आम्ही आनंदानें प्राण सोडतों. गंगेच्या प्रवाहांत आम्ही जलसमाधी घेतों. हजारों कोसांवरून धावत येऊन बुडकुलीभर पाणी तरी हजारों लोक बरोबर घेऊन जातात, आणि मोठ्या उत्सवप्रसंगीं त्याचें आचमन करून स्वतःस धन्य मानतात. पक्क्या बंद केलेल्या भांड्यांत हें पाणी

भरून ठेवून आम्ही त्याची पूजा करतों. राजेमहाराजेसुद्धां मोठालीं भांडीं भरून ठेवीत असतात. गंगोत्रीहून पाणी नेऊन रामेश्वराला स्नान घालणें यासारखें महत्पुण्य नाहीं असा आमचा समज आहे. रंगून, जावा, हाँगकाँग, मादागास्कर, सुएझ, एडन, माल्टा इत्यादि बाहेर ठिकाणीं जाणारे पुष्कळ हिंदु लोक गंगाजल आणि गीता बरोबर नेत असतात.

गीता आणि पवित्र गंगाजल या दोहोंत हिंदूंचें सारें हिंदुत्व सांठविलेलें आहे. गेल्या खेपेच्या माझ्या प्रवासांत मींसुद्धां हें पाणी बरोबर घेतलें होतें; आणि संधि मिळेल तेव्हां त्यांतलें थोडें थोडें पाणी मी पीत असें. भर गर्दीत कितीही गडबड चाललेली असतां आणि हजारों माणसें इकडून तिकडे गडबड करीत असतां यांतील थोडेंसें पाणी मी प्यालों कीं ताबडतोब माझें चित्त शांत होई. पॅरीस, लंडन, न्यूयॉर्क, रोम इत्यादि मनुष्यांनीं गजबजलेलीं पोळीं माझ्या मानसिक दृष्टिपथांतून ताबडतोब अदृश्य होत असत आणि 'हर हर' असा गंभीर ध्वनि माझ्या कानांवर उमटूं लागे. हिमालयांतील निर्मनुष्य अरण्यें माझ्या दृष्टीसमोर उभीं राहात; आणि तेथील गंगाप्रवाहाचा तो 'हर हर' असा मंजुळ ध्वनि माझ्या कानांत दुमदुमूं लागे. माझें अंतःकरण, मेंदू आणि शरीरांतील साऱ्या धमन्या यांतून तो ध्वनि सरसरूं लागे.

प्रियबंधु, आपला 'टी' बालब्रह्मचारी आहे. पूर्वीच्या आश्रमांत तो ब्राह्मण होता. त्यामुळें 'नमो ब्रह्मणे' हा मंत्र त्याच्या जिभेवर नित्य खेळत असे. पण आतां त्याच्या जागीं 'नमो नारायणाय' हा उदात्त मंत्र आला आहे आणि त्याच्या संन्यासाश्रमाला तें योग्यच आहे. तेव्हां गंगामातेनें ब्रह्मकमंडलूचा आश्रय सोडून त्याच्या लहानशा भांड्यांत येऊन बसावें हेंही युक्तच आहे. पण काल रात्रीं पाहातों तों गंगामातेला त्याच्या लहानशा भांड्याचा कंटाळा आल्यासारखें दिसलें. त्यांतून बाहेर पडण्याचा यत्न ती करीत होती. गंगाप्रवाह या बोटींत फुटून आपलीं पूर्वींचीं कृत्यें पुन्हां करूं लागला तर केवढा अनर्थ होईल बरें? या प्रवाहानें एकदां हिमालयाचें पोट फोडलें, ऐरावताला वाहवून नेला, जह्नूची झोंपडी नाहींशी करून टाकिली. असले प्रकार जर पुन्हां घडले तर मोठेंच संकट कोसळेल. तेव्हां मीं गंगामातेची मनोभावें प्रार्थना केली व तुला मद्रासेस पाठवूं असें सांगितलें. तेथें ऐरावताहूनही जाड डोक्याचे ब्राह्मण पुष्कळ

आहेत. जह्लूसारखीं झोंपडीं तेथें तुला पुष्कळ आढळतील, आणि हिमालयाच्या शिखराशीं तुलना पावतील अशीं अर्धी तुळतुळीत केलेलीं डोकींही पुष्कळ भेट-तील. हिमालयाच्या दगडासारखींच हीं डोकींही कडक आहेत. फार काय, पण यांच्या कडकपणापुढें हिमालयांतले गोटेसुद्धां लोण्याचेच म्हणावे लागतील. तेव्हां हे मद्रासी गोटे हवे तितके फोडून टाकण्यास तुला कांहींच हरकत नाहीं. यासा-ठींच मद्रास बंदर येईपर्यंत कृपा करून धीर धर अशी तिची प्रार्थना मीं केली. इतक्यांत आणखीही एक युक्ति मला सुचली. मीं म्हटलें ‘माते, बोटीवरील हे रुमाल घातलेले नोकर तरी पहा, हे सारे अस्सल मुसलमान आहेत. ते गोमांस-भक्षक आहेत; आणि ते पलीकडे झाडीत असलेले लोक भंगी आहेत. लालबेगचे ते अव्वल दर्जाचे शिष्य आहेत. आतां तूं मुकाट्यानें भांड्यांत राहिली नाहींस तर या मंडळीला हांक मारून त्यांना तुला शिवायला सांगेन; आणि इतकेंही करून तूं गप बसली नाहींस तर तुला माहेरीं पोंचती करीन. तें पलीकडे दिसणारें यंत्र पाहिलेंस ना ? तेथें तुला रवाना केलें कीं, तुझ्या माहेरघराप्रमाणें तूं पुन्हां पांढऱ्या दगडासारखी होऊन बसशील. मग तुझी सारी चळवळ अगदीं थंड पडून तूं गोठून बसशील. एवढा धाक घालतांच गंगामाता बिचारी गप बसली. अरे, देव काय आणि माणसें काय, मऊ सांपडलें कीं कोंपरानें खणावें, हा साऱ्यांचाच धंदा. गरीबसा भक्त सांपडला कीं देवसुद्धां त्याला अधिक अधिक छळूं लागतात.

अरे, पण मी कोठें वहावलों ? मूळ मुद्दा सोडून मी भरकटत चाललों आहें. मी कवी नाहीं, हें मीं अगोदरच सांगितलें आहे. तेव्हां जरा दमानें घेतल्यास माझा विषय मी पुन्हां हातीं घेईन.

आपलें तें चांगलें असें वाटणें, हा मनुष्यस्वभावच आहे. आमचे हिंदी लोक इतर साऱ्यांपेक्षां मला अधिक सुंदर दिसतात. नंदनवनांतले रहिवासीसुद्धां माझ्या दृष्टीनें त्यांच्यापुढें अरूप ठरतील. त्यांतून आम्हां बंगाल्यांचें सौंदर्य तर अनुपमच आहे. आमची भूमिसुद्धां तशीच सुंदर आहे. हिरव्यागार गवताचा गालिचा जिकडे तिकडे पसरलेला पाहिला म्हणजे दृष्टीला केवढा आराम होतो म्हणून सांगावें ? त्यांतच भर म्हणून हजारों ओहोळांच्या आणि नद्यांच्या माळा आपल्या कंठांत तिनें धारण केल्या आहेत. या मनोहारी शोभेचा अल्पसा प्रत्यय काश्मीरांत आणि मलबारांत येतो. या जलप्रवाहांतसुद्धां कमी सौंदर्य आहे काय ? जिकडे तिकडे जलमय

झालें आहे, पर्जन्यधारा एकसारख्या पडत आहेत, नारळी आणि खजुरी आपलीं मस्तकें मधून मधून लोंबवीत आहेत आणि बेडूक ओरडत आहेत असा देखावा सौंदर्यपूर्ण नव्हे तर काय ? आमच्या गंगातटाकाची शोभा तर कांहीं विशेषच आहे. बाह्य देशांतून जाऊन आल्यावांचून या शोभेचें खरें महत्त्व कळावयाचें नाहीं. तुफानी समुद्रांतून सुखरूपपणें येऊन तें डायमंड बंदर, त्यावरील तें नीलवर्ण आकाश, त्यांत मधून मधून फिरणारे ते कृष्णवर्ण ढग, त्यांच्या त्या पिवळ्या, तांबड्या आणि सोनेरी कडा आणि बंदराच्या तटाकावरील नारळी आणि खजूरी यांच्या चवऱ्या या वस्तु पाहिल्या म्हणजे आनंदानें हृदय उचंबळूं लागतें. या चवऱ्यांच्या खालीं लाल, पिवळें, धूसर इत्यादि रंगांचें वन पसरलेलें दिसतें. या वनांत आंबे, फणस, लिची इत्यादि अनेक जातींचीं झाडें आपल्या पल्लवांनीं गज-बजलेलीं दिसतात. ही पल्लवराशि अशी दाट असते कीं, तिच्यांतून झाडाचें खोडही दिसत नाहीं. या गर्दीतच मधून मधून बांबूचीं बेटें आकाशाकडे जात असलेलीं दिसतात; आणि या साऱ्यांच्या खालीं बालतृणाचा हिरवागार गालिचा पसरलेला असतो. यार्कंद, इराण, तुर्कस्थान इत्यादिकांतील कारागिरांची कुशलता या सृष्टीच्या गालिचापुढें अगदीं लोपून जाते. दृष्टि कितीही दूरवर लांब-विली तरी जिकडे तिकडे हीच शोभा थेट गंगेच्या मुखापर्यंतही पसरली आहे. क्षितिजापासून डोकीवरील आकाशापर्यंत तुम्हीं कोठेंही नजर फेंकली, तरी नाना रंगांच्या मिश्रणाच्या सौंदर्यावांचून तुम्हांस दुसरें कांहींच आढळावयाचें नाहीं. एकाच मुख्य रंगाच्या पोटांत किती तरी प्रकार आढळून येतील. ही दिव्य शोभा दुसऱ्या कोठेंही तुम्हांस आढळावयाची नाहीं. वेड्या, असलें रंगांचें मिश्रण तूं कधीं तरी पाहिलें आहेस काय ? ही जादू तुझ्या डोळ्यांना कधीं तरी दिसली आहे काय ? रंगांतसुद्धां मोहिनीमंत्र आहे. नुसत्या रंगाला भुलून पतंग दिव्याच्या ज्योतीवर जाऊन पडतो आणि स्वतःचें भस्म करून घेतो. भुंगे कमळाभोंवतीं नाचून नचून अखेरीस मृत्युसुद्धां पावतात. त्यांना पोटाचें सुद्धां भान राहात नाहीं. गंगातटाकाची शोभा तुला पाहून घ्यावयाची असेल तर ती आतांच पोटभर पाहून घे. कारण, हा सारा देखावा आतां लवकरच बदलूं लागणार आहे. ही शोभा एकदां लक्ष्मीदासांच्या हातीं गेली कीं, तिचें वाटोळें झालेंच. मग त्या हरिततृणाच्या जागीं विटांच्या भट्ट्या दिसूं लागतील. ज्या ठिकाणीं गंगा-

प्रवाहाच्या लहान लहान लाटा आतां खेळत आहेत त्या ठिकाणीं तागानें भरलेल्या होड्या आपलीं लांव नाकें खुपसूं लागतील. मग सांप्रतची शोभा तुला कोठून दिसणार ? त्या होड्यांच्या मार्गे उंच उंच बारकसें उभीं राहून आपल्या शुष्क डोलकाठ्यांचें अरण्य त्यांनीं तेथें एकदां पसरलें म्हणजे मागचे तालतमालादि वृक्ष आणि तें सुंदर नीलाकाश यांचें दर्शन कोठून होणार ? ते आम्रवृक्ष आणि ते लिची पुन्हां दृष्टीस पडावयाचे नाहींत. आकाशाच्या नीलवर्णाच्या जागीं कोळशाच्या धुराचे काळेकुट्ट ढग तुला दिसूं लागतील; आणि त्यांच्या पोटांत अर्धवट लपून राहाणारीं कारखान्यांच्या धुराड्याचीं भेसूर तोंडें पिशाचासारखीं दिसूं लागतील.

बोलतां बोलतां आम्ही भरसमुद्रांत येऊन पोंचलों. समुद्राच्या तटाकाचें सुंदर वर्णन कालिदासानें आपल्या रघुवंशांत केलें आहे. पण हें सौंदर्य तेथें दृग्गोचर होत नाहीं. तें वर्णन अगदीं चुकीचें आहे. त्या महाकवीला मी शतशः प्रणाम करितों, तथापि त्यानें समुद्र पाहिला नव्हता अथवा हिमालयाचेंही दर्शन घेतलें नव्हतें असा माझा पक्का समज आहे.

काळ्या आणि पांढऱ्या पाण्याचा संयोग येथें दिसतो. प्रयागास गंगायमुनांचा संगम जसा दिसतो, तसाच थोडा बहुत प्रकार येथेंही आहे. हरद्वार, प्रयाग आणि गंगामुख येथें स्नान केल्यानें खचित मुक्ति मिळते असें सांगतात. पण गंगेचें खरें मुख हें नव्हे असेंही सांगतात. तें कांहीं का असेना, मी येथेंच नमन करितों. मला येथेंच परमेश्वर दिसतो; कारण, त्याचें अस्तित्व नाहीं असें ठिकाण तरी कोणतें ?

येथील शोभा कोणत्या शब्दांनीं वर्णावी ! दृष्टीचा टप्पा पोहोंचेपर्यंत जिकडे तिकडे निळें पाणी दिसतें. त्याच्या पृष्ठभागावर वाऱ्याच्या आंदोलनानें लहान लहान लाटा जिकडे तिकडे नाचतांना दिसतात. या लाटांच्या कडा दुधासारख्या पांढऱ्या शुभ्र असतात. यामुळें गंगाफेनानें शुभ्र दिसणाऱ्या शिवाच्या जटाजूटाचा भास जागोजाग होतो. समुद्राच्या पृष्ठभागाच्या तुलनेनें गंगाप्रवाह फारच शांत असतो. अफाट समुद्र आणि गंगा या दोहोंचा जेथें संगम झाला ती जागा आम्हांस येथून दिसत आहे. हें पहा, येथें गंगेचें पाणी दिसेनासें झालें; आणि येथून महासमु-

द्रास सुरवात झाली. आतां जिकडे तिकडे पाणीच पाणी. या समुद्राचे केंस निळे, त्याचा देह नीलवर्ण आणि वस्त्रेंही निळींच. देवांच्या भयानें कोट्यवधि असुर समुद्रांत लपले होते, अशीं वर्णनें आपण पुराणांत वाचतों; पण देवांचे दिवस आतां संपले असून असुरांचे आले आहेत. वरुण त्यांचा मित्र झाला आहे. नाना प्रकारचे भेसूर आवाज काढून सारे असुर आतां नाचत सुटले आहेत. त्यांचें युद्धनृत्य आतां सुरू झालें आहे. मोठमोठ्यानें हंसून या फेंसाच्या रूपानें जणूं काय ते आपले दांत दाखवीत आहेत! याच गडबडींत आणि धांदलींत आमची बोट आपला मार्ग आक्रमीत आहे आणि तिच्या तक्तपोशीवर स्त्रीपुरुषें मोठ्या दिमाखानें फिरत आहेत. या समुद्रवलयांकित जगावर आपलेंच राज्य आहे, ही जाणीव त्यांच्यांत पदोपदीं दिसून येत आहे. त्यांनीं सुंदर पोषाख केले आहेत. आत्मविश्वास आणि स्वावलंबन हे गुण त्यांच्या प्रत्येक हालचालींत मूर्तरूप धारण करीत आहेत. याच गुणांना काळ्या वर्णाचे लोक गर्व आणि उद्धटपणा अशीं नांवें देतात. पण आकाशांत कांहीं निराळाच प्रकार घडून येत आहे. वर पावसाळी ढग जिकडे तिकडे दिसूं लागले आहेत. वर त्यांचा गडगडाट, खालीं लाटांचा खळखळाट आणि बोटींत इंजिनाचा दणदणाट यांनीं एकच कोलाहल करून सोडला आहे. या आवाजांच्या मिश्रणाचें श्रवण करतां करतां मी तर गुंगच होऊन गेलों. अर्धवट झोंपेंत, अर्धवट जागा, अशा स्थितींत मी असतां स्त्रीपुरुषांच्या मिश्र संगीताचा गंभीर आणि कर्णमधुर ध्वनि माझ्या कानांवर येऊन आदळला. ‘ब्रिटानिया, समुद्राची राणी ब्रिटानिया, समुद्राच्या लाटांवर ब्रिटानियाचें राज्य आहे!’ एकाएकीं दचकून मी इकडे तिकडे पाहूं लागलों तों आमची बोट खूब हेलकावे खात आहे असें मला आढळून आलें. आपला बंधु ‘टी’ याजकडे पाहिलें तों आपलें मस्तक दोन्ही हातांनीं दाबून तो बसला होता. उलटी होऊं नये म्हणून ही सारी धडपड तो करीत होता.

दुसऱ्या वर्गाच्या एका खोलींत विद्यार्जनासाठीं जाणारे दोन तरुण बंगाली आहेत. त्यांची अवस्था तर फारच कठीण झालेली आहे. त्यांतील एक तर इतका घाबरून गेलेला दिसतो कीं, जमिनीवर पाय ठेवण्याची संधि त्याला मिळाली तर मोठ्या आनंदानें तो घराकडे धांव घेईल. हे दोन तरुण आणि आम्ही दोघे मिळून चारच हिंदू बोटींत आहेत. आमचे पहिले दोन दिवस गंगाप्रवाहांतच

प्रवाहाच्या लहान लहान लाटा आतां खेळत आहेत त्या ठिकाणीं तागानें भरलेल्या होड्या आपली लांब नाकें खुपसूं लागतील. मग सांप्रतची शोभा तुला कोठून दिसणार ? त्या होड्यांच्या मागें उंच उंच बारकसें उभीं राहून आपल्या शुष्क डोलकाठ्यांचें अरण्य त्यांनीं तेथें एकदां पसरलें म्हणजे मागचे तालतमालादि वृक्ष आणि तें सुंदर नीलाकाश यांचें दर्शन कोठून होणार ? ते आम्रवृक्ष आणि ते लिची पुन्हां दृष्टीस पडावयाचे नाहींत. आकाशाच्या नीलवर्णाच्या जागीं कोळशाच्या धुराचे काळेकुट्ट ढग तुला दिसूं लागतील; आणि त्यांच्या पोटांत अर्धवट लपून राहाणारीं कारखान्यांच्या धुराड्याचीं भेसूर तोंडें पिशाच्चासारखीं दिसूं लागतील.

बोलतां बोलतां आम्ही भरसमुद्रांत येऊन पोंचलों. समुद्राच्या तटाकाचें सुंदर वर्णन कालिदासानें आपल्या रघुवंशांत केलें आहे. पण हें सौंदर्य तेथें दृग्गोचर होत नाहीं. तें वर्णन अगदीं चुकीचें आहे. त्या महाकवीला मी शतशः प्रणाम करितों, तथापि त्यानें समुद्र पाहिला नव्हता अथवा हिमालयाचेंही दर्शन घेतलें नव्हतें असा माझा पक्का समज आहे.

काळ्या आणि पांढऱ्या पाण्याचा संयोग येथें दिसतो. प्रयागास गंगायमुनांचा संगम जसा दिसतो, तसाच थोडा बहुत प्रकार येथेंही आहे. हरद्वार, प्रयाग आणि गंगामुख येथें स्नान केल्यानें खचित मुक्ति मिळते असें सांगतात. पण गंगेचें खरें मुख हें नव्हे असेंही सांगतात. तें कांहीं का असेना, मी येथेंच नमन करितों. मला येथेंच परमेश्वर दिसतो; कारण, त्याचें अस्तित्व नाहीं असें ठिकाण तरी कोणतें ?

येथील शोभा कोणत्या शब्दांनीं वर्णावी ! दृष्टीचा टप्पा पोहोंचेपर्यंत जिकडे तिकडे निळें पाणी दिसतें. त्याच्या पृष्ठभागावर वाऱ्याच्या आंदोलनानें लहान लहान लाटा जिकडे तिकडे नाचतांना दिसतात. या लाटांच्या कडा दुधासारख्या पांढऱ्या शुभ्र असतात. यामुळें गंगाफेनानें शुभ्र दिसणाऱ्या शिवाच्या जटाजूटाचा भास जागोजाग होतो. समुद्राच्या पृष्ठभागाच्या तुलनेनें गंगाप्रवाह फारच शांत असतो. अफाट समुद्र आणि गंगा या दोहोंचा जेथें संगम झाला ती जागा आम्हांस येथून दिसत आहे. हें पहा, येथें गंगेचें पाणी दिसेनासें झालें; आणि येथून महासमु-

द्रास सुरवात झाली. आतां जिकडे तिकडे पाणीच पाणी. या समुद्राचे केंस निळे, त्याचा देह नीलवर्ण आणि वस्त्रेंही निळींच. देवांच्या भयानें कोट्यवधि असुर समुद्रांत लपले होते, अशीं वर्णनें आपण पुराणांत वाचतों; पण देवांचे दिवस आतां संपले असून असुरांचे आले आहेत. वरुण त्यांचा मित्र झाला आहे. नाना प्रकारचे भेसूर आवाज काढून सारे असुर आतां नाचत सुटले आहेत. त्यांचें युद्धनृत्य आतां सुरू झालें आहे. मोठमोठ्यानें हंसून या फेंसाच्या रूपानें जणूं काय ते आपले दांत दाखवीत आहेत! याच गडबडींत आणि धांदलींत आमची बोट आपला मार्ग आक्रमीत आहे आणि तिच्या तक्तपोशीवर स्त्रीपुरुषें मोठ्या दिमाखानें फिरत आहेत. या समुद्रवलयांकित जगावर आपलेंच राज्य आहे, ही जाणीव त्यांच्यांत पदोपदीं दिसून येत आहे. त्यांनीं सुंदर पोषाख केले आहेत. आत्मविश्वास आणि स्वावलंबन हे गुण त्यांच्या प्रत्येक हालचालींत मूर्तरूप धारण करीत आहेत. याच गुणांना काळ्या वर्णाचे लोक गर्व आणि उद्धटपणा अशीं नांवें देतात. पण आकाशांत कांहीं निराळाच प्रकार घडून येत आहे. वर पावसाळी ढग जिकडे तिकडे दिसूं लागले आहेत. वर त्यांचा गडगडाट, खालीं लाटांचा खळखळाट आणि बोटींत इंजिनाचा दणदणाट यांनीं एकच कोलाहल करून सोडला आहे. या आवाजांच्या मिश्रणाचें श्रवण करतां करतां मी तर गुंगच होऊन गेलों. अर्धवट झोंपेंत, अर्धवट जागा, अशा स्थितींत मी असतां स्त्रीपुरुषांच्या मिश्र संगीताचा गंभीर आणि कर्णमधुर ध्वनि माझ्या कानांवर येऊन आदळला. 'ब्रिटानिया, समुद्राची राणी ब्रिटानिया, समुद्राच्या लाटांवर ब्रिटानियाचें राज्य आहे!' एकाएकीं दचकून मी इकडे तिकडे पाहूं लागलों तों आमची बोट खूब हेलकावे खात आहे असें मला आढळून आलें. आपला बंधु 'टी' याजकडे पाहिलें तों आपलें मस्तक दोन्ही हातांनीं दाबून तो बसला होता. उलटी होऊं नये म्हणून ही सारी धडपड तो करीत होता.

दुसऱ्या वर्गाच्या एका खोलींत विद्यार्जनासाठीं जाणारे दोन तरुण बंगाली आहेत. त्यांची अवस्था तर फारच कठीण झालेली आहे. त्यांतील एक तर इतका घाबरून गेलेला दिसतो कीं, जमिनीवर पाय ठेवण्याची संधि त्याला मिळाली तर मोठ्या आनंदानें तो घराकडे धांव घेईल. हे दोन तरुण आणि आम्ही दोघे मिळून चारच हिंदू बोटींत आहेत. आमचे पहिले दोन दिवस गंगाप्रवाहांतच

गेले. त्या वेळीं आपला बंधु 'टी' माझा एक अपुरा लेख पुरा करण्यासाठीं माझ्या माग हात धुवून लागला होता. ' उद्बोधन ' मासिकाच्या संपादक महाशयानें बहुधा त्याचे कान भरले असावे. माझ्या लेखाचा विषय अर्वाचीन हिंदुस्थान हा होता. बोटीवरील ही एकांताची संधि साधून मीं त्याला म्हटलें, 'बेट्या, अर्वाचीन हिंदुस्थानाबद्दल तुला स्वतःला काय वाटतें ? आपल्या सांप्रतच्या स्थितीबद्दल तुझें काय मत आहे ?' त्यानें एकवार त्या दुसऱ्या वर्गाच्या खोलीकडे पाहिलें आणि मग स्वतःकडे पाहून म्हटलें, ' फारच वाईट, अगदीं शोचनीय.'

हुगळी आणि पद्मा असे गंगेचे दोन फांटे येथें झाले आहेत. त्यांपैकीं पद्मा हा फांटा बराच मोठा आहे. तथापि हुगळीचें महत्त्व अधिक मानण्यांत येतें. हुगळी हा मूळ प्रवाह असल्यामुळें त्याचें महत्त्व अधिक आहे असें सांगतात. त्याचप्रमाणें टोलीनल्ला या नांवाचाही गंगेचा एक प्रवाह आहे. हाच प्रवाह खरोखर मूळचा असेंही कांहीं म्हणतात. याला त्यांनीं आदिगंगा असें नांव दिलें आहे. पूर्वी गंगेचा प्रवाह फार खोल असून त्यांतून मोठालीं गलबतेंसुद्धां त्रिवेणी घांटापर्यंत जात असत. प्राचीन काळीं सप्तग्राम हें बंगालचें मुख्य बंदर असून परदेशांशीं होणारा आपला व्यापार येथून चालत असे. कालांतरानें सरस्वतीचें मुख ओहरत गेलें. १५२९ त हें मुख इतकें भरलें होतें कीं पोर्तुगीज लोकांचीं गलबतें येथपर्यंत येईनाशीं झाल्यामुळें त्यांना वरण्यासाठीं दुसरें बंदर शोधावें लागलें. याच बंदराच्या किनाऱ्यावर हल्लींचा प्रख्यात हुगळी गांव वसला. गंगेचें पात्र दिवसेंदिवस ओहरत जात आहे, ही गोष्ट सोळाव्या शतकांतच दर्यावर्दीच्या ध्यानीं आली होती. येथल्या आणि परक्या व्यापाऱ्यांनाही ही गोष्ट काळजी करण्यासारखी वाटते. मनुष्याचें सारें चातुर्य या कामीं अद्यापपर्यंत तरी फोल ठरलें आहे. गंगेचें पात्र भरत चाललें आहे, असा उल्लेख १६६६ सालीं एका फ्रेंच मिशनऱ्यानें केला आहे. कलकत्त्याच्या अंधार कोठडीच्या गप्पेंत प्रसिद्धीस आलेला हाल्वेलसाहेब एकदां मुर्शिदाबादेस जात होता. मध्यंतरीं नदीच्या पात्रांत पुरेसें पाणी नसल्यामुळें लहानशा देशी होडींतून त्याला वर जावें लागलें. उन्हाळ्यांत या पात्रांतून साधारण मचवेही दूरवर जाऊं शकत नाहींत, असें कोलब्रुक नांवाच्या एका नावाड्यानें लिहून ठेविलें आहे. सन १८२२ पासून ४६ पर्यंत हुगळीचें पात्र व्यापारी बोटींना बंद करण्यांत आलें होतें. या चोवीस

वर्षांच्या अवधींत या प्रवाहाची खोली दोन तीन फुटांहून अधिक नव्हती. सतराव्या शतकांत डच लोकांनीं आपली वखार चिनसुरा येथें स्थापिली. हें ठिकाण हुगळीपासून एक मैल खालीं आहे. यानंतर आलेल्या फ्रेंच लोकांची वखार चंद्रनगर येथें स्थापिली गेली. हें ठिकाण चिनसुऱ्याहूनही अधिक खालीं आहे. सन १७२३ त एका जर्मन कंपनीनें चंद्रनगरच्या खालीं पांच मैलांवर बांकीपुर येथें आपली वखार उघडली. सन १६१६ त श्रीरामपुर येथें डेन लोकांची वखार होती आणि त्यानंतर आलेल्या इंग्रजांनीं कलकत्ता येथें आपली वखार उघडली. कलकत्ता हें नदीच्या मुखाला अगदीं जवळचें बंदर आहे. वरील ठिकाणांपैकीं कलकत्त्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही ठिकाणीं आगबोटी हल्लीं जाऊं शकत नाहींत. पुढें मागें कलकत्त्याचीही हीच स्थिति होईल कीं काय अशी भीति वाटूं लागली आहे.

शांतिपूरपर्यंत गंगेच्या पात्रांत भर उन्हाळ्यांतसुद्धां इतकें पाणी कां असतें याचें कारण मोठें चमत्कारिक आहे. नदीचा वरून येणारा प्रवाह आटत चालला म्हणजे किनाऱ्यावरील जमिनींत मुरलेलें पाणी प्रवाहाकडे पुन्हां परतूं लागतें. बाजूच्या किनाऱ्याहून गंगेचें पात्र अद्यापिही बरेंच खोल आहे. यामुळें या उताराकडे किनाऱ्याच्या पोटांतील पाणी वाहूं लागतें. आतां आजूबाजूची माती पात्रांत येऊन तें अधिक उथळ झालें म्हणजे मात्र या परिस्थितींत बदल होऊं लागेल. कलकत्त्याच्या बंदराला याशिवायही आणखी एक धोका असल्याचें सांगतात. धरणीकंपामुळें म्हणा किंवा दुसऱ्या कांहीं कारणामुळें म्हणा, येथील पाणी कित्येक वेळां आटून जात असतें. सन १७७० सालीं इकडून तिकडे चालत जाण्याइतकें पाणी कमी झालें होतें असें सांगतात. सन १७३४ च्या अक्टोबरच्या नवव्या तारखेला ओहोटी झाली तेव्हां भर दुपारीं गंगेचें पात्र कोरडें ठणठणीत पडलें होतें असा उल्लेख आहे.

कलकत्त्याच्या खालच्या भागांतील प्रवाहांत दोन मोठे दांडे पडले आहेत. हें एक मोठें धोक्याचें स्थळ आहे. पूर्वी दामोदर नदी कलकत्त्याच्या वर तीस मैल गंगेला मिळाली होती. पण आतां हा प्रवाह अगदीं बदलून गेला आहे. आतां कलकत्त्याच्या खालीं एकतीस मैलांवर हा संगम आहे; आणि त्याखालीं सहा मैल रूपनारायण नदी या प्रवाहास येऊन मिळते. अशा रीतीनें तीन नद्यांचें पाणी येथें एकत्र झालें आहे. पण पाण्याच्या ओघाबरोबरच वाळू आणि चिखलही

पुष्कळ वाहून येऊन प्रवाहांत दांडे पडले आहेत. आज येथें तर उद्यां तेथें अशा रीतीनें या दांड्यांची जागा बदलतच असते. कित्येक वेळां त्यांची माती लोण्यासारखी मऊ असते तर कित्येक वेळां ती दगडासारखी मऊ असते. यामुळें प्रवाहांतून गलबतें चालविणें मोठें धोक्याचें आहे. पात्राचा ठाव घेण्याचें काम येथें अहोरात्र चालत असतें. निष्काळजीपणानें या कामाची टाळाटाळ कांहीं दिवस झाली तर किती तरी गलबतांचा नाश होईल. एक तर तीं ताडकन् फुटतील अथवा मऊ चिखलांत गडप होऊन जातील. कित्येक वेळां मोठीं तिरकटी तारवेंही येथें पाहतां पाहतां अदृश्य झाल्याचे दाखले आहेत. या तारवांच्या डोलकाठ्यांचीं टोंकें मात्र वर राहिलीं होतीं. हे दांडे दामोदर आणि रूपनारायण या नद्यांच्या मुखाशीं आहेत. येथें दामोदरानें आपल्या उदरांत गलबतांना ठाव देण्याचें जणूं काय व्रत पत्करलें आहे. इतके दिवस दामोदर संताळ परगण्यांतील खेडींपाडीं मात्र भक्षण करीत असे, पण आतां तेवढ्यानेंच तृप्त न राहातां मधून मधून गलबतांचें आणि बोटींचें तोंडीं लावणेंही करीत असतो. सन १८७७ सालीं सहा हजार खंडी गहूं भरून एक बोट कलकत्त्याहून निघाली आणि या दांड्यावर आपटतांच थोड्याच वेळांत तिचा मागमूसही दिसेनासा झाला. एका वेळीं तर अशीच एक मोठी बोट अवघ्या दोन मिनिटांत रसातळाला गेली. अशा प्रकारचें हें गंगामुख आहे. आपल्या काळदाढेंतून सुखरूप बाहेर सोडल्याबद्दल गंगामातेला मी प्रणाम करतों. आपला बंधु 'टी' याला मीं असें म्हटलें तेव्हां तो मला म्हणाला, 'नुसत्या नमस्कारानेंच काय होणार? एकादा बकरा तरी बळी द्या.' यावर मीं म्हटलें, 'अरे, एकच दिवस बळी दिल्यानें काय होणार! असा एकादा बळी रोज दिला पाहिजे.' दुसऱ्या दिवशीं आम्ही जेवावयाला बसलों असतां मीं त्याला म्हटलें, 'बकऱ्याचे बळी कसे चालले आहेत, पाहिलेंस?' माझ्या म्हणण्याचा अर्थ त्याच्या लक्षांत आला नाहीं. तो म्हणाला, 'तुम्हीच फक्त खाणें खातांना दिसतां. मग बकऱ्यांच्या बळीचें काय म्हणतां?' तेव्हां उत्तरादाखल पुढील कथा मीं त्याला सांगितली.

एके वेळीं कलकत्त्यांतील एक तरुण मनुष्य आपल्या सासुरवाडीस गेला होता. हें गांव गंगेपासून पुष्कळ अंतरावर होतें. जेवणाची तयारी झाली तेव्हां त्याची सासू त्याला म्हणाली, "जेवायला बसण्याच्या आधीं थोडें दूध घ्या." तेथला

हा कांहीं रिवाज असेल असें समजून त्या तरुणानें थोडेंसें दूध घेतलें. इतक्यांत आजूबाजूची मंडळी ढोलकीं पिटून नाचूं लागली. सासूबाई म्हणाल्या, "तुम्ही गंगातटाकीं राहतां, त्या अर्थी गंगेचें पाणी तुमच्या पोटांत असलेंच पाहिजे. तुम्हांला जें दूध मीं दिलें त्यांत तुमच्या सासऱ्यांच्या अस्थींची पूड होती. आपल्या सासऱ्याला मुक्ति देऊन आपलें मुलाचें नातें तुम्हीं आज खरें केलें आहे!" आपल्या या बोटीवर कलकत्त्यांतील तरुण आहेत आणि बोटीवरील मांसाच्या पदार्थांवर ते यथेच्छ ताव मारतात. मग हा बकऱ्याचा बळी गंगेलाच मिळत नाहीं तर काय? त्या अर्थी तुला आतां काळजी करण्याचें कारण नाहीं. आपला चेहरा सदोदित गंभीर ठेवण्याची कला 'टी'ला इतकी साधली आहे कीं, माझ्या या गोष्टीचा परिणाम त्याच्या चित्तावर काय झाला हें मला कांहींच कळलें नाहीं.

गलबत ही तरी किती आश्चर्यजनक वस्तु आहे पहा! समुद्राकडे नुसतें पाहिल्यानेंसुद्धां पोटांत भीति उत्पन्न होते. चोहों बाजूंनीं आकाश त्याला टेंकलेलें आहे. त्याच्या पोटांतून सूर्य वर येतो आणि त्याच पोटांत पुन्हां गडप होतो. त्या सागरमहाराजांनीं जरासे डोळे वटारले तर आमचा जीव खालवर होऊं लागतो. पण अशा प्रकारच्या समुद्रावरही गलबतानें आपलें वर्चस्व स्थापिलें आहे. त्यानें त्याला आपला राजमार्ग बनविलें आहे. या गलबताची रचना प्रथम कोणीं केली असावी बरें? कोणाही एकाद्या विशिष्ट व्यक्तीचें तें कर्तव्य नाहीं. मनुष्याच्या जीवनाला अत्यंत आवश्यक आणि ज्यांवांचून त्यांचें क्षणभरही चालावयाचें नाहीं अशीं अनेक हत्यारें आणि अवजारें ज्याप्रमाणें निर्माण झालीं त्याप्रमाणें गलबतेंही अनेकांच्या श्रमानें निर्माण झालीं आहेत. एकादें चाकच पहा. ही वस्तु किती आवश्यक आहे? रें रें करीत जाणाऱ्या खटाऱ्यापासून तों जगन्नाथाच्या रथापर्यंत, हातानें सूत कांतणाऱ्या चरख्यापासून तों प्रचंड गिरण्यांतील अवाढव्य यंत्रांपर्यंत याचा सर्वव्यापी संचार आहे. हें चाक कोणी शोधून काढलें? कोणाही एकाच व्यक्तीनें तें केलेलें नाहीं. एवढ्याशा चाकांतसुद्धां अनेकांचे श्रम सामावलेले आहेत. अगदीं आरंभकालचीं मनुष्यें रानांतील झाडें तोडीत आणि त्यांच्या खोडांच्या गंडेऱ्या पाडून त्या ढकलीत ढकलीत गांवांत आणीत. चाकाची मूळ कल्पना येथेंच उत्पन्न झाली. आरंभीं जाड बुंधाचे वाटोळे तुकडे चाकासारखे उपयोगांत आणले जात. मग, ह्यानंतर तुंबे, आरा,

धांवा इत्यादिकांची रचना अस्तित्वांत येऊं लागली. मूळच्या गंडेऱ्यांपासून तों सध्यांच्या पोलादी तारांच्या चाकाच्या उत्पत्तीपर्यंत किती काळ लोटला असेल हें कोणीं सांगावें ? कदाचित् लाखों वर्षेंही लोटलीं असतील. आमच्या हिंदुस्थानांत अगदीं प्राचीन काळापासूनचे नमुने अद्यापिही पहावयास मिळतील. एकाद्या वस्तूंत कांहीं सुधारणा झाली तरी जुन्याला चिकटून बसणारीं माणसें आमच्यांत थोडीं फार असतातच. यामुळें एका वस्तूच्या सुधारणेच्या अनेक पायऱ्या आमच्या देशांत एकाच वेळीं आढळून येतात. बांबूवर तार ताणून पहिलें वाद्य तयार झालें. प्रथम हें बोटानेंच वाजवीत असत. मग घोड्यांच्या केसांचा गज निर्माण झाला. अशा रीतीनें पूर्णत्व पावलेलें तंतु वाद्य निर्माण झालें. सारंगी, तौस, दिलरुबा इत्यादि नाना रचनेचीं तंतुवाद्यें अस्तित्वांत आलीं. तंतुवाद्यांची इतकी वाढ झाली तरी भिकाऱ्याची एकतारी अद्यापि जिवंत आहे. मध्य हिंदुस्थानांत लांकडाच्या वाटोळ्या गडगड्यांचा उपयोग चाकासारखा होत असलेला अद्यापिही तुम्हांस आढळेल. एका बाजूला रबराच्या धांवा घातलेली सुंदर गाडी आणि तिच्याच शेजारीं गडगड्या चाकांचें धडपडत चालणारें गाडें, अशा वस्तु सुखानें एकत्र नांदत असल्याचा देखावा आपल्या देशांत अद्यापिही दिसतो.

सुवर्णयुगांत माणसें सत्यवचनी आणि निरपेक्ष असत. आंत एक व बाहेर एक असें दिसूं नये म्हणून आपलीं शरीरेंही तीं झांकीत नसत. मनांत स्वार्थ उद्भवूं नये म्हणून तीं घरदारसुद्धां करीत नसत. ही माझी मत्ता आणि ती तुझी असा भेद त्यांच्या ठिकाणीं नव्हता. अशा त्या कालांत पाण्यावर तरण्यासाठीं तराफे बांधीत असत. नंतर लांकडाचे ओंडके पोखरून होड्या बनविण्याची कला अस्तित्वांत आली. ओरिसापासून कोलंबोपर्यंत आपण प्रवास केला तर त्या साऱ्या किनाऱ्याच्या आजू बाजूनें तराफे हिंडत असलेले आपणांस आजही दिसून येतील. हे तराफे समुद्रांत लांब लांब प्रवास करीत असतात. यांतच आजच्या भव्य आगबोटीचें बीज दिसून येतें.

आपल्या पूर्व बंगाल्यांत कोळ्यांच्या लहानापासून मोठ्या होडक्यापर्यंत किती तरी प्रकार आढळून येतात. या बोटींवर उतारूनें पाय ठेवला कीं आधीं त्याला कुलस्वामीचें स्मरण करावें लागतें. सुरक्षित पलीकडे ने अशी गंगामातेची प्रार्थनाही करावी लागते. वाऱ्याचा अल्पस्वल्प फूत्कार आला तरी नावाड्याला

बोट अनावर होते. आपापल्या देवाचें नांव घ्या असें तो उतारूंना म्हणूं लागतो. ह्याच्याहून मोठ्या बोटी असतात त्या चालविण्यासाठीं उभें राहून वल्हें मारावें लागतें. मग श्रीमंतांच्या भपकेबाज नौका दिसूं लागतात. यांत बसण्याच्या जाग्यावर सुंदर छप्पर बांधलेलें असतें. बोटींच्या पोटांत गंगोदकाचे चंबू भरलेले असतात. आपल्या बंगाल्यांत बोटींचा उपयोग किती तरी मोठ्या प्रमाणावर होत असतो. बंगाली बाबूंना त्यांच्या ऑफिसांत पोंचविण्यास किती तरी बोटी रोज येरझारा घालीत असतात. या लहान रचनेची पुढील पायरी ओबडधोबड पण मोठ्या मचव्यांत दिसून येते. हा गृहस्थ कधीं सरळ चालावयाचा नाहीं. एकदां पूर्वेला तर एकदां उत्तरेला तोंड करील. ' शनैः पंथः ' या सूत्राला धरून हा वागत असतो. याच्या पुढची पायरी दोन दोन डोलकाठ्यांच्या प्रचंड गलबतांत आढळते. सिलोन, मालदीव बेटें, अरबस्थान इत्यादि लांब लांब देशांचा प्रवास करून तेथून नारळ, खजूर, वाळलेले मासे इत्यादि वस्तूंची ने आण हीं करीत असतात. या एकाच जातीच्या पोटांत किती तरी बारीकसारीक भेद आहेत.

शिडें लावून गलबत चालविणें हा एक अजब शोध आहे. वारा कोणत्याही दिशेनें वाहात असला तरी नावाडी चतुर असेल तर गलबत मुक्कामाला बरोबर पोंचतें. आतां वारा अगदींच उलट असेल तर मुक्काम येण्यास अधिक वेळ लागेल इतकेंच. शिडें लावल्यानें गलबत दुरून फार सुंदर दिसतें. शुभ्र पंखाचा एखादा पक्षीच जणूं काय आकाशांतून उतरला आहे ! वारा एकसारखा एकाच दिशेनें वहात नसल्यामुळें गलबताला एकाच दिशेनें एकसारखें जातां येत नाहीं; आणि तो थोडा फार उलटा असला तर गलबताला नागमोडीनें जावें लागतें. वारा अगदींच पडला तर मात्र गलबताची गति कुंठित होऊन त्याला जागच्या जागीं डुबकत रहावें लागतें. भूमध्यरेषेजवळ असे प्रकार वारंवार घडतात. सध्याचीं शिडाचीं गलबतेंसुद्धां निवळ लांकडी नसतात. त्यांत लोखंडी पत्र्याचा उपयोग पुष्कळ केलेला असतो. शिडाच्या गलबतावर मुख्य कप्तानाचें काम करणें ही एक मोठी कला आहे. आगबोटीवरील तांडेलापेक्षां हा तांडेल फारच अधिक हुशार असावा लागतो. पुष्कळ अनुभव असल्याशिवाय हें काम करतां येणें शक्य नाहीं. वाऱ्याची गति, त्यांत वेळोवेळीं होणारे फेरफार, समुद्रांतील धोक्याचीं

स्थळें इत्यादि गोष्टींची त्याला पूर्ण माहिती असावी लागते. आगबोटीची गती बहुतांशीं मनुष्याच्या हातांत असते. इंजिन बंद करून ती हवी तेथें उभी करतां येते. पुढें, मागें अथवा बाजूला कोणत्याही दिशेकडे ती चालवितां येते आणि इतकी अदलाबदल अगदीं थोड्या वेळांत करतां येते. शिडाच्या गलबताची स्थिति अशी नाहीं. शिडें उतरून सुकाणूं फिरवीपर्यंत गलबत खडकाला जाऊन लागण्याचा अथवा दुसऱ्या गलबतावर आपटण्याचाही संभव असतो. माणसांची वाहतुक शिडांच्या गलबतांतून सांप्रत फारशी होत नाहीं. फार झालें तर मजूर लोकांची ने आण यांतून होते. मालांतसुद्धां किंमतवान् माल त्यांतून नेत नाहींत. लहानसहान शिडांचीं गलबतें किनाऱ्याजवळ राहून जवळपासच्या बंदरांची ने आण करीत असतात. वाफेचा शोध लागला नव्हता तेव्हां लढाऊ गलबतेंसुद्धां शिडानेंच चालवीत असत. ह्यामुळें समुद्रावरील लढाई अत्यंत कठीण असे. लढाईला तोंड लागण्यापूर्वीही अनेक धोक्यांतून गलबतांना पार पडावें लागे. लढाईच्या वेळीं वाऱ्याची दिशा बदलली किंवा समुद्राच्या पोटांतील जलप्रवाह प्रतिकूल झाला तर तेवढ्यानेंही लढाईचा निकाल त्या पक्षाला प्रतिकूल होत असे. गलबतें निवळ लाकडी असल्यामुळें तोफांच्या भडिमारानें तीं भडाभड पेट घेत. त्यांची रचनाही पुष्कळ वेगळी असे. गलबताला चार पांच मजले असत. अगदीं वरच्या मजल्याच्या एका टोंकाला मुख्य दर्यासारंगाची खोली असे. त्याच्या खालच्या मजल्यांत अशाच खोल्या केलेल्या असून त्यांचा उपयोग जेवणाखाणाकडे होत असे. गलबताच्या दोन्ही बाजूंना तोफा लावलेल्या असून जंग्यांतून त्यांचीं तोंडें बाहेर काढलेलीं असत. हे सर्व मजले अगदीं ठेंगणे बांधलेले असत. गलबतांतील माणसांची भरती त्या काळीं जुलमानें होत असे. गलबतांतील शिस्तसुद्धां अत्यंत दुष्टपणाची होती. अगदीं नवख्या माणसालासुद्धां अधिकारी डोलकाठीच्या टोंकापर्यंत चढण्यास सांगत; आणि त्याला चढतां न आलें तर चावकाचा मार त्याला खावा लागे. अशा दिव्यांत कित्येक माणसें प्राणासही मुकत. सारी सत्ता त्या काळीं श्रीमंतांच्या हातीं असून कायदेही तेच करीत. व्यापारामुळें झालेला नफा तेच खात; आणि लढाईत मिळालेली लूट अथवा खंडणीही त्यांच्याच पदरीं पडे. रक्ताची तिलांजलि देण्याचा हक्क मात्र गरिबांस दिला होता. जगाच्या इतिहासांत हाच न्याय सर्वत्र दिसतो. आतां

असले कायदे नामशेष झाले आहेत. आरमारी नोकरींत जुलमानें भरती होत नाहीं. तथापि अगदीं नवशिके गुन्हेगार असतील तर त्यांना तुरुंगांत पाठविण्या-ऐवजीं त्यांची भरती करून त्यांना आरमारी शिक्षण देण्यांत येतें.

वाफेचा शोध लागल्यापासून हा सारा मनु बदलला आहे. सध्यांच्या आग-बोटींना शिडें असतात, पण तीं शोभेदाखलच म्हटलीं पाहिजेत. आगबोटींना वाऱ्याची वाट पहावी लागत नाहीं. वादळापासूनही त्यांना फारसा धोका नाहीं. समुद्राच्या पोटांतील खडकांबद्दल सावधगिरी बाळगली म्हणजे झालें. हल्लींचीं लढाऊ गलबतें तर पूर्वींच्याहून अगदींच वेगळीं झालीं आहेत. नुसता बाह्य आकार पाहिला तर तीं गलबतें म्हणण्यापेक्षां तरते किल्लेच म्हणणें अधिक शोभेल. त्यांतील तोफांची संख्या पूर्वींच्याहून हल्लीं पुष्कळ कमी झाली आहे. पण तोफ-खान्याच्या सामर्थ्याच्या मानानें पहातां जुना तोफखाना शुद्ध पोरखेळ होता. त्यांतील अगदीं लहान बोटींना टारपेडो म्हणतात. त्याहून थोड्या मोठ्या बोटी असतात त्यांचा उपयोग शत्रूंचा व्यापार मारण्याकडे करितात आणि किल्लेवाल्या बोटी असतात त्यांजकडे मुख्य लढाईचें काम असतें.

अमेरिकेंत दक्षिण आणि उत्तर संस्थानांत युद्ध झालें तेव्हां गलबतांच्या बाहेरच्या बाजूला लोखंडी गजांची जाळी बसविण्यांत आली होती. तोफेचे गोळे या गजांवर आपटून पाण्यांत पडत. यानंतर गलबतांवर लोखंडी चिलख-तांचा उपयोग होऊं लागला. उलटपक्षीं तोफाही अधिकाधिक मोठ्या होऊं लागल्या, आणि त्या भरण्याचें व डागण्याचें काम यंत्रानें होऊं लागलें. सध्यांची तोफ एवढी प्रचंड असते कीं, पांचशें माणसांनासुद्धां ती तसूभरही हालवितां येत नाहीं. पण यंत्राच्या साहाय्यानें ती भरण्याचें, डागण्याचें अथवा तिचें तोंड फिरविण्याचें काम क्षणार्धांत होतें. आतांच्या तोफा म्हणजे वज्रास्त्रेंच होत. गलबतालाही मोठ्या किल्ल्याचें स्वरूप प्राप्त झालें आहे. सध्यांची तोफ म्हणजे प्रत्यक्ष महाकालीच. तिच्या एका गोळ्यानें मोठमोठ्या गलबतांचाही चुराडा होतो. पण एवढा राक्षसी किल्लासुद्धां टारपेडोला म्हणजे आगमाशाला भितो. या यंत्राचा आकार साधारणपणें माशासारखा असून त्याच्या तोंडांत भयंकर स्फोटक द्रव्य भरलेलें असतें. या तोंडाचा स्पर्श या तरत्या किल्ल्याला होतांच तो आपल्या मूळ स्वरूपांत विलीन होतो; म्हणजे लोखंड लोखंडांत

आणि लांकूड लांकडांत प्रविष्ट होतें. आंतील ज्वालाग्राही पदार्थ असतात त्यांचें रूपांतर ज्वाला आणि धूर यांत होतें. या प्रचंड धडाक्यांत सांपडलेल्या माणसांचा मागमूसही नाहींसा होतो; आणि कोठें कांहीं अवशेष सांपडले तर ते नुसत्या खिम्याच्या रूपानें आढळतात. आगमाशांचा शोध लागल्यापासून समुद्रावरील युद्ध फार काळ टिकणें अशक्य झालें आहे. एकदोन लढायांतच सर्व युद्धाचा निकाल लागतो. तथापि या भयंकर संहारक यंत्रामुळें उभयपक्षीं जेवढी प्राणहानी होईल अशी कल्पना होती तेवढी ती होत नाहीं असें प्रत्यक्ष अनुभवानें आढळून आलें आहे.

रणांगणांवर लढाई चालली असतां उभयपक्षांच्या तोफांतून व बंदुकांतून सुटणाऱ्या गोळ्यांपैकीं थोडेसेही बरोबर लागू झाले तर दोन्ही सैन्यें थोड्याच वेळांत नामशेष होतील. त्याचप्रमाणें लढाऊ बोटींतून सुटणाऱ्या पांचशें गोळ्यांतून एक जरी बरोबर लागू पडला तरी दोन्ही आरमारें थोड्याच वेळांत जलसमाधि घेतील. तोफखान्यांत आणि बंदुकांत सुधारणा होत आहे, त्यांचा पल्ला वाढत आहे, यंत्रानें त्या जलद भरतां येतात, पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, या वाढीबरोबर निशाण चुकण्याचीही वाढ होत आहे. जुन्या काळीं एक तोफ डागावयाची तर केवढी तरी खटपट करावी लागे. तथापि आपलें लक्ष्य ती बरोबर उडविल्यावांचून रहात नसे; आणि आतां मिनिटाला दीडशें गोळे सोडणाऱ्या तोफा आणि त्यांच्या साहाय्याला सारें यंत्रशास्त्र सज्ज असतांही हवा तापविण्यावांचून त्यांच्यानें अधिक कार्य होत नाहीं. यंत्रें अल्पप्रमाणांत असणें हितावह आहे; पण त्यांचाच अतिरेक झाला म्हणजे मनुष्यांनाही तीं आपल्यासारखींच बनवितात. मनुष्याची कल्पकता नाहींशी होते, त्याची बुद्धि हीन होते. गिरण्यांतून एकच काम माणसें अहोरात्र करीत असतात. अहोरात्र धागे जोडावे, टांचण्यांचीं डोकीं बनवावीं, नाहीं तर मागाबरोबर मागें पुढें व्हावें हा उद्योग जन्मभर चालला, कीं त्या माणसांची माणुसकीच नाहींशी होते. कांहीं कारणानें तो त्यांचा उद्योग बंद पडला तर दुसरें कोणतेंही काम त्यांच्या हातून होण्यासारखें नसल्यामुळें त्यांना निव्वळ उपाशीं मरावें लागतें. याच कारणामुळें जन्मभर मास्तरकी अथवा खर्डेघांशी करणारीं माणसें अखेरीस गाढवांतलीं गाढव बनतात.

व्यापारी गलबतें आणि उतारूंचीं गलबतें यांच्या बांधणींत पुष्कळ फेर असतो. त्याचप्रमाणें लढाऊ गलबताची बांधणीही या दोहोंहून अगदीं वेगळी असते. कांहीं व्यापारी गलबतांवर लढाईचे वेळीं थोड्या तोफा ठेवण्याजोगी सोय केलेली असते. तथापि लढाऊ गलबतांच्या आकाराशीं त्यांचें कांहींच साम्य नसतें. सध्यांचीं व्यापारी गलबतें बहुधा वाफेचीं असतात. तीं अतिशय मोठीं असून त्यांना खर्चही फार लागतो. ह्यामुळें त्यांची मालकी कोणाही एकाच व्यक्तीकडे नसून कंपन्यांकडे असते. पी. आणि ओ. कंपनी सर्वांत जुनी आणि श्रीमंत आहे. तिच्या खालोखाल बी. आय्. एस्. एन्. चा नंबर लागतो. याशिवाय फ्रेंच, ऑस्ट्रियन, जर्मन, इटालियन इत्यादि सुप्रसिद्ध आगबोट कंपन्या आहेत.

ज्या वेळीं आम्ही प्रवासाला निघालों तेव्हां कांहीं कंपन्यांनीं हिंदी लोकांस नेण्याचें बंद केलें होतें. हिंदुस्थानांतला प्लेग युरोपांत जाईल अशी त्यांना भीति वाटत होती. सरकारी परवान्याशिवाय कोणाही हिंदी मनुष्याला बाह्य देशीं जातां येऊं नये, असा कायदा सरकारनें केला आहे. उद्देश हाच कीं, त्याला कोणी फसवून मजूर म्हणून नेत नाहींत किंवा गुलाम म्हणून विकीत नाहींत अशी खात्री व्हावी. आगबोटींत घेण्यापूर्वीं हा सरकारी परवाना तपासला जातो. उच्चवर्गीय हिंदी लोकांवर आजपर्यंत या कायद्याची अंमलबजावणी होत नव्हती; पण प्लेग सुरू झाल्यापासून तो पुन्हां जिवंत झाला आहे. आतां कोणीही 'नेटिव्ह' बाहेर निघाला कीं त्याची वर्दी सरकारला तावडतोब पोंचते. वरचा वर्ग आणि खालचा वर्ग असे समाजाचे भेद आपण करतों. पांढरपेशांचा वर्ग आपण सभ्य समजत असून अडाणी आणि कावाडकष्टी लोकांचा वर्ग क्षुद्र समजतों. पण सरकारच्या दृष्टींत हा भेदभाव नाहीं. 'नेटिव्ह' हा एकच वर्ग त्याला ठाऊक आहे. महाराजा, राजा, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र इत्यादि साऱ्यांचा अंतर्भाव 'नेटिव्ह' या एका वर्गांत होतो. जो कायदा झाडूवाल्याला तोच साऱ्या नेटिव्हांना भेदभावाशिवाय लावण्यांत येतो. बा इंग्रज सरकारा! तुझ्या कृपेनें कोट्यवधि नेटिव्हांपैकींच मी एक आहें, या भावनेची क्षणभर जाणीव तरी मला झाली. त्यांच्याशीं क्षणभर तरी मी एकरूप झालों. माझा हा देह कायस्थ ज्ञातींत जन्मास आल्यामुळें किती तरी लोक त्याजवर निशाणबाजी करीत होते. आम्ही आर्य हा घोष साऱ्या हिंदुस्थानांत साऱ्या जातींच्या तोंडून आतांशा

ऐकूं येऊं लागला आहे. प्रश्न इतकाच कीं, अस्सल आर्यरक्ताचा कितीसा अंश आपल्या धमन्यांत खेळत आहे. कांहीं म्हणतात कीं, आमचें सारें रक्त अस्सलच आहे. दुसरे कोणी म्हणतात कीं, फक्त त्यांत तोळा दोन तोळे मिसळ झाली आहे. फरक म्हटला तर इतकाच. आमच्या बंगाल्यांत एका बाबीबद्दल मात्र सर्वांची एकवाक्यता आहे; ती हीच कीं, आपली जात कायस्थांहून श्रेष्ठ. आतां तर इंग्रजांच्या आणि आपल्या वंशवृक्षाचें मूळ एकच असें म्हणणारेही हरीचे लाल निघाले आहेत. यामुळें नेटिव्ह या सदरांत आपण येत नाहीं असें ते म्हणतात. इंग्रज आणि ते एकमेकांचे चुलतभाऊ! मग ते नेटिव्ह कसे? इंग्रज लोकांप्रमाणेंच केवळ आमच्यावर उपकार करण्याकरितां तेही येथें आले. त्यांच्या धर्मांतही बालविवाह, बहुपत्नित्व, मूर्तिपूजा, सती, गोषा, असल्या आचरट गोष्टींना थारा नाहीं. या सर्व गोष्टी कायस्थांच्या पूर्वजांनीं येथें आणल्या! त्यांचा धर्म आणि इंग्रजांचा धर्म हे एकाच नमुन्याचे! त्यांचे पूर्वज इंग्रजांसारखेच अगदीं गोरे, पण पुढें उष्ण कटिबंधाच्या वास्तव्यामुळें त्यांची कातडी काळी पडली! सरकार म्हणतें, "तुम्ही सारे नेटिव्ह, मग त्यांत कोणी कोळशाइतका काळा असेल तर कोणी उडदाइतका असेल; एखादा काजळाशीं स्पर्धा करीत असेल! आम्हांला त्याचें काय?" अशा स्थितींत तुम्ही इंग्रजी पोषाख केला तरी काय उपयोग? विलायती टोप्या तुमच्या कामीं यावयाच्या नाहींत. हिंदूंशीं फारकत करून इंग्रजांत तुम्ही मिसळूं पहाल तर दोन तडाखे अधिकच खाण्याची तुम्हांवर पाळी येईल. हे इंग्रज सरकारा, तुला प्रणाम असोत! सुदैवाची कृपा तुजवर आहेच ती आणखीही वृद्धिंगत होवो! आम्ही आमच्या धोतरावरच संतुष्ट राहूं, अनवाणी सारा देश आम्ही आनंदानें तुडवूं, आणि तुझ्या कृपेनें मिळणारा डाळभात हाताच्या बोटांनीं भुरकून आम्ही सुखी होऊं! काय ही आमची दशा! अध्यीकच्या गांवठी साहेबांच्या नादीं लागून त्यांच्या बाह्य झकपकीला आम्ही भुललों! 'अरे, हा नेटिव्ह पोषाख टाकून द्या. या नेटिव्ह चालीरीतींचा त्याग करा म्हणजे हे इंग्रज लोक तुम्हांला खांद्यावर घेऊन नाचतील' असें सांगणारे उपदेशकही आम्हांस भेटले; आणि त्याप्रमाणें वागण्याची थोडीशी तयारीही आम्ही चालविली होती. पण इतक्यांत काय चमत्कार झाला कीं, इंग्रजांचा आसूड खाडकन् वाजला. बुटाच्या लथेचा अस्पष्ट ध्वनीही कर्णगोचर झाला. मग काय विचारतां! जिकडे

तिकडे पळापळीला सुरवात झाली. मग मी 'नेटिव्ह' असें प्रत्येक जण म्हणूं लागला. इंग्रजांच्या अंध अनुकरणाची ही दशा झाली. इंग्रजी बुटांच्या लाथांनीं आमच्या डोक्यांतलें खूळ बाहेर काढलें. इंग्रज सरकारकी जय! त्यांचें सिंहासन अक्षय्य राहो! माझ्या डोक्यांत जें अल्पस्वल्प वेड इतक्याउपरही शिल्लक राहिलें होतें तें अमेरिकेंत साफ धुवून निघालें. दाढी वाढल्यामुळें मला त्रास होऊं लागला, तेव्हां एका न्हाव्याच्या दुकानांत मी डोकावलों; पण माझी मुद्रा पाहतांच नापित महाराज कर्कशपणें ओरडून म्हणाले, 'तुझ्यासारख्या बुरणुशी तोंडाकरितां हें दुकान नाहीं.' माझ्या भगव्या पोषाखाला आणि विचित्र रुमा-लाला हा बेटा कदाचित् बुजला असेल, असें मला वाटलें. तेव्हां आपण इंग्रजी पद्धतीचा पोषाख करावा असें माझ्या मनांत आलें. मी तसें करण्याच्या बेतांत असतां सुदैवानें एक अमेरिकन गृहस्थ मला भेटला. तो म्हणाला, "तुमचा पोषाख आहे तोच बरा आहे. त्यामुळें तुमची जात अमुक असा निश्चय तरी करतां येतो. त्यामुळें कोणाची फसगत होत नाहीं. पण युरोपीय पोषाख तुम्ही चढविला कीं सारें गांव तुमच्यावर तुटून पडेल." यानंतर दुसऱ्या दोन तीन दुकानांत मी डोकावलों, पण पहिलाच अनुभव साऱ्या ठिकाणीं आला. अखेरीस हातानें दाढी करण्यास शिकण्याचें मी ठरविलें. एकदां भुकेनें काहूर उठविलें असतां एका दुकानांत शिरून कांहीं पदार्थ मी मागविला. तेव्हां तेथला नोकर मला म्हणाला, 'छे, आमच्या दुकानांत तो पदार्थच नाहीं.' मी म्हणालों, 'समोरच्या बरणींत तर तो मला दिसत आहे.' नोकर म्हणाला, 'आतां खरें बोलावयाचें तर या दुकानांत तुम्हांस बसूं देतां येत नाहीं. तुम्हांला येथें कोणीं खातांना पाहिलें तर आमचें दुकान विटाळलें असें तो समजेल. मग आमच्या दुकानांत जो कोणी भोजन करील त्यावर ग्रामण्य होईल.' हिंदुस्थान आणि अमेरिका यांत असलेलें हें साम्य पाहून त्यांतल्या त्यांतच मला समाधान झालें. आमच्याच सारखा जातिभेद येथेंही आहे! अरे नेटिव्हांनो! तुमचें तें आर्य-रक्ताचें भांडण आतां बाजूला राहूं द्या. तुम्हां गुलामांना आपल्या वंशशुद्धीचा एवढा अभिमान कशाला पाहिजे? आम्ही शुद्ध आणि उच्च असा खोटा अभिमान जे बाळगतात, त्यांना जगांत सर्वत्र कमी मानतात. हा मुद्दा आतां तरी तुमच्या ध्यानीं येऊं द्या.

शिडांनीं चालणाऱ्या तारवांपेक्षां आगबोटी पुष्कळच मोठ्या असतात. यांत पहिला आणि दुसरा वर्ग यांच्या खोल्या असून त्यांच्या आजूबाजूस मोकळी जागा सोडलेली असते. बोटीच्या एका टोंकाला खलाशी आणि नोकर यांच्या राहण्याची जागा असते. तिसऱ्या वर्गाचा उपयोग बहुधा गरीब लोक मात्र करतात. तिसऱ्या वर्गाची जागा फार लहान आणि गैरसोईची असते. इंग्लंड आणि हिंदुस्थान यांत जा ये करणाऱ्या बोटींत तिसरा वर्ग म्हणून राखलेली जागा नसते; तथापि आगबोटीच्या वरच्या मजल्यावर अशा लोकांची थोडी-बहुत सोय करतात. पावसाळी हवेंत या उतारूंचे फार हाल होतात. त्याच-प्रमाणें बंदरोबंदरीं मालाची चढउतार होत असतांही या उतारूंना बराच त्रास सोसावा लागतो. पण हवेंत उष्णता अधिक असली म्हणजे रात्रीच्या वेळीं या जाग्याचा उपयोग पहिल्या आणि दुसऱ्या वर्गाचे उतारूच अधिक करतात. जुन्या पद्धतीच्या बोटींत दुसरा वर्ग हवेच्या बाबतींत फारच वाईट असतो. अलीकडे जर्मन कंपन्यांनीं बांधलेल्या नव्या बोटींत दुसरा वर्गही उत्तम असतो. आगबोटी पुष्कळ अंशीं लोखंडी पत्र्याच्या बांधलेल्या असतात; तथापि उतारूंच्या खोल्या लांकडी असतात. या खोल्यांना जें रंगरोगण करतात तेवढ्यालाच सुमारें पावणें चारशें रुपये खर्च लागतो. खोलीच्या दोन्ही बाजूंना मिळून झोंपाळ्यासारखे चार बिछाने टांगलेले असतात. हल्लीं आगबोटींचा व्यवहार बहुतांशीं इंग्रज कंपन्यांच्याच हातीं आहे. उतारूंतही त्यांचाच भरणा अधिक असतो. यामुळें जर्मन, ऑस्ट्रियन वगैरे कंपन्यांच्या बोटींतही खाण्यापिण्याचे पदार्थ इंग्रजी नमुन्याचेच करतात. आपल्या इकडे निरनिराळ्या प्रांतीं ज्याप्रमाणें निरनिराळ्या प्रकारचा स्वयंपाक असतो, तोच प्रकार इकडेही आहे. तथापि उतारूंत इंग्रजांचा भरणा अधिक असल्यामुळें इंग्रजी पद्धतच स्वीकारणें भाग असतें.

गलबतांत तांडेल हा सर्वांत वरिष्ठ अधिकारी असतो. जुन्या काळीं तर हा तांडेल म्हणजे जवळजवळ सर्वसत्ताधारी बादशहाच होता. गलबतावरील तंट्याबखेड्यांचे निवाडे करून अपराध्यांना वाटेल ती शिक्षा तो देत असे. कोणी चांचे लोक सांपडल्यास त्यांना तो फांशीही देत असे. आतां एवढी सत्ता त्याला उरली नाहीं, तरी एकंदरीनें त्याचा शब्द म्हणजे कायदा अशी स्थिति अद्यापिही

आहे. याशिवाय चार पांच इंजिनीयर आणि चार पांच सुकाणे ही बोटीवरील अंमलदारी वर्गाची मंडळी होय. ही सारी युरोपियनच असते. बाकी उरलेले नोकरचाकर, खलाशी, कोळसेवाले इत्यादि लोक हिंदी मुसलमान असतात. हिंदु खलाशी फार थोडे दृष्टीस पडतात. आचारी हे बहुधा काळे ख्रिस्ती असतात. यांशिवाय कांहीं झाडूही असतात. मुसलमान खलाशी ख्रिस्ती स्वयंपाक्याच्या हातचें अन्न खात नाहींत. त्याचप्रमाणें बोटीवरच्या अन्नांत पुष्कळ वेळां डुकराच्या मांसाचाही उपयोग केलेला असतो. हें अन्नही त्यांना चालावयाचें नाहीं. यासाठीं आपली व्यवस्था ते अगदीं वेगळी करितात. तथापि त्यांच्यांतही कांहीं 'सुधारक' आतां दिसूं लागले आहेत. ते कसलाच विधिनिषेध बाळगीत नाहींत. आमच्या बोटीवर कांहीं हिंदु उतारू होते. ते आपलें अन्न स्वतःच शिजवून खात. स्वयंपाकाच्या प्रत्येक खोलींत दोन दोन पंप लाविलेले असतात. एकांतून गोडें आणि दुसऱ्यांतून खारें पाणी येतें. ज्या हिंदूंना नळाचें पाणी चालतें, त्यांना विलायतचा प्रवास अगदीं सोवळ्यानें करितां येईल. त्यांच्या अन्नपाण्याला कोणाचा स्पर्शसुद्धां होण्याचें कारण नाहीं. स्वयंपाकासाठीं स्वतंत्र खोली असते, आणि पिण्याच्या पाण्याची नळीही असते. बोटीवर डाळ, तांदूळ, दूध, तूप, भाजीपाला इत्यादि सारे पदार्थ मिळतात. विशेषतः ज्या बोटींवर हिंदी खलाशी असतात, तेथें या पदार्थांचा सांठा अवश्य ठेवावा लागतो. मिळत नाहीं अशी वस्तु एकच–पैसा. तो तुमच्याजवळ असला कीं आपलीं जुनीं मतें उराशीं घट्ट बाळगूनसुद्धां साऱ्या जगाचा प्रवास तुम्हांस करितां येईल. कलकत्त्याहून युरोपास जाणाऱ्या साऱ्या बोटींत बहुधा बंगाली नोकरच असतात. ही एक वेगळी जातच बनूं लागली आहे. त्यांची वेगळी भाषासुद्धां बनत आहे. कप्तानाला ते बारीवाला म्हणतात. दुय्यम अंमलदाराला मालिम म्हणतात. डोल, शीड हीं नांवें आहेतच. आर्या म्हणजे शीड खालीं उतरणें. हावीस म्हणजे नांगर उठवणें इत्यादि.

लास्कर आणि आगवाले यांचा प्रत्येकीं एकेक मुख्य अंमलदार असतो. याला सारंग म्हणतात. एका सारंगाच्या हाताखालीं दोन तीन तांडेल असतात आणि त्यानंतर खलाशी आणि आगवाले येतात.

वाढप्यांना खानसामा म्हणतात आणि त्यांचा मुख्य तो बटलर. या साऱ्यांच्यावर नोकरांचा नाईक म्हणून एक युरोपियन असतो, त्याला स्टीवर्ड म्हणतात.

लास्कर लोक आगबोटीची झाडलोट करतात, अवजारें गुंडाळतात व सोडतात; त्याचप्रमाणें धाकट्या बोटी समुद्रांत लोटण्याचा प्रसंग आला तर तें कामही तेच करितात. सारंग व तांडेल हे त्यांच्या कामावर देखरेख करीत असून प्रसंगीं त्यांना मदतही करितात. आगवाले कोळसा मारण्याचें काम करतात; त्याचप्रमाणें इंजन स्वच्छ ठेवण्याचें कामही त्यांचेंच आहे. सारें इंजन घासून पुसून लखलखीत ठेवणें हें काम वाटतें तेवढें सोपें नाहीं. सारंग हे बहुधा कलकत्त्याचे निवासी असून ते बंगाली भाषा बोलतात. त्यांना लिहितां वाचतां येतें, आणि त्यांची चालचलणूकही सभ्यपणाची असते. त्याचप्रमाणें चालीपुरतें इंग्रजीही ते बोलतात. आमच्या बोटीवरील सारंगाचा तेरा वर्षांचा एक मुलगा बोटीवरील कप्तानाचा नोकर आहे. येथें बंगाली लास्कर, नोकरचाकर आणि छोकरे लोक कामावर असलेले पाहून आमच्या लोकांबद्दलची माझी निराशा बरीच कमी झाली. ही सारी मंडळी बरीच धंष्टपुष्ट दिसत असलेली पाहून मला आनंद झाला. त्यांचें पौरुष हळूहळू जागें होऊं लागलें आहे. आज्ञाधारकतेबरोबर निर्भयपणाही त्यांच्यांत दिसतो. कलकत्त्यांतील 'नेटिव्ह' नोकरांच्या अंगीं पदोपदीं आढळणारा हांजीखोरपणा येथें औषधालासुद्धां मिळावयाचा नाहीं. बोटीवरचे झाडूवालेसुद्धां मला बेदरकार दिसले. केवढी ही उलथापालथ !

हिंदी लास्कर आपापलीं कामें उत्तम रीतीनें आणि विनबोभाट पार पाडीत असतात आणि इतकें करूनही गोऱ्या खलाशांच्या चतुर्थांश पगारावर ते खूष असतात. यामुळें इंग्लंडांत मोठी चळवळ चालू झाली आहे. लास्कर लोक युरोपियन खलाशांपेक्षां आपापल्या कामांत अधिक तरबेज असल्यामुळें त्यांच्याविरुद्ध कांहीं महत्त्वाचा आक्षेप घेतां येत नाहीं. यामुळें लास्कर भित्रे असतात असा सामान्य आरोप त्यांजवर करण्यांत येतो; पण प्रत्यक्ष अनुभवानें हा आरोप अगदीं फोल ठरला आहे. धोक्याच्या प्रसंगीं युरोपियन खलाशी भीति घालविण्यासाठीं सडकून दारू पितात, आणि मग कोणत्याही कामाला ते निरुपयोगी होतात. लास्कर कधींही दारू पीत नाहींत. यामुळें ते कधीं बेभानही होत नाहींत; आणि वादळासारख्या धोक्याच्या वेळींही आपापलीं कामें ते अगदीं शांतपणें करीत असतात. रणांगणावर हिंदी सैनिक पळत सुटला असा एकही दाखला नाहीं. त्यांना चांगला पुढारी मात्र पाहिजे. जनरल स्ट्रॉंग या नांवाचा एक सेना-

पति बंडाच्या वेळीं हिंदुस्थानांत होता. त्या वेळच्या स्वानुभवाच्या अनेक गोष्टी तो सांगत असे. 'बंडखोर शिपायांजवळ पुष्कळ तोफा आणि दारूगोळा असतां आणि लढाईच्या कामांत ते अनुभवी असतांही त्यांचा एवढा मोठा पराभव कां झाला,' असा प्रश्न मी त्याला केला तेव्हां तो म्हणाला, 'त्यांचे पुढारी चांगले नव्हते. स्वतः मागें राहून ते नुसते तोडानें मात्र उत्तेजन देत होते. वरिष्ठ अंमलदार स्वतः पुढें चालत असल्याशिवाय शिपायांना खरें उत्तेजन येत नाहीं; आणि मग थोड्याशा कारणानेंही ते कच खातात. जमिनीवर काय किंवा समुद्रावर काय, मुख्य अंमलदार हा शिपायांचा जीव असतो. स्वतःचें डोकें देण्यास अंमलदार तयार असल्याशिवाय शिपाई कधींही पुढें सरत नाहींत. आपल्या कर्तव्यासाठीं मान तोडून ठेवण्याची ज्याची तयारी असेल, तोच पुढारी होऊं शकतो.' हाच नियम सर्वत्र सारखा लागू पडतो. आमच्या पुढाऱ्यांना पोटाचें पाणी हालविल्याशिवाय पुढारीपण मात्र पाहिजे. यामुळें आपली चळवळ कितीही मोठी झाली तरी अखेरीस तिचा परिणाम शून्य हाच. हुकूम करणार सारे आणि पाळणारा कोणींच नाहीं अशी आमची स्थिति आहे.

आम्ही आर्य म्हणून केवढ्याही अभिमानाचें प्रदर्शन तुम्हीं केलें आणि हिंदुस्थानच्या गत-वैभवाच्या कितीही गोष्टी तुम्ही अहोरात्र करीत राहिलां तरी तुम्ही खरोखरच जिवंत तरी आहां काय ? आपली जात श्रेष्ठ म्हणून अभिमान बाळगणारे श्रेष्ठ जातीचे लोकच आज मृत्पिंड बनले आहेत. मिसर देशांत दहा हजार वर्षांचीं प्रेतें जशीं असतात तसेच तुम्हीही प्रेतवत् आहां. तीं प्रेतें एका जागीं पडलेलीं असतात आणि तुम्ही हालचाल करितां इतकाच काय तो फरक. हलक्या जातीचे म्हणून ज्या लोकांचा तिरस्कार आजपर्यंत तुम्ही करीत आलां आहां, त्यांच्यांतच आज थोडा बहुत तरी जिवंतपणा दिसतो. खरोखर तेच आज वरिष्ठ जातीचे असून तुम्ही हलक्या जातीचे आहां. घरांत अगदीं अव्वल पद्धतीचें भपकेबाज सामान भरून त्याला तुम्ही एकाद्या पदार्थसंग्रहालयाची शोभा आणतां. पदार्थसंग्रहालयांत जसा जुन्यापान्या निर्जीव वस्तूंचा संग्रह असतो, तोच प्रकार तुमच्याही घरांत असतो. तुमचे रीतिरिवाज आणि तुमची चालचलणूक कोणी तिऱ्हाइतानें पाहिली तर कोठल्या तरी प्राचीन युगांत आपण आहों असें त्याला वाटेल. या मायावी जगांत तुम्ही खरोखरच भ्रमरूप आहां. खखरखीत

वाळूच्या मैदानांत जसा पाण्याचा खोटा देखावा दिसतो, त्याचप्रमाणें डोळ्यांना तुम्ही दिसत असतांही तुम्हांला खरें अस्तित्व नाहीं. हिंदुस्थानांतील वरिष्ठ वर्गांची स्थिति आज अशी आहे. तुम्ही वर्तमानकाळ नसून भूतकाळ आहां. भूतकाळच्या सान्या प्रकारांची गोळाबेरीज तुमच्या ठिकाणीं आहे. तुम्ही वर्तमानकाळांत दिसतां हा पहाणाराच्या डोळ्यांचा भ्रम असतो. अपचनामुळें स्वप्नें पडतात, त्याचप्रमाणें तुम्हीही स्वप्नरूप अहां. अहो स्वप्नांतल्या माणसांनों! तुम्ही अजून अदृश्य कां होत नाहीं? तुमच्या हाडकोळ्या वोटांत कांहीं अमूल्य रत्नांच्या आंगठ्या आहेत. तुमच्या वाडवडिलांचा तो ठेवा आहे. त्याचप्रमाणें दुसऱ्याही कांहीं पेट्या त्यांनीं रत्नांनीं भरून ठेविल्या आहेत. मरतां मरतां तुम्हीं त्यांना मिठ्या मारून बसलां आहांत. अद्यापि त्यांना तुम्ही कोणालाही स्पर्श करूं दिलेला नाहीं; पण आतां ही मिठी सोडून तुमच्या पुढच्या पिढीला हा सारा खजिना देऊन टाका. जुनें राज्य जाऊन आतां इंग्रजांचें राज्य झालें आहे. शिक्षणाचा प्रसार सर्वत्र होत आहे. तेव्हां हा ठेवा दुसऱ्याच्या स्वाधीन करण्याची वेळ हीच आहे. इतके दिवस अशी वेळ लाभली नव्हती. आतां तुम्ही शून्यांत लुप्त होऊन नव्या हिंदुस्थानाचा उदय होण्यास अवकाश करून दिला पाहिजे. हातीं नांगर धरणाऱ्या शेतकऱ्यांच्या, कोळ्यामाळ्यांच्या आणि म्हारापोरांच्या झोंपड्यांतून नवा हिंदुस्थान जन्म घेणार आहे. वाण्याउदम्यांच्या दुकानांतून तो वावरणार आहे. बाजारांतून आणि कारखान्यांतून तो बाहेर पडणार आहे. गगनचुंबित वृक्षराजींतून आणि अरण्यांतून निघणारा त्याचा आवाज गिरिकपाटांतून दुमदुमणारा आहे. या बिचाऱ्या गरीब दुबळ्या लोकांनीं आज हजारों वर्षे जुलूम सोसला आहे; आणि तसें करतांना हूं कीं चूंसुद्धां केलेलें नाहीं. यामुळें त्यांच्या अंगीं अफाट धैर्य आलेलें आहे. जन्मांचे जन्म त्यांनीं दुःखाकष्टांत काढले, यामुळें त्यांचा चिवटपणा अद्यापिही शाबीत आहे. मूठभर बाजरीची भाकरी खाऊन सारें जग ते हालवून सोडतील. एक चतकोर भाकरी मिळाली तरी त्यांच्या क्रियाशक्तीला वावरण्यास सारें जग अपुरें पडेल. अहिरावणाच्या रक्ताच्या एकेका थेंबांतून ज्याप्रमाणें प्रत्येकीं एक अहिरावण उत्पन्न होत होता, त्याचप्रमाणें त्यांच्या क्रियाशक्तीच्या एकेका लहरीपासून एकेक शक्ति उत्पन्न होईल. शुद्ध जीवनांत जें सामर्थ्य असतें तेंही त्यांजपाशीं आहे. हें सामर्थ्य जगांत सर्वत्र

आढळत नाहीं. इतकी शांतवृत्ति, इतकें समाधान, इतकें प्रेम, इतकी कर्मप्रवणता आणि संकटांतही अनुपम धैर्य एवढ्या गुणांचा एकत्र सांठा जगांत दुसऱ्या कोठें तरी तुम्हांस आढळेल काय? हिंदुस्थानांतील तेल्यातांबोळ्यांच्या अंगीं हे गुण आहेत. तुम्ही वरिष्ठ वर्ग मात्र मृत्पिंड बनलां आहां. तुम्ही म्हणजे प्राचीन आर्यावर्ताचा नुसता सांगाडा; आणि सामान्य जनता ही जुन्या ठेव्याची आतां वारसदार बनली आहे. आतां होईल तितक्या लवकर त्या रत्नभांडाराच्या किल्ल्या त्यांच्या स्वाधीन करा. तुम्ही स्वतः आतां हवेंत वितळून जा. तुमचीं तोंडें वंद झालीं कीं, उदयोन्मुख हिंदुस्थानाची पहिली आरोळी तुमच्या कानीं येईल. लक्षावधि सिंहनाद एकत्र झाले आहेत अशा स्वरूपाची ती आरोळी असेल. तिचा नाद साऱ्या विश्वांत दुमदुमून राहील. 'वाः! गुरूकी फत्तेह!'

आमची बोट आतां बंगालच्या उपसागरांत आहे. येथें पाण्याला अतिशय खोली आहे असें म्हणतात. सुंदरवन हें बंगाल प्रांताचें अखेरचें टोंक आहे. येथें पूर्वी पुष्कळ गांवें आणि खेडींपाडीं होतीं असें म्हणतात. पण गंगाप्रवाहानें हा उंचवटा धुवून जाऊन तेथें आतां दलदल झाली आहे असें कित्येकांचें मत आहे. तथापि याविरुद्ध बोलणारेही कांहीं पंडित आहेत. तें कसेंही असलें तथापि सुंदरवन आणि बंगालच्या उपसागराचा उत्तर भाग या स्थळांनीं इतिहासांत नांव केलें आहे हें मात्र खरें. पोर्तुगीज चांचे येथेंच एकत्र होऊन खलबतें करीत. सुंदरवनाचा प्रदेश ताब्यांत घेण्याची खटपट आकारानच्या राजांनीं केली होती; आणि याच ठिकाणीं मोंगलशाहीच्या प्रतिनिधीनें पोर्तुगीज चांच्यांवर मात करण्याचा यत्न केला होता. ख्रिस्ती, मोगल, मग आणि बंगाली यांच्या आपसांतील लढायांचें रणांगण हेंच.

बंगालचा उपसागर नेहमींच थोडाबहुत तुफानी असतो आणि आतां तर काय बोलूनचालून पावसाळाच! आमची बोट एकसारखी झुलत आहे. उपसागराच्या मर्यादेला आतां कोठें आरंभ झाला आहे, आणि आतांच बोट इतकी हालूं लागली आहे; मग पुढें काय होणार देव जाणे! यापुढें मद्रास इलाख्याचा किनारा लागणार. नुसत्या भूमींत काय सामर्थ्य आहे? सारी कर्तबगारी माणसाची आहे. एकादें रखरखीत अरण्य योग्य माणसाच्या हातीं सांपडलें तर तो त्याचें इंद्रभुवन बनवितो. जुन्या काळीं मद्रासला चिमणापट्टण आणि मद्रासपट्टण अशीं

नांवें होतीं. हीं नुसतीं खेडीं होतीं. चंद्रगिरीच्या राजानें तीं एका व्यापारी मंडळाला विकलीं. त्या काळीं इंग्रजी व्यापाराचें मुख्य मथक जावा बेटांत होतें; आणि त्यांच्या आशियांतील व्यापाराचें केंद्र बांटम नांवाच्या स्थळीं होतें. मद्रास येथील वखार आणि इतर वखारींचा कारभार बांटम येथून चाले. तें बांटम आतां कोठें गेलें ? त्याचें नांव तरी ऐकूं येतें काय ? आणि तेंच मद्रासचें पहा. पूर्वीच्या त्या अल्प खेड्यांची वाढ आतां कोणीकडच्या कोणीकडे झाली आहे ! कर्त्या पुरुषावर नशिबाची नेहमींच कृपा असते, हें म्हणणें मात्र कोणींही सर्वथैव खरें मानूं नये. नशिबा आधीं ईश्वराची कृपा पाहिजे. आतां कर्तृत्ववानाच्या पाठीमागें ती जगन्माता नेहमीं उभी असते, हेंही मी कबूल करतों. दक्षिण हिंदुस्थानांत मद्रास हें एक नमुनेदार ठिकाण आहे. दक्षिण हिंदुस्थानाचें सामान्य स्वरूप या एकाच शहरीं आढळतें. कलकत्त्याला जगन्नाथाच्या घाटावरही या स्वरूपाची कल्पना केव्हां केव्हां येते हेंही खोटें नाहीं. येथें ओरिसांतील ब्राह्मण आढळतात. बहुतेक डोक्याचा गोटा आणि मध्येंच शेंडीचा झुपका, कपाळावर नानारंगांचे आणि आकारांचे पट्टे आणि ज्यांत पायांच्या बोटांचीं टोकें मात्र सरासरी राहूं शकतील अशीं पादत्राणें, असा देखावा पाहिला म्हणजे मद्रास प्रांताची आठवण आपोआप होते. तपकिरीनें भरलेलें नाक आणि गंधाचे शिक्के या गोष्टी या प्रांतांतील लोकांच्या विशिष्ट खुणा आहेत. गुजराथी ब्राह्मण, काळाकुट्ट देशस्थ ब्राह्मण, गोरापान घाऱ्या डोळ्यांचा कोंकणस्थ हे सारे ब्राह्मण आहेत, आणि पोषाखांतही त्यांच्यांत बहुधा सारखेपणा आहे. त्यांना दक्षिणी ब्राह्मण अशी सामान्य संज्ञा आहे. तथापि दक्षिणी ब्राह्मणाचा खरा नमुना म्हणजे मद्रासी ब्राह्मणच होय. रामानुजपंथाच्या विशिष्ट चिन्हानें त्यांचीं मस्तकें भरपूर रंगविलेलीं असतात. या पंथाची फारशी माहिती ज्याला नाहीं, त्याला तर हीं चिन्हें पूज्य दिसण्याऐवजीं भेसुर दिसतात. उत्तरहिंदुस्थानांतील रामानंदपंथाचे अनुयायीही अशींच चिन्हें धारण करितात. बंगाल्यांतील वैष्णवपंथी शरिरावर इतके शिक्के मारतात कीं ते पाहून एकाद्याला भीतीच वाटेल; पण रामानंदवाल्यांनीं त्यांनाही मागें टाकलें आहे. दक्षिणप्रांत म्हटला कीं कांहीं विशिष्ट गोष्टी आठवा-वयाच्याच. तेलगू, तामीळ, मल्याळी या भाषा कीं तपभर ऐकूनसुद्धां ज्यांचें अक्षरही समजावयाचें नाहीं व तो सारभाताचा ढीग हटकून आठवावयाचाच.

चिंच, मिरीं आणि मिरची यांचें वैपुल्य सारांत इतकें असतें कीं, प्रत्येक घासा-बरोबर त्रिभुवन आठवतें. एकेक घास म्हणजे थेट काळजाला भिडणारा बाणच तो! त्यांतच कांहीं तीक्ष्ण वासाच्या पदार्थांची फोडणीही असावयाची. याशिवाय ताकभाताचा ढीग वेगळाच. शरिरावर वाहणाऱ्या तेलाच्या ओघळांचें स्मरण व्हावयाचेंच. त्याच तेलांत हे लोक मासेही तळतात. या वस्तूंचें स्मरण न झालें तर तो दक्षिण देश कसला?

तथापि दक्षिण प्रांतानें एक मोठी कामगिरी केली आहे, हेंही ध्यानांत ठेवलें पाहिजे. मुसलमानी साम्राज्याच्या भर तडाक्यांत आणि त्याच्या पूर्वींही हिंदु धर्म त्याच प्रांतानें जिवंत राखिला. त्याच प्रांतानें श्रीमच्छंकराचार्य निर्माण केले. त्याच प्रांतांत रामानुज जन्मले, आणि मध्वमुनींची जन्मभूमीसुद्धां हीच. सध्याच्या हिंदु धर्माचे प्रणेते हेच. बंगाल्यांतील चैतन्य पंथ म्हणजे माध्वांची एक अल्पशी शाखाच होय. कबीर, दादु, नानक इत्यादि पुरुषांनीं उत्तरेंत धर्म-जागृति केली. तथापि हा शांकरमताचा प्रतिध्वनि मात्र आहे. रामानुजांचे अनुयायी अयोध्या वगैरे प्रांतांत पुष्कळ आहेत. दक्षिणेंतील ब्राह्मण उत्तरेकडील ब्राह्मणांना खरे ब्राह्मण समजतच नाहींत. त्यांना ते शिष्य करावयाचे नाहींत किंवा संन्यासदीक्षाही द्यावयाचे नाहींत. हिंदुस्थानांतील नानाविध पंथांचे मठ पाहिले तर त्यांत मद्र-प्रांतस्थांचाच भरणा अधिक आढळतो. उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानांनीं धुमाकूळ माजविला तेव्हां तिकडील ब्राह्मण अरण्यांत आणि गिरिकंदरांत लपून राहिले. घरेंदारें आणि बायकापोरेंही त्यांनीं सोडलीं. मुसलमानांच्या वावटळीपुढें त्यांचा निभाव लागला नाहीं. पण याच वेळीं दक्षिणेंत विजयानगरचें हिंदु साम्राज्य अस्तित्वांत आलें. सायणाचार्यांचा जन्मही दक्षिणेंत झाला. आपल्या बाहुबलानें मुसलमानांची लाट परतवून बुक्क वंशाची गादी त्यांनीं जिवंत ठेवली. विजया-नगरच्या राज्याची सुसंघटना त्यांनींच केली. यामुळेंच दक्षिण प्रांतानें शांततेचे आणि भरभराटीचे दिवस पाहिले. त्यांचें बुद्धिवैभव वर्णनातीत आहे. ती अति-मानुषी बुद्धि म्हटली पाहिजे. अशा रीतीनें साम्राज्यें हांकीत असतांही त्यांनीं वेदभाष्य लिहिलें. अशा रीतीनें झालेल्या धर्मकार्यांतून मुनि विद्यारण्य निर्माण झाले. वेदान्तावर त्यांनीं लिहिलेला पंचदशी हा ग्रंथ सुप्रसिद्धच आहे. हे मुनिही येथेंच जन्मले. मद्रास इलाखा म्हणजे मुख्यतः तामिळ वंशाची जन्मभूमि. या

वंशाची संस्कृति अत्यंत प्राचीन आहे. येथूनच कांहीं लोक प्राचीन काळीं युफ्रे-टिस नदीच्या तीरीं गेले होते. ज्योतिष, धर्म, नीति इत्यादि शास्त्रांचें जें ज्ञान त्यांनीं परकीयांना दिलें, त्यांतूनच असीरियन आणि बाबिलोनियन संस्कृती निर्माण झाल्या. त्यांच्याच दंतकथांतून ख्रिस्ती बायबलालाही आधार मिळाला. यांच्यां-तीलच एक शाखा मलबार किनाऱ्यावरून बाह्य देशीं गेली, आणि तिनें इजिप्शि-यन संस्कृतीला जन्म दिला. एकंदर आर्यावर्तावर या दाक्षिणात्यांनीं महदुपकार करून ठेविले आहेत. वीरशैव आणि वीरवैष्णव यांचीं प्रचंड देवालयें त्यांच्या महाविजयाची साक्ष अद्यापिही देत आहेत. हिंदुस्थानांतील वैष्णव पंथाचा आद्य-प्रवर्तक एक तामिळ अंत्यज होता. अद्यापिही धर्मतत्त्वांचा अभ्यास दक्षिणेकडे जेवढा होतो, तेवढा इतर प्रांतीं होत नाहीं. त्यांची धर्म-जिज्ञासा आजमितीलाहि पूर्वींसारखीच कायम आहे.

२४ जूनच्या रात्रीं आमची बोट मद्रासला पोंचली. मी सकाळीं उठून पहातों तों मद्रास बंदरांत ती बरवा करून असलेली दिसली. बंदर अगदीं शांत होतें, तथापि समुद्र बराच खवळलेला दिसत होता. कोठें कोठें लाटा खडकावर आप-टून पंधरावीस फुटांच्या उंच उड्या मारीत होत्या. आमच्या समोर मद्रासेंतील प्रसिद्ध 'स्ट्रँड' रस्ता दिसत होता. सकाळ झाल्यावर थोड्या वेळानें दोन युरोपियन पोलीस इन्स्पेक्टर, एक मद्रासी जमादार आणि दहा बारा शिपाई अशी टोळी आमच्या बोटीवर आली. कोणाही 'नेटिव्हा 'नें बंदरावर उतरूं नये असा हुकूम पोलिसनें फर्मावला; तथापि युरोपियनांस उतरण्यास हरकत नव्हती. 'नेटिव्ह' कोणीही असला तरी आपल्याबरोबर प्लेगचे जंतू तो वाळ-गणारच. तथापि माझ्या मद्रासी स्नेह्यांनीं माझ्यासाठीं खास परवानगी देण्याचा अर्ज केला होता. हळूहळू माझे मद्रासी स्नेही लहान लहान पडावांतून बोटी-भोंवतीं गोळा होऊं लागले. बोटीवर येण्याची परवानगी त्यांना नसल्यामुळें बोटींतूनच त्यांच्याशीं मी बोलूं लागलों. बहुतेक सारी मित्रमंडळी गोळा झाली होती. आंबे, केळीं, नारळ अशीं फळें त्यांनीं टोपल्या भर भरून आणलीं होतीं. तसेंच कोणी दहींभात, कोणी पेढे बरफी, तर दुसऱ्या कोणी तिखट मिठाचे पदार्थ आणले होते. पडावांची संख्या हळूहळू वाढत चालली. त्यांत आतां बायका-मुलेंही येऊं लागलीं. माझा इंग्रज मित्र चॅमियर हाही मला आढळला. मद्रासेंत

बॅरिस्टरी करण्यासाठीं तो आला होता. रामकृष्णानंद आणि निर्भयानंद यांच्या मनांतून बोटीवर येऊन एक दिवस माझ्याबरोबर रहावें असें फार होतें; तथापि त्यांचें निवारण मी केलें. बोटींतून उतरण्याची परवानगी मला मिळत नाहीं, अशी बातमी गांवांत पसरतांच आणखी पडाव जमा होऊं लागले. बोटीच्या कठड्याला टेंकून मी पुष्कळ वेळ उभा होतों. अखेरीस मला अतिशय थकवा आला, तेव्हां सर्व मित्रांचा निरोप घेऊन मी आपल्या खोलींत गेलों. 'ब्रह्मवादी' या मासिकाच्या धोरणाबद्दल आणि मद्रासेंतील एकंदर कार्याबद्दल माझ्याशीं चर्चा करण्याचें माझ्या मित्रांच्या मनांत फार होतें; तथापि तें साधलें नाहीं. तेवढ्याच करितां एक मित्र तर माझ्याबरोबर कोलंबोस येण्यासही सिद्ध झाला होता; पण अखेरीस साराच बेत फसला. संध्याकाळीं आमची बोट बंदर सोडून निघाली. बोट चालू होतांच हजारों माणसांचा कोलाहल माझ्या कानीं आला. खोलीच्या खिडकींतून मीं बाहेर डोकावलें, तेव्हां बंदराचा धक्का माणसांनीं फुलून गेला असल्याचें मला आढळून आलें.

सिलोनला पोंचण्यास आम्हांस चार दिवस लागले. कलकत्ता सोडला तेव्हांच समुद्र खवळलेला दिसत होता. आतां तर लाटा अधिकच मोठाल्या आणि जोर-दार येऊं लागल्या. बोट अतिशय हालूं लागली. बोट लागल्यानें पुष्कळ उतारू हैराण होऊं लागले. ते दोघे बंगाली तरुणही आजारी झाल्यासारखे दिसले. त्यांतला एक तर बिचारा फारच घाबरला. आतां मी खास मरणार असें तो म्हणूं लागला. बोट लागण्यानें आजपर्यंत कोणीही मेला नाहीं असें त्याला आम्ही सर्वांनीं जीव तोड तोडून सांगितलें. हे बंगाली तरुण 'नेटिव्ह' असल्यामुळें त्यांच्या वांट्याला आलेली खोली म्हणजे शुद्ध अंधारकोठडी. हवा आणि उजेड यांची भेट तेथें होत नव्हती. त्यांतून ती नेमकी पंख्याच्या वर होती. यामुळें त्याच्या एकसारख्या घरघरीनें डोकें उठण्याची सोय झाली होती. बोटीची नाळ लाटे-बरोबर पाण्यांत घुसली कीं इकडे पंखा हवेंत तरंगूं लागे; आणि मग जो हिसका बसे तो खरोखर वर्णनातीतच होता. मांजरानें उंदराला इकडे तिकडे भिरकवावें त्याचप्रमाणें बोटीनें आमची अवस्था केली होती.

बोलून चालून पावसाळ्याचे दिवस. त्यांतून पश्चिम दिशेकडे वादळें अधिक. यामुळें आमची बोट त्या दिशेकडे जों जों अधिक जाई तों तों तुफानी वारा

आणि लाटाही वाढत. मद्रासी स्नेह्यांनीं दिलेल्या फळफळावळीपैकीं बराचसा भाग आणि दहीं भात हे पदार्थ त्या दोन तरुणांना मीं दिले.

मद्रासेकडे स्त्रीपुरुषें खुशाल अनवाणी फिरतात. युरोपांत पाय उघडे दाखविणें हें असभ्यतेचें लक्षण समजलें जातें. देशाप्रमाणें वेषही बदलावा यांत नवल नाहीं. युरोपांतील बायका पायांचें नख दिसूं द्यावयाच्या नाहींत, पण छातीचा अर्धा भाग त्या खुशाल उघडा टाकतील. आमच्या देशांत कांहीं प्रांतीं डोक्यावर पागोटें अवश्य हवें; मग बाकीचा देह उघडा राहिला तरी चालेल. माझा एक म्हैसुरी मित्र मद्रास बंदरीं बोटीवर चढला होता. हा वर्णानें ब्राह्मण असून रामानुजपंथी होता. डोक्याचा गोटा केलेला आणि आपल्या पंथाची निशाणी कपाळावर भरपूर लावलेली, अशा थाटानें त्यानें बोटीवर प्रवेश केला. बरोबर खाण्यासाठीं चुरमुरे, वाळलेला भात आणि फुटाणे अशी सामुग्री त्यानें बरोबर घेतली होती. त्याला सिलोनला उतरावयाचें होतें. हा सारा प्रवास बरोबरच्या जिनसांवरच निभवावा असा त्याचा बेत होता. बोटीवरील पदार्थाला त्यानें स्पर्श केला असता तर बिचाऱ्याला जातीनें वाळीत टाकलें असतें. पूर्वी एकवार हा सिंहलद्वीपाला जाऊन आलेला होता, आणि त्या वेळीं त्याच्या ज्ञातीनें त्याजवर बरेंच काहूर उठविलें होतें. पण अखेरीस आपल्या ज्ञातिबांधवांची समजूत त्यानें कशीबशी केली. ज्ञातीचा आक्षेप नसला म्हणजे इतर जातीचे लोक कोणाला त्रास द्यावयाचे नाहींत. आमच्या जातिभेदाचा हा एक विशेष आहे. दक्षिण हिंदुस्थानांत जातींची संख्या इतकी बोकाळली आहे कीं, कित्येक जाती अवघ्या चारपांचशें माणसांच्याच असतात. जाती इतक्या लहान झाल्यामुळें लग्नांचीसुद्धां मोठी पंचाईत पडते. यामुळें बहिणीच्या मुलीशींही लग्न करण्याची चाल त्यांच्यांत पडली आहे. बहिष्कार हें शुद्ध खूळ आहे. तो कोणत्या कारणासाठीं घालावा आणि कोणत्यासाठीं घालूं नये याचा कांहींच निर्बंध नाहीं. म्हैसुरांत प्रथमच आगगाडी आली तेव्हां ती बघण्यासाठीं खेड्यापाड्यांतून आलेल्या ब्राह्मणांवर बहिष्कार पडला. आगगाडी पाहाणें हेंही महापातकच! माझा म्हैसुरी मित्र हा एक अद्वितीय पुरुष आहे. इतका निःस्वार्थी, मेहनती आणि गुरुनिष्ठ मनुष्य तुम्हांला क्वचितच आढळेल. अल्पशी शेंडी राखून बाकीच्या डोक्याचा गोटा केलेला, नेसतें धोतर एवढाच पोषाख, आणि पायीं

अनवाणी, असा गृहस्थ पहिल्या वर्गाच्या खोलींत शिरतांना पाहून पुष्कळांना मोठी गंमत वाटली. केव्हां केव्हां हा माझा स्नेही बोटीच्या वरच्या मजल्यावर अनवाणी हिंडतो, आणि हिंडतां हिंडतां चणेकुरमुरे खातो. मद्रासी म्हटला कीं, तो चेट्टी ( वाणी ) असलाच पाहिजे असा बोटीवरील नोकरांचा ग्रह असतो. हे चेट्टी खूब श्रीमंत असतात; पण अन्नासाठीं अथवा कपड्यासाठीं ते पैसा खर्चावयाचे नाहींत, असें हे नोकरलोक म्हणत. या ब्राह्मणाला माझ्या संगतींत पाहून 'आतां याची जात गेली' असें नोकर म्हणूं लागले. मद्रासी आणि बंगाली यांच्यांत दळणवळण वाढलें कीं मद्राशांचे कडक निर्बंध ढिले पडूं लागतात हें कांहीं खोटें नाहीं.

माझ्या मद्रासी मित्राला बोट लागली नाहीं. गुरुबंधूला मात्र आरंभीं थोडा त्रास झाला; पण आतां तो ठीक आहे. नानाप्रकारच्या गप्पागोष्टी, कांहीं वाद-विवाद आणि प्रसंगीं लोकांच्या उठाठेवी, अशा रीतीनें आमचे चार दिवस मोठ्या मजेंत गेले. समोर कोलंबो बंदर दिसूं लागलें. रावणाची लंका आली. श्रीराम-चंद्रानें सेतु बांधून लंकेंत प्रवेश केला, आणि रावणाला जिंकलें. मी हा पूल पाहिला, आणि रामनदचे महाराज–सेतुपति–यांचीही भेट घेतली. यांच्या वाड्यांत भगवान् रामचंद्राच्या हातची शिळा आहे. याच शिळेवर भगवंतांनीं रामनदच्या पहिल्या राजाची स्थापना स्वहस्तें केली. तथापि या कथेवर सिंहली लोक विश्वास ठेवीत नाहींत. सिंहली लोक बौद्धधर्मी आहेत. ते म्हणतात कीं 'रामायण सारेंच खोटें. आमच्या देशांत रावण नव्हता आणि रामही कधीं आला नाहीं.' पण त्यांनीं तसें म्हटलें म्हणून काय झालें? आमचे जुने ग्रंथ काय सारेच खोटे? ते म्हणतात 'आमच्या बेटाचें नांव सिंहल आहे, लंका नाहीं.' हे लोक सामान्यतः फार शिथिल दिसतात. भाषणांत, आचरणांत अथवा त्यांच्या स्वभावांतही तिखटपणा म्हणून कसला तो नाहींच. केसांचे बुचडे बांधिलेले, आणि त्यांत एक मोठी फणी खोवलेली, अशा वेषानें ते खरोखरच बायकांसारखे दिसतात. देहयष्टि पाहिली तर तीही वेलीसारखी लवचिक, बारीक आणि ठेंगणी. स्त्रीदेहाशीं तिचें साम्य अधिक दिसतें. यांना काय रावण-कुंभकर्णाचे वंशज म्हणावें? छेः, छेः, तसें मनांतसुद्धां आणूं नये. सांप्रतच्या सिंहली लोकांचे पूर्वज बंगाल्यांतून आले, अशी दंतकथा मी ऐकली

आणि हीच पीठिका मला ठीक वाटली. स्त्रियांसारखा पोषाख केलेले, मृदु भाषेंत किंकिणक्कणानें बोलणारे, थबकत थबकत आणि नाचत मुरडत चालणारे, कोणाच्याही तोंडाकडे बेमुर्वतपणें पहाण्याची छाती नसलेले, जन्मापासून प्रेमगीतें लिहिणारे आणि विप्रलंभ शृंगारांत सदोदित रडत असणारे अशा जातीचे लोक आतां बंगाल्यांतही निर्माण होऊं लागले आहेत. सिंहली लोकांचे हे सख्खे भाऊ शोभतील. मग सिंहली लोकांचे पूर्वज बंगाली होते, ही आख्यायिका सार्थ कां म्हणूं नये ? असले बंगाली लंकेंत गेले तर तेथें त्यांचे भाऊबंद त्यांना पुष्कळ आढळतील. या जातीच्या पुष्कळशा बंगाल्यांना धरून सरकारनें त्यांची रवानगी इकडे केली तर खरोखर चांगलें होईल. त्यांना शोधावयास फारशी खटपट नको. खुद्द राजधानींतच ते हवे तेवढे मिळतील.

विजयसिंग या नांवाचा एक बंगाली राजकुमार होता. तो आपल्या बापाशीं भांडला. तेव्हां आपल्याच सारखे कांहीं तरुण गोळा करून तो लंकेंत गेला. त्या काळीं त्या बेटांत एका रानटी जातीचे लोक राहात होते. या जातीच्या सध्यांच्या वंशजांना बेदुइन असें म्हणतात. लंकेच्या राजानें आपली मुलगी आमच्या बंगाली कुमाराला दिली. कांहीं काळ सुखानें घालविल्यावर आपल्या स्त्रीशीं खलबत करून राजा आणि सरदार लोक यांजवर अचानक छापा घालून बंगाली कुमारानें त्यांची कत्तल उडविली. यानंतर विजयसिंग गादीवर बसला. आणखी थोडा काल लोटल्यानंतर आपल्या बायकोचा त्याला कंटाळा आला. तेव्हां हिंदुस्थानांतून पुष्कळ बायका आणि पुरुष त्यानें तिकडे नेले. पहिल्या बायकोचा त्याग करून अनुराधा नांवाच्या नव्या स्त्रीशीं त्यानें लग्न केलें. नंतर मूळच्या रानटी लोकांचें सत्र त्यानें आरंभिलें. मूळच्या लोकांपैकीं बहुतेकांची कत्तल झाली आणि जे कांहीं मूठभर शिल्लक राहिले त्यांनीं घनदाट अरण्याचा आश्रय केला. त्यांचे वंशज अद्यापिही रानावनांतूनच आढळतात. या वेळीं लंकेच्या नांवाचें रूपांतर होऊन तें सिंहलद्वीप बनलें. बंगाल्यांतील उडाणटप्पू दरोडेखोरांचें हें मायपोटच बनलें होतें.

पुढें अशोकाचें साम्राज्य झाल्यानंतर त्याचा मुलगा व मुलगी अशीं दोघें सिंहलद्वीपांत आलीं. सर्वसंगपरित्याग करून धर्मप्रचार करावयाचा अशी शपथ त्यांनीं घेतली होती. सिंहलद्वीपांतील लोक अगदीं रानटी अवस्थेला पोंचले आहेत

असें त्यांना आढळून आलें. तेव्हां सारा जन्म तेथें खटपट करून त्या लोकांची शक्य तितकी सुधारणा त्यांनीं केली. त्यांनीं नवे नीतिनिर्बंध घालून दिले आणि लोकांस बौद्धधर्माची दीक्षा दिली. बौद्धधर्माचा पाया येथें चांगलाच रोवला गेला. लोकांची सुधारणा होऊं लागली. अनुराधापुरम् या नांवाचें एक मोठें शहर मध्यभागीं वसलें. या शहराचे राहिलेले अवशेष पाहून आजमितीलाही प्रेक्षक आश्चर्यानें थक्क होतो. पडझड झालेल्या दगडी इमारती मैलच्या मैल पसरल्या आहेत. जागोजाग प्रचंड स्तूप आहेत. या मोडतोडीभोंवतीं सध्या दाट अरण्य माजलें असून या भागाची साफसुफी चांगलीशी झालेली नाहीं. या शहरांत प्राचीन काळीं भिक्षु आणि भिक्षुणी यांची पुष्कळ वस्ती होती. त्यांचें केंद्रस्थान हेंच शहर असून येथून त्यांचे धर्मप्रचारक साऱ्या बेटभर हिंडत. किती तरी प्रचंड बुद्धमंदिरें येथें होतीं. त्यांत ध्यानस्थ बुद्धाची मूर्ति वसविलेली असे. बुद्ध उपदेश करीत आहे, अशा थाटाच्या मूर्तीही कोठें असत. त्याचप्रमाणें निर्वाणाच्याही मूर्ती असत. देवळाच्या भिंती बाहेरून चित्रानें रंगविलेल्या असत. त्यांवर नरकयातनांचीं चित्रें दाखविलीं होतीं. कित्येक प्राणी मार खात असलेले, कित्येक करवताखालीं सांपडलेले, अग्नींत जळत असलेले, आणि तेलांत तळत असलेले दाखविलेले असत. एकंदरीनें हीं चित्रें अगदीं किळसवाणीं होतीं. अहिंसा ही ज्या धर्माची पताका त्यांतही असल्या गोष्टींना स्थान मिळेल असें कोणाच्या स्वप्नीं तरी आलें असतें काय ? चीन आणि जपान या देशांतही ही स्थिति आहे. अहिंसेचें पुराण तोंडानें बडबडत असतां शिक्षांचे इतके प्रकार दाखविण्यांत येतात कीं, ते पाहून प्रेक्षकाचें रक्त गोठून जाईल. एकदां एका बौद्धाच्या घरांत चोर शिरला. घरांतील नोकरांनीं त्याला धरलें आणि त्याला खूब बडवूं लागले. सारी गडबड ऐकून मालक स्वतः बाहेर आला आणि नोकरांना म्हणाला, " अरे, याला मारूं नका. ' अहिंसा परमो धर्मः' " ' तर मग याचें काय करावें ? ' असा प्रश्न चाकरांनीं केला, तेव्हां यजमान म्हणाले ' याला गोणत्यांत शिवून समुद्रांत टाकून द्या. ' यजमानाचा हा हुकूम ऐकून चोर म्हणाला, 'अहाहा ! रावसाहेब किती दयाशील !'

बौद्ध लोक शांतताप्रिय आणि परमतसहिष्णु आहेत, असा लौकिक मी ऐकला होता; पण अनुभव मात्र अगदीं वेगळा येतो. बौद्धप्रचारक केव्हां केव्हां कलकत्त्यांत येतात, त्यांचीं भाषणें मीं ऐकलीं आहेत. आमच्या हिंदुधर्माला ते अशा

सोलिंव शिव्या देतात कीं, त्यांचें भाषण ऐकून खरोखर नवलच वाटतें. कलकत्त्यांतील हिंदु लोक त्यांचा मानमरातव चांगल्या प्रकारें राखीत असतांही ही स्थिति. एके वेळीं अनुराधापुरम् येथें मी भाषण करीत होतों. माझे श्रोते सारेच हिंदु होते. त्यांत बौद्ध कोणी नव्हते. माझें भाषण खासगी इमारतींत नसून एका खुल्या मैदानावर चालू होतें. इतक्यांत एकाएकीं कित्येक बौद्ध भिक्षू आणि बौद्ध स्त्रीपुरुषें तेथें जमा झालीं. बरोबर आणलेलीं ढोलकीं हे लोक मोठमोठ्यानें बडवूं लागले. झांजांचा कर्कश आवाजही चोहोंकडे उठूं लागला. श्रोत्यांच्या कानठळ्या बसतील इतका गोंगाट या लोकांनीं केला. अर्थात् माझें भाषण मला बंद करावें लागलें. भाषण चालू असतें तर या लोकांनीं दंडादंडीचाही प्रसंग आणला असता, यांत शंका नाहीं. 'बौद्धांचा अहिंसा धर्म आपणच पाळूं या' एवढे शब्द कसेबसे उच्चारून माझ्या हिंदु श्रोत्यांना मी शांत केलें. थंड रक्ताच्या हिंदूंनींही माझ्या विनंतीला मान दिला आणि शांतपणें सभेचें विसर्जन झालें.

हळूहळू तामिळ हिंदु सिंहलद्वीपांत येऊन वस्ती करूं लागले. बौद्धधर्माची अवस्था हळूहळू कठीण होऊं लागली, तेव्हां आपली राजधानी सोडून कँडी नांवाचें एक डोंगराळ गांव बौद्धांनीं वसविलें. पण अखेरीस तामिळ हिंदूंनीं हें शहर हस्तगत करून घेतलें आणि एका हिंदु राजाची स्थापना तेथील गादीवर केली. पुढें पाश्चात्यांची टोळधाड येण्यास सुरवात झाली. स्पेन, पोर्तुगाल आणि हॉलंड येथील लोकांनीं सिंहलद्वीपांत वस्ती केली. सर्वांच्या अखेरीस इंग्रज तेथें आले; आणि तेच तेथील मालक होऊन बसले. कँडी येथें असलेल्या राजकुटुंबाची रवानगी तंजावरास झाली; आणि त्यांच्या योगक्षेमासाठीं इंग्रज सरकारकडून त्याला पेन्शन मिळूं लागलें.

उत्तर सिलोनांत बौद्धांपेक्षां हिंदूंची वस्ती अधिक आहे; आणि दक्षिणेंत बौद्ध आणि अर्धबाटगे गोरे यांची वस्ती अधिक आहे. बौद्धांचें मुख्य ठाणें कोलंबो हें आहे; आणि तेंच राजधानीचेंही शहर आहे. हिंदूंचें मुख्य शहर जाफना हें आहे. येथें हिंदुस्थानाइतकी जातिभेदाची तीव्रता नाहीं. पूर्वी सिलोनांतील सारे खाटिक बौद्ध होते; पण बुद्धाच्या तत्त्वांचा प्रसार अधिकाधिक होऊं लागला, तसतशी यांची संख्या कमी होऊं लागली. इंग्रजी नांवें ठेवण्याचीही आवड बौद्ध लोकांत पूर्वी अधिक होती, पण तीही आतां कमी होऊं लागली आहे. सर्व

हिंदूंचा वर्ण एकच झाला असून त्यांच्यांत रोटीबेटी व्यवहार अगदीं मोकळेपणें होत असतो. फार काय, पण कोणा हिंदूनें एकादी युरोपियन वायको केली तरीही तें खपलें जातें. या जोडप्याला झालेला मुलगा गंध लावतो आणि देवळांत जाऊन 'शिव शिव' म्हणतो, मग त्याच्या हिंदुत्वावद्दल कोणीं शंकासुद्धां घेत नाहीं. धर्म आणि जात यांचा संबंधच तेथें उरलेला नाहीं. नवरा हिंदु तर वायको ख्रिस्ती; नवरा भस्मलेपन करून **'नमः पार्वतीपतये'** असा घोष करतो. एकाद्या ख्रिस्त्याला हिंदु व्हावेंसें वाटलें, तर शिवालयांत जाऊन त्यानें हात जोडावे आणि **'नमः शिवाय'** म्हणावें, कीं बनला तो हिंदु. यामुळें ख्रिस्ती मिशनऱ्यांची मोठी तारांबळ झालेली आहे. माझ्यासारख्या हिंदूला ते इतके पाण्यांत पाहातात त्याचें कारण हेंच. हिंदु लोकांची वस्ती सिलोनांत झाल्यापासून पुष्कळ ख्रिस्ती लोक भस्मलेपन करून हिंदु झाले. **'नमः शिवाय'** म्हणावें आणि आपल्या जातींत परत यावें असा सपाटा सुरू झाला. अद्वैत आणि वीर शैव असे दोन पंथ येथील हिंदूंत प्रमुख आहेत. हिंदु या आपल्या शब्दाबद्दल येथें शैव हा शब्द आला आहे. सिलोनांतील तामिळ हे पूर्वीचे अस्सल तामिळ आहेत; आणि त्यांनीं आपला धर्मही पूर्वीइतकाच शुद्ध ठेविला आहे. या लोकांचें भजन आणि नृत्य व तांडव नृत्य यांची कल्पना या गोष्टी पाहिल्यावांचून होणार नाहीं. हजारों माणसें मृदंग घेऊन एकत्र झालेलीं, त्यांतच हजारों झांजांचा आवाज मिसळलेला अशा स्थितींत सर्वांगाला भस्मचर्चन करून लठ्ठ लठ्ठ रुद्राक्षांच्या माळा गळ्यांत घालून लाल डोळ्यांचे तामिळ भक्त आवेशानें तांडवनृत्य करूं लागले कीं, तुमच्या आमच्यासारखा प्रेक्षक गांगरून जातो.

कोलंबो येथील आमच्या मित्रांनीं आमच्या उतरण्याची व्यवस्था आगाऊ करून ठेवली होती. त्यासाठीं त्यांना सरकारी परवाना घ्यावा लागला होता. सर कुमारस्वामी हे येथील हिंदूंचे पुढारी आहेत. यांची पत्नी जातीनें इंग्रज आहे. या जोडप्याचा मुलगा अलपस्वल्प हिंदु पोषाख करून आणि कपाळाला भस्म लावून अनवाणी हिंडत असतो. अरुणाचलम् आणि दुसरी प्रमुख मंडळी यांच्याशीं माझी भेट झाली. ही मंडळी मला बोटीवर पोंचविण्यास आली, तेव्हां बरेचसे ओले नारळ त्यांनीं मला देऊन ठेवले. हिगिन्स या नांवाच्या बाईनीं बौद्ध मुलींसाठीं एक शाळा कोलंबो येथें सुरू केली आहे. ही शाळा मीं जाऊन

पाहिली. त्याप्रमाणें काउंटेस कॅनोव्हरा यांचा मठ आणि शाळा हींही मीं पाहिलीं. काउंटेसबाईचा मठ आणि शाळा यांच्या इमारती बऱ्याच प्रशस्त आहेत. हिगिन्सबाईची शाळा त्या मानानें वरीच आकुंचित आहे. याचें कारणही उघड आहे. काउंटेसबाईनीं सर्व पैसा स्वतःचा खर्च केला असून हिगिन्सबाईला आपली इमारत भिक्षेच्या पैशावर उभारावी लागली. काउंटेसबाई भगव्या रंगाची साडी बंगाली पद्धतीनें नेसतात. गेरूची आवड सिलोनी बौद्धांत वरीच पसरली असल्याचें मला आढळून आलें. काउंटेसबाईच्या पद्धतीचा पोषाख केलेल्या कितीतरी स्त्रिया गाड्यांतून हिंडतांना मला आढळल्या.

कँडी येथें भगवान् बुद्धाचा एक दांत पुरला असून त्यावर देऊळ बांधलेलें आहे. हें बौद्धांचें यात्रेचें एक प्रमुख स्थान आहे. पूर्वी हा दांत पुरी येथील जगन्नाथाच्या मंदिरांत असून कालाचे अनेक तडाखे खात खात अखेरीस तो सिलोनला पोंचला, असें येथील बौद्ध सांगतात. येथेंही कांहीं काळपर्यंत त्याला शांतता मिळाली नाहीं; पण आतां यापुढें मात्र त्याचा निद्राभंग कोणी करणार नाहीं.

सिंहली लोकांनीं आपला प्राचीन इतिहास फार सुसंगत ठेवला आहे. शेंडाबुडखा नसलेल्या आमच्या दंतकथांसारखा हा इतिहास नाहीं. त्याचप्रमाणें आपले धर्मग्रंथही बौद्धांनीं चांगले जतन केले आहेत. हे ग्रंथ जुन्या मागधी भाषेंत लिहिलेले आहेत. ब्रह्मदेश, सयाम आणि इतर मुलूख यांत बौद्धधर्म येथूनच प्रसार पावला. आपल्या धर्मग्रंथांत उल्लेखिलेला शाक्य मुनी हाच आद्य प्रणेता असें येथील बौद्ध म्हणतात; आणि त्यानेंच सांगितलेला धर्म व्यवहारांत आणण्याची खटपट ते करीत असतात. नेपाळ, भूतान, सिकीम, लदक, चीन इत्यादि देशांतील लोकांप्रमाणें ते शिवपूजन करीत नाहींत, अथवा टाळादेवीसारख्या देवदेवतांवर ते विश्वास ठेवीत नाहींत. असले पूजामंत्र आणि या देवतांचीं विधिविधानें त्यांना अवगतच नाहींत. तथापि भुताटकीसारख्या गोष्टींवर त्यांचा भरंवसा आहे. येथील बौद्धांत उत्तरेचा आणि दक्षिणेचा असे दोन प्रमुख पंथ झाले आहेत. उत्तरेकडील बौद्धांस महायान पंथ मान्य असून दाक्षिणात्यांत हीनयानाचा प्रचार आहे. दक्षिणेकडील बौद्धांत ब्रह्मी, सयामी इत्यादिकांचा भरणा अधिक आहे. महायान पंथाचे अनुयायी बुद्धाला केवळ नांवापुरता मात्र मानतात. त्यांचीं

मुख्य दैवतें तारादेवी आणि अवलोकितेश्वर हीं आहेत. यांच्या पूजनांत अनेक प्रकारचे गुप्त अर्थांचे मंत्र असून त्यांत विधीही बरेच आहेत. तिबेटी लोक हे खरे शिवगण आहेत. ते मुख्यतः शिवाची आणि त्यावरोबरच कांहीं इतर हिंदु देवतांचीही पूजा करतात. ते डमरु वाजवितात, रुंडमाळा धारण करितात, त्याचप्रमाणें मेलेल्या लामांच्या हाडकांच्या केलेल्या तुतान्याही वाजवितात. मांस आणि मदिरा हीं त्यांना फार प्रिय आहेत. त्याचप्रमाणें भुताखेतांचे मंत्र जपून त्यांना बोलावणें आणि मंत्रांनीं रोगी बरे करणें इत्यादि गोष्टीही ते करितात. चीन आणि जपान येथील देवळांच्या भिंतींवर कितीतरी एकाक्षरी मंत्र लिहिलेले मीं पाहिले. यांची लिपी बंगाली लिपीच्या अगदीं जवळ जवळ आहे. बंगाली जाणणान्या कोणाही माणसाला यांतील साम्य सहज ओळखतां येण्यासारखें आहे.

माझा म्हैसुरी स्नेही कोलंबोहून मद्रासला परत गेला. मी पुन्हां बोटीवर चढलों तेव्हां येथील लोकांनीं लिंबें, नारळ, सरवतांच्या बाटल्या इत्यादि वस्तु मला नजर केल्या होत्या. कुमारस्वामींनींही आपल्या स्वतःच्या बगीच्यांतील लिंबें मला पाठवून दिलीं होतीं. कुमारस्वामी हें कार्तिकेयाचें नांव आहे. त्याचप्रमाणें सुब्रह्मण्य वगैरे दुसरींही नांवें त्याला आहेत. दक्षिणेंत या देवतेच्या पूजेचा प्रचार बराच आहे. ॐम् या पवित्र शब्दाचा प्रतिनिधि हा देव आहे असें इकडे मानतात.

ता. २५ जून रोजीं सकाळीं आम्हीं कोलंबो बंदर सोडलें. आतां खऱ्या पावसाळ्याला सुरवात झाली असून त्याचा पूर्ण मारा यापुढें आम्हांवर पडेल. आगबोट जों जों पुढें जात आहे तों तों वादळी हवेच्या सपाट्यांत ती अधिकाधिक सांपडत आहे. वाऱ्याचा जोरही एकसारखा वाढत आहे. पाऊस एकसारखा पडत असून भर दिवसासुद्धां काळोखी असते. प्रचंड लाटा आगबोटीच्या वरच्या मजल्यावर आदळून मोठा गोंगाट करून सोडतात. आतां या मजल्यावर जाणें अशक्य झालें आहे. आम्ही जेवावयास बसलों म्हणजे आगबोटीच्या हालण्यामुळें पदार्थांच्या ताटल्या गडबडां लोळूं लागतात. अतिशय हालण्यामुळें डोलकाठ्या आणि दोरखंडें यांतून निघणाऱ्या करकर आवाजामुळें आगबोट फाटत आहे कीं काय असा भास होतो. यंदांचा पावसाळा नेहमींपेक्षां अधिक वादळी आहे असें तांडेलसुद्धां म्हणाला. चिनी समुद्र आणि हिंदी महासागर यांजवरच याच्या आयु-

ष्याचीं वरींच वर्षें गेलीं आहेत. हा गृहस्थ मोठा बोलका असून आपले नाना-प्रकारचे अनुभव तो आम्हांस सांगत असतो. जुन्या काळीं चिनी खलाशी मोठे बंडखोर असत. कित्येक वेळां बिथरून जाऊन बोटीच्या अंमलदारांना ते मारून टाकीत असत, आणि मग कोठल्या तरी आडबंदाराला बोट लावून आणि तिच्यांतला माल लुटून ते खुशाल फरारी होत. अशा प्रकारच्या अनेक कथा त्यानें आम्हांस सांगितल्या. आम्हालाही सध्यां गप्पाष्टकांशिवाय दुसरा उद्योग नाहीं. आगबोट इतक्या सपाट्यानें हालते कीं लिहिणें वाचणें अगदीं अशक्य आहे. खोलींत धडपणें बसणेंसुद्धां मुष्किलीचें झालें आहे. लाटांचें पाणी आंत येऊं नये म्हणून खिडकी घट्ट लावावी लागते. एके दिवशीं 'टी' यानें खिडकी उघडी ठेवली होती. इतक्यांत एक लाट आंत अशी येऊन कोसळली कीं साऱ्या खोलीभर पाणीच पाणी होऊन गेलें. वरच्या मजल्यावरील स्थिति तर विचारा-वयासच नको. अशा प्रकारच्या परिस्थितींतसुद्धां तुमच्या 'उद्बोधना'चें काम थोडेंबहुत होत आहे हें तुमचें भाग्य !

आमच्या बोटीवर दोन ख्रिस्ती उपदेशक आहेत. यांपैकीं एक अमेरिकन असून तो सहकुटुंब आला आहे. याचें नांव बोगेश. लग्न होऊन पुरीं सात वर्षेंहि लोटलीं नाहींत तोंच अर्धो डझन मुलांचें खिल्लार त्याच्या मागें लागलें आहे. त्याजवर परमेश्वराची ही खास कृपा आहे, असें नोकरलोक म्हणतात. मग त्या मुलांना आणि त्याला स्वतःला काय वाटत असेल तें असो. वरच्या मजल्यावर एक लांबलचक रगटें पसरून मुलांची आई त्याजवर त्यांना लोटून देते, आणि आपण चालती होते. मुलें गडबडां लोळूं लागतात आणि केरकचऱ्यानें आपलें सारें अंग भरून घेतात. अशा स्थितींत तीं रडून टाहो फोडतात यांत नवल काय ? सारीं मुलें इतस्ततः लोळत असल्यामुळें तेथील उतारूंना इकडे तिकडे जाणें झाल्यास फार जपून पावलें टाकावीं लागतात. नाहींतर एकादें मूल पाया-खालीं सांपडून फट म्हणतां ब्रह्महत्या व्हावयाची. तान्ह्या मुलाला एका उंच कांठाच्या टोपलींत घालून आणि त्याला दोघांच्या मध्यें ठेवून हें जोडपें तासांचे तास बसून काढतें. युरोपीय संस्कृतीची ही तऱ्हा पाहून माझ्यासारख्याच्या अंगा-वर तर शहारे येतात. तोंडांत पाणी घेऊन चारचौघांदेखत आम्हीं गुळणा केला किंवा दांत घांसले कीं आम्ही रानटी ठरलोंच. ठीक आहे. असल्या गोष्टी गुप्तपणें

करणें चांगलें असें तुम्ही म्हणतां. पण वर सांगितलेल्या सारख्या गोष्टी चार-चौघांसमक्ष करणें हीसुद्धां सुधारणाच कीं काय ? आणि असल्या सुधारणेच्या मागें आमचे हिंदी नेटिव्ह लागले आहेत हें केवढें नवल ? जुन्या ख्रिस्ती धर्मांत उपाध्यायांना लग्न करण्याची मनाई होती. या चालीविरुद्ध ओरड करण्यासाठीं प्रॉटेस्टंट पंथ निघाला. या पंथानें उत्तर युरोपावर केवढे उपकार केले आहेत याची कल्पनासुद्धां तुम्हांस होणार नाहीं. दहा कोट इंग्रज गृहस्थ मरून जाऊन नुसते पाद्रीच शिल्लक उरले, तर वीस वर्षांच्या अवधींत नवी दहा कोट प्रजा सहज निर्माण होईल.

आगबोट एकसारखी हालत असल्यामुळें वहुतेक उतारू डोकें धरून बसले आहेत. एका गृहस्थाबरोबर त्याची लहानशी मुलगी आहे. तिची आई वारल्यामुळें तिची जोपासना करण्यास कोणीच उरलें नाहीं. आपल्या निवेदितेनें तिच्या आईची जागा सध्यां पत्करली आहे. त्याचप्रमाणें बोगेशचीं मुलेंही ती संभाळते. वर सांगितलेला गृहस्थ म्हैसूर येथील असून तेथें त्याचा एक मळा आहे. त्याच्या मुलीला मीं एकदां म्हटलें ‘ बेटा, कसें काय आहे ?’ तिनें उत्तर दिलें, ‘ हा बंगला अगदीं खराब आहे. तो एकसारखा हालतो आणि मग माझें डोकें दुखूं लागतें. ’ माणसें असणाऱ्या साऱ्या स्थळांना ती बंगलाच म्हणते. बोगेशचें एक मूल आधींच थोडें आजारी होतें. त्यांत आगबोट अशी हालूं लागली व त्याजकडे पहाणारें कोणी नाहीं. सारा दिवसभर बिचारें तक्तपोशीवर लोळत असतें. आमचा वृद्ध तांडेल मधून मधून आपल्या खोलीबाहेर येऊन त्या मुलाला चमच्यानें खीर पाजीत असतो. त्या मुलाच्या अस्थिपंजराकडे पाहून त्या बिचाऱ्याला करुणा येते. आईच्या हलगर्जीपणाबद्दल तो कांहीं उद्गार काढतो.

सदा सर्वदा सुखी असावें असें प्रत्येकाला वाटतें; पण सुख चिरंतन होऊं शकत असेल तर दुःखही चिरंतन होईल. यांपैकीं एकाच वस्तूचें अस्तित्व असूं शकणार नाहीं. पण हा विचार कोणाच्याच मनांत येत नाहीं ! मग अशा एकच एक स्थितींत हालचाल तरी कसली ? आणि आम्ही एडनला तरी कसे पोंचलों असतों ? सुदैवानें सुख किंवा दुःख हीं चिरजीवि नसल्यामुळें आम्ही अखेरीस एडनला पोंचलों. सहा दिवसांच्या प्रवासाला चवदा दिवस लागले, आणि तोंडच्या वाऱ्याचा झोत आणि लाटांचा तडाखा खात खात आम्ही बंदरांत शिरलों हें

खरें. कोलंबो सोडल्यापासून पाऊस आणि वारा वाढतच चालला, व लाटा पर्वतप्राय उसळूं लागल्या. साऱ्या आकाशभर पाण्याशिवाय दुसऱ्या वस्तूचें जणूं अस्तित्वच नव्हतें. आगबोटीची गति अर्धी झाली. सोकोत्रा बेटाजवळ तर वादळाला पूर्ण भर आला होता. येथून एकदां सुखरूप निभावलों म्हणजे मिळविली असें कप्तानसुद्धां म्हणे; पण यांतूनही पार पडून आम्ही बंदर गांठलें आणि आमचे घोडे गंगेला न्हाले.

आठ तारखेला संध्याकाळीं आम्ही एडनला पोंचलों. काळ्या गोऱ्यांपैकीं कोणासही येथें उतरूं दिलें नाहीं. त्याचप्रमाणें मालाचीही चढउतार येथें कांहीं झाली नाहीं. येथें पहाण्यासारखें असें कांहीं नाहीं. जिकडे तिकडे वाळूचीं मैदानें पसरलीं असून तीं राजपुतान्याची आठवण करून देतात. मधून मधून उघड्याबोडक्या टेकड्याही आहेत. या टेकड्यांतून किल्ले आणि शिपायांच्या छावण्या पसरल्या आहेत. मैदानांतून भोजनवसतिगृहें आणि दुकानें दिसतात. यांची अर्धचंद्राकार वस्ती बोटींतूनही स्पष्ट दिसते. बंदरांत बरींच गलबतें नांगरलीं आहेत. एक इंग्रजी आणि एक जर्मन लढाऊ गलबत असून बाकीचीं सारी उतारूंचीं अथवा मालाचीं आहेत. गेल्या खेपेला हा गांव मी पाहून आलों होतों. समोरच्या टेंकड्यांच्या मागें नेटिव्हांची छावणी आणि बाजार आहे. तेथून कांहीं मैल अंतरावर टेकड्यांच्या पायथ्याशीं मोठाले खाडे खणले असून त्यांत पावसाचें पाणी सांठतें. गांवाच्या उपयोगांत येणारें एवढेंच पाणी पूर्वी असे. पण आतां खाऱ्या पाण्याचें गोडें पाणी येथें बनवितात. तथापि हें पाणी फार महाग पडतें. एडन हा गांव आपल्या देशांतील गांवासारखाच असून त्यांत बरीचशी वस्ती हिंदी लोकांची आहे. पारशी आणि सिंधी व्यापारी येथें बरेच आहेत. हा गांव बराच प्राचीन आहे. रोमन बादशहा कॉन्स्टन्टियस ह्यानें ख्रिस्ती धर्मप्रचारकांची एक टोळी शुभ वर्तमान गाजविण्यासाठीं येथें पाठविली होती. पण येथील अरबांनीं त्या साऱ्यांची कत्तल उडविली. तेव्हां ह्या अरबांना शिक्षा करावी, अशी विनंती रोमन बादशहानें हबशी राजाला केली. अबिसीनियाचा प्रदेश ख्रिस्ती धर्माच्या अमलाखालीं आधींच आला होता. हबशी राजानें मोठें सैन्य पाठवून अरबांना त्यांच्या कृतकर्माचें प्रायश्चित्त दिलें. यानंतर एडनचा प्रदेश इराणी राजाच्या ताब्यांत गेला. पाण्यासाठीं खणलेले खाडे इराणी सरकारनेंच खोदविले

असें म्हणतात. यानंतर मुसलमानांचा उदय झाला; आणि त्यांच्या विजयाच्या लाटेंत हा प्रदेश पुन्हां अरबांच्या हातांत गेला. हा जिंकण्याची खटपट एका पोर्तुगीज सेनापतीनें केली होती, पण तींत् त्याला यश आलें नाहीं. पुढें तुर्कस्थानच्या सुलतानानें येथें आपलें आरमारी ठाणें केलें. हिंदी महासागरांतून पोर्तुगीजांचें उच्चाटन करावें असा त्याचा हेतु होता.

यानंतर इंग्रजांनीं हें बंदर अरबांपासून विकत घेतलें; आणि त्या जाग्यावर सध्यांचें गांव वसविलें. आतां सर्व बलिष्ठ राष्ट्रांचीं लढाऊ जहाजें वाटेल त्या बंदरीं जातात येतात आणि कोठेंही कांहीं खुट्ट झालें कीं सगळ्यांच्याच उड्या तेथें पडतात. जगाची उठाठेव करावी असें साऱ्यांनाच वाटतें. आपला व्यापार, आपलें राजकारण आणि आपली प्रजा यांचें संरक्षण करण्याच्या निमित्तानें सारीं राष्ट्रें सज्ज होऊन बसलीं आहेत. आगबोटींचा व्यवहार फार वाढला असल्यामुळें जेथें तेथें त्यांना कोळसा भरणें अवश्य असतें. युद्धप्रसंगीं शत्रूच्या मुलखांतून कोळसा मिळणें अशक्य असतें. याकरितां कोळशाचीं आपल्या मालकीचीं मथकें जागोजाग असावीं असें प्रत्येक राष्ट्राला वाटतें. नाकेबंदीच्या बहुतेक जागा इंग्रजांनीं व्यापल्या आहेत. त्यांच्या खालोखाल फ्रेंचांनीं अशीं ठिकाणें हस्तगत केलीं आहेत, आणि आतां शिलकी ठिकाणें घेण्याची धडपड बाकीचीं राष्ट्रें करीत आहेत.

सुवेझचा कालवा ही युरोप आणि आशियाला जोडणारी सांखळी आहे. हा कालवा फ्रेंचांच्या ताब्यांत आहे. यासाठीं इंग्रजांनीं एडन बंदर युद्धसाहित्यानें सज्ज करून ठेवलें आहे. त्याचप्रमाणें तांबड्या समुद्रावर इतर राष्ट्रांनींही अशीं ठाणीं वसविलीं आहेत. ज्याला त्याला मुलुखगिरीची हांव सुटलेली आहे. या हांवेमुळेंच आजपर्यंत अनेक अनर्थ ओढवले आहेत. इटलीवर सात शतकेंपर्यंत परकीयांचा अंमल होता. भयंकर अडचणी सोसून हा देश आतां स्वतंत्र झाला आहे. पण स्वतंत्रता प्राप्त होण्याबरोबर इटलीच्याही डोक्यांत वारें भरलें. कोठें तरी नवें राज्य संपादन करावें असें त्याला वाटूं लागलें. युरोपांत अशी मुलुखगिरी कोणी चालूं देत नाहीं. दुसऱ्याच्या हद्दींत एकाद्या राष्ट्रानें पाऊल ठेवलें, कीं त्याची हकालपट्टी करण्याकरितां बाकीचीं सर्व राष्ट्रें एक होतात. आशियांत बहुतेक ठिकाणीं बलिष्ठ युरोपियन राष्ट्रांनीं आपला अंमल बसविला आहे,

यामुळें वारक्यासारक्यांना पुढें सरण्यास फारसा अवकाशच नाहीं. आफ्रिकेंत मात्र कोठें कोठें लहानसहान तुकडे उरले आहेत. तेव्हां इटलीची नजर या खंडाकडे फिरली. इटलीनें आपला मोर्चा प्रथम उत्तर आफ्रिकेकडे वळविला. पण तेथें फ्रेंचांकडून मज्जाव झाल्यामुळें इटलीला स्वस्थ बसावें लागलें. यानंतर इंग्रजांनीं तांबड्या समुद्रावरील एक लहानसा टापू इटलीला दिला. पाय ठेवण्यापुरती जागा मिळण्यावरोबर इटलीनें आपलें सैन्य तेथें उतरविलें; पण अबिसीनियाचा राजा मेनलिक यानें या सैन्याला असा मार दिला कीं, आपला जीव बचावण्याकरितां आपला मुलुखही त्या सैन्याला सोडावा लागला. अबिसीनियाला रशियाच्या झारचा आंतून पाठिंबा होता असें म्हणतात. अबिसीनियांतील ख्रिस्ती पंथ आणि रशियन पंथ हे जवळ जवळ सारखेच असल्यामुळें त्यांच्यांत धर्मबंधुत्वाचें नातें उत्पन्न झालें आहे.

आमची बोट आतां तांबड्या समुद्रांतून जात आहे. तो ख्रिस्ती उपाध्याय मला म्हणाला, ' यहुद्यांचा मुख्य मोझेस हा याच समुद्रावरून पायीं चालत गेला. त्याचा शिष्यगणही त्याजबरोबर होता. त्यांना पकडण्याकरितां मिसरच्या राजानें सैन्य रवाना केलें, पण तें समुद्रार्पण झालें. त्यांच्या रथांचीं चाकें गाळांत रुतून बसलीं.' आमच्या कर्णासारखीच ही गत झाली. ही हकीकत भौतिक शास्त्राधारेंही सिद्ध करितां येईल असेंसुद्धां तो पाद्री म्हणाला. जुन्या चमत्कारांची उपपत्ति नव्या शास्त्रांच्या आधारानें लावण्याची टूम आतां निघाली आहे. पण हे चमत्कार सृष्टिक्रमानेंच होत असतील तर त्यांत 'चमत्कार' तो कोठें राहिला ? आणि मग तुमच्या देवाचें मोठेपण सिद्ध करण्यास यांचा काय उपयोग होणार ? दोन्हीकडून हा एक मोठा पेंचच आहे. अर्वाचीन पंडित म्हणतात, हे चमत्कार शास्त्रविरुद्ध असतील तर त्या नुसत्या दंतकथा; आणि असल्या दंतकथांवर उभारलेला तुमचा धर्मही खोटा. आतां ते शास्त्रानुकूल असतील तर ते सृष्टिक्रमाप्रमाणें घडत असल्यामुळें तुमच्या देवाचें देवपणही फुकट. मीं हा प्रश्न बोगेशला विचारला, तेव्हां तो म्हणाला, ' इतके बारीकसारीक मुद्दे मला कांहीं कळत नाहींत; पण मी तसा विश्वास ठेवतों इतकें मात्र खरें. ' हें उत्तर ठीक आहे. तें समाधानकारक नसलें तरी भांडण वाढविणारें नाहीं. दुसऱ्यांच्या धर्मावर मात्र वाटेल तिकडून हल्ला करणारे पुष्कळ लोक असतात. परधर्मीयांशीं

बुद्धिवाद करण्याचा डौल ते घालतात आणि त्यांत ते हुशारीही दाखवितात. पण हाच प्रसंग त्यांच्या स्वतःच्या धर्मावर आला कीं तावडतोब टोपी फिरवून 'याला साक्ष माझें मन' असा जवाब देतात. अशा आडमुठ्यांशीं वाद करणें हेंसुद्धां मोठ्या त्रासाचें काम होतें. असल्यांच्या बुद्धीला मी कवडीचीही किंमत देत नाहीं. दुसऱ्यांच्या धर्माला वेड हें नांव देण्यास ते एका पायावर तयार असतात. विशेषतः युरोपियनांनीं ज्याला वाईट म्हटलें, त्याच्या ठिकाणीं तर कसलाही चांगलेपणा ते पाहात नाहींत; पण स्वतःवर तीच पाळी आली म्हणजे अकटश्र-विकटो दंतकथाही ते बनवून सांगूं लागतात आणि त्यांजवर आपला विश्वास आहे असें दाखविण्याकरितां त्या सांगत असतांना ते आनंदानें बेहोष होतात; आणि ईश्वरी प्रेमाचा पूर म्हणून डोळ्यांवाटे ते पाणीही काढतात.

आमची बोट आतां एकसारखी उत्तरेकडे चालली आहे. तांबड्या समुद्राचा किनारा फार प्राचीन काळीं एका संस्कृतीचा मध्यबिंदु होता. आमच्या एका बाजूला अरबस्थानांतील वालुकामय प्रदेश असून दुसऱ्या बाजूला इजिप्त आहे. प्राचीन काळीं ज्याला इजिप्त अथवा मिसर देश म्हणत तो प्रदेश हा. हजारों वर्षांमागें मूळचे लोक तांबडा समुद्र ओलांडून येथें आले. ते मलबारांतून आले असावे, असाही कित्येकांचा तर्क आहे. येथें आल्यानंतर अधिकाधिक प्रदेश ते आक्रमूं लागले. त्यांच्या सामर्थ्याची वाढ झपाट्यानें होऊं लागली. ग्रीक लोकांनीं त्यांचें शिष्यत्व पत्करिलें. या लोकांनीं बांधलेल्या पिरामिड नांवाच्या इमारती आणि त्यांच्या मृत राजांचे देह या वस्तू आजमितीसही हयात आहेत. प्राचीन मिस्त्री लोक या प्रदेशांत राहात होते. त्यांचे केस कुरळे असून त्यांच्या कानांत बाळ्या असत. ते शुभ्र धोतरें नेसत. पण ते कासोटा घालीत नसत. अत्यंत प्राचीन काळीं आपला इतिहास त्यांनीं कांहीं चिन्हांच्या भाषेंत लिहिला आहे. मातीच्या भांड्यांवर आणि शिलाखंडांवर हा इतिहास त्यांनीं लिहून ठेविला.

मनुष्य मरण पावला म्हणजे त्याचा सूक्ष्म देह इकडे तिकडे फिरत असतो, पण त्याच्या जड देहाला कांहीं अपाय झाला तर त्याचा परिणाम सूक्ष्म देहावर घडतो, आणि जड देहाच्या विनाशाबरोबर सूक्ष्म देहाचाही विनाश होतो असें प्राचीन मिस्त्री लोक मानीत. यामुळेंच मृत देहांचें संरक्षण ते इतक्या काळजीनें करीत. राजपुरुषांचीं शवें सुरक्षित राहावीं म्हणून प्रचंड पिरामिडी त्यांनीं बांधल्या.

काय अचाट युक्ति! आणि किती भयंकर परिश्रम!! आणि एवढी सारी मेहनत कशाकरितां, तर नुसत्या मातीच्या रक्षणासाठीं! अरेरे! एवढ्या श्रमांची इतकी विफलता दुसऱ्या कोठें आढळेल काय? या राजपुरुषांच्या प्रेतांबरोबर कांहीं द्रव्यनिधीही असेल अशा समजानें चोरांनीं येथें मोठमोठीं भुयारें खणलीं आहेत. पण द्रव्य सांपडलें नाहीं. ते प्रेतेंच घेऊन गेले. ही गोष्ट फार प्राचीन काळीं घडलेली आहे. हे चोर कोणी बाहेरचे लोक नसून ते मिस्रीच होते. या छिन्न-भिन्न झालेल्या प्रेतांचे अवयव कांहीं रोगांवर फार गुणकारी आहेत असा समज प्राचीन काळीं होता. यहुदी आणि अरब हकीम हे अवयव युरोपांत नेऊन तेथील रोग्यांस देत असत. युनानी आणि हकिमीउपचार पद्धतींचा आरंभ येथूनच झाला असावा.

अशोक राजानें मिसर देशांत कांहीं धर्मप्रचारक पाठविले होते. धर्मप्रचारा-बरोबर हे लोक वैद्यकीही करीत. ते शुद्ध शाकाहारी असून नैष्ठिक ब्रह्मचारी असत. संन्याशाशिवाय इतरांना ते आपली दीक्षा देत नसत. यांच्या वास्तव्या-नंतर यांच्या धर्माचे बरेच पंथ येथें निर्माण झाले. यांपैकींच एकांतून ख्रिस्ती धर्म उद्भवला. प्राचीन काळीं मिसर देश ही विद्याभूमि होती. त्या काळीं अलेक्झां-ड्रिया हें शहर विद्येचें केंद्र म्हणून साऱ्या जगभर प्रसिद्ध होतें. या ठिकाणीं एक विश्वविद्यालय आणि एक ग्रंथालयही होतें. या शहरीं पुष्कळ पंडितांचें वास्तव्य असे. कालांतरानें अक्षरशत्रु, आडमुठ्या आणि विनाशप्रिय अशा ख्रिस्ती लोकांच्या हातीं हें शहर पडलें. ग्रंथसंग्रहालयाला त्यांनीं आग लावून दिली, आणि तेथून विद्येचें समूळ उच्चाटन केलें. हैपेशिया या नांवाची एक ऋषितुल्य स्त्री त्या वेळीं तेथें होती. तिचा वध करून तिच्या मृतदेहावरसुद्धां अत्याचार करण्यास या पशूंनीं कमी केलें नाहीं. तिचा देह छिन्नविच्छिन्न करून तो त्यांनीं रस्त्यांतून फरफरां ओढीत नेला. रस्त्याच्या घर्षणानें सगळें मांस निघून गेलें आणि नुसत्या अस्थी शिल्लक राहिल्या, तेव्हां त्या मोडून तोडून त्यांनीं इकडे तिकडे फेंकून दिल्या.

आमच्या एका बाजूला अरबस्थान पसरलें आहे. ही शूरांची जन्मभूमी होय. बेडुइन स्वार तूं कधीं पाहिला आहेस काय? अंगांत एक लांब अंगरखा,

डोक्याला रुमाल, आणि त्याजभोंवतीं लोंकरीच्या दोऱ्या गुंडाळलेल्या अशा थाटांत ती स्वारी हिंडत असते. त्याचा चालण्याचा रुबाब आणि उभें राहाण्याची ऐट हींसुद्धां पाहाण्यासारखीं असतात. हा थाट दुसऱ्या कोणत्याही देशांत तुम्हांस आढळावयाचा नाहीं. वर आकाश आणि खालीं वालुकामय प्रदेश अशा खुल्या जागेंत आयुष्य गेल्यामुळें खुलेपणाची म्हणजे स्वतंत्रतेची आवड त्या लोकां-इतकी दुसऱ्या कोठेंही तुम्हांस आढळणार नाहीं. त्यांची ही स्वतंत्र वृत्ति पाया-पासून डोक्यापर्यंत रोमरोमांतून डोकावत असते. या वर्णनाचें चित्र तुला कल्पितां आलें तर तोच अरब असें तूं समज. ज्या वेळीं आडमुठ्या ख्रिस्त्यांनीं आणि गॉथ लोकांनीं प्राचीन ग्रीक आणि रोमन संस्कृतींचा धुव्वा उडविला, ज्या काळीं प्राचीन इराण देश सडून जाण्याच्या पंथास लागला होता, ज्या काळीं हिंदुस्थानांतील पाटलिपुत्र आणि उज्जनी येथील ज्ञानसूर्य अस्तास गेला होता, ज्या काळीं जुलमी राजसत्ता येथें पसरली होती, ज्या काळीं येथें धर्माची शुद्ध अवहेलना होत होती, त्या काळीं हा अर्धमनुष्यस्थितींतला आणि उपेक्षणीयसा दिसणारा अरब उठला आणि साऱ्या जगभर त्यानें आपले बाहू पसरले.

ती पहा, एक आगबोट मक्केहून येत आहे. तींत सर्व यात्रेकरू भरले आहेत. युरोपांतला तुर्क पाश्चात्य पोषाखांत सज्ज झाला आहे. मिस्री मुसलमान अर्धवट युरोपियन पोषाखांत आहे. सीरियन मुसलमानानें इराणी कपडे पेहेरलेले आहेत; आणि खरा अरब गुढघ्याच्या खालीं येणारा अंगरखा घालून उभा आहे. महं-मदाच्या जन्मापूर्वी काबा येथील देवळाला प्रदक्षिणा घालतांना लोक नग्न होत असत; पण ही चाल बंद करून एक कटिवस्त्र गुंडाळण्याची आज्ञा महंमदानें केली. अरबांचे हे दिवस आतां काळाच्या पोटांत गडप झाले आहेत. काफीर, सिद्दी, हवशी इत्यादि रक्तांची मिसळामिसळ झाल्यामुळें अरबांचा पूर्वीचा नूरसुद्धां पालटला आहे. शरीरसामर्थ्य आणि पूर्वीची क्रियाशक्ति यांतसुद्धां आतां वैगुण्य आलें आहे. जुन्या अरण्यवासी अरबाची फारशी ओळखही आतां राहिलेली नाहीं. त्याचें प्राचीन वैभव आतां नामशेष झालें आहे. उत्तर अरबस्थानांतील लोक तुर्की अमलाखालीं असून आपलें आयुष्य ते शांततेनें घालवीत आहेत. सुलता-नाची ख्रिस्ती प्रजा तुर्कांचा द्वेष करून अरबांवर प्रेम करीत असते. अरबाला विद्येची गोडी असून शांततेनें आयुष्य घालवावें असेंही त्याला वाटतें. तो सद्गु-

स्वस्थ होऊं शकतो आणि कोणालाही उपद्रव करण्याची त्याची इच्छा नसते असें हे ख्रिस्ती लोक म्हणतात. उलट तुर्क म्हटला कीं, ख्रिस्त्यांवर अरेरावी गाजविण्यांतच त्याला भूषण वाटतें.

अरबस्थान हा फार उष्ण प्रदेश आहे. तथापि तेथील कडकीनें ग्लानी येत नाहीं. मस्तकाचें आणि देहाचें रक्षण करण्यापुरती काळजी तुम्हीं घेतली, कीं मग तुम्हांला कसलाही त्रास व्हावयाचा नाहीं. उष्णतेबरोबरच हवा कोरडी असली तरी ती कडकी बाधत नाहीं; एवढेंच नव्हे तर उलट ती थोडीशी उत्तेजकच होते. राजपुताना, अरबस्थान आणि आफ्रिका यांतील रहिवाशी या गोष्टीची उत्तम साक्ष पटवितात. मारवाडांत माणसें आणि गाई, म्हशी, घोडे, इत्यादि जनावरेंही धष्टपुष्ट आणि धिप्पाड असतात. अरब आणि सिद्दी यांचे देह पाहूनच खरोखर संतोष होतो. उलटपक्षीं आमच्या बंगाल्यांचीं शरीरें पहा. बंगाल्यांतील उष्ण हवेंत ओलावा असल्यामुळें मनुष्याला आणि जनावरालासुद्धां सदोदित ग्लानी येते, शरिराचें चापल्य नाहींसें होतें, आणि यामुळें त्याची योग्य वाढही खुंटते.

तांबड्या समुद्रांत उकाड्याची कमाल झालेली असते. विशेषतः उन्हाळ्याच्या दिवसांत तर येथें उकाडा इतका होतो कीं, या समुद्राचें नुसतें नांव ऐकूनच उतारू घाबरतात. आतांच पहाना, आमचे सारे उतारू वरच्या उघड्या मजल्यावर बसले असून शिळोप्याच्या गप्पागोष्टी करीत आहेत. आपापल्या माहितीच्या अपघाताच्या गोष्टी ते सांगत आहेत. आमच्या कप्तानसाहेबांनीं तर सर्वांवर मात केली आहे. एका चिनी युद्धनौकेंत घडलेल्या भयंकर प्रकाराची गोष्ट त्यानें आम्हांस सांगितली. हें गलबत तांबड्या समुद्रांतून जात असतां तेथील उष्णतेनें कप्तान आणि कोळसा मारणारे आठ खलाशी मृत्युमुखीं पडले. ही गोष्ट अशक्य असेल असें म्हणावयास नको. कोळसे मारणाऱ्या खलाशांना आधींच आगीच्या खाईंत उभें राहावें लागतें. त्यांतच तांबड्या समुद्रांतील भयंकर कडक हवेची भर पडते. ते बिचारे वरील मजल्याकडे धांवत सुटतात अथवा वेडे होऊन समुद्रांत उडी घेतात; आणि कित्येक एंजिनाच्या खोलींतच कडकीनें मरून पडतात.

अशा अनेक गोष्टी ऐकून आम्हीही जवळजवळ वेडे होण्याच्या मार्गाला लागलों, पण सुदैवानें आजची हवा इतकी कडक नव्हती. वारा उत्तरेकडून येत असल्यामुळें भूमध्य समुद्रावरून येतांना तो पुष्कळ थंड होऊन येत असे.

ता. १४ जुलई रोजीं तांबडा समुद्र वटावून आमची बोट सुएझला पोंचली. सुएझचा कालवा समोरच दिसत आहे. सुएझला उतरण्याचा कांहीं माल आमच्या बोटींत आहे. सध्यां इजिप्तमध्येंही प्लेग आहे, आणि आमच्या बोटींतील उतारूबरोबरही प्लेगजंतू आले असण्याचा संभव आहे. अर्थात् संसर्गाची भीति दोन्ही बाजूंनीं आहे. परस्पर संसर्ग घडूं नये म्हणून येथें जी काळजी घेण्यांत येते, तिच्यापुढें आपल्या देशांतील व्यवस्था कांहींच नाहीं. माल उतरावयाचा, पण मिस्री हमालानें त्याला स्पर्श करतां कामा नये. यामुळें बोटीवरच्या खलाशांनाच हमालाचें काम करावें लागलें. यारीनें माल उचलावयाचा आणि समुद्रांत उभ्या असलेल्या होडक्यांत सोडावयाचा; पण तसें करतांना होडक्याला स्पर्श करावयाचा नाहीं. कंपनीचा गुमास्ता आपल्या बोटींतून आला असून त्याची बोट समुद्रांतच उभी आहे. कारण त्याला वर येण्याला परवानगी नाहीं. बोटीचा कप्तान आपल्या मजल्यावर उभा राहूनच त्याच्याशीं भाषण करीत आहे. हें कांहीं हिंदुस्थान नव्हे. रोगप्रतिबंधक नियम येथें सर्वांना सारखेच लागू होतात. हे नियम गोऱ्या माणसांनीं अजून पायाखालीं तुडविलेले नाहींत. युरोपला आरंभ येथून झाला. या स्वर्गलोकांत प्लेगचा प्रवेश होऊं नये म्हणून एवढी काळजी घेतली जात आहे. प्लेगचे जंतू दहा दिवसपर्यंत सुप्तावस्थेंत राहूं शकतात, यामुळें आम्हांला दहा दिवसपर्यंत समुद्रांतच रहावें लागलें. आतां बोटीचा प्रवास दहा दिवसांवर होऊन गेल्यामुळें हा नियम आम्हांला लागू होणार नाहीं; पण इजिप्तच्या कोठल्याही बंदराला आमचा स्पर्श झाला, तर मात्र या नियमाच्या तडाख्यांत आम्ही सांपडूं. तसें झाल्यास नेपल्स किंवा मार्सेलिस येथें उतरण्याची परवानगी कोणासही मिळणार नाहीं, हें लक्षांत ठेवूनच आमच्या बोटीचा सारा कारभार चालला आहे; पण यामुळें एक तासाच्या कामाला एक दिवस लागतो. आमच्या बोटीला रात्रींसुद्धां कालव्यांतून पार होतां येईल, पण तसें करण्यास बोटीवर लांबवर उजेड फेकणारा मोठा विद्युद्दीप लावावा लागेल आणि हें करावयाचें म्हणजे कोणा तरी सुएझच्या रहिवाशाची मदत घेणें भाग पडेल. मग दहा दिवसांचें सुतक आलेंच! यासाठीं उजाडेपर्यंत आम्हांस ताऱ्याकडे पहात येथेंच स्वस्थ पडावें लागेल. येथील बंदर फार खोल असून आजूबाजूला लहान मोठ्या वाळूच्या टेकड्या आहेत. मासे आणि समुद्रसुसरी असंख्य असून

त्यांचे थवेच्या थवे हिंडतांना आढळतात. समुद्रसुसरींचा सुळसुळाट येथल्या-इतका दुसऱ्या कोठेंही नाहीं. याच्या खालोखाल ऑस्ट्रेलियांतील सिडने या बंदराचा नंबर लागतो. एकादा मनुष्य समुद्रांत पडण्याची खोटी कीं तावडतोब त्याचा फडशा उडतो. पाण्याला पाय लावण्याची छाती कोणालाही व्हावयाची नाहीं. उलटपक्षीं माणसांनींही यांच्यावर शस्त्र उचललें आहे. थोडी संधि सांपडतांच माणसें त्यांचा संहार करितात.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आमची न्याहारीसुद्धां झाली नव्हती तोंच मोठमोठ्या सुसरींचा एक थवा आमच्या बोटीमागें जमला असल्याचें समजलें. या सुसरी जिवंत अशा मीं कधीं पाहिल्या नव्हत्या आणि गेल्या खेपेला आमची बोट फारच थोडा वेळ येथें थांवली होती, आणि तीही जमिनीच्या अगदीं जवळ. तेव्हां या वेळची संधि साधण्याकरितां सुकाणूच्या बाजूकडे मी धांवत गेलों. पुरुष, बायका, पोरें या साऱ्यांनींच ही संधि साधण्यासाठीं मोठी गर्दी केली होती. पण प्रेक्षक जमत आहेत असें पाहून सुसरी तेथून निघून जाऊं लागल्या. यामुळें आम्हां प्रेक्षकांचा थोडा बहुत हिरमोड झाला. त्या वेळीं नाना प्रकारचे मासे मात्र समुद्रांत पुष्कळ हिंडत होते. मध्येंच एकादा प्रचंड मासा तीरासारखा इकडून तिकडे जाई. या माशाला बॅनिटो असें नांव आहे. हे मासे वाळवून बाहेर देशीं पाठविण्याचा धंदा बराच चालतो. बंगाल्यांतही हे वाळलेले मासे येतात असें मीं ऐकिलें आहे. यांचें मांस तांबड्या रंगाचें असून तें मोठें रुचकर असतें असें म्हणतात. एवढें मोठें धूड पाण्यांत बाणासारखें वावरतांना पाहून त्याच्या सामर्थ्याची कल्पना येते. पाणी स्वच्छ असल्यामुळें त्याच्या साऱ्या हालचाली आम्हांला स्पष्ट दिसत होत्या. अशा रीतीनें त्याजकडे पाहण्यांत आम्हीं अर्धा पाऊण तास काढला; आणि आतां कंटाळा येऊन आम्ही परत फिरणार तोंच 'अरे आला रे आला' अशी आरोळी आम्हांस ऐकूं आली. मीं समोर पाहिलें तों एक प्रचंड पदार्थ आमच्या बोटीकडे येत आहे असें मला दिसलें. हळू-हळू ही टेकडी जवळ येऊं लागली. त्याचें सपाट मस्तक आम्हांस दिसूं लागलें. बॅनिटोचें चापल्य या गृहस्थांत नव्हतें. पायघड्या घातल्यासारखा हा गृहस्थ मोठ्या डौलानें चालत होता. त्याच्या आजूबाजूला पुष्कळ लहान लहान मासे चालत होते. कित्येक त्याच्या पाठीवर चढून खेळत होते, कित्येकांनीं

त्याच्या गळ्याला मिठी मारली होती; हेच आमचे मगरमहाराज ! आपल्या साऱ्या परिवाराला बरोबर घेऊन ते येत आहेत ! पुढें चालत असलेल्या माशांकडे मार्गदर्शकाचें काम त्यांनीं दिलें आहे. भक्ष्य दिसल्यास महाराजांना त्याची वर्दी द्यावयाची हें यांचें काम आहे. मग खूष होऊन महाराजही त्यांना आपल्या भक्ष्याचे लहानसहान तुकडे देतात. पण या महाराजांचें प्रचंड जाबाड पाहिलें म्हणजे त्यांतून कांहीं शिल्लक उरत असेल कीं नाहीं, याची शंकाच आहे. आजूबाजूचे हिंडणारे मासे ही जणूं काय त्याची प्रजाच आहे. मगरमहाराजांच्या आंगाला चिकटणारे किडे भक्षण करून ही प्रजा आपली उपजीविका करते. प्रत्येक मगराबरोबर हे दोन जातीचे मासे नेहमीं असतात. हे आपले प्रजाजन असें समजून मगरमहाराजही त्यांना त्रास देत नाहींत. या माशांचीं शरीरें चिकट असतात. त्यांना कशाचाही स्पर्श झाला तर त्या पदार्थाला हे मासे चिकटतात.

दुसऱ्या वर्गांतील उतारूंत मोठी खळबळ उडून गेली आहे. यांच्यापैकीं एक लष्करी गृहस्थ आहे, त्याच्या उत्साहाला तर पार राहिला नाहीं. सारी बोट धुंडाळून एक प्रचंड गळ त्यानें शोधून काढला. आपल्या इकडे विहिरींतून भांडीं काढण्याकरितां ज्या गळाचा उपयोग करितात, तशाच जातीचा हा आहे. या गळाला सुमारें शेरभर मांस त्यानें बांधिलें आणि एका जाड दोरखंडाला तो अडकविला. नंतर हा गळ पाण्यांत फेंकून दिला. बोटीच्या बाजूला पोलिसखात्याची एक होडी उभी होती. आमच्यापैकीं कोणीं बंदरावर उतरूं नये आणि बंदरावरील मनुष्यानें बोटीकडे येऊं नये म्हणून हा पहारा आम्हीं आल्यापासूनच बसला होता. या बोटीवर दोन शिपाई निजले होते. ही त्यांची पहारा करण्याची तऱ्हा पाहून बोटींतील उतारू त्यांची चेष्टा करीत होते. पण या पोलिसांचाही आतां मोठा उपयोग झाला. बोटीवरील गडबड ऐकून ते जागे झाले. त्यांतील एक गृहस्थ उठून उभा राहिला व आपल्या अधिकाराचे कपडे तो शोधूं लागला. गडबड आहे तेव्हां आपला अधिकार दाखविण्याची वेळ आली असावी असें त्याला वाटलें. पण बोटीवरील आमच्या लष्करी अंमलदारानें हुकाची दोरी त्याच्या हातीं दिली आणि हूक कांहीं अंतरावर नेऊन सोडण्यास सांगितलें. शिपाईबुवांनींही आपल्या बोटींतील लांब काठी बाहेर काढून तिच्या साहाय्यानें तो गळ पुढें ढकलला. पुढें काय होतें हें पहावयास आम्ही सारे उत्सुक होऊन

बसलों. मगरमहाराजांची स्वारी हालत डुलत पुढें येतच होती. आम्हा साऱ्यांचे डोळे त्याजकडे लागले होते. त्याला येण्यास किती तरी वेळ लागतो असें आम्हांस वाटलें; पण जगांतील प्रत्येक गोष्टीला शेवट हा आहेच. आमच्या बोटीपासून थोड्याच अंतरावर एखाद्या प्रचंड पखालीसारखा पदार्थ आम्हांस दिसला. त्याबरोबर ' मगर मगर ' अशी हाकाटी सर्वत्र झाली. ' अरे, ओरडूं नका ' असेंही कांहीं जण ओरडूं लागले. ' आपल्या पांढऱ्या टोप्या काढून हातीं घ्या, नाहीं तर मगर बिचकेल.' अशीही सूचना कोणीं पुढें आणिली. मगर गळाच्या जवळ आला. त्याला लाविलेल्या आमिषावर आतां तो खचित तोंड टाकील असें आम्हांस वाटलें. इतक्यांत त्याच्या गतीची दिशा थोडी बदलली. अरेरे ! हा तर पलीकडे चालला. पण छे, त्याचें शेंपूट पुन्हां एकदां वांकडें झालें. त्याचा देह आमिषाकडे वळला. पुन्हां तो त्या दिशेनें पुढें सरकला. पण आमिषावर तोंड न टाकतां त्यानें आणखी एक पलटी खाल्ली. आमची निराशा होऊं लागली. पण अखेरीस त्यानें गळ गिळल्याचें दिसलें. ' खेंचा, खेंचा ' असा कोलाहल सर्वत्र सुरू झाला. चाळीस पन्नास उतारू दोरी खेंचण्यास पुढें सरसावले. तो मगर तरी किती धडपड करीत आहे पहा ! एकदां या कुशीवर आणि एकदां त्या कुशीवर अशा रीतीनें तो एकसारखा वळवळत आहे. दोरी खेंचण्याचा सपाटा सारखा सुरूच होता. पहा, मगर हळूहळू पाण्यावर ओढला जाऊं लागला. ' खेंचा, खेंचा !' अरेरे, पण हें काय झालें ? आपल्या तोंडांतून त्यानें गळ बाहेर टाकला. मगर पळून गेला मग आमच्या बोटीवरील गडबड काय विचारतां ? ' तुम्ही किती मूर्ख आहां रे ? त्याला गळ गिळण्याससुद्धां तुम्ही अवधी दिला नाहीं. इतकासुद्धां धीर तुम्हाला निघाला नाहीं. बरें जाऊं द्या. गेल्यावर आतां रडून काय उपयोग ? मगर पार निघून गेला. आपल्यापुढें चालणाऱ्या देहरक्षकांच्या हलगर्जीपणाबद्दल मगरमहाराजांनीं त्यांचे कान उपटले कीं नाहीं याची खबर आम्हांस अद्यापि मिळाली नाहीं. मगरमहाराज साफ निसटून गेले एवढें मात्र खरें. या मगराच्या आंगावर वाघासारखे काळे पट्टे होते. आमच्या गळाचा टप्पा सोडून आपल्या साऱ्या परिवारासह निघून जाऊन तो दिसेनासा झाला.

पण अगदींच निराश होण्याचें कारण नाहीं. एक वाघोबा निसटून गेले तर त्यांच्या ऐवजीं समोरून दुसरे येत आहेत. बिचाऱ्या मगरांना बोलतां येत असतें

तर पूर्वीच्या मगरानें या नव्या गृहस्थाला आगाऊ सूचना देऊन सावध केलें असतें; आणि दुसऱ्यानेंही यासंबंधीं त्याच्याशीं भाषण केलें असतें. पण असा कांहीं प्रकार न घडल्यामुळें नवा मगर हळूहळू पुढें येत होता. मगरांना बोलतां तरी येत नसावें किंवा बोलतां येत असेल तर पाण्याच्या खालीं शब्द उमटत नसावा; कदाचित् आणखीही एक गोष्ट असेल. हे पाण्यांतले वाघोवा मनुष्याच्या सहवासांत अधिक येत असल्यामुळें मनुष्यस्वभावाचा कांहीं अंश त्यांनीं आपलासा केला असावा. स्पष्ट आणि खरें बोलण्याऐवजीं त्या पहिल्या वाघोबानें खोटेंच हंसून 'बरें आहे ना ?' एवढें म्हणून पुढें चाल केली असावी. आपण एकट्यानेंच मूर्ख ठरूं नये हा मनुष्याला शोभणारा विचार त्याच्याही डोक्यांत आला असावा.

बंगालींत एक कविता आहे. 'प्रथम भगीरथ शंख वाजवीत जातो, आणि मागोमाग गंगा येते,' असा या कवितेचा आशय आहे. आम्हांला शंखनाद कांहीं ऐकूं आला नाहीं, पण पुढें वाटाडे मासे मात्र चालतांना दिसले. मागोमाग मगरमहाराजांची स्वारी सपरिवार येत होती. आम्हीं लावलेला गळ अद्यापिही तेथेंच तरंगत होता. एवढें सुंदर आमिष टाकून पलीकडे कोण जाणार ? शंखासारख्या निवळ पाण्यांत हा पांढरा, पिंवळा, शेंदरी पदार्थ किती सुंदर दिसत होता ? त्याचा सुवास किती पसरला असेल हें एक मगरमहाराजच जाणत !

'खामोश ! हां हिंडू नका. सावधपणें गुपचिप उभे रहा. पण दोरीच्या जवळपासच असा बरें !' आले, मगरबुवा गळाजवळ आले. ते हुंगून पहात आहेत. त्यांनीं गळावर तोंड टाकलें. थांबा, त्यांना गळ पुरता गिळूं द्या. चूप, चूप, ते पहा उलटे फिरत आहेत. थांबा, आणखी वेळ जाऊं द्या. इतक्यांत गळ पुरता गिळून वाघोबा दुसरीकडे जाऊं लागले. खेंचा, पांचपन्नास मनुष्यें दोरखंड ओढूं लागलीं. म्हातारे, तरणे सारे एकदिलानें दोर ओढूं लागले. 'खेंचो ! डोकें पाण्यावर आलें.' 'जोरसे खेंचो.' अर्धें शरीर पाण्यावर दिसूं लागलें. आतां त्याचा सारा देह पाण्याबाहेर दिसूं लागला. अबब ! केवढें जाभाड हें ! ! जाभाड आणि घसा एवढ्यांतच जणूं काय सारें शरीर आलें. त्याचें जाभाड फोडून गळ बाहेर पडला आहे. सबूर, सबूर ! ए अरब पोलिस, त्याचें शेंपूट त्या दोरीनें गुंडाळ पाहूं ? हां संभाळ, शेपटीचा एकादा तडाखा बसला तर 'अल्ला' म्हणावें लागेल. त्याच्या

तडाख्यानें घोड्याची कंबरसुद्धां साफ मोडून जाते. केवढें प्रचंड धूड हें ! अरे, याच्या पोटाखालीं हें काय वरें असावें ? कांहीं का असेना. खेंचो भाई ! पहा रक्ताची नुसती धार लागून राहिली आहे ! त्याला आतां ओढून घ्या. छे ! छे ! आपल्या कपड्यांकडे आतां पाहूं नका. त्यांना रक्ताचें स्नान होणारच. पण संभाळा वरें. अजून तो मेला नाहीं. त्यानें कोणाला डास मारला तर एकादा हात समूळ उपटून काढील. त्याच्या मस्तकावर त्या मोठ्या दांडक्यानें प्रहार केले पाहिजेत. 'अहो लष्करी महाराज, हें काम तुमचें. असले खून करण्यांत तुम्हीच पटाईत.' यावर तो अधिकारी म्हणाला, 'बरोबर, हें काम माझेंच.' असें म्हणून बोटींतलें एक लाकडी तुळवट त्यानें उचललें, आणि मगराच्या मस्तकावर तो धडाधड प्रहार करूं लागला. बायका आरडा ओरडा करूं लागल्या. 'अरे, काय हा निर्दयपणा ! त्याला मारूं नका.' पण तोंडानें असें म्हणत असतां त्या तेथून हालल्याही नाहींत. पण हें वर्णन आतां पुरे. त्या मगराचें पोट त्या राक्षसांनीं कसें चिरलें आणि त्यांतून येणाऱ्या रक्तमांसांचा चिखल कसा झाला याचें वर्णन मी आतां करीत नाहीं. मी इतकेंच सांगतों कीं, त्या दिवशीं मला जेवण गेलें नाहीं. माझें नाक त्या मगराच्या घाणीनें कोंदलें होतें.

सुएझचा कालवा म्हणजे कृत्रिम पाटबंधारे बांधण्याच्या विद्येची एक विजय-पताकाच होय. फर्डिनंड लेसेप्स नांवाच्या एका फ्रेंच एंजिनियरनें हा कालवा बांधला. भूमध्य व तांबडा हे दोन समुद्र या कालव्यानें जोडले आहेत, आणि यामुळें युरोप आणि हिंदुस्थान यांतील व्यापाराला मोठी सोय झाली आहे.

प्राचीन काळापासून आतांपर्यंत मानवी समाजाची जी संकृति बनत आली आहे, तिच्यांत हिंदुस्थानचा व्यापार हा एक महत्त्वाचा घटक आहे. हिंदुस्थानाइतकी सुपीक जमीन इतरत्र कोठेंही नाहीं. त्याचप्रमाणें पूर्वी उद्योगधंद्यांतही आपल्या देशानें सर्वांस मागें टाकलें होतें. सुती कापड, कापूस, ताग, नीळ, लाख, तांदूळ, हिरे, मोत्येंसुद्धां साऱ्या जगाला पुरविण्याचा मक्ता एका शतका-पूर्वी हिंदुस्थानाला होता. किनखाब, शाली इत्यादि उंची रेशमी आणि लोकरीचा मालही हिंदुस्थानाइतका दुसऱ्या कोठेंच चांगला होत नव्हता. त्याचप्रमाणें लवंगा, वेलदोडे, मिरीं, जायफळें, जायपत्री इत्यादि मसालाही हिंदुस्थानांतूनच बाहेर जात असे. यामुळें जगांतील कोणताही देश व्यापारधंदा करण्याइतका

सुधारला कीं हिंदुस्थानाशीं त्याचा संबंध स्वाभाविकपणेंच येत असे. या साऱ्या वस्तूंसाठीं हिंदुस्थानाकडे येण्याशिवाय त्याला गत्यंतरच नव्हतें. हा सारा व्यापार मुख्यतः दोन मार्गांनीं होत असे. खुष्कीच्या मार्गानें अफगाणिस्थान आणि इराण यांच्या द्वारें आणि पाण्यांतून तांबड्या समुद्राच्या द्वारें. शिकंदर बादशहानें इराण देश जिंकल्यानंतर न्यूआर्कस नांवाच्या मनुष्यास समुद्रमार्ग शोधून काढण्यास पाठविलें. बाबिलोन, इराण, ग्रीस आणि रोम येथें हिंदुस्थानाचा व्यापार किती मोठा चालत असे, याची बहुतेकांस कल्पना नाहीं. पुढें रोमन साम्राज्याचा अंत झाला तेव्हां बगदाद, वेनिस आणि जिनोवा हीं तीन मुख्य व्यापारी पथकें बनलीं. हिंदुस्थानाचा सारा व्यापार या बंदरांशीं होता. पुढें रोमन साम्राज्य बहुतांशीं मुसलमानांच्या हातीं गेलें. त्यांनीं समुद्रमार्ग व्यापाराला बंद करून टाकला, तेव्हां जिनोवा येथील कोलंबस नांवाचा मनुष्य नवीन मार्ग शोधण्यासाठीं बाहेर पडला. अटलांटिक महासागर ओलांडून आपण हिंदुस्थानाला पोंचूं अशी आशा त्याला वाटत होती. त्याला हिंदुस्थानचा मार्ग सांपडला नाहीं तरी त्या प्रयत्नांत अमेरिकेचा शोध लागला. पण त्याच्या डोक्यांत हिंदुस्थानचें खूळ इतकें भरलें होतें कीं, हाच हिंदुस्थान देश असें तो म्हणूं लागला. यामुळेंच अमेरिकेंतील मूळच्या लोकांना इंडियन असें नांव पडलें आणि तें आजपर्यंत चालू आहे. सिंधु नदीला सिंधु आणि इंदु अशीं दोन नांवें आढळतात. इराणी लोकांनीं इंदूचें हिंदु केलें आणि ग्रीकांनीं इंडस केलें; आणि यांतूनच पुढें 'इंडिया' हें नांव उद्भवलें. महंमदी साम्राज्याच्या उदयानंतर हिंदु शब्दाचा अर्थ काळा असा होऊं लागला. हिंदु हा शब्द कमीपणाचा दर्शक झाला. आज 'नेटिव्ह' या शब्दाला जी किंमत आहे, ती त्या काळीं 'हिंदु' शब्दाला होती.

पुढें पोर्तुगीज लोकांनीं आफ्रिकेला वळसा घालून येणारा नवा समुद्रमार्ग शोधून काढला. यामुळें पोर्तुगाल देशाचें नशीब फळफळलें. त्यांची सुबत्ता पाहून फ्रेंच, डच, डेन, इंग्रज इत्यादि लोकही हिंदुस्थानाकडे धांवत सुटले. अखेरीस हिंदुस्थानाचा व्यापार, त्याचें उत्पन्न किंबहुना सर्वस्व सांप्रत एकट्या इंग्रजांच्या हातीं आलें; आणि यामुळेंच इंग्लंड आज साऱ्या जगाच्या अघाडीस आहे. आतां हा मामला हळूहळू बदलूं लागला आहे. हिंदुस्थानांतील जिन्नस अमेरिकेंत आणि दुसऱ्याही कोठें कोठें निर्माण होऊं लागले असून त्यांनीं हिंदी जिनसांवरही

ताण केली आहे. यामुळें हिंदुस्थानी जिनसांना पूर्वीइतका मान आतां राहिला नाहीं. या साऱ्या बाबतींत एका काळीं हिंदुस्थान अघाडीस होता, ही गोष्ट युरोपियन लोकांस कबूल करणें कसेंसेंच वाटतें. आपली सारी संपत्ति आणि संस्कृति यांचें बीज या 'नेटिव्हां'कडून आलें आहे, ही गोष्ट तर ते कबूल करीतच नाहींत, पण ती समजावून देण्याचा यत्न कोणीं केला तर ती ते ध्यानांतसुद्धां घेत नाहींत; पण ही वस्तुस्थिति त्यांच्या घशांत कोंबून त्यांच्या मेंदूला ती पटविण्याचा अट्टाहास आपण करीत राहिलें पाहिजे.

आमच्या हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांची आणि त्यांच्याच वर्गातल्या इतरेजनांची काळजी कोणीच करीत नाहीं. परकीयांनीं त्यांना जिंकलें आणि स्वकीय त्यांना तुच्छ समजतात, तथापि अनादि कालापासून सर्व देशाचा भार त्याच लोकांनीं उचलला आहे. ते जन्मभर कष्ट करतात, पण या कष्टांबद्दल पोटभर खावयास मिळालें नाहीं तरी त्याबद्दल ते कुरकुर करीत नाहींत. याचा परिणाम काय होणार याचा तूं आपल्या मनाशींच विचार कर. सृष्टीच आतां ही स्थिति बदलूं पाहात आहे. सारें जग हळूहळू निराळ्या मार्गाकडे वळत आहे, आणि ही गोष्ट सृष्टीच्या कायद्याला अनुसरूनच आहे. सर्व देशांत आणि सर्व संस्कृतींत क्रांति होऊं लागली आहे. ज्या वर्गानें आजपर्यंत हाल सोसले, तो वर्ग आतां मोठेपणास चढून सत्ताधीश होणार आहे. हा प्रकार सर्व देशांतच आढळून येत आहे. पूर्वीही असेंच झालें. बाबिलोन, इराण, ग्रीस, रोम, व्हेनिस इत्यादि ठिकाणींही संस्कृतीची उलथापालथ अशीच झाली, आणि हिंदुस्थानांतही तोच प्रकार घडून येणार आहे. अहो स्वामीमहाराज, अशा स्थितींत तुमची वाट काय होणार ? तुमची काळजी कोण करणार ? तुमचा विचारसुद्धां कोणाच्या मनांत येणार नाहीं. तुमच्या बापदाद्यांनीं कांहीं तत्त्वग्रंथ लिहिले, डझन अर्धा डझन वीर-काव्यें लिहिलीं, आणि हजार पांचशें देवळें बांधिलीं. त्यांची कर्तबगारी कायती इतकीच. पण तिच्याबद्दल आकाश फाटून जाईल अशा विजयाच्या आरोळ्या तुम्ही मारतां. पण जगाच्या संस्कृतीची इमारत उठविण्यासाठीं ज्यांच्या रक्तानें तिचा पाया घातला गेला, ते बिचारे कांहींच बोलत नाहींत. ते बोलूनचालून पायांत अदृश्य झाले. मग त्यांजकडे पाहातो कोण आणि त्यांचें कौतुक करतो कोण ? तत्त्वज्ञानी, जगज्जेते शूर पुरुष आणि महाकवी हे साऱ्यांच्या नजरेसमोर

असतात. यामुळें त्यांना देव्हाऱ्यांत वसवून सर्व जग त्यांची पूजा करतें. पण ज्यांच्याकडे कोणी पाहात नाहीं, ज्यांना कोणाकडून सुखाचा एक शब्दसुद्धां प्राप्त होत नाहीं, ज्यांना कोणाकडून उत्तेजन मिळत नाहीं, इतकेंच नव्हे तर उलट ज्यांना लोक तुच्छ समजतात, ते बिचारे लोक इतक्या हाल अपेष्टांतही आपली शांति ढळूं देत नाहींत, त्यांचा धीर खचत नाहीं, त्यांची भक्ति थंडावत नाहीं, त्यांचा व्यवहार अडून पडत नाहीं. आमचे सामान्य शेतकरी अशा रीतीनें आपापलीं कर्तव्यें संभाळून कुरकुर न करितां आपला सारा जन्म काढीत असतात. एवढे कष्ट भोगीत असतांही तोंडांतून चकारसुद्धां न काढणें यांत कांहींच शौर्य नाहीं असें तुम्हांला वाटतें काय ? एकाद्या प्रसंगीं एकादा नेभळटही मोठ्या धाष्टर्याचें काम करून जातो, भित्र्यांतला भित्रासुद्धां प्रसंगाच्या भरीं भरून आपला जीव देतो, एकादा कृपण प्रसंगीं कर्णालाही लाजवितो, आणि अशी एकादी गोष्ट पाहिली कीं, केवढा हो हा मोठा असें म्हणणारे हजारों लोक त्याजभोंवतीं जमतात, त्याचीं स्तोत्रें गाऊं लागतात. पण कोणाची दृष्टि नसतां स्वतःच्या स्तुतीचा शब्दही कानीं पडत नसतां आपलीं बारीक सारीक कामेंसुद्धां केवळ स्वधर्म म्हणून जो जन्मभर करीत राहातो, तोच खरा पुण्यात्मा; तोच खरा निरपेक्ष. आमच्या हिंदुस्थानांतील शेतकरी वर्ग या कोटींतला आहे. या वर्गाला माझे शतशः प्रणाम आहेत.

सुएझचा कालवा हीसुद्धां एक प्राचीन वस्तु आहे. इजिप्त देशांत, जुन्या काळीं लहान लहान प्रवाह एकमेकांस जोडण्यांत आले होते, आणि या प्रवाहांचीं दोन्ही तोंडें दोन समुद्रांस जोडलीं होतीं. मिसर देश रोमन साम्राज्याच्या ताब्यांत गेल्यानंतरसुद्धां हा जलमार्ग चालू ठेवण्याची खटपट सुरूच होती. पुढें मुसलमानांनीं इजिप्त देश जिंकला, त्या वेळीं वेगवेगळे भाग खणून टाकून या मार्गाचें जुनें स्वरूप मुसलमानांनीं पूर्णपणें पालटून टाकलें.

यानंतर या कार्याकडे कोणीं फारसें लक्ष दिलें नाहीं. हल्लींचा कालवा इजिप्तचा खेदिव इस्माइल यानें खोदविला. या कामाची पाहाणी एका फ्रेंच एंजिनियरानें केली होती, आणि या कामाला लागणारा पैसाही फ्रान्समध्येंच गोळा केला होता. हा कालवा शुष्क वालुकामय अरण्यांतून जात असल्यामुळें आजूबाजूच्या वाळूनें तो वरचेवर ओहरतो हीच मोठी अडचण आहे. बऱ्याच मोठ्या आका-

राची एकच व्यापारी बोट या कालव्यांतून जाऊं शकते. पण प्रचंड मन्वारें अथवा तितक्याच मोठ्या व्यापारी बोटी यांतून जाऊं शकत नाहींत असें ऐकतों. एकमेकांच्या उलट दिशांनीं येणाऱ्या बोटींची टक्कर होऊं नये म्हणून कालव्यांत जागोजाग फांटे काढले आहेत. या फांट्यांत वेळेला दोन तीन बोटीही सामावूं शकतात. कालव्याच्या कारभाराचें मुख्य ठिकाण भूमध्य समुद्राच्या नाक्यावर आहे; आणि सर्व कालवाभर आगगाडीसारखीं स्टेशनेंही आहेत. बोटीनें कालव्यांत प्रवेश केल्यावरोबर ती खबर मुख्य ठिकाणाला पाठविली जाते. कालव्यांत बोटी किती आहेत आणि त्या कोणकोणत्या स्थळीं आहेत, याची बित्तंबातमी तारांच्या द्वारें मुख्य ठिकाणाला येत असते. या साऱ्या बातम्यांची नोंद एका मोठ्या नकाशावर केली जाते. कालव्याच्या अरुंद भागांत बोटींची समोरांसमोर गांठ पडूं नये म्हणून आगगाडीप्रमाणें 'लाइन क्लीअर' मिळाल्यावांचून कोणतीही बोट स्टेशनांतून सोडण्यांत येत नाहीं.

या कालव्याची सारी व्यवस्था फ्रेंचांच्या हातीं आहे. कनाल कंपनीचे पुष्कळसे भाग आतां इंग्रजांच्या हातीं आले असले तरी सारी व्यवस्था फ्रेंचांच्याच हातीं राहावी असें दोघांच्या संमतीनें ठरलें आहे.

हा पाहा, बोलतां बोलतां भूमध्य समुद्र आला. येथें आशिया खंडाची मर्यादा संपली. त्याचप्रमाणें आफ्रिकेचीही हद्द संपली. जुनी संस्कृति येथें संपून यापलीकडे नव्या संस्कृतीचें साम्राज्य सुरू झालें. एका जातीच्या रीतीभाती संपून दुसऱ्या जातीला सुरवात झाली. कपडेलत्ते, खाणेंपिणें आणि स्वभावसुद्धां येथून वेगळा लागला. आम्हीं युरोपांत प्रवेश केला. यामुळें हें ठिकाण मोठें मननीय झालें आहे. केवळ वेगळ्या चालीरीतींमुळेंच नव्हे, तर जगाच्या दोन संस्कृतींची भेटण्याची जागा म्हणूनही हें स्थळ लक्षांत ठेवण्यासारखें आहे. यामुळें येथें नाना वर्णांचें, मानववंशांचें, संस्कृतींचें आणि चालीरीतींचें विलक्षण मिश्रण आढळतें. हल्लीं ज्या संस्कृतीनें सारें जग आक्रमण केलें आहे, त्या संस्कृतीचें जन्मस्थान हेंच. भूमध्यसमुद्राच्या दक्षिणेला अत्यंत प्राचीन असा मिसर देश आहे. संपत्ति आणि उद्भिज्जपदार्थ यांचें वैपुल्य एका काळीं येथें होतें. शिल्पकला येथेंच जन्मास आली. या समुद्राच्या पूर्वभागाला आशिया मायनर आहे. प्राचीन फिनीशियन, कवडी कवडी करणारा यहुदी, शूर बाबिलोनियन, असीरियन,

इराणी इत्यादिकांची खिचडी येथें आहे. उत्तरेस ग्रीक लोकांचा उदय होऊन त्यांनीं एका काळीं आपली संस्कृति युरोपला दिली.

असो; स्वामीमहाराज, नाना देशांचें, पर्वतांचें, नद्यांचें आणि समुद्रांचें वर्णन आतां पुरे झालें. आतां थोडासा प्राचीन इतिहास सांगतों. हा इतिहास मोठा कौतुक वाटण्यासारखा आहे. या पोकळ दंतकथा नसून हा मानववंशाचा खरा इतिहास आहे. पुष्कळ काळपर्यंत हा इतिहास विस्मृतीच्या दरींत गडप होऊन बसला होता. जुन्या ग्रीक दंतकथा आणि यहुद्यांनीं वर्णिलेले चमत्कार एवढ्याच गोष्टी आपणांस अवगत होत्या. पण आतां जुने शिलालेख, इमारती आणि इतर अवशेष उघडकीस आले असून ते जुन्या इतिहासाचें कथन सुसंबद्ध रीतीनें करीत आहेत. या कामाला नुकता आरंभच झाला असला, तरीसुद्धां तेवढ्यावरून मिळणारी माहिती मोठी आश्चर्यजनक आहे. भविष्यत्कालीं आणखी काय काय चमत्कार बाहेर पडतील हें कोणीं सांगावें ? साऱ्या जगांतील महापंडित येथें अहोरात्र डोकीं खाजवीत बसले आहेत. एकादा धोंड्याचा तुकडा, एकादें फुटकें मडकें किंवा भांडें, अथवा एकादा विटेचा तुकडा हातीं लागला कीं त्याच्या पोटांतून काय बाहेर पडणार म्हणून हे पंडित त्याजकडे मोठ्या आशेनें डोळे लावून बसतात.

मुसलमानांचा पुढारी उस्मान यानें कुस्तुंतुनिया शहर जिंकलें आणि इस्लामचें निशाण त्यावर चढविलें. हळूहळू युरोपचा पूर्वभाग या निशाणाच्या अमलाखालीं आला. इस्लाम पुढें सरूं लागला आणि ग्रीक लोकांच्या पीछेहाटीस सुरवात झाली. ते युरोपांत पसरूं लागले आणि त्यांजबरोबर त्यांचें ज्ञानही युरोपांत गेलें. जी विद्या आणि संस्कृति त्या काळापर्यंत त्यांनीं जतन करून ठेविली होती, ती त्यांनीं युरोपच्या स्वाधीन केली. ग्रीक लोक रोमन साम्राज्याच्या सत्तेखालीं दीर्घ काल होते, तरी विद्या आणि संस्कृति या बाबतींत रोमन लोकांचे ते गुरु होते, यांत संशय नाहीं. ग्रीक लोकांनीं ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला आणि बायबल हा धर्मग्रंथ ग्रीक भाषेंत आणला. ग्रीक लोक गुरुस्थानीं असल्यामुळें आपल्या भाषेचा आणि तिजबरोबरच ख्रिस्ती धर्माचाही प्रसार त्यांनीं रोमन साम्राज्यांत केला. रोमन साम्राज्यांत राजकीय सत्ता हातीं नसतांही ग्रीक लोकांना कोणतें स्थान प्राप्त झालें होतें हें यावरून उघड दिसतें. तथापि यवन या संज्ञेनें ज्या प्राचीन

ग्रीक लोकांस आपण ओळखतों, तेच युरोपीय संस्कृतीचे आद्यजनक होत. ख्रिस्ती धर्माचा उदय होण्यापूर्वींसुद्धां संस्कृतीच्या कळसास ते पोंचले होते. ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केल्यानंतर त्यांची प्राचीन संस्कृति आणि विद्याही नष्ट झाली. तथापि ही विद्या त्यांच्यांतून गेली तरी तिचा प्रवेश युरोपांत झाला. ह्या प्राचीन विद्येचा कांहीं भाग आर्यावर्तांतही येऊं लागला आहे. या विद्येनेंच इंग्रज, जर्मन, फ्रेंच इत्यादि राष्ट्रांच्या संस्कृतीचा पाया घातला. ग्रीक भाषा, ग्रीक विद्या आणि ग्रीक कला यांचें वेड एका काळीं युरोपास लागून राहिलें होतें. ग्रंथांतील विचा-रांचें तारतम्य न पाहातां ग्रीक ग्रंथांत असेल तें सारें खरें, असें म्हणण्याचा तो काळ होता. पुढें युरोपीय लोकांच्या बुद्धीचा उदय होऊं लागला व आधिभौतिक शास्त्रें निर्माण होऊन वाढीस लागलीं, यामुळें त्यांच्यांत शोधक बुद्धि उत्पन्न होऊं लागली. ग्रीक ग्रंथांच्या उत्पत्तीचा काळ, त्यांचा कर्ता, त्यांतील विषय इत्यादि-कांची छाननी होऊं लागली. मूळ संहिता शुद्ध आहे कीं तींत पुढें क्षेपक भाग शिरला आहे, याचाही विचार युरोपियन पंडित करूं लागले. धर्मावरील पुस्तकें वगळून बाकीच्या कोणत्याही विषयावरील पुस्तकांसंबंधीं आपलें मत अगदीं मोकळेपणें देण्याची सवड त्यांना मिळाली होती. यामुळें ग्रंथसंशोधनाचें एक शास्त्रच बनून गेलें आहे.

अमुक अमुक गोष्ट अमुक काळीं घडली असें एकाद्या ग्रंथांत लिहिलें असलें, तरी तेवढ्यावरून ती तशीच घडली असेल, असा निश्चय करण्याचें प्रयोजन नाहीं. कोणींही उठावें आणि मन मानेल तें खरडून ठेवावें, अशी रीत प्राचीन काळीं होती. त्यांतून त्या काळच्या लोकांना सृष्ट पदार्थांचें ज्ञानही फार कमी होतें. फार काय, पण ज्या पृथ्वीवर आपण राहातों तिची माहितीही त्यांना फारशी नव्हती. यामुळें त्या काळच्या लेखांतून अवास्तव मजकूर किती तरी आढळतो. तर्कशास्त्राला सोडून असलेल्या अनेक गोष्टी आढळून आल्या, तेव्हां युरोपियन पंडितही साशंक होऊं लागले. लेखकाचा मजकूर दुसऱ्या पडताळयाच्या पुराव्यानें खरा ठरतो कीं नाहीं, हें पहाण्याकडे त्यांची बुद्धि वळली. हिंदुस्थानांत अमुक अमुक काळीं चंद्रगुप्त नांवाचा राजा होऊन गेला, असा मजकूर एकाद्या ग्रीक लेखांत आढळला, तर हिंदुस्थानावरील इतर ग्रंथांत त्याचा प्रत्यंतर पुरावा मिळेपर्यंत तो निःसंशय खरा मानूं नये, अशी युरोपीय पंडितांची प्रवृत्ति झाली.

चंद्रगुप्ताच्या काळचे शिलालेख, नाणीं, इत्यादि पुराव्याच्या आधारानें ग्रीक ग्रंथांतील मजकूर खरा ठरला, तरच तो निःसंशय खरा मानावा, असें या पंडितांनीं ठरविलें.

शिकंदर बादशहाच्या कारकीर्दीत अमुक एक गोष्ट घडली, असा उल्लेख सांपडला, परंतु त्याबरोबरच एक दोन रोमन बादशहांचा उल्लेख नसला, तर तो ग्रंथ शिकंदराच्या काळीं लिहिला गेलेला नव्हे असा निश्चय ते करतात. याशिवाय जुन्या ग्रंथांतील क्षेपक भागांचा विचार करणेंही अवश्य असतें. एकादा ग्रंथ लिहून दीर्घ काळ लोटल्यानंतरही एकादा लेखक आपल्या पदरचा भाग त्यांत घुसडतो.

ग्रंथाच्या कालनिश्चयांत भाषेचाही संबंध असतो. कालांतरानें प्रत्येक भाषेच्या रचनेंत फरक पडत असतो. याशिवाय प्रत्येक ग्रंथकाराचा स्वतःचा भाषाविशेष म्हणून असतो तो वेगळाच. कोठल्याही ग्रंथांत कोठें एकाएकीं विषयांतर झालें असलें आणि मूळ संहितेची परंपरा तुटत असली, तर हा मधला भाग क्षेपक असावा, असा निश्चय सहजच होतो. तसेंच मूळ ग्रंथकाराच्या भाषासरणींत मध्येंच कोठें बदल झालेला दिसला, तर तो भागही क्षेपक असावा, अशी शंका सहजच येते. अशा प्रकारें हें नवें संशोधनाचें शास्त्र बनलें आहे.

अर्वाचीन शास्त्रांची वाढ पुष्कळ झाली आहे; एवढेंच नव्हे तर कालदृष्ट्या ती अत्यंत झपाट्यानें झाली आहे. आधिभौतिक शास्त्रांनीं सृष्टीच्या अनेक गूढांचा उलगडा आतां करून टाकला आहे. यामुळें या शास्त्रांना अत्यंत महत्त्व प्राप्त झालें आहे. त्यांचा पगडा लोकांच्या मनावर इतका बसला आहे कीं, जुन्या ग्रंथांत कांहीं चमत्काराच्या गोष्टींचें वर्णन आलें कीं, ‘ अशास्त्र, झूट ’ अशी ओरड लोक ताबडतोब करितात.

युरोपांत संस्कृत भाषेचें अध्ययन आतां मोठ्या प्रमाणावर होऊं लागलें आहे. हिंदुस्थानांत, मिसर देशांत आणि युफ्रेटिस नदीच्या तीरीं सांपडलेल्या शिलालेखांचें वाचन तिकडील पंडित मोठ्या प्रमाणावर करूं लागले आहेत. त्याचप्रमाणें कित्येक स्थळीं भूमिगत झालेलीं देवळें व इमारती बाहेर येऊं लागल्या आहेत. या सर्व गोष्टींनीं प्राचीन इतिहासाचें ज्ञान पुष्कळच सुलभ करून ठेवलें आहे.

इतका शोध एका बाजूनें होत असतां जुनें बायबल अथवा नवा करार हीं मात्र या पंडितांच्या तावडींतून आजपर्यंत अजीबात सुटलीं होतीं. पण आतां

तोही मनु बदलला आहे. धर्माच्या नांवाखालीं माणसें जाळण्याचें आणि भयंकर अत्याचार करण्याचें युग विस्मृतींत गडप होऊन गेलें आहे. आतां जुना पुराणा भिक्षुक वर्ग काय बडबड करील तेवढीच. पण असल्या शुष्क बडबडीला भीक न घालतां या लेखांचे वाभाडे काढणारे पंडितही आतां पुष्कळ आहेत. हिंदु आणि इतर धर्मशास्त्रें हीं त्यांच्या घणाच्या तडाख्यांतून सुटत नाहींत. त्याच-प्रमाणें यहुदी आणि ख्रिस्ती शास्त्रांचेंही अध्ययन तितक्याच न्यायनिष्ठुरतेनें कर-णारा पंडितांचा वर्ग वाढत जाईल अशी आशा आपण करूं या. जुन्या इतिहा-साचा अभ्यास करणाऱ्या या पंडितांतही दोन प्रकार आहेत. ख्रिस्ती शास्त्र म्हटलें कीं, त्यांत लिहिलेलें सारें खरें, असें हठवादीपणानें म्हणणारे जुने पंडि-तही आजमितीस आहेत. एकच उदाहरण सांगतों. मास्पेरो नांवाच्या एका महापंडितानें मिसर देशाच्या प्राचीन इतिहासाचा मनःपूर्वक अभ्यास केला आहे. या विषयावर त्यानें एक प्रचंड ग्रंथ लिहिला आहे. थोड्या वर्षांपूर्वी या ग्रंथाचें इंग्रजी भाषांतर मीं वाचलें होतें. पुढें इंग्लंडांत गेलों तेव्हां ब्रिटिश म्यूझि-यममध्यें त्या ग्रंथाचा शोध मीं केला. पण तो भाषांतराचा ग्रंथ आतां निरुपयोगी ठरला आहे, असें तेथील अधिकाऱ्यानें मला सांगितलें. तो म्हणाला, 'हा भाषांतरकार जुनाट मतांचा ख्रिस्ती आहे. ख्रिस्ती धर्माला उणेपणा येईल असा मजकूर मूळ ग्रंथांत जेथें जेथें त्याला आढळला, तेथें तेथें विलक्षण ओढा-ताण आणि शब्दच्छल करून तो मजकूर आपल्या मतांस त्यानें जुळता करून घेतला आहे. यामुळें मूळ ग्रंथकाराच्या म्हणण्याचा आशय तुम्हांस कधींच कळावयाचा नाहीं. याकरितां मूळ फ्रेंच ग्रंथ तुम्ही वाचा.' यानंतर मीं मूळ ग्रंथ पाहिला तेव्हां त्याचें म्हणणें अगदीं खरें असल्याचा मला प्रत्यय आला. मुळांत आणि भाषांतरांत अगदीं जमीनअस्मानाचें अंतर! धर्ममतें ही एक और चीज आहे. सत्य आणि असत्य यांचें विलक्षण मिश्रण बनविण्याची हातोटी तिला चांगली साधली आहे. हा ग्रंथ वाचल्यानंतर एकंदरीनें सर्वच भाषांतरांसंबंधीं माझें मन कलुषित झालें आहे.

याशिवाय याच संबंधांत आणखीही एक शास्त्र निर्माण झालें आहे. विशिष्ट भूप्रदेशांतील रहिवाशांचा वर्ण, त्यांचे केंस, त्यांची देहयष्टि, मस्तकाचा आकार, भाषा, चालीरीती इत्यादिकांवरून त्यांच्या संस्कृतीचें अनुमान करावयाचें. जर्मन

लोक सामान्यतः सर्वच आधिभौतिक शास्त्रांत प्रवीण आहेत. तथापि संस्कृतांत तर त्यांचें प्राविण्य विशेष आहे. त्याचप्रमाणें जुन्या असीरियन संस्कृतीचा अभ्यासही त्यांनीं फारच उत्तम केला आहे. मिसरी संस्कृतीचा अभ्यास फ्रेंचांनीं विशेष केला आहे. त्याचप्रमाणें डच लोकांनीं ख्रिस्ती आणि यहुदी या धर्मांचा अभ्यास उत्तम प्रकारें करून जगभर लौकिक मिळविला आहे. इंग्रज लोक पुष्कळशा शास्त्रांमागें धांव घेतात, पण अर्ध्या रस्त्यांतूनच ते परत फिरतात.

आतां या शास्त्रज्ञांच्या मतांची थोडीशी दिशा तुम्हांला दाखवितों. तीं मतें तुम्हांला आवडलीं नाहींत, तर तीं खोडून काढण्याचा अधिकार तुम्हांला आहेच; पण हीं कडू मतें तुम्हांस सांगितल्याबद्दल मजवर रागावूं मात्र नका.

यहुदी, प्राचीन बाबिलोनियन, मिसरी इत्यादि सारे मानववंश मूळ एकाच बीजांतून उद्भवले असें मत बराच काळ प्रचलित होतें. तथापि त्यावर फारसा विश्वास आतां कोणी ठेवीत नाहीं. काजळाइतके काळे, बसक्या नाकाचे, जाड ओंठाचे आणि कुरळ्या केंसांचे काफिर तुम्हीं पाहिले असतील. त्याचप्रमाणें त्यांचे सख्खे अगर सावत्र भाऊ संताळ, अंदमानी, भिल्ल इत्यादि लोकही तुम्हीं पाहिले असतील. यांतील पहिल्या वर्गाचे लोकांना निग्रो असें म्हणतात. हे आफ्रिकेचे रहिवासी आहेत. यांच्याहून खालच्या प्रतीच्यांना निग्रिटो किंवा अल्प निग्रो अशी संज्ञा आहे. अरबस्थानाचा कांहीं भाग, युफ्रेटिस नदीचा कांठ, दक्षिण इराण, हिंदुस्थान, अंदमान इत्यादि ठिकाणीं या दुसऱ्या जातीची वस्ती प्राचीन काळीं पसरली होती. यांतील कांहीं लोक ऑस्ट्रेलियापर्यंतही गेले होते असें म्हणतात. सांप्रत यांची वस्ती हिंदुस्थानांतील कांहीं अरण्यें, अंदमान आणि ऑस्ट्रेलिया एवढ्या प्रदेशांतच आहे.

लेपूचा, भुतिया, चिनी इत्यादि पिवळे लोकही तुम्हीं पाहिले असतील. काळे सडक केस, काळे डोळे, स्वल्प दाढीमिशी, सपाट चेहरा आणि तोंडाचीं उंच हाडें, हे यांचे शरीरविशेष आहेत. त्याचप्रमाणें नेपाळी, ब्रह्मी, सयामी, मलायी आणि जपानी हेही सामान्यतः याच वर्गांतील आहेत. पण देहयष्टीनें ते ठेंगणे आहेत इतकेंच.

वर सांगितलेल्या या दोन वंशांना मांगोल आणि अल्प मांगोल अशीं नांवें आहेत. मांगोल वंशाचा मुख्य भरणा आशियाखंडांत आहे. त्या खंडाचा बराच

मोठा भाग त्यांनीं व्यापला आहे. कालमक, हूण, चिनी, तार्तार, तुर्की, मांच्यु, किर्गिझ इत्यादि शाखा याच वृक्षाच्या आहेत. यांतील कांहीं शाखा आपल्या वडाऱ्यांप्रमाणें सदोदित भटकणाऱ्या असून बकरींमेंढरें पाळून रानांतच वस्ती करणें अशी यांची चाल आहे. हिंडतांहिंडतां संधि सांपडेल त्या वेळीं टोळधाडी-प्रमाणें कोठेंतरी पडून चिरस्थायी वस्तीचा विध्वंस करण्याचाही धंदा हे लोक करितात. चिनी आणि तिबेटी लोक मात्र या सिद्धांतास अपवाद आहेत. याच वंशाला तुराणी असें दुसरेंही एक नांव आहे. इराणी, तुराणी हीं नांवें आपल्या देशांत आपल्या कानांवरून किती वेळां तरी गेलीं असतील. यांपैकीं तुराणी ते हे.

काळे सडक केंस, सरळ नाक आणि काळे विशाळ डोळे अशा प्रकारचे देह-विशेष असलेले लोक प्राचीन काळीं मिसर देशांत राहत होते. त्यांच्या वंशजांची वस्ती सांप्रत साऱ्या हिंदुस्थानभर पसरली आहे. विशेषतः दक्षिण हिंदुस्थानांत ती विशेष प्रमाणावर आहे. ही सारी वस्ती एकाच शाखेची असून तिला द्रविडी अशी संज्ञा आहे.

उत्तर अरबस्थानांतील अरब, अर्वाचीन यहुदी, प्राचीन बाबिलोनियन, असी-रियन, फिनीशियन इत्यादि शाखा ज्या मूळ वंशांतून निघाल्या त्यांस सेमिटिक असें नांव आहे. हा वंश गोऱ्या वर्णाचा, सरळ डोळ्यांचा, पण कान आणि नाक हे अवयव वांकडे असलेला असा आहे. त्यांचे ओंठ जाड आणि कपाळ मागें चपटें होत गेलेलें असतें.

संस्कृत आणि तिच्याच कुलांतल्या दुसऱ्या भाषा बोलणारे सरळ नाकाचे, सरळ मुखाचे आणि नेत्रांचे गौरवर्ण, काळ्या अथवा पिंगट केसांचे आणि काळ्या अथवा निळ्या डोळ्यांचे लोक आर्य वंशीय होत.

हल्लीं आढळून येणारे मानव वंश अगदीं निर्भेळ आहेत असें नाहीं. प्राचीन वंशांच्या भेळसेळींतून त्यांची उत्पत्ति झाली आहे. एकाद्या देशांत यांपैकीं एकाद्या वंशाचें आधिक्य झालें म्हणजे त्या वंशाची भाषा आणि त्याचे अवयवविशेष यांची छाप देशांतील साऱ्या वस्तीवर पडते. इतर वस्तीही त्यांचें अनुकरण करूं लागते.

उष्ण कटिबंधांतील लोक काळे आणि शीत कटिबंधांतले गोरे असा समज सार्वत्रिक आहे. तथापि पुष्कळ युरोपीय पंडित ही उपपत्ति मान्य करीत नाहींत. रक्तसंकरानें अनेकविध वर्ण उत्पन्न झाले असें त्यांचें मत आहे.

मिसर देश आणि प्राचीन बाबिलोनिया यांतील संस्कृति सर्वांत जुन्या आहेत असें विद्वान् लोक मानितात. मिसर देशांत आठ हजार वर्षांपूर्वीचे अथवा त्याहू-नही जुने असे इमारतींचे अवशेष आढळतात. हिंदुस्थानांत अगदीं जुन्या इमारती म्हटल्या म्हणजे चंद्रगुप्ताच्या काळच्या आहेत. म्हणजे खिस्ती शकापूर्वी तीनशें वर्षें इतकाच त्यांचा जुनेपणा आहे. याहून अधिक प्राचीन अवशेष अद्यापि सांपडले नाहींत. तथापि याहून अधिक प्राचीन ग्रंथ मात्र अस्तित्वांत आहेत. तितके प्राचीन ग्रंथ जगांत कोठेंही नाहींत. हिंदूंचे वेद ग्रंथ खिस्ती शतकापूर्वी निदान पांच हजार वर्षें अस्तित्वांत होते, ही गोष्ट पंडित बाळ गंगाधर टिळक यांनीं सिद्ध केली आहे.

भूमध्यसमुद्राचा किनारा हें अर्वाचीन युरोपियन संस्कृतीचें एक जन्मस्थान आहे. या संस्कृतीनें सारें जग व्यापलें आहे. याच किनाऱ्यांवर सेमिटिक आणि आर्यन या दोन संस्कृतींचा संयोग झाला आणि या संयोगांतून अर्वाचीन संस्कृतीचा जन्म झाला.

मिसर देशांत एक मोठी शिला सांपडली. या शिलेवर प्रथम कांहीं मजकूर सांकेतिक भाषेंत खोदला असून त्याच्या खालीं दुसरा एक मजकूर खोदला आहे. या दुसऱ्या मजकुराची लिपी ग्रीकलिपीच्या जवळ जवळ आहे; आणि याही मजकुराच्या खालीं आणखी एक लेख खोदला आहे. या तिन्ही लिप्या वेग-वेगळ्या असल्या, तरी त्यांतील मजकूर एकाच अर्थाचा असावा, अशी कल्पना एका पंडिताच्या मनांत आली. त्यानें त्यांतील एक मजकूर लावला. अशाच प्रकारें बाबिलोनियांत सांपडलेल्या विटा आणि कौलें यांजवरील मजकुराचाही उलगडा विद्वानांनीं हळुहळू केला. यानंतर कांहीं अशोककालीन लेख सांपडले. याहून जुने लेख अद्याप हिंदुस्थानांत मिळाले नाहींत. देवळें, स्तंभ इत्यादिकां-वरील सांकेतिक लेख वाचण्याचें काम अजूहीन मिसर देशांत चालू आहे; आणि यामुळें त्या देशाची प्राचीन संस्कृति अधिकाधिक प्रकाशांत येत आहे.

मिसर देशांतील प्राचीन रहिवासी दक्षिणेकडे असलेल्या कुंट नांवाच्या देशांतून समुद्र ओलांडून आले. हा कुंट देश म्हणजे सध्याचा मलबार होय असें कांहीं पंडितांचें मत आहे. हें खरें असेल तर सांप्रतचे मिसरी लोक आणि दक्षिण हिंदुस्थानांतील द्रविड यांचा मूळ वंश एकच असला पाहिजे, हें उघड आहे. या लोकांचा पहिला राजा मेनेस हा होता. यांचे धार्मिक आचार कांहीं अंशीं आमच्या प्राचीन दंतकथांशीं जुळते होते. यांच्या धार्मिक कथांचा थोडासा मासला देतों. शिवू या नांवाचा एक देव होता. त्याजभोंवतीं 'नूइ' नांवाच्या देवीनें वेष्टन घातलें. यानंतर 'शू' या नांवाचा दुसरा एक देव आला आणि त्यानें नुईचें उच्चाटन केलें. त्या वेळीं नुईचा देह आकाशरूप झाला, आणि तिचे दोन हात आणि दोन पाय यांचे चार खांब होऊन त्यांनीं आकाश तोलून धरिलें. नंतर शिवू देव पृथ्वीरूप झाला. ऑसिरिस या नांवाचा पुत्र आणि आयसिस् या नांवाची कन्या नुईच्या पोटीं जन्मली. प्राचीन मिसर देशांतील या मुख्य देवता होत. या देवतांच्या पोटीं जन्मास आलेला होरस देव सर्व मिसर देशभर पूज्य मानिला जातो. हें देवतात्रय एकत्र मांडून त्यांचें एकत्र पूजन करण्याचा प्रघात प्राचीन मिसर देशांत होता. आयसिस् या देवतेचें पूजन गाईच्या रूपांतही होत असे.

जमिनीवर ज्याप्रमाणें एक नाईल नदी आहे, त्याचप्रमाणें आकाशांतही एक नाईल आहे. पृथ्वीवरील नाईल म्हणजे आकाशनदीचा एक लहानसा भाग. सूर्य होडींत बसून पृथ्वीभोंवतीं प्रदक्षिणा करितो, असें मिसरी लोकांचें मत होतें. अहि या नांवाचा सर्प सूर्याला केव्हां केव्हां भक्षण करतो आणि त्या वेळीं ग्रहण लागतें.

चंद्रावर एक अस्वल हल्ला करितें आणि तें त्याचे फाडून फाडून तुकडे करितें. या आपत्तींतून चंद्र पंधरा दिवसांनीं पहिल्या सारखा होतो. मिसर देशांतील प्राचीन देवतांपैकीं कांहींचीं तोंडें कोल्ह्यासारखीं, कांहींचीं ससाण्यासारखीं, कांहींचीं गाईसारखीं आणि कांहींचीं दुसऱ्या जनावरांसारखीं होतीं.

मिसरी संस्कृतीबरोबर युफ्रेटिस नदीच्या तीरीं दुसरी एक संस्कृति जन्मास आली. बाल, मोलाक, इस्टार्ट आणि दामुझी या देवता या संस्कृतींत जन्मास आल्या. दामुझी देवाला एका अस्वलानें मारलें आणि इस्टार्ट त्याच्या शोधासाठीं पृथ्वीतळीं गेली. या ठिकाणीं आलाट नांवाची देवता होती, तिनें नानाप्रकारें

इस्टार्टेचा छळ केला. कितीही छळ झाला तरी दामुझीला घेतल्यावांचून आपण परत जाणार नाहीं असें इस्टार्टे म्हणाली. इस्टार्टे ही स्त्रीची देवता; ती परत पृथ्वीवर गेल्यावांचून पृथ्वीचें संवर्धन कसें होणार ? ती नसेल तर माणसें, पशुपक्षी आणि वनस्पतीसुद्धां निर्माण होणार नाहींत. तेव्हां सर्व देवांनीं मध्यस्थी केली आणि दामुझीनें पृथ्वीतळीं चार महिने वस्ती करावी आणि बाकीचे आठ महिने पृथ्वीवर यावें अशी तडजोड केली. ती मान्य करून इस्टार्टे पृथ्वीवर आली. त्यावरोबर वसंत ऋतूचें आगमन झालें आणि योग्य काळीं पृथ्वीवर फुलें, फळें आणि धान्य यांची समृद्धि झाली.

या दामुझी देवतेला आडुनाय् किंवा अडोनिस अशीं दुसरींही नांवें आहेत. सिमिटिक वंशांतील साऱ्या शाखांचा धर्म बहुधा एकच होता; त्यांत कोठें फरक असला तर तो अगदीं अल्प होता. बाबिलोनियन, यहुदी, फिनीशियन आणि नंतरचे अरब या सर्वांचा पूजाविधि एकच होता. मोलॉक हें त्यांच्या देवाचें नांव. हा शब्द बंगाली भाषेंत मलिक या अपभ्रंशाच्या रूपानें अद्यापिही रूढ आहे. मलिक म्हणजे शास्ता. मुलुक म्हणजे राज्य. अशा प्रकारें या प्राचीन शब्दाचें अस्तित्व अद्यापिही आढळून येतें. या वंशाचा 'आलात' या नांवाचा एक देव होता. याच शब्दाचा अपभ्रंश होऊन पुढें अरबांचा अल्ला निर्माण झाला असावा असें कांहीं पंडितांचें मत आहे.

या देवांच्या पूजाविधींत कांहीं अमानुष आणि भयंकर आचारही होते. मोलाक अथवा बागदेवापुढें मुलें जिवंत जाळीत. इस्टार्टे देवतेच्या देवळांत तर जो नंगा नाच चाले, त्याचें वर्णनही किळसवाणें आहे.

बाबिलोनियन वंशाच्या मानानें यहुदी वंशाचा इतिहास अर्वाचीन म्हटला पाहिजे. बायबल या संज्ञेनें जो धर्मग्रंथ ओळखला जातो, त्याच्या रचनेचा प्रारंभ ख्रिस्ती शकापूर्वी पांचशें वर्षें झाला असून त्याची पूर्तता ख्रिस्ती शकानंतर कित्येक वर्षांनीं झाली, असें पंडितांनीं निश्चित केलें आहे. बायबलांतील मुख्य मजकूर बाबिलोनियन वंशाला अनुलक्षून लिहिला आहे. जलप्रलय आणि सृष्टीची उत्पत्ति यांची जी कथा बाबिलोनियन लोकांत प्रसिद्ध होती, तिचा अंतर्भाव बहुतांशीं जशाचा तसाच बायबलांत झालेला आहे. आशिया मायनरच्या मुलखांत इराणी बादशहाचें साम्राज्य होतें, तेव्हां इराणी धर्माचीं पुष्कळशीं

मतें यहुदी लोकांत घुसलीं. ऐहिक जीवित इतकेंच कायतें खरें जीवन आणि यापलीकडे दुसरें कांहीं अस्तित्व नाहीं, आणि मनुष्याला आत्मा म्हणून कांहीं वेगळा पदार्थ नाहीं, असें जुन्या कराराचें मत आहे. नव्या करारांत मृत्यूनंतरच्या जीविताचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणें मृत्यूनंतर पुनरुत्थान आहे हेंही मत नव्या करारांत आहे. हीं मतें पारशी धर्मांतून आलेलीं आहेत. त्याचप्रमाणें नव्या करारांतला सैतान हा तर एकट्या पारशी धर्मातच सांपडणारा आहे.

'याव' आणि ' ोलाक' या देवतांचें पूजन हा यहुदी धर्माचा विशेष आहे; पण हीं नांवें मात्र यहुदी भाषेंत नाहींत. हे शब्द मिसरी भाषेंतील असावे असें कांहीं विद्वानांचें मत आहे. तथापि या बाबींत अद्यापि कांहींच निश्चय झालेला नाहीं. यहुदी लोक बराच काळपर्यंत मिसर देशांत वास्तव्य करून होते, अशीं वर्णनें बायबलांत आहेत; पण या मजकुराच्या सत्यतेबद्दल विद्वान् लोक साशंक आहेत. आब्राहाम, आयझॅक, जोसेफ इत्यादि धर्माध्यक्षांचीं नांवें हीं खरीं माणसांचीं नांवें नसून तीं केवळ रूपकें आहेत असें पुष्कळ पंडित म्हणतात.

'याव' हें नांव यहुदी लोकांत प्रचलित नसून त्याऐवजीं 'अदुनोयी' अशी संज्ञा ते लावतात. पुढें यहुदी लोकांत इस्रायल आणि इफ्रेम अशा दोन शाखा झाल्या. त्यांचीं दोन वेगवेगळीं देवळें झालीं, आणि वेगवेगळ्या वसतिस्थानांत या शाखा राहूं लागल्या. इस्राएलांचें जें देऊळ जरूसलेममध्यें होतें त्यांत 'याव' देवतेची मूर्ति होती. ही देवता अर्धनारीनटेश्वराप्रमाणें अर्धा पुरुष आणि अर्धी स्त्री अशी आहे. इफ्रेम लोकांनीं बांधलेल्या देवळांत हीच 'याव'ची मूर्ति सुवर्णांकित नंदीच्या रूपानें आहे.

या देवतांपुढें पहिल्या मुलाचा जिवंत बळी द्यावयाचा अशी चाल या दोन्ही शाखांत होती. या देवळांतून पुष्कळ संतिणी असत. देवळाचें सारें उत्पन्न त्या घेत, आणि मनसोक्त रीतीचें वर्तन करीत. देवळाचा होणारा खर्चही त्याच आपल्या उत्पन्नांतून करीत.

यानंतर देव अंगांत आणणारा एक वर्ग यहुदी लोकांत निर्माण झाला. झांज, ढोल इत्यादिकांसारखीं वाद्यें वाजवून आणि आंग घुमवून ते अवसर आणीत. या लोकांना पुढें धर्मगुरू मानण्यांत येऊं लागलें. पुढें इराणी लोकांशीं यांचा संबंध विशेष येऊं लागला तेव्हां मूर्तिपूजेविरुद्ध बोलणारे लोक या यहुदी लोकांत निपजूं

लागले. मूर्तिपूजा, मुलाचा बळी, संतिणींचे अत्याचार इत्यादि चालींचा कडक निषेध ते करूं लागले. हळूहळू मुलाच्या वधाऐवजीं त्याची सुंता करावी अशी चाल प्रचारांत आली; आणि संतिणींची नीतिभ्रष्टता, मूर्तिपूजा, इत्यादि चालीही हळूहळू नष्ट होत गेल्या. कालांतरानें याच धर्मगुरूंच्या वर्गांतून ख्रिस्ती धर्माचा उदय झाला.

जीजस या नांवाचा कोणी मनुष्य यहुदी लोकांत होऊन गेला होता कीं काय, या बाबतींत अद्यापिही मोठीं रणें माजत आहेत. नवा करार या संज्ञेंत ज्या चार ग्रंथांचा अंतर्भाव होतो, त्यांपैकीं सेंट जॉन याचा ग्रंथ तर अर्वाचीन संशोधकांनीं सर्वथा त्याज्य ठरविला आहे. तो मुळींच विश्वासार्ह नाहीं असा त्यांचा निश्चय आहे आणि बाकीचे तीन ग्रंथ म्हणजे एकाद्या प्राचीन पुस्तकाच्या तीन नकला असाव्या आणि त्याही येशू ख्रिस्तानंतर पुष्कळ वर्षांनीं झालेल्या असाव्या असें अर्वाचीन विद्वान् म्हणतात. येशू ख्रिस्ताचा म्हणून जो काळ समजला जातो, त्या काळीं अथवा त्यानंतरही पुष्कळ काळ हे ग्रंथ अस्तित्वांत नव्हते.

ज्या सुमाराला येशू ख्रिस्ताचा जन्म झाला असें मानतात, त्या काळीं खुद्द यहुदी लोकांत जोसेफस आणि फायलो या नांवाचे दोन इतिहासकार जन्मले होते. यहुदी लोकांसंबंधीं बारीकसारीक माहितीसुद्धां त्यांनीं दिली आहे. त्यांच्यांतील अगदीं क्षुद्र धर्मपंथांसंबंधींसुद्धां माहिती त्यांनीं दिली आहे; पण जीजस किंवा ख्रिस्तीधर्म यांचा नुसता नामनिर्देशही त्यांनीं केला नाहीं. रोमन न्यायाधिशानें जीजसला मृत्यूची शिक्षा सांगितली या वृत्तांताची हकीकत त्यांच्या ग्रंथांत कोठेंही नाहीं. जोसेफच्या पुस्तकांत यासंबंधीं एकच उद्गार होता, पण तोही क्षेपक असें आतां निश्चित झालें आहे.

त्या काळीं यहुदी लोकांवर रोमनांची सत्ता होती; आणि शाळागुरूंचें काम ग्रीक लोकांकडे होतें. ग्रीकांच्या हाताखालीं शास्त्रें व कला यांचें शिक्षण त्यांनीं घेतलें. ग्रीक लोकांनीं यहुद्यांसंबंधीं अनेक प्रकारची माहिती लिहिलेली आहे, तथापि त्यांत जीजस किंवा ख्रिस्ती धर्म यांचा उल्लेखही नाहीं. याशिवाय या बाबींत आणखीही एक गोष्ट विचार करण्यासारखी आहे. नव्या करारांत जीं मतें आणि तत्त्वें सांगितलीं आहेत, त्यांचा प्रसार ख्रिस्ताच्या जन्मापूर्वीं बराच काळ यहुदी लोकांत झाला होता. बाह्य देशांतील लोकांशीं त्यांचा संबंध वाढल्यामुळें

इतर धर्मांतील पुष्कळशा मतांचा प्रवेश यहुद्यांत आधींच झाला होता. त्या मतांचा उपदेश करण्याचें काम हिलेल आणि दुसरे रब्बी अगोदरच करीत होते. अर्वाचीन विद्वानांचें मत अशा प्रकारचें आहे. तथापि स्वधर्मासंबंधीं कोणतेंही मत अगदीं सडेतोडपणें देणें त्यांच्या कीर्तीला विघातक होण्याचा संभव असतो. परधर्मासंबंधीं हवे ते तारे तोडण्यास हरकत नाहीं; पण ख्रिस्त्यानें ख्रिस्ती धर्मासंबंधीं खरें मत लिहिणेंसुद्धां अनुचित. यामुळें या बाबींत ख्रिस्ती पंडितांना फार जपून पाऊल टाकावें लागतें.

अशा रीतीनें अनेक धर्मांचा, चालीरीतींचा आणि मानववंशांचा अभ्यास पाश्चात्य पंडितांनीं चालविला आहे. दूरदूरचे आणि जवळ जवळ अज्ञात असे देशसुद्धां त्यांच्या तडाख्यांतून सुटले नाहींत. पण आमच्या बंगाली लोकांस मात्र या गोष्टीचा मागमूसही नाहीं; आणि तें व्हावें तरी कसें ? सतत दहा वर्षें अविश्रांत श्रम करून असल्या एकाद्या ग्रंथाचें भाषांतर करण्याचें कोणीं मनांत आणलें तर तेवढ्या अवधींत खावें काय, हा प्रश्न त्याच्या पुढें उभा राहाणार ! त्यानें पोट बांधून काम केलें अशीही कल्पना केली, तर त्याला प्रकाशक कोण भेटणार ?

पहिली गोष्ट ही कीं, आमचा देश फार दरिद्री आहे; आणि दुसरी ही कीं, विद्वत्ता वाढीस लावावी आणि तिचा उपयोग दुसऱ्यास करून द्यावा असें कोणाच्याच मनांत येत नाहीं. अर्वाचीन शास्त्रें आणि कला यांचे वृक्ष लावून त्यांचीं फळें लोकांच्या पदरीं टाकावीं असा उद्योग करणारा कोणी आढळेल काय ? हिंदुस्थानांत असा दिवस कधीं तरी उगवेल काय ? '**मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम्**' अशा सामर्थ्याच्या जगन्मातेलाच या प्रश्नाचें उत्तर देतां येईल.

असो; आमची बोट नेपल्सला पोंचली. इटली देशाला आमचे पाय लागले. इटलीची राजधानी रोम ही आहे. हें शहर फार जुनें आहे. प्राचीन काळीं अत्यंत सामर्थ्यवान् म्हणून नांवाजलेल्या रोमन साम्राज्याची राजधानी हीच. रोमन लोकांचें राजकारण, त्यांची धनुर्विद्या, त्यांच्या वसाहती आणि त्यांचे विजय, या गोष्टी अद्यापिही साऱ्या जगभर अगदीं नमुनेदार म्हणून समजल्या जातात.

नेपल्स बंदर सोडून आम्ही मार्सेलीसला आलों; आणि तेथून निघालों ते थेट लंडनला पोंचलों. युरोपविषयीं तुम्हांला बरीच माहिती आहे. त्या लोकांचें खाणेंपिणें, कपडालत्ता आणि रीतरिवाज यांची माहिती आपल्या लोकांना बरीच

असल्यामुळें त्यासंबंधीं अधिक लिहिण्याची मला जरूर नाहीं. तथापि युरोपची सांप्रतची संस्कृति, तिचें मूळ, तिचा आपणांशीं असलेला संबंध आणि तिचें ग्रहण कोठपर्यंत करावें, इत्यादि गोष्टींविषयीं माझे विचार पुढें मागें मी नमूद करणार आहें. 'नाहीं देहाचा भरंवसा' हा नियम त्रिकालाबाधित आहे. याकरितां काय करावयाचें तें केव्हां तरी उरकून टाकलेलें बरें; आणि यामुळेंच माझे विचार केव्हां तरी नमूद करून ठेवण्याची मला इच्छा होते. पण असल्या भारुडाचा उपयोग काय असेंही मनांत येतें. बोलकेपणाचें काम आपण आजपर्यंत पुष्कळच केलें आहे. या कामांत आम्हांशीं—विशेषतः बंगाल्यांशीं—टक्कर मारील असा मायेचा पूत कोण आहे? पण कृतीबद्दल मात्र विचारूं नका. तेव्हां आतां बोलण्यापेक्षां कांहीं कृति झाली तर करा. आतां जिभेला विश्रांति देऊन तुमची प्रत्यक्ष क्रिया बोलती करा. युरोपसंबंधीं एकच गोष्ट विशेषेंकरून नमूद करण्याजोगी आहे. ती ही कीं, शिक्षण आणि शासनसत्ता हीं जों जों खालच्या वर्गाच्या हातांत अधिकाधिक येत गेलीं, तों तों युरोपचें पाऊल अधिकाधिक पुढें पडूं लागलें. स्वदेशांत ज्यांची किंमत केरकचऱ्याइतकीसुद्धां नसते, अशा लोकांना अमेरिकेंत आश्रय मिळतो आणि याच लोकांनीं अमेरिकेचें नांव आतां सर्वतोमुखीं करून टाकलें आहे. अमेरिकेचा जिवटपणा याच लोकांवर अवलंबून आहे. तुमचें म्हणणें चारचौघां श्रीमंतांनीं अथवा विद्वानांनीं ऐकलें आणि त्याची स्तुति केली अथवा निंदा केली तरी तिचा हिशेब काय? हे लोक म्हणजे देशाचीं भूषणें; देशाला सजविणारे ते दागिने इतकेंच. त्यांजवर जगणें अथवा मरणें अवलंबून नाहीं. देशाचा जीव म्हणजे त्यांतील सामान्य आणि दरिद्री जनता. सत्कार्य करण्यासाठीं पुष्कळ माणसें लागतात असें नाहीं. त्याचप्रमाणें त्याला संपत्तीचीही जरूरी नाहीं. सत्कार्यांत या गोष्टींचा हिशोबच नाहीं. मूठभर माणसेंसुद्धां साऱ्या जगाची उलथापालथ करूं शकतील. विश्वकपाटाचीं बिजागरें पांच दहा माणसेंसुद्धां तोडूं शकतील. मात्र त्यांच्यांत विचारांचें संपूर्ण ऐक्य आणि तदनुरूप आचार हीं अवश्य असलीं पाहिजेत. हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे. असें ऐक्य जेथें आहे तेथें शत्रुत्व कांहीं करूं शकत नाहीं; किंबहुना अशा सत्कार्याला जों जों शत्रु अधिक तों तों त्याचें पाऊल अधिकच पुढें पडत जातें. अरे, नदीच्या प्रवाहांत अडथळे असल्यावांचून त्याला जोमही नसतो. प्रत्येक

नव्या वस्तूला अडथळ्यांशीं टक्कर मारावीच लागते. असे अडथळे येणें हीच तिच्या उत्तमपणाची साक्ष होय. भिकार वस्तूला अडथळा तरी कोण करणार? ज्या ठिकाणीं अडथळे नाहींत तेथें विजयही नाहीं. '**नमो नारायणाय।**'

ज्याच्या पायावर चक्र असतें तो जगभर भटक्या मारीत फिरतो, असा एक समज आपल्या लोकांत आहे. कांहीं स्थायिक उद्योगधंदा न करितां एकादा मनुष्य भटक्या मारीत असला तर त्याच्या पायावर चक्र पडलें आहे असें म्हणतात. मला वाटतें माझे पाय चक्रमयच असावेत. माझ्या पायांवर किती चक्रें आहेत हें पाहाण्यासाठीं माझे दोन्ही तळवे अगदीं सूक्ष्मपणें मीं तपासले, पण त्यांजवर इतक्या भेगा पडल्या आहेत कीं, त्यामुळें चक्रांचा मागमूसही कोठें लागत नाहीं. हल्लीं कडक थंडी पडूं लागल्यापासून माझ्या पायांना जिकडे तिकडे भेगाच भेगा पडल्या आहेत. तथापि माझ्या वृत्तीवरून माझ्या पायांवर खूप चक्रें असावींत यांत मात्र शंका नाहीं. पारिसमध्यें बराच काळ घालवून फ्रेंच भाषा आणि संस्कृति यांचा अभ्यास करावा अशी माझी उत्कट इच्छा होती. माझ्या जुन्या ओळखीच्या लोकांना सोडून एका नव्या फ्रेंच मित्राचा मीं आश्रय केला. त्याचें उत्पन्न बेताबाताचेंच आहे. त्याला इंग्रजी भाषा येत नाहीं, आणि माझें फ्रेंच भाषेचें अध्ययन विकटोपर्यंत! अशा मनुष्याचा सहवास करण्यांत माझा एक हेतु होता. एक तर फ्रेंच भाषेंत बोलावें अगर मुकें रहावें, अशा अडचणींत मी सांपडलों म्हणजे त्या भाषेंत बोलण्याचा सराव मला करावाच लागेल अशी माझी कल्पना होती. पण अखेरीस हे सारे बेत जागच्या जागींच राहिले; आणि आतां व्हिएन्ना, तुर्कस्थान, ग्रीस, इजिप्त आणि जरुसलेम या देशांतून प्रवास करण्यासाठीं मी बाहेर पडलों आहें. '**यदृच्छा बलीयसी।**' तिच्या पुढें कोणाचें काय चालणार! तेव्हां या पत्रावर कॉन्स्टॅन्टिनोपलचा मुक्काम पाहून तुला नवल वाटण्याचें कारण नाहीं.

माझ्याबरोबर तीन प्रवासी सोबती आहेत. यांपैकीं कुमारी...ही अमेरिकन स्त्री तुमच्या माहितीची आहेच. याशिवाय जूलबॉय हा फ्रेंच गृहस्थ मजबरोबर आहे. फ्रान्सांत हा एक प्रख्यात तत्त्ववेत्ता आणि वाङ्मयविशारद म्हणून गणला जातो. याशिवाय कुमारी काव्ह ही एक प्रख्यात गाणारी स्त्रीही आमच्या बरोबर आहे. नुसत्या गाण्याच्या धंद्यावर वर्षाकांठीं तीनचार लाख रुपयांची कमाई ही

करते. तिची आणि माझी ओळख गेल्या खेपेसच झाली होती. सारा बर्नहार्ट ही जगविख्यात नटी फ्रेंचच आहे. काव्ह आणि बर्नहार्ट या दोघींनाही इंग्रजी भाषेचा गंधसुद्धां नाहीं. तथापि अमेरिका आणि इंग्लंड या देशांत त्या वारंवार जात असतात, आणि आपापला धंदा करून लक्षावधि रुपये त्या घेऊन येतात. साऱ्या युरोपांत फ्रेंच भाषा अघाडीला असून तिचा प्रसार सर्वत्र आहे. फ्रेंच भाषा येत असल्यावांचून कोणीही मनुष्य सुसंस्कृत समजला जात नाहीं; यामुळें या दोन प्रख्यात स्त्रियांना कोणतीही परभाषा शिकण्याचें कारणच उरलेलें नाहीं आणि तसें करण्यास त्यांना फुरसतही नाहीं. बर्नहार्टबाई आतां साधारण वृद्ध झाल्या आहेत असें म्हटलें तरी चालेल. तथापि नाटकांतील पोषाख करून त्यांनीं रंग-भूमीवर पाय ठेवला कीं, स्वतःची भूमिका अत्युत्कृष्टपणें वठविण्याची कला त्यांना पूर्ण साध्य झाली आहे. मग ती भूमिका एकाद्या मुसमुसणाऱ्या तरुणीची असो अगर वृद्धेची असो. इतकेंच नव्हे, तर तरुण पुरुषाची भूमिकाही तितक्याच उत्तमपणें त्या रंगवितात. त्यांचा आवाज तर इतका मनोहर आहे कीं, त्याचें यथास्थित वर्णन करणेंसुद्धां अशक्य आहे. त्यांच्या आवाजांत चांदीच्या घंटांचा किंकिण नाद निघतो असें लोक म्हणतात. या बाईंना आमच्या देशाबद्दल फार पूज्य बुद्धि आहे. हिंदुस्थान हा देश जितका प्राचीन तितकाच संस्कृतिपूर्ण आहे असें त्यांनीं मला किती वेळां तरी बोलून दाखविलें आहे. एके वेळीं एका नाटकांत हिंदुस्थानांतील एका गांवाचा उल्लेख होता. त्यांतील एक भूमिका बर्नहार्टबाईकडे होती. हा देखावा रंगभूमीवर मांडण्याचें काम त्यांनीं स्वतःच केलें होतें. या देखाव्यांत एक रस्ता दाखविला असून त्यावर पुरुष, बायका, मुलें, साधू आणि रस्त्यावरील दुकानें वगैरेंची मांडणी इतकी यथातथ्य होती कीं, ती पाहून हिंदुस्थानांतील एकाद्या गांवांत आपण गेलों आहोंत कीं काय, असेंच प्रेक्षकांस वाटावें. हा देखावा यथास्थित तयार करण्याकरितां बाईंनीं प्रत्येक पदार्थसंग्रहालय पाहिलें होतें. हिंदुस्थानांतील स्त्री-पुरुषांचीं चित्रें, त्यांचे पोषाख, रस्ते, नदीकांठचे घांट इत्यादि प्रत्येक वस्तूचें पूर्ण निरीक्षण करण्यांत त्यांनीं एक महिना खर्च केला होता. एकदां तरी हिंदुस्थान देश पाहावा अशी त्यांची उत्कट इच्छा आहे. त्या देशाचीं सुखस्वप्नें मला पडत असतात, असें त्या एकदां मला म्हणाल्या. राजपुत्र एडवर्ड यांनीं

वाघाच्या आणि हत्तीच्या शिकारीस बाईंना आपल्याबरोबर नेण्याचें कबूल केलें आहे. हिंदुस्थानांत जाऊन यावयाचें तर किमानपक्ष दोन लाख रुपये तरी पाहिजेत असें त्या म्हणाल्या. त्यांना पैशाला तोटा आहे असें मुळींच नाहीं. कुबेराची तिजोरी त्यांच्याच हातांत आहे असें त्या म्हणतात. स्पेशल आगगाडी-शिवाय त्या कधींच प्रवास करीत नाहींत. त्यांचा प्रवासांतील भपका आणि चैन यांना लागणारा पैसा युरोपांतील पुष्कळशा संस्थानिकांनींसुद्धां नजरेनें पाहिला नसेल. त्यांच्या खेळाचें तिकिट मिळवावयाचें म्हणजे आगाऊ निदान एक महिना तरी दुप्पट तिप्पट पैसे भरून मिळवून ठेवावें लागतें. पण त्यांना पैसा जसा लयलूट मिळतो तसाच त्याचा व्ययही होत असतो. मुक्त हस्तानें पैसा उध-ळण्याची संवयच त्यांना लागून गेली आहे. यामुळें हिंदुस्थानाला जाण्याचा बेत सध्यां तरी त्यांना लांवणीवर टाकावा लागला आहे.

काव्हबाईंनीं येत्या हिंवाळ्यांत आपल्या मैफली बंद ठेवल्या आहेत. इजिप्त-सारख्या एकाद्या समशीतोष्ण देशांत जाऊन विश्रांति घेण्याचें त्यांनीं ठरविलें आहे. त्यांचा पाहुणा म्हणून मीही थोडे दिवस तिकडे जाणार आहें. या बाईंनीं नुसता गायनकलेचाच अभ्यास केला आहे असें नसून त्या बऱ्याच बहुश्रुत आहेत. विशेषतः धर्म आणि तत्त्वज्ञान या विषयांकडे त्यांचा फार ओढा आहे. त्यांचा जन्म अगदीं गरीब आईबापांच्या पोटीं झाला, आणि केवळ स्वतःच्या बुद्धिमत्तेनें आणि दीर्घ परिश्रमानें त्यांनीं आतां पुष्कळ संपत्ति मिळविली आहे. दारिद्र्यांत एके काळीं रखडणारी ही कुमारिका आतां राजांची आणि संस्थानि-कांची देवता होऊन बसली आहे.

याशिवाय मेल्बा, एमा ॲमो इत्यादि दुसऱ्या बऱ्याच स्त्रिया गायनकलेंत प्रसिद्ध आहेत. त्या प्रत्येक वर्षाकांठीं दोन तीन लाख रुपये सहज मिळवितात. तथापि काव्हबाईंच्या विशिष्ट कुसरीची सर त्यांना येत नाहीं असें म्हणतात. अप्रतिम सौंदर्य, तारुण्य, बुद्धिमत्ता, आणि अप्सरेचा आवाज या सर्वांचें एकत्र अधिष्ठान झाल्यावर या बाईंनीं आपल्या श्रोतृगणाला चित्रासारखें बसवावें यांत नवल नाहीं. बाल्यदशा विपन्नावस्थेंत आणि कष्टांत गेली व तारुण्याला पोंचेपर्यंत अनेक विपत्तींशीं त्यांना झगडावें लागलें, या परिस्थितीची पुरी आठवण अंतःक-रणाला राहिली असल्यामुळें या बाईच्या ठिकाणीं गरिबांबद्दल सहानुकंपा विशेष

आढळते. प्राप्त झालेल्या संपत्तीच्या मदाचा धूर त्यांच्या डोळ्यांवर आला नसल्यामुळें मानवी जीवित फुलपांखरासारखें नाचण्याबागडण्याकरितां नसून त्याचा अधिक उच्च हेतु आहे, ही गोष्ट त्या विसरल्या नाहींत.

पाश्चात्य लोकांच्या समाजरचनेचा एक विशेष असा आहे कीं, त्यांतील घटकांस विकास पावण्यास हवी तेवढी संधि सांपडते. अंगीं धडाडी असलेला कोणत्याही स्थितींतला मनुष्य तेथें मागें पडून राहावयाचा नाहीं. आमच्या इकडे ही स्थिति नाहीं. पुष्कळ विद्याभ्यास करावा असें एकाद्या बंगाली स्त्रीच्या मनांत आलें तर संधीच्या अभावीं तिचे मनोरथ जागच्या जागींच विराम पावतात. आणि तसें पाहिलें तर बंगाली भाषेंत शिकण्यासारखें तरी काय आहे ? सडक्या कादंबऱ्या आणि कुजकीं नाटकें. आणखी त्यांतून सध्यांची आपली विद्या तर परभाषा किंवा संस्कृत यांच्या हद्दींत बांधलेली आहे. यामुळें कांहीं थोड्यांना मात्र तिची प्राप्ति होते. इकडे पाश्चात्य देशांत कोणत्याही भाषेंत विपुल ग्रंथसंपत्ति झालेली आहे. यामुळें कोणत्याही देशांतल्या मनुष्याला शिकण्याची सोय झाली आहे. याशिवाय परभाषेंत एकादा चांगलासा नवा ग्रंथ निघाला तर त्याचीं भाषांतरें साऱ्या युरोपियन भाषांत ताबडतोब होतात. यामुळें परभाषांतील ग्रंथांचें स्वारस्यही एकाद्याला स्वभाषेंत चाखतां येतें.

जूलबॉय हे एक प्रख्यात ग्रंथकार आहेत. विशेषतः जुने धर्म आणि प्राचीन काळच्या धर्मविषयक कल्पना यांच्यांत ऐतिहासिक तथ्य कितपत आहे, याचा शोध त्यांनीं फार चांगला केला आहे. जुन्या काळीं प्रचलित असलेल्या मंत्रतंत्र, जादूटोणा, भूतप्रेतादिकांचें पूजन या विषयावर त्यांनीं एक सुप्रसिद्ध ग्रंथ लिहिला आहे. प्राचीन काळीं प्रचलित असलेल्या या आचारांचें प्रतिबिंब चालू काळांतही कोठें कोठें आणि कोणत्या स्वरूपांत आढळतें याचें विवेचन त्यांनीं फार चांगलें केलें आहे. ते चांगले कवि आहेत. त्याचप्रमाणें व्हिक्टर ह्यूगो, लॅमार्टिन इत्यादि फ्रेंच ग्रंथकारांच्या आणि गटे, शीलर वगैरे जर्मन कवींच्या ग्रंथांत आढळून येणाऱ्या आपल्या वेदान्त विचाराचे ते कट्टे पुरस्कर्ते आहेत. युरोपांतील तत्त्वज्ञान आणि काव्य यांजवर वेदान्तानें आपला चांगला अंमल बसविला आहे. बहुधा प्रत्येक चांगला कवि वेदान्त-भक्त असल्याचें मला आढळून आलें. कोणीं तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ लिहिला तर त्यांत वेदान्तबीजें कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत

हटकून आढळतात. इतकेंच कीं, या गोष्टीची कबुली न देणारे कांहीं हरीचे लाल असतात. हीं सारीं तत्त्वें आपल्या एकट्याच्याच डोक्यांत पिकलीं असें सिद्ध करण्याची त्यांची धडपड असते. हर्बर्ट स्पेन्सर आणि दुसरे कांहीं लेखक याच मासल्याचे आहेत. तथापि बरेच ग्रंथकार आर्य वेदान्तग्रंथांचें ऋण अगदीं मोकळ्या मनानें कबूल करितात. वास्तविक पाहातां असें करण्याशिवाय त्यांना गत्यंतरच नसतें. विचारविनिमयाचीं साधनें सध्यां इतकीं वाढलीं आहेत कीं, जगाच्या एका टोंकाला घडलेली गोष्ट तासाभऱ्यांत साऱ्या जगाला विदित होते. जूलबॉय हे श्रीमंत आहेत असें नाहीं. त्यांचें उत्पन्न अगदीं बेताबाताचें आहे. त्यांतून पारिससारखी अत्यंत महागाईची राहाणी. पण तेवढ्यांतही मला आमंत्रण देऊन आपल्या घरीं त्यांनीं मला ठेवून घेतलें होतें. हे गृहस्थ अत्यंत विनयशील आणि स्वभावानें फार सालस आहेत. तेही आतां प्रवासास आमच्याबरोबर निघाले आहेत.

याशिवाय आणखीही दोन सोबती प्रवासी आम्हांस मिळाले आहेत. पेरी हायसिंथ आणि त्यांची पत्नी हीं कॉन्स्टँटिनोपलला जात आहेत. हायसिंथ हे पूर्वीं बैरागीपंथाचे होते. नैष्ठिक ब्रह्मचर्य हा या पंथाचा विशेष आहे. त्यांची विद्वत्ता, असामान्य वक्तृत्व आणि पंथाच्या यमनियमांचें निष्ठुर पालन यामुळें हे गृहस्थ एकट्या फ्रान्सांतच नव्हे, साऱ्या युरोपांत प्रसिद्धीस आले होते. कॅथॉलिक पंथांत त्यांची मानमान्यता फारच मोठी होती. त्यांच्या भाषाप्रभुत्वाविषयीं व्हिक्टर ह्यूगो यांनींसुद्धां त्यांची प्रशंसा केली होती. चाळीस वर्षांच्या वयाला एका अमेरिकन स्त्रीवर त्यांचें प्रेम जडलें आणि त्यांनीं तिच्याशीं लग्न केलें. यामुळें साऱ्या कॅथॉलिक जगांत मोठी खळबळ उडाली. अखेरीस पंथानें त्यांचा त्याग केला. हायसिंथ यांनींही आपला बैराग्याचा झगा फेंकून देऊन गृहस्थाश्रम स्वीकारला आणि मॉशुए लॉयझॉं हें नवें नांव घेतलें. तथापि त्यांच्या पहिल्याच नांवानें मी त्यांना अजून संबोधीत असतों. त्यांच्या या कृतीनें एका काळीं साऱ्या युरोपभर चर्चा सुरू झाली होती. कांहीं दिवस तर लोकांना याशिवाय दुसरा विषयच नव्हता. प्रॉटेस्टंट लोकांनीं त्यांच्याबद्दल बहुमानानें ल्याहावें तर उलट पक्षीं कॅथॉलिक पंथानें त्यांना शिव्या द्याव्या असा प्रकार चालला होता. त्यांच्या विद्वत्तेबद्दल पोप महाराजांच्या मनांत आदर असल्यामुळें

आपल्या पंथानें एवढ्या बहुमोल मनुष्याला मुकावें हें त्यांना बरें वाटेना. तेव्हां 'तुम्ही ग्रीक कॅथॉलिक पंथांत शिरा' असा उपदेश त्यांनीं हायसिंथ यांस केला. या ग्रीक पंथांत जन्मांत एकदां लग्न करण्याची परवानगी असते. तथापि पोपचा हा उपदेश हायसिंथ यांच्या पत्नीला आवडला नाहीं. तेव्हां पतीचे कान धरून पोपच्या कळपांतून तिनें त्याला बाहेर ओढलें. आतां या जोडप्यानें नातवंडें पाहिलीं आहेत. वयोवृद्ध लायझाँ हे आतां जरुसलेमला जात आहेत. ख्रिस्ती आणि मुसलमान यांच्यांत मित्रत्वाचा संबंध बांधतां आल्यास पहावा अशी खटपट ते तेथें करणार आहेत. लायझाँ बाईला आपला पति म्हणजे प्रति मार्टिन लूथर वाटतो. पोपचें सिंहासन उचलून तें भूमध्यसमुद्रांत ते फेंकून देतील असें ती पूर्वी म्हणे. पण असें होण्याऐवजीं ते मात्र दोन घरच्या पाहुण्याप्रमाणें उपाशी राहिले. बिचाऱ्या बाईला अशीं सुखस्वप्नें अजूनहि पडतात. लायझाँसाहेब मोठे मृदुभाषी, विनयी, आणि भक्तिमान् गृहस्थ आहेत. भक्तिमार्गाकडे त्यांचें अंतःकरण स्वाभाविकपणेंच धांव घेतें. माझी केव्हांही भेट झाली तरी नाना धर्मासंबंधीं ते भाषण करूं लागतात. आमचा अद्वैत सिद्धान्त मात्र त्यांच्या गळीं फारसा उतरत नाहीं. भक्ताला आपला देव वेगळा असावा असें वाटणें स्वाभाविकच आहे. बाईची वृत्ति मात्र माझ्याबद्दल साशंक दिसते. त्याग आणि संन्यास यांच्या गोष्टी मी त्यांजबरोबर बोलूं लागलों म्हणजे त्यांच्या पूर्ववयांतील वृत्ति पुन्हां एकदां जागी होते; आणि त्या वृत्तीची दर्शक अशी छाया त्यांच्या डोळ्यांत दिसूं लागली कीं, बाईच्या अंतःकरणाला पीळ पडूं लागतो. यामुळें माझा त्यांना राग येतो. याशिवाय त्यांच्या संतापाचें आणखीही एक कारण आहे. 'या आवानें त्याला बिघडविलें' असें फ्रेंच लोक तुच्छतेनें तिला म्हणतात. आपल्यांतील एका साधूला तिनें भ्रष्ट केलें म्हणून फ्रेंचांचा तिजवर राग आहे. असल्या विषम परिस्थितींत सांपडलेल्या बाईची खरोखर कींवच केली पाहिजे. पॅरिस म्हणजे कॅथॉलिक पंथाची राजधानी; आणि बिचाऱ्या बाईना तर तेथें राहाण्यावांचून गत्यंतर नाहीं. आजूबाजूचे कॅथॉलिक लोक तर इतके कर्मठ कीं, तिचें दर्शन होण्याबरोबर ते अजून कपाळाला आंठ्या घालतात. लायझाँसाहेबांना धर्माबद्दल एक अक्षरसुद्धां उच्चारण्याची सोय नाहीं. कारण त्यांना श्रोताच कोणी मिळावयाचा नाहीं. इकडे लायझाँबाईचा स्वभावही जरा अधिक संशयी; यामुळें कित्येक

वेळां त्यांना अल्प कारणानेंसुद्धां कष्ट भोगावे लागतात. तोंडांतून एकादासुद्धां अधिक उणा शब्द काढण्याची सोय नाहीं. एकदां एक नटी त्यांना भेटली. या नटीचा एक दोस्त होता. लायझॉंबाई तिला म्हणाल्या, 'त्याच्याबरोबर तूं लग्न तरी कर.' त्या नटीला हा फटकारा सहन झाला नाहीं. तिनें तावडतोव म्हटलें 'मी तुझ्यापेक्षां हजार पटीनें बरी. माझा मित्र कांहीं धर्माध्यक्ष नाहीं. आतां आमचें लग्न कायद्यानें झालें नाहीं एवढें खरें, पण कोणा नैष्ठिक ब्रह्मचारी साधूला भ्रष्ट करण्याचें पातक मीं केलेलें नाहीं. तुझें प्रेम त्या वैराग्यावर इतकें जडलें होतें तर त्याच्या घरीं मोलकरीण म्हणून तूं राहावयाचें होतेंस. पण त्याच्याशीं लग्न करून त्याच्या साऱ्या जन्माचा तूं नाश केलास. वैराग्याला संसारी बनविण्यापेक्षां अधिक मोठें पातक तें कोणतें?'

या साऱ्या गोष्टी माझ्या कानीं आल्या असल्या तरी त्या मला ठाऊक आहेत असें या जोडप्याला मीं कधीं दर्शवीतसुद्धां नाहीं. वृद्ध हायसिंथ हे खरोखर स्वभावानें फार गोड आणि शांत गृहस्थ आहेत. आपल्या बायकामुलांच्या संगतींत आपला काळ ते सुखानें घालवितात. लोकांच्या वडवडीकडे ते फारसे लक्ष देत नाहींत; आणि खरें पाहिलें तर लोकांनीं तरी त्यांजविरुद्ध एवढा गिल्ला कां करावा? मला वाटतें, याचें कारण एकच आहे. लायझॉंबाईचा ताठरपणा थोडा कमी होईल तर लोकही तिचा अपराध कदाचित् विसरतील. यांत घेण्यासारखी गोष्ट इतकीच कीं प्रत्येक देशांत वेगवेगळ्या विचारांना आणि आचारांना प्राधान्य असतें आणि तेथील लोक त्या दृष्टीनें प्रत्येकाच्या कृतीचें परीक्षण करून तिचा भलेवुरेपणा ठरवीत असतात. फार काय, पण एकाच देशांतसुद्धां स्त्रिया आणि पुरुष यांचे दृष्टिकोण वेगळे असतात. यामुळें अशा कृतीला एक पक्ष दोष देत असतो तर दुसरा तिला बरें म्हणतो.

माझ्याबरोबरच्या या प्रवाशांच्या संगतींत मला एक मात्र मोठा फायदा झाला आहे. हायसिंथबाईशिवाय दुसऱ्या कोणालाही इंग्रजी भाषा समजत नाहीं. यामुळें ती भाषा जवळ जवळ बहिष्कृत आहे. मला फ्रेंच भाषेचा उपयोग करणें भाग पडतें आणि कानांवरही एकसारखी फ्रेंच भाषाच पडते.

पॅरिस येथून निघतांना माझा मित्र मॅक्झिम यानें देशोदेशींच्या आपल्या मित्रांस लिहिलेलीं ओळखपत्रें मजबरोबर दिलीं आहेत, यामुळें माझी मोठी सोय

झाली आहे. हा मॅक्झिम म्हणजे जगविख्यात मॅक्झिम तोफेचा जनक. हा गृहस्थ जन्मानें अमेरिकन आहे. आतां त्यानें कायमची वस्ती इंग्लंडांत केली आहे. तेथें त्याचा तोफांचा मोठा कारखाना आहे. या तोफेच्या शोधावद्दल त्याला मोठा गर्व वाटतो असें मात्र नाहीं. या शोधाबद्दल त्याच्या तोंडावर कोणीं अधिक स्तुति केली तर तो लगेच म्हणतो, 'मित्रा, या विनाशक हत्याराला जन्म देण्याशिवाय मीं दुसरें कांहींच केलें नाहीं काय ?' चीन आणि हिंदुस्थान या देशांवद्दल मॅक्झिमच्या मनांत मोठा आदर आहे. धर्म आणि तत्त्वज्ञान यांचा चांगला अभ्यास त्यानें केला आहे; इतकेंच नव्हे तर या विषयावर तो लेखही लिहितो. माझीं व्याख्यानें आणि लेख त्याच्या वाचनांत आले आणि तेव्हांपासून माझ्यावद्दल त्यांच्या मनांत आदर—फाजील आदर उत्पन्न झाला आहे. हा गृहस्थ जगविख्यात आहे असें म्हटलें तरी चालेल. जगांतल्या साऱ्या राजांना तो तोफा पुरवितो. सुप्रसिद्ध चिनी मुत्सद्दी ली. हंगचंग हा त्याचा परमस्नेही आहे. यामुळें कन्फ्यूशसच्या धर्माची आणि चिनी संस्कृतीची त्याला चांगली ओळख होऊन त्या देशावद्दल त्याला आदर वाटूं लागला आहे. कधीं कधीं चिनी टोपण-नांव घेऊन वर्तमानपत्रांत तो लेख लिहितो, आणि स्वतःस ख्रिस्ती म्हणविणाऱ्या लोकांनीं चिनांत कसा आणि कां प्रवेश केला आणि तेथें कसा धुडगूस ते घाल-तात याचें वर्णन तो करीत असतो. असले लेख लिहितांना ख्रिस्ती लोकांवर कोरडे ओढण्यास तो कमी करीत नाहीं. ख्रिस्ती भटांनीं चिनांत शिरून उपदेश करावा या गोष्टीचें त्याला अतिशय वैषम्य वाटतें. या बाबतींत त्याच्या पत्नीचेंही मत त्याच्याशीं तंतोतंत जुळतें आहे. ख्रिस्ती भटांच्या या उपद्व्यापामुळें त्या धर्माबद्दल जगांत द्वेष उत्पन्न होतो असें ती म्हणते. या जोडप्यावर लक्ष्मीची पूर्ण कृपा आहे, पण पोटीं संतान मात्र नाहीं.

पॅरिसहून प्रथम व्हिएन्नाला जाऊन तेथून कॉन्स्टँटिनोपलला जावयाचें असा अनुक्रम आम्हीं ठरविला होता. हा प्रवास आगगाडीनेंच व्हावयाचा होता. कॉन्स्टँ-टिनोपल येथें बोटींत वसून अथेन्सला उतरावयाचें आणि ग्रीस देश पाहून तेथून भूमध्यसमुद्रांतून इजिप्त, आशियामायनर, जरुसलेम इत्यादि प्रदेशांकडे जावयाचें असा आमचा बेत होता. पॅरिस येथून थेट कॉन्स्टँटिनोपलला जाणारी एक खास गाडी रोज सुटत असते. या गाडींत खाण्यापिण्याची आणि निजण्यावसण्याची

उत्तम सोय केलेली असते. अमेरिकेंत लांववर जाणाऱ्या गाड्या अशाच पद्धतीनें सजविलेल्या असतात; आणि त्याच नमुन्यावर ही गाडी होती. आतां अमेरिकन गाड्यांप्रमाणें ही गाडी सर्वांगपूर्ण होती असें नाहीं. तथापि एकंदरीनें ती ठीक होती.

आज अक्टोबरची तेवीस तारीख. आमच्या प्रवासाला निघण्याकरितां आम्ही उद्यां पॅरिस सोडणार. यंदां येथें मोठें प्रदर्शन भरणार असल्यामुळें साऱ्या जगाचें लक्ष पॅरिसकडे लागलें आहे. साऱ्या जगांतील प्रसिद्ध स्त्रीपुरुषें येथें एकत्र जमलीं आहेत. आपापल्या देशाचें महत्त्व जगाला पटविण्याकरितां नाना प्रकारच्या खटपटी हीं माणसें करीत आहेत. या प्रदर्शनांत नांव मिळविण्याचें भाग्य ज्याला प्राप्त होईल त्याची एकट्याचीच कीर्ति साऱ्या जगभर गाजेल असें नाहीं तर त्याच्या जन्मभूमीचें नांवही सर्वत्र प्रसिद्ध होईल. बेट्या वंगाल देशा, तुझें अस्तित्व येथें कोठें दिसतें आहे काय ? जर्मन, फ्रेंच, इंग्लिश, इटालियन इत्यादि साऱ्या देशांतील महापुरुष येथें आढळतात. पण बेट्या, तुझें नांवहि ऐकूं येत नाहीं. तुझें अस्तित्व जगाला जाणवील असा येथें कोण आहे ? पण तूं दुःख करूं नको. आपापल्या देशाचें मोठेपण गाजविणारीं गोरीं तोंडें जिकडे तिकडे दिसत असतां त्यांतच एक श्यामवर्ण मुख दिसत आहे. जगांतील भौतिक शास्त्रज्ञांत ज्याचें नांव गाजलें आहे, तो डॉ. जगदीश वोस सध्यां येथें आहे. तो तुझी लाज राखील. या वंगाली तरुणानें पाश्चात्यांचें लक्ष आज आपल्याकडे वेधून घेतलें आहे. त्याच्या तीव्र वुद्धीनें युरोप हादरून गेलें आहे, आणि त्याच वुद्धीच्या धक्क्यानें मृतप्राय पडलेली माझी जन्मभूमी उठून वसली आहे. विद्युच्छक्तीचें ज्ञान असलेल्या साऱ्या भौतिक पंडितांच्या अग्रभागीं एक वंगाली तरुण वसला आहे, ही गोष्ट आम्हांला केवढ्या अभिमानाची आहे वरें ? शाबास, वीरा शावास ! तूं आज आर्यभूमीचें—वंगाल्यांचें नांव राखलेंस. जेथें जेथें डॉ. वोस जातो, तेथें तेथें हिंदुस्थानाचें नांव मोठ्या आदरानें निघतें व तेथें तेथें वंगालच्या मुकुटांत एक नवा तुरा खोंवला जातो. वंगाली तरुणा, ईश्वर तुला सुखी करो !

कवी, तत्त्ववेत्ते, शास्त्रज्ञ, नीतिविद्याविशारद, मुत्सद्दी, गवई, चित्रकार, मूर्तिकार, शिल्पज्ञ इत्यादि साऱ्या धंद्यांतले प्रसिद्ध पुरुष येथें जमले आहेत. लेगेट

या गृहस्थांच्या घरीं या माणसांना मेजवान्यांवर मेजवान्या झडत आहेत. या मेजवान्यांच्या प्रसंगीं कधीं कोकिलेचे पंचमालाप तर कधीं विद्वज्जनगोष्टी कानीं पडत असतात. श्रोत्यांचीं मनें या प्रसंगीं तल्लीन होऊन ते तहानभूकही विसरतात. पण या मेजवान्यांचा शेवट उद्यां होणार. जगांतील प्रत्येक वस्तूला अंत हा आहेच. प्रदर्शनाच्या जागांतून आणखी एकवार मी विहंगवेगानें फिरून आलों. मनुष्याच्या बुद्धीचे डोळे दिपविणाऱ्या नाना कल्पना येथें एकत्र झाल्या आहेत. जणूं काय विजेचा एक खांबच करून तो उभा केला आहे! अनंत स्वर्गीय वस्तूंचें संमेलन येथें भरलेलें आहे.

गेले दोन तीन दिवस येथें पाऊस पडत आहे. या दिवसांत फार करून सूर्य-दर्शन झालेंच नाहीं. फ्रान्स देशावर सूर्यनारायणाची कृपा असल्यामुळें असे प्रसंग क्वचितच येतात. जगाचे डोळे दिपविण्याजोगें हें प्रदर्शन असलें तरी या साऱ्याचा जन्महेतू इंद्रियभोग हा असल्यामुळें सूर्यनारायणाला लाज वाटून त्यानें आपलें मुख विषादाच्या ढगामागें लपविलें नसेल ना? किंवा या झगझगीत देखाव्याचा अंत जवळ आला आहे, या विचारानें दुःख होऊन त्याचें मुख म्लान झालें असेल.

हें प्रदर्शन मोडावयाचें हासुद्धां एक पर्वतप्राय उद्योग आहे. याच्या मोड-तोडीस सुरवात झाली कीं, या शहराचें सध्यांचें मनोहर रूपही पालटून जाईल. माती आणि चुना यांचा गुडघा गुडघा चिखल रस्त्यांत होईल. प्रदर्शनांत इंद्र-सभेलाही लाजविणाऱ्या अनेक इमारती दिसतात. पण हा सारा लांकडें आणि चिंध्या यांचा डोलारा. बाहेरच्या झगझगाटाच्या पोटांत न पहाणें बरें. आपलें सारें जगच असें आहे. मग त्याचाच नमुना प्रदर्शनांत असला तर काय नवल! या इमारती जमीनदोस्त होऊं लागल्या कीं, चुन्याच्या धुळीचे लोटच्या लोट उठतील, चिंध्यांचे ढिगारे जिकडे तिकडे सांचतील. आणि त्यांतच पाऊस; मग चिखलाला काय तोटा? ही घाण पहाण्यास उद्यां आम्ही येथें नाहीं ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे.

तारीख २४ आक्टोबर रोजीं आमच्या गाडीनें पॅरिस शहर सोडलें. रात्रीं गुडुप अंधार असल्यामुळें गाडीबाहेर कोणताही प्रदेश अवलोकनांत येत नव्हता.

बॉय आणि मी असे दोघे डब्याच्या एका भागांत होतों. सारी रात्र आम्हीं झोपेंत काढली. पहांटे मी जागा झालों आणि बाहेर पहातों तों आम्हीं फ्रेंच हद्द ओलांडून जर्मनींत प्रवेश केला असल्याचें मला समजलें. मीं पूर्वी एक वेळेला जर्मनी पाहिला होताच. पण फ्रान्स देश पाहून जर्मनींत गेलें म्हणजे मनावर कांहीं वेगळाच परिणाम होतो. 'यात्येकतोऽस्तशिखरं पतिरोपधीनाम्' इत्यादि जें चंद्रसूर्यांच्या अस्तोदयाचें वर्णन कालिदासानें शाकुंतलांत केलें आहे, त्याची आठवण अशा वेळीं हटकून होते. १८७० सालापर्यंत फ्रान्स आपणास जगज्जेता म्हणवीत होता; पण त्या वेळीं झालेल्या युद्धांत तरुण जर्मनीनें फ्रान्सची धुळधाण केली. तेव्हांपासून सुडाचा अग्नि फ्रान्सचें हृदय जाळीत आहे. या एका कल्पनेशिवाय फ्रान्सला कांहीं सुचेनासें झालें आहे. यामुळें एका बाजूला अस्तास जाऊं पाहणाऱ्या चंद्राप्रमाणें त्याची स्थिति झाली आहे. उलट पक्षीं १८७० सालीं फाटाफुटीच्या स्थितींत असलेला जर्मनी सुसंघटित होऊन आतां त्याचें बलाढ्य साम्राज्य बनलें आहे. बाल्यदशेंतून बाहेर येऊन हें तरुण साम्राज्य झपाट्यानें वर चढत आहे. त्याची प्रभा बालसूर्याप्रमाणें जग आक्रमण करूं पाहात आहे. फ्रान्स देशाची संस्कृति फार जुनी आहे. युरोपीय संस्कृतीच्या नेतृत्वाचा मान फ्रान्सला आहे. फ्रेंच लोक थोडेसे ठेंगणें, कृष्णवर्ण केंसांचे, इंद्रियसुखलोलुप आणि उडाऊ वृत्तीचे आहेत, तर याच्या उलट दुसऱ्या बाजूला बेढब शरीराचे, रानवट चालीरीतींचे, तांबूस पिवळ्या केसांचे, उंच आणि राक्षसासारखे धष्टपुष्ट असे जर्मन लोक आहेत. पॅरिसइतकें सुंदर शहर पाश्चात्य देशांत दुसरें नाहीं. बाकीचीं शहरें म्हणजे पॅरिसचें अल्पस्वल्प अनुकरण अथवा अनुकरणाचा प्रयत्न. पॅरिसच्या रचनेंत स्वर्गीय सौंदर्य आहे; आणि जर्मनी, इंग्लंड, अमेरिका इत्यादि देशांतील त्याच्या नकला अगदीं गांवढळ आणि ओबडधोबड दिसतात. फार काय, पण फ्रान्सच्या एकाद्या ओबडधोबड कृतींतही जें सौंदर्य दिसतें तें जर्मनीच्या सुंदर म्हणून मानलेल्या वस्तूंतही आढळत नाहीं. फ्रान्सच्या विकृतींतसुद्धां सौंदर्य, आणि जर्मनीच्या सुंदर आकृतींतही भेसुरपणा आढळतो. एकाद्या फ्रेंच पंडिताला तो रागावलेला असतां तुम्हीं पाहिलें तर त्या वेळींसुद्धां त्याच्या चेहऱ्यावर सौंदर्याचा ठसा दिसेल. पण हंसऱ्या मुद्रेचा जर्मन पंडितसुद्धां भीतिप्रद दिसतो. फ्रेंचांची संस्कृति कापुर किंवा कस्तुरी यांप्रमाणें सर्व दिशांना सुवास

पसरविणारी आहे. कापुर उडून ज्याप्रमाणें हवेंत पसरतो तशी फ्रेंच संस्कृति आहे. उलट पक्षीं जर्मन संस्कृति शिशासारखी किंवा पाऱ्यासारखी जड आहे. ती जेथें बसेल तेथून जागची हलावयाची नाहीं. तिच्यांत तरलता नाहीं. जर्मनांचा स्नायू दीर्घ काळपर्यंत—कदाचित् मरेपर्यंतहि—एकसारखे लहानलहान तडाखे देत बसेल, पण फ्रेंचांचा स्नायू एकाच प्रचंड तडाख्यांत आपला कार्यभाग करून जाईल. फ्रेंचांच्या देहयष्टींत पौरुषापेक्षां स्त्रीत्वाचेंच आधिक्य आढळतें.

फ्रेंचांचें अनुकरण करून प्रचंड इमारती आणि राजवाडे जर्मनी उठवीत आहे. पुतळे आणि पाषाणमूर्ती उभारण्याचें काम जर्मनींत सर्वत्र सुरू आहे. पण एकादी प्रचंड दोन तीन मजली जर्मन इमारत पाहिली कीं, हें माणसें राहाण्याचें ठिकाण कीं हत्ती बांधण्याची शाळा असा प्रश्न मनांत येतो. उलट पक्षीं पांच चार मजली फ्रेंच घोडशाळा पाहिली तर आकाशांतल्या पऱ्या येथें येऊन रहात असाव्या अशी काव्यमय कल्पना मनांत उभी राहाते.

अमेरिकेंत सध्यां जर्मन चालरीत श्रेष्ठ ठरली आहे. लक्षावधि जर्मन लोक अमेरिकेंत भरले आहेत. मुख्य भाषा इंग्रजीच असली तरी अमेरिका हळूहळू प्रतिजर्मनी बनत आहे. जर्मनांची संख्या तेथें दिवसेंदिवस वाढत आहे; आणि या लोकांची चिकाटीही मोठी दांडगी आहे. जर्मन राष्ट्राची हुकमत आज सारें युरोप मानीत आहे. तो देश आज युरोपच्या मुकुटस्थानीं बसला आहे. सक्तीच्या शिक्षणाचें स्वप्नसुद्धां इतर राष्ट्रांस पडलें नव्हतें, तेव्हां जर्मनींत तें सर्रास सुरू झालें होतें. लिहितां वाचतां न येणें हा तेथें गुन्हा गणला जातो, यामुळें जर्मनींत वाचतां न येणारी व्यक्ति औषधाससुद्धां मिळावयाची नाहीं, आणि याचें फल तें राष्ट्र आज भोगीत आहे. जर्मन लष्कर सर्वमान्य समजलें जातें. त्याच-प्रमाणें आपलें आरमारही सर्व जगाच्या आघाडीस असावें अशी खटपट जर्मनी करीत आहे. जर्मन कारखान्यांत बनलेल्या वस्तू इंग्लंडांतील कारखान्यांना मागें टाकीत चालल्या आहेत. जर्मन माल आणि जर्मन लोकसुद्धां खुद्द इंग्लंडच्या वसाहतींत मिरासदार होऊं पाहात आहेत. चिनांत बॉक्सरांचें बंड झालें, त्या वेळीं सर्व युरोपियन राष्ट्रांचीं सैन्यें तेथें एकत्र जमलीं होतीं. या संयुक्त सैन्यांचें आधिपत्य जर्मन सेनापतीकडे राहील असें जर्मन बादशहानें म्हटल्याबरोबर बाकीच्या राष्ट्रांनीं निमूटपणें मान डोलवली !

सारा दिवस आमची गाडी जर्मन साम्राज्यांतून धांवत होती. दुपार उलटून गेल्यावर आम्ही ऑस्ट्रियाच्या सरहद्दीवर पोंचलों. प्राचीन काळीं या प्रांतावर-सुद्धां जर्मन लोकांचीच सत्ता होती. पण आतां हा प्रांत जर्मन साम्राज्यांतून वेगळा झाला आहे. बाहेर देशांतून येणाऱ्या कांहीं विशिष्ट मालावर जबर जकात घेण्याची पद्धत प्रत्येक देशांत आहे. त्याचप्रमाणें राष्ट्रांत तयार होणारा एखादा जिन्नस तेथलें सरकार सर्वस्वी आपल्या ताब्यांत ठेवतें. रशिया आणि तुर्कस्थान या देशांत सरकारी परवान्यावांचून कोणासही पाय ठेवण्याची मनाई आहे. आधीं असा पास खिशांत घालावा तेव्हांच सरहद्दींत पाऊल ठेवावें. तेथले अधिकारी प्रथम हा पास फार कडकपणें तपासतात; आणि सरकाराविरुद्ध असें कांहीं नाहीं अशी पक्की खात्री करून घेऊन मग देशांत जाण्यास ते परवानगी देतात. पासांत कांहीं लटपट असल्याचा संशय आला तर तो पास ते ताबड-तोब हिसकावून घेतात. कांहीं देशांत तंबाखूवर जबर कर असतो. एखाद्या प्रवाशाच्या खिशांत थोडीशी तंबाखू सांपडली तर त्याला अतिशय त्रास होतो. तुमच्या पेटींतली चिंधीन् चिंधी ते उलगडून पाहातात. कॉन्स्टँटिनोपलला जावयाचें म्हणजे जर्मनी आणि ऑस्ट्रिया या दोन मोठ्या राष्ट्रांतून आणि यांशिवाय किती तरी किरकोळ संस्थानांतून जावें लागतें. हीं अनेक संस्थानें पूर्वीं तुर्की साम्राज्यांत होतीं; पण पुढें या लहान लहान ख्रिस्ती राजांनीं संगनमत केलें आणि मुसलमानांच्या हातून आपली सुटका करून घेतली. हीं संस्थानें लहान लहान भासलीं तरी एखाद्या साम्राज्याला उपसर्ग लावण्याच्या कामीं मोठ्या संस्थानांनाही तीं मागें टाकतात.

तारीख २५ ऑक्टोबर रोजीं संध्याकाळीं आमची गाडी व्हिएन्नाला पोंचली. हें ऑस्ट्रियाचें राजधानीचें शहर आहे. ऑस्ट्रिया आणि रशिया येथील राज-कुटुंबांतील पुरुषांना आर्चड्यूक आणि स्त्रियांना आर्चडचेस अशा संज्ञा लावतात. आमच्या गाडींतून असे दोन आर्चड्यूक आज व्हिएन्नाला उतरावयाचे होते. ते उतरून जाईपर्यंत बाकीच्या लोकांना उतरण्याची मनाई होती. यामुळें कांहीं वेळ आम्हांला डब्यांतच बसून राहावें लागलें. स्टेशनवरफिती लावलेला पोषाख केलेले लष्करी अंमलदार आणि शिपाई उभे होते. आर्चड्यूक खालीं उतरतांच या लष्करी लोकांनीं त्यांना घेरलें. ही मंडळी रवाना झाल्याबरोबर आम्हीही

खालीं उतरलों. उतारू फारसे नसल्यामुळें सामानाची तपासणी होऊन आम्हांला जाण्यास लवकरच परवानगी मिळाली. आमच्या राहाण्याची व्यवस्था एका पथिकाश्रमांत आम्हीं आगाऊच करून ठेवली होती. आश्रमाचा मनुष्य आमच्यासाठीं गाडी घेऊन आलाच होता. तींत वसून आम्ही आश्रमांत गेलों. रात्र असल्यामुळें बाहेर पडण्याचें कोणाच्या मनांतही आलें नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं शहर पाहाण्याकरितां आम्ही बाहेर पडलों. जर्मनी आणि इंग्लंड या दोन देशांखेरीज युरोपच्या बाकीच्या साऱ्या भागांत फ्रेंच राहणीच नमुनेदार म्हणून समजली जाते. आम्हां हिंदु लोकांप्रमाणेंच फ्रेंच लोकही दोनदांच जेवतात. सकाळचें जेवण बारा वाजतां आणि संध्याकाळीं आठ वाजतां. सकाळीं आठ नऊच्या सुमारास फ्रेंच लोक थोडी कॉफी घेतात. इंग्लंड आणि रशिया यांशिवाय बाकीच्या देशांत चहाचें प्रस्थ फारसें नाहीं. फ्रेंचांच्या दुपारच्या जेवणाला फराळ आणि संध्याकाळच्या जेवणाला मात्र खरें जेवण म्हणतात. रशियांत थंडी फार आणि चीनचें त्याला सान्निध्य यामुळें चहा पिण्याचा प्रघात रशियांत फार आहे. चिनी चहा चांगल्या प्रतीचा असून तो बहुतेक रशियांतच खपतो. चहा पिण्याची पद्धत रशियनांनीं चिनी लोकांपासून घेतली आहे; आणि चिनी पद्धतीप्रमाणेंच दूध न घालतां ते चहा पितात. चहांत किंवा कॉफींत दूध मिसळलें तर तसली कॉफी विषासारखी अपायकारक होते असें ते म्हणतात. चिनी, जपानी आणि मध्यआशियांतील लोक हेच खरे चहाचे भक्त असून ते सारे दुधाशिवाय चहा घेतात. रशियांत चहा घेतांना त्यांत थोडा लिंबाचा रस पिळून थोडी साखरही टाकतात. गरीब लोकांना साखर थोडी दुर्मिळ असल्यामुळें घरांतल्या प्रत्येक माणसाच्या चहांत तिचा मुबलक उपयोग करतां येत नाहीं. तेव्हां एकानें तोंडांत साखरेचा खडा धरून चहा प्यावा. नंतर तोंडांतला खडा काढून तो दुसऱ्याला द्यावा. अशा रीतीनें साखरेच्या एकाद्या खड्यावर सर्व कुटुंबाचें चहापान होतें.

व्हिएन्ना हें पॅरिसच्या धर्तीवर बांधलेलें पण त्याहून थोडें लहान असें शहर आहे. येथील लोकांस ऑस्ट्रियन म्हणतात. तथापि ते वंशानें जर्मनच आहेत. पुष्कळ वर्षेंपर्यंत ऑस्ट्रियाचा बादशहा हाच साऱ्या जर्मनीचा बादशहा होता. पण प्रशियाच्या विलियम राजाच्या कारकीर्दींत हा मनु बदलला. त्या राजाची

दूरदृष्टि, त्याचा प्रधान बिस्मार्क याची चतुराईची राजनीति आणि सेनापति मोल्टक याचें रणकौशल्य हीं एकत्र जमून ऑस्ट्रियाच्या अमलांतून जर्मनी मोकळा झाला. प्रशियाचा राजा विलियम पहिला जर्मन बादशहा झाला. यामुळें ऑस्ट्रियाचें जुनें वैभव आणि सत्ता यांना जबर धक्का बसला. तथापि 'काप गेले पण भोकें राहिलीं' या न्यायानें आपलें नांव कसेंबसें सांभाळून ऑस्ट्रियन साम्राज्य जिवंत राहिलें आहे. जर्मन वंशांतील राजांनीं मध्य युरोप बहुधा भरून गेलें असतां आणि इंग्लंड आणि रशिया या देशांत जर्मनांचें बरेंच प्राबल्य असतांही आजपर्यंत ऑस्ट्रियाचे बादशहाच जर्मनीचे सत्ताधारी होते. साऱ्या मध्ययुरोपांत आपलेंच साम्राज्य असावें अशी इच्छा या घराण्यांत अद्यापिही वसत आहे. पण मनगटांत जोर नसल्यामुळें ती पूर्ण होत नाहीं इतकेंच.

तुर्काला युरोपांत 'रुग्ण गृहस्थ' ( sick man ) अशी संज्ञा लावितात. पण वास्तविक पाहातां ही संज्ञा ऑस्ट्रियालाच अधिक योग्य होईल. हा देश कॅथॉलिक पंथाचा आहे, आणि अगदीं परवांपर्यंत ऑस्ट्रियाला 'पवित्र रोमन साम्राज्य' अशी संज्ञा लावीत असत. हल्लींच्या तरुण जर्मनींत प्रॉटेस्टंट पंथाचें मोठेंच प्राबल्य आहे. आजपर्यंत ऑस्ट्रियाचा बादशहा म्हणजे पोपचा उजवा हात समजला जात असे; आणि आतांही राजघराण्यांतला कॅथॉलिक पुरुष सर्व युरोपांत हा एकटाच आहे. फ्रान्सही कॅथॉलिक पंथाचा आहे, तथापि तें लोकसत्ताक आहे. स्पेन आणि पोर्तुगाल येथील राजघराणीं कॅथॉलिक असलीं तरी राजकीय उलाढालींत ते देश कोणी जमेस धरीत नाहीं. इटलींत म्हणजे खुद्द पोपच्या वसतिस्थानांत त्याला राहाण्यापुरती मात्र जागा मिळाली आहे. त्याचें पूर्वीचें वैभव आणि सत्ता हीं दोन्हीही नष्ट झालीं आहेत. इटलीचा राजा आणि पोप महाराज या दोघांत कसलाही प्रेमसंबंध उरलेला नाहीं. राजा आतां भक्तीचें सोंगसुद्धां करीत नाहीं. इतकेंच नाहीं तर पोपचें दर्शनसुद्धां त्याला नको असतें आणि पोपलाही राजाचें मुखावलोकन सुखावह वाटत नाहीं. पोप आणि राजा या दोघांचीही राजधानी रोम हीच आहे. जुन्या काळीं ज्या वाड्यांत पोप राहात होता, तो वाडा राजानें त्याजपासून हिसकावून घेतला आणि त्यांत तो आतां स्वतः राहात असतो. प्राचीन काळीं इटलीच्या ज्या भागावर पोपची राजकीय सत्ता होती, तो भागही त्याच्या हातांतून आतां गेला आहे आणि त्याचें साम्राज्य

त्याच्या राहात्या वाड्याच्या मर्यादेंतच सामावलेलें आहे. तथापि पोपसंबंधीं पूज्य बुद्धि असलेले लोक अद्यापिही बरेच असल्यामुळें धार्मिक बाबींत त्याच्या शब्दाला अजून बरेंच महत्त्व आहे. याशिवाय त्याचा पाठपुरावा करण्यास ऑस्ट्रियन साम्राज्य उभें असतेंच. दीर्घ कालपर्यंत इटलीवर ऑस्ट्रियाची राजकीय सत्ता होती. परराष्ट्राच्या अमलाखालीं राहाणें ही गोष्ट कोणत्याही लोकांस रुचणारी नसते. या अमलांतून सुटण्याची धडपड इटालियन लोक करीत होतेच; आणि या धडपडींतूनच अर्वाचीन इटली जन्मास आला आहे. इटली आपल्या ताब्यांतून गेला, ही गोष्ट ऑस्ट्रियाला न रुचल्यामुळें तो इटलीचा वैरी होऊन राहिला आहे. इटलीनें आपलें लष्करी व आरमारी बळ वाढवावें, अशी भर इंग्लंडनें त्याला दिली; पण हा उपदेश इटलीच्या हिताला विघातक होता. इटली म्हणजे सुप्रसिद्ध दरिद्री; यामुळें इंग्लंडच्या नादीं लागून इटली आणखी कर्जांत बुडाला. याशिवाय भरींत भर म्हणून आफ्रिकेंतला मुलूख आपल्या राज्यास जोडण्याचा मोह त्याला पडला. पण अबिसीनियाच्या राजानें त्याला चांगलाच मार दिल्यामुळें पैशापरी पैसा गेला आणि अपेश मात्र पदरीं पडलें. इकडे हा प्रकार घडत असतां प्रशियाचें संस्थान उदयास येत होतें. ऑस्ट्रियाशीं युद्ध करून त्याचें जर्मन मुलखांतलें महत्त्व प्रशियानें समूळ नष्ट करून टाकलें. सांप्रत ऑस्ट्रियन साम्राज्य मरणाच्या पंथास लागलें आहे; आणि आपल्या नवीन मिळालेल्या स्वातंत्र्याचा उपयोग इटलीला नीटसा करितां न आल्यामुळें त्याची घडी चांगलीशी बसलेली नाहीं.

ऑस्ट्रियाचें सांप्रतचें राजघराणें हें मोठें स्वाभिमानी म्हणून साऱ्या युरोपांत प्रख्यात आहे. आपलें घराणें सर्वांत जुनें अशी प्रौढी तें मिरवितें. शरीरसंबंध करतांनासुद्धां या अभिमानाची त्याची जाणीव पूर्ण जागृत असते. कॅथॉलिक राजघराण्याशिवाय इतरांशीं संबंध जोडावयाचा नाहीं असा त्याचा बाणा आहे. अशा प्रकारच्या जुन्यांतल्या जुन्या म्हणून नाणावलेल्या राजघराण्याशीं संबंध जोडण्याचा मोह जेव्हां नेपोलियनला पडला, तेव्हांच आपल्या भावी विनाशाचें बीज त्यानें पेरलें. एकाद्या प्राचीन राजघराण्याशीं संबंध जोडून फ्रान्सांत नवें राजघराणें उत्पन्न करावें असला मोह त्याच्या बुद्धीला पडला. नेपोलियनच्या आरंभींच्या काळांत असल्या जुन्या मोठेपणाला तो केव्हांही जुमानीत नव्हता. ‘ माझें मोठेपण जुन्या वंशावर नसून भावी महान् वंशाचा मूळ पुरुष मी आहें ’ असें मोठ्या अभि-

मानानें तो म्हणे. दुसऱ्याच्या जिवावर मोठेपणा मिरविणारांचा तो तिरस्कार करी. पण भवितव्यतेचा चमत्कार कसा विलक्षण कीं, एवढा अभिमानी पुरुषसुद्धां जुन्या अभिमानाला भुलला !

यानंतर नेपोलियनच्या काळांत झालेल्या उलाढाली आणि त्यांत नेपोलियननें बजावलेला भाग या गोष्टी इतिहासप्रसिद्ध आहेत. जोसेफाईन राणीशीं घटस्फोट, ऑस्ट्रियन बादशहाशीं झालेल्या लढाईंत त्या बादशहाचा पराभव, त्याच बादशहाची मुलगी मराया लुइसा हिच्याशीं झालेला नेपोलियनचा विवाह, पुढें झालेला पुत्रजन्म, त्या मुलाला झालेला रोमचा राज्याभिषेक, नेपोलियनचें पतन, सासऱ्यानें केलेलें त्याचें शत्रुत्व, लेपझिक वॉटर्लूच्या लढाया, सेंट हेलीनांतील कैद, मुलाचा आजोळीं वास, त्या मुलाचा झालेला मृत्यु इत्यादि गोष्टी सर्वतोमुखीं झालेल्या आहेत.

फ्रान्सचें त्या काळचें लष्करी वैभव आतां उरलेलें नाहीं. तेव्हांच्या मानानें तो देश आतां बराच दुबळा झालेला असून जुन्या काळच्या वैभवाची आठवण करून संतोष मानणें एवढाच मार्ग त्याला उरलेला आहे. यामुळें हल्लींच्या काळांत नेपोलियनबद्दल किती तरी पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. पुष्कळ नाटककारांनीं नाटकें लिहिलीं आहेत, सुप्रसिद्ध नटी व नट या नाटकाचे प्रयोग महिनेच्या महिने करीत असतात; आणि प्रत्येक रात्रीं तिकीट मिळालें नाहीं म्हणून परत जाणारे लोक हजारों असतात. अगदीं अलीकडेच ‘तरुण गरुड’ या नांवाचें एक नाटक रंगभूमीवर आलें आहे. मादाम बर्नहार्द ही सुप्रसिद्ध नटी त्यांत काम करीत असते आणि पाय ठेवण्यास जागा नाहीं एवढी गर्दी नाटकगृहांत रोज होते.

‘तरुण गरुड’ हा नेपोलियनचा एकुलता एक पुत्र आपल्या आजोबाच्या घरीं व्हिएन्नाच्या राजवाड्यांत राहात आहे. बापाची वीरकथा त्याच्या कानीं जाऊं नये, अशी खबरदारी ऑस्ट्रियाच्या प्रधानानें घेतली आहे; पण नेपोलियनचे कांहीं हस्तक मुलाच्या तैनातींत आपला प्रवेश करून घेतात. या मुलाला कसें तरी पळवून फ्रान्समध्यें न्यावें आणि बूरबाँ घराण्याची हकालपट्टी करून तेथें बोनापार्टवंशाची स्थापना करावी असा बेत ते करितात. या कामीं युरोपांतील इतर राजांची मदत मिळावी अशाही त्यांच्या खटपटी सुरू आहेत. कसा झाला तरी तो नेपोलियनचा मुलगा. बापाचें कर्तृत्व अंशतः तरी त्याच्यांत अस-

णारच. एके दिवशीं शॉनब्रूनच्या राजवाड्यांतून मुलगा नाहींसा होतो. त्याचे छद्मी वेषांतले नोकरही त्याजबरोबर पळून जातात. पण पाताळयंत्री प्रधानाला या गोष्टीची बातमी लागते. अर्ध्यामुर्ध्या प्रवासांतच या मंडळीचे बेत संपुष्टांत येतात. राजपुत्राला धरून शॉनब्रूनच्या राजवाड्यांत पुन्हां कोंडण्यांत येतें. विचारा 'तरुण गरुड' पंख बांधले जाऊन त्याचें उड्डाण जागच्या जागींच राहातें, आणि मनांतल्या मनांत झुरत राहून त्याचा अंत होतो.

शॉनब्रूनचा राजवाडा ही सामान्य प्रतीची इमारत आहे. आतां तो राजवाडाच असल्यामुळें त्यांतील दालनें भपकेबाज रीतीनें शृंगारलीं आहेत; पण यांत विशेष कांहीं नाहीं. एका दालनांत शुद्ध चिनी कारागिरी, तर दुसऱ्यांत शुद्ध हिंदी, अशा रीतीनें सारा राजवाडा सर्व देशांच्या कौशल्याचें प्रदर्शन बनलें आहे. वाड्या-भोंवतालचा बाग फार मनोहर आहे. प्रेक्षक हा वाडा पाहाण्यास जातात, त्यांची मुख्य इच्छा म्हटली म्हणजे नेपोलियनच्या मुलाची खोली पाहाण्याची असते. तो कोणत्या खोलींत निजत असे, जेवणखाण कोठें करीत असे, आणि शिळोप्याचे वेळीं गप्पा गोष्टी करण्यास कोठें बसत असे, हीच जिज्ञासा तीव्र असून ती तृप्त करण्यासाठीं बहुतेक प्रेक्षक राजवाड्यांत जात असतात. पुष्कळ फ्रेंच स्त्रीपुरुषें 'तरुण गरुडा' ची खोली कोणती, त्याचा बिछाना कोणता आहे, असे आचरट-पणाचे प्रश्न तेथील द्वाररक्षकांस विचारतात. ऑस्ट्रियन लोकांना नेपोलियनबद्दल फारसें प्रेम वाटत नाहीं. आपल्या राजकन्येचें जबरीनें हरण करून आपल्या राज-घराण्याशीं या भुरट्यानें संबंध जोडला इतकीच आठवण ऑस्ट्रियन लोकांस आहे. त्याच्या मुलाला कोठें आश्रय राहिला नाहीं तेव्हां आजोबानें आपल्या घरीं त्याला थारा दिला, इतकेंच. तथापि ज्याला नेपोलियननें रोमचा राजा म्हणून अभिषेक केला, त्याला राजा म्हणण्यास मात्र कोणीही ऑस्ट्रियन तयार नव्हता. हा आमच्या बादशहाचा नातू एवढीच ओळख त्यांना होती; आणि बादशहाचा नातू अस-ल्यामुळें फार तर आम्ही त्याला आर्चडयूक म्हणूं, पण या पलीकडे त्याला अधिक मान देण्याची आमची इच्छा नाहीं, हें फ्रेंच लोकांनीं समजावें असें ते म्हणत. अशा स्थितींत 'तरुण गरुड' या संज्ञेची ओळख राजवाड्याच्या रक्ष-कांस पटली नाहीं तर त्यांत काय नवल? याशिवाय खुद्द बादशहाच या मुलाच्या मृत्यूला एकपरी कारणीभूत झाला आहे, असे उल्लेख त्या काळच्या

पुस्तकांत पुष्कळ आहेत. यामुळें त्याचें नांव निघतांच हे द्वाररक्षक कपाळाला आंठ्या घालतात आणि आपले ओंठ शिवून घेतात; आणि मग दालनामागें दालनें ते वायुवेगानें उघडीत जातात. त्यांच्या तोंडाचें कुलूप काढावयाचें तर त्याला एकच युक्ति आहे. त्यांचा हात बराचसा ओला झाला म्हणजे तोंड बोलूं लागतें. पण ते तरी बिचारे काय करणार? त्यांना मिळणारा पगार अगदींच बेताबाताचा, सरासरी पोट भरेल इतकाच असतो. मग समोर दिसणाऱ्या चकचकीत वस्तूचा मोह त्यांनीं कसा आवरावा? मनांतल्या जाज्वल्य देशाभिमानानें कपाळाला आंठ्या पडल्या तरी हात पुढें होतोच. मग फ्रेंच प्रेक्षकहि यथाशक्ति त्याला संतुष्ट करतात, आणि त्या काळचा प्रधान मेटरनिक याला शिव्या देत देत घरचा रस्ता सुधारतात.

व्हिएन्नांत विशेष पाहाण्यासारखी वस्तु म्हणजे तेथील पदार्थालय होय. विद्यार्थ्यांच्या फार उपयोगी पडणारें असें भौतिक शास्त्रांच्या उपकरणांचें संग्रहालयही मोठें आहे. त्याचप्रमाणें फार प्राचीन काळीं अस्तित्वांत असून आतां नामशेष झालेल्या प्राण्यांच्या सांगाड्यांचा संग्रहही बराच मोठा आहे. चित्रालयांत ठेवलेल्या तसबिरींपैकीं बराच मोठा भाग डच चित्रांनीं भरला आहे. सृष्टीचे देखावे आणि प्राणि यांचीं चित्रें अस्सलाबरहुकूम रेखाटण्यांत डच चित्रविद्येची फार प्रसिद्धी आहे. नुसत्या माशांचीं चित्रें काढण्यांत एका चित्रकारानें आपल्या आयुष्याचीं बरींच वर्षें खर्चिलीं होतीं. पाणी भरलेला ग्लास, एकादा मांसखंड अथवा एकादा पक्षी अशीं चित्रेंसुद्धां खरोखर अत्यंत आश्चर्यजनक असतात. पण स्त्रियांचीं जीं चित्रें डच कारागिरांनीं काढलीं आहेत, त्यांतील स्त्रिया तालीमबाजी वळणावर गेलेल्या दिसतात. व्हिएन्नांत जर्मन पंडित बरेच आहेत. तथापि ज्या कारणांनीं तुर्कस्थान अवनतीला गेला, तींच कारणें ऑस्ट्रियांतही अस्तित्वांत असलेलीं दिसतात. नानाविध मानववंश आणि अनेक भाषा यांची खिचडी तुर्कस्थानांत होती. यामुळें साम्राज्यांत एकसूत्रत्व आणणें अशक्य झालें; आणि हाच प्रकार आज ऑस्ट्रियन साम्राज्यांत आहे. ऑस्ट्रियनांच्या खऱ्या मुलखांत जर्मन वस्ती असून ती जर्मन भाषा बोलते. हंगेरीची प्रजा तार्तर शाखेची आहे. त्यांची भाषाही फार वेगळी आहे. या साम्राज्यांतील कांहीं मुलखांत ग्रीकांची वस्ती असून धर्मानें ते जुन्या कॅथॉलिक पंथाचे आहेत व ते ग्रीक

भाषा बोलतात. इतके वेगवेगळे प्रकार बेमालूमपणें सांधण्याची कला ऑस्ट्रियन बादशाहीला नाहीं; आणि नुसत्या तरवारीचें सामर्थ्य म्हटलें तर तेंही तितकें नाहीं. हेंच त्याच्या पतनाचें कारण आहे.

युरोपांत सध्या देशाभिमानाची लाट प्रचंड उठली आहे. एक भाषा बोलणारे आणि एकाच धर्माचे अनुयायी असलेले वेगवेगळ्या राज्यांतील लोक एकत्र होण्याची धडपड करीत आहेत. जेथें अशा प्रकारची संहति घडून आली, तेथें तो मुलूख सामर्थ्यवान् झालेला आहे, आणि उलटपक्षीं अशी संहति जेथें अशक्य झाली आहे, तेथें फाटाफूट आणि शक्तिपात हीं उघड दिसत आहेत. हल्लींच्या ऑस्ट्रियन बादशहाच्या मृत्यूनंतर त्या साम्राज्यांतील जर्मन भाषा बोलणारा मुलूख आपल्या साम्राज्यास जोडून घेण्याची खटपट जर्मनी अवश्य करील. जर्मनीचा हा बेत सिद्धीस जाऊं नये म्हणून रशिया त्याच्या मार्गांत आडवा पडेल; आणि असें झालें तर एका प्रचंड युद्धास सुरवात होईल हें उघड आहे. हल्लींचा ऑस्ट्रियन बादशहा फार वृद्ध झाला असल्यामुळें हा उत्पात केव्हां घडून येईल याचा भरंवसा नाहीं. सांप्रतच्या जर्मन बादशहानें तुर्की सुल-तानाशीं मित्रत्व जोडलें आहे. तुर्क आणि रशियन यांचा वैरभाव फार प्राचीन काळापासून चालत आला आहे आणि अद्यापही तो तसाच चालत आहे. अशा स्थितींत जर्मनीवर रशियानें स्वारी केली तर त्याला थोडाबहुत तरी पायबंद लावण्याचें काम तुर्कस्थान करील. हा सारा हिशेब मनांत करूनच जर्मन बाद-शहानें तुर्कांचें मित्रत्व संपादिलें आहे.

व्हिएन्नांत अवघ्या तीनच दिवसांत मला कंटाळवाणें वाटूं लागलें. पॅरिस शहर पाहिल्यानंतर युरोपांतील बाकीचीं शहरें बेचव वाटूं लागतात. विशेषतः इतर शहरीं नाविन्य असें कांहीं आढळत नाहीं. तीच पोषाखाची तऱ्हा, तींच पक्वान्नें, तीच जेवणाची पद्धत, आणि बाकीच्या साऱ्या गोष्टीही त्याच नमुन्या-बरहुकूम. जिकडे तिकडे तोच काळा पोषाख आणि तीच वांकडीतिकडी टोपी. मग मन लवकर विटून न जाईल तर काय होईल ? तशांत आकाश बहुधा अभ्राच्छादित. अशा स्थितींत डोक्यावर कृष्णवर्ण वस्त्राचें आच्छादन आणि जमिनीवर जिकडे तिकडे कृष्णवर्ण पोषाख पाहून जीव गुदमरल्यासारखा होतो. एकच तऱ्हा आतां साऱ्या युरोपभर पसरत आहे, आणि सर्वत्र एकच राहणी

आढळूं लागली आहे. माझ्या दृष्टीप्रमाणें हीं चिन्हें भावी विनाशाचीं आहेत. शेंकडों वर्षे एकाच प्रकारच्या तालमींत आम्ही वाढलों. सकाळीं उठल्यापासून रात्रीं आंग टाकीपर्यंत ठरलेल्या गोष्टी ठरलेल्या रीतीनें करावयाच्या, हें आमच्या आंगवळणीं पडून गेलें आहे. यामुळें आम्ही शुद्ध यंत्रें बनून गेलों आहों. आमच्या ठिकाणीं स्वतंत्र जीव नाहीं. आमची हालचाल निवळ यंत्राच्या हालचालीसारखी परप्रेरित आहे. यंत्रें ज्याप्रमाणें 'होय' अथवा 'नाहीं' असें कधींच म्हणत नाहींत, त्याचप्रमाणें आम्हीही बापदाद्यांच्या पावलांच्या खुणांवर पावलें टाकीत डोळे मिटून चालत आलों आहों. आमच्या ठिकाणीं स्वतंत्र विचारशक्ति उरली नाहीं. विचार नसल्यामुळें बुद्धीच्या उदयाचेंही कारण नाहीं; आणि बुद्धीच्या नाशामागें विनाश ठेवलेलाच आहे. युरोपांतले लोकही आतां याच मार्गानें जात आहेत; आणि आमची जी स्थिति आज आहे, तीच त्यांना उद्यां प्राप्त होणार आहे. एकच अन्न, एकाच प्रकारचें वस्त्रप्रावरण, एकाच प्रकारची विचार-सरणी, हीं सर्वांस सुरू झालीं म्हणजे ते लोकही आमच्याच सारखे यंत्रें बनून जातील. तेही मग बापदाद्यांच्या पावलांवर पावलें टाकण्यापलीकडे कांहीं कर-णार नाहींत. या अवस्थेचा अंतिम परिणाम विनाश हा एकच होय.

ता. २८ आक्टोबर रोजीं रात्रीं नऊ वाजतां आम्ही पुनः गाडींत बसलों, आणि ता. ३० रोजीं कॉन्स्टँटिनोपल येथें उतरलों. ह्या दोन रात्री आणि एक दिवस एवढ्या अवधींत आमची गाडी हंगेरी, सर्व्हिया आणि बल्गेरिया या तीन देशांतून गेली. हंगेरियन लोक ही ऑस्ट्रियाच्या बादशहाची प्रजा आहे. त्याचा अंमल ऑस्ट्रिया आणि हंगेरी या दोन देशांवर चालतो. तथापि त्याची पदवी 'ऑस्ट्रियाचा बादशहा आणि हंगेरीचा राजा' अशी आहे. हंगेरियन आणि तुर्क हे एकाच वंशाचे आहेत. तिबेटी लोकांची शाखाही याच वंशाची आहे. कास्पि-यन समुद्राच्या उत्तरेकडून हंगेरियन लोक युरोपांत शिरले; आणि तुर्क लोक इराणची पश्चिम सरहद्द आणि आशियामायनर या मार्गानें युरोपांत आले. हंगे-रियन लोक धर्मानें ख्रिस्ती आहेत आणि तुर्क मुसलमानी धर्माचे आहेत. तथापि तर्तर रक्ताचा लष्करी बाणा दोघांच्या ठिकाणीं सारखाच आहे. ऑस्ट्रियापासून विभक्त होण्याकरितां हंगेरियन लोकांनीं वारंवार युद्धें केलीं आहेत; आणि आतां हंगेरीचा अन्तर्भाव ऑस्ट्रियन सम्राज्यांत होत असला तरी त्या सत्तेचा अंकुश

वहुधा त्याजवर नाहींच. राजधानीचें शहर बुडापेस्त हें नीटनेटकें आणि सुंदर शहर आहे. स्वभावतः हंगेरियन लोक खुशालचंडू आहेत. त्यांना गायनवादनाचाही मोठा शोक आहे. पॅरिस शहरांत जिकडे तिकडे हंगेरियन बँडवालेच आढळतात.

रशिया आणि तुर्कस्थान यांजमधील युद्ध संपल्यानंतर सर्व्हिया, बल्गेरिया आणि बाकीचा बाल्कन प्रांतांतला तुर्कांचा मुलूख तुर्की साम्राज्यांतून फुटून स्वतंत्र झाला. तथापि टर्कीचा सुलतान हा या प्रांताचा बादशहा असें अद्यापिही म्हणवितो. सर्व्हिया आणि बल्गेरिया या संस्थानांना परराष्ट्रांशीं अद्यापिही राजकारण करितां येत नाहीं. फ्रान्स, जर्मनी आणि इंग्लंड हीं तीनच राष्ट्रें युरोपांत सुसंघटित आहेत. बाकीच्या सार्‍यांत आपल्या इकडल्यासारखाच गोंधळ चालतो; आणि युरोपांतील कित्येक संस्थानें तर इतकीं रानटी आहेत कीं, तितकी अवनति सार्‍या आशियांत कोठेंही सांपडावयाची नाहीं. सर्व्हिया आणि बल्गेरिया या संस्थानांत नुसत्या मातीचीं घरें असून लोकांच्या अंगावरही चिंध्याच आढळतात. गांवांत घाणीचे आणि कचर्‍याचे ढीग जागोजाग पडलेले असतात. मी हिंदुस्थानांतच आहें कीं काय असा भ्रम मला केव्हां केव्हां होई. हे लोक ख्रिस्ती असल्यामुळें त्यांना डुकरें बाळगावींच लागतात; आणि एकादें डुकर दोनशें माणसांनासुद्धां करितां येणार नाहीं इतकी घाण करितें. मातीच्या भिंती आणि वर मातीचेंच धाबें असें घर, रहिवाशांच्या अंगावर चिंध्या आणि तेथेंच डुकरांचें खिल्लार असा देखावा तुम्हीं डोळ्यांपुढें आणला तर सर्ब किंवा बल्गेरियन माणसाची कल्पना तुम्हांला बरोबर येईल. पुष्कळ युद्धें करून आणि रक्ताचे पाट वाहावून हे लोक तुर्कस्थानच्या जोखडांतून मोकळे झाले आहेत. पण या स्वातंत्र्याबरोबरच एक घोरपडही त्यांच्या गळ्यांत पडली आहे. आपलें सैन्य त्यांना युरोपियन पद्धतीवर सज्ज ठेवावें लागतें; आणि तेंही बरेंच मोठें असलें पाहिजे. कारण तसें नसेल तर त्यांच्या स्वातंत्र्याची शाश्वती एका दिवसापुरतीही सांगतां येणार नाहीं. शेजारचें रशियन आस्वल आज ना उद्यां या सार्‍यांनाच गिळंकृत करील, पण हें दोन दिवसांचें स्वातंत्र्यसुद्धां मोठ्या लष्करी बळावरच अवलंबून आहे. यामुळें सक्तीची लष्करभरती तेथें अस्तित्वांत आहे. फ्रान्सनें जर्मनीच्या हातचा

मार ज्या दिवशीं खाल्ला, तो दिवस युरोपचा दुर्दिन होय. त्या पराभवाच्या तिरमिरींत फ्रान्सनें प्रत्येक प्रजाजनावर लष्करी पोषाख चढविला. योग्य वय झाल्याबरोबर प्रत्येक तरुणानें ठराविक मुदतीचें लष्करी शिक्षण घेतलेंच पाहिजे असा निर्बंध फ्रान्सनें केला. या लष्करी कायद्यांतून कोणालाही मुक्त होतां येत नाहीं. तीन वर्षेंपर्यंत लष्करी छावणींत राहून प्रत्येकानें लढाईची विद्या शिकलीच पाहिजे. कोणी लक्षाधीशाचा बेटा असला तरी सामान्य शेतकऱ्याप्रमाणें त्यानें खांद्यावर बंदूक टाकलीच पाहिजे. तेवढ्या अवधींत त्याच्या खाण्यापिण्याचा आणि कपड्यालत्त्याचा खर्च सरकार करितें; आणि याशिवाय रोज एक पैसा पगार म्हणून देतें. मुदत संपल्यानंतर हा शिपाई घरीं जातो. तथापि हुकूम झाल्याबरोबर लष्करांत येण्यास त्यानें दोन वर्षेंपर्यंत सज्ज राहिलें पाहिजे. या दोन वर्षांनंतर पंधरा वर्षेंपर्यंत सरकार बोलवील तेव्हां त्यानें सैन्यांत आलें पाहिजे. जर्मनीनें बोलून चालून सिंहाची शेंपटी पिरगळून त्याला राग आणला, तेव्हां स्वसंरक्षणासाठीं त्यालाही जय्यत तयारी ठेवणें भाग आहे. यामुळें जर्मनीही पंचहत्यारी बनला. इतर बारीक सारीक संस्थानांनींही पुढें हेंच वळण गिरविलें. युरोपांतील सारींच संस्थानें एकमेकांबद्दल साशंक असून त्यांच्या पोटांत सदोदित धास्ती असते. या सक्तीच्या लष्करी शिक्षणाला एकटें इंग्लंड मात्र अपवाद आहे. इंग्लंड हें बेट आहे; यामुळें कोणाही शत्रूला समुद्रांतून आल्यावांचून त्याजवर स्वारी करणें शक्य नाहीं. यासाठीं इंग्लंडनें प्रचंड आरमार बाळगलें आहे. पण बोअर लोकांशीं झालेल्या युद्धांत इंग्लंडला जो धडा मिळाला, त्यामुळें सक्तीची लष्करी भरती त्यालाही कदाचित् करावी लागेल. लोकसंख्येनें रशिया सर्वांत मोठा आहे यामुळें सर्वांत मोठें लष्कर त्याला उभें करितां येतें. अशा रीतीनें बाल्कन संस्थानांच्या चारही बाजूंना लष्करी छावण्या असल्यामुळें त्यांनाही सदोदित लढाईच्या तयारीनें राहावें लागतें. आतां एवढ्या तयारीला पैसा कोठून आणावा ? शेतकऱ्यांना पिळून हा पैसा सरकार उभा करितें. यामुळें त्यांना चिंध्या पांघरण्यावांचून गत्यंतरच नाहीं. खेड्यापाड्यांत चिंध्यापांघ्यांचे शेतकरी तर शहरांतून भपकेबाज पोषाकाचे लष्करी शिपाई असा देखावा साऱ्या युरोपांत दृष्टीस पडतो. लष्करी पेशाचें खूळ साऱ्या युरोपांत पिकलें आहे. पाहावें तिकडे शिपाईच शिपाई! तथापि स्वातंत्र्य तें स्वातंत्र्य

आणि गुलामगिरी ती गुलामगिरी ! सत्कार्य झालें तरी तें जुलमानें करावें लागल्यास तें कंटाळवाणेंच होतें. हें कार्य माझें आहे अशी भावना असल्याशिवाय कोणाच्याही हातून महत्कार्य घडूं शकत नाहीं. आंगावर चिंध्या आणि अहोरात्रांत एक वेळ भाकरतुकडा अशा स्थितींतलें स्वातंत्र्य सोन्याच्या सांखळींतील गुलामगिरीहून शतपट चांगलें ! गुलामाला या लोकीं आणि परलोकींही नरकवास भोगावा लागतो. सर्व आणि बल्गेरियन हे लोक अद्यापि मागसलेले असून इतर युरोपीयन लोक त्यांची चेष्टा करीत असतात. पण शतकेंच्या शतकें त्यांनीं गुलामगिरींत काढलीं असून तींतून नुकतेच कोठें ते मुक्त झाले आहेत. मग एकाच दिवसांत सारें शहाणपण त्यांना कोठून येणार ? त्यांच्या हातून अनेक चुका घडणें अपरिहार्य आहे; पण चुका करतांकरतांच ते हळूहळू शहाणे होतील. अंगावर जबाबदारी येऊन पडली म्हणजे दुबळ्यांतला दुबळाही भीम बनतो, आणि वेड्यांतला वेडा नाना फडणीस होऊं शकतो.

आमची गाडी हंगेरी, रोमानिया आणि इतर संस्थानें यांतून गेली. मृतप्राय ऑस्ट्रियन साम्राज्यांत जीं मानवकुलें आहेत, त्यांत हंगेरियन लोकच अद्याप जिवंत आहेत. युरोपांत जितकीं मानवकुलें आहेत, त्यांतील एक दोन लहानशीं वगळून बाकीचीं सारीं इंडो-युरोपीयन किंवा आर्य या वंशाचीं आहेत असें युरोपीय पंडितांचें मत आहे. संस्कृतोद्भव भाषा न बोलणाऱ्या लोकांत हंगेरियन लोक येतात. हंगेरियन आणि तुर्क हे एकाच वंशाचे आहेत हें पूर्वी सांगितलेंच आहे. युरोप आणि आशिया या दोन्ही खंडांत या वंशानें आपलें राज्य स्थापल्यास फार दीर्घ काल लोटला आहे असें नाहीं. हिमालयाच्या उत्तरेस आणि हिंदुकुश पर्वताच्या आजूबाजूला तुर्कस्थान म्हणून जो प्रदेश आहे, तेंच तुर्कांचें जन्मस्थान होय. या प्रदेशाला तुर्की भाषेंत चागोई असें म्हणतात. दिल्ली येथील मोगल घराणें, इराणचें सध्यांचें राजघराणें, तुर्की सुलतानाचें घराणें आणि हंगेरियन लोक या साऱ्यांचा प्रसार याच मूलस्थानांतून झाला. तुर्क हे प्राचीन काळीं कैकाड्यासारखे भटकणारे लोक होते. बकरीं, घोडे आणि इतर जनावरें यांचीं खिल्लारें बरोबर घेऊन ते वर्षानुवर्षे भटकत राहात. बायकामुलें आणि मालमत्ता हींसुद्धां ते बरोबर वाळगीत. गुरांना चारा मिळण्याइतकी सोय दिसली कीं, तेथें आपलीं पालें ठोकावीं आणि चारा संपला कीं, आपलें लष्कर तेथून उठवून दुसऱ्या कोठें तरी जाऊन

पडावें. आजमितीसही मध्यआशियांत या वंशाच्या कांहीं शाखा अशाच भटकणाऱ्या आहेत. भाषा आणि शरीरविशेष या बाबींत मध्यआशियांतील या शाखांचें तुर्कांशीं असलेलें साम्य अद्यापिही स्पष्ट दिसतें. देशमानानें चेहऱ्यांत अल्पस्वल्प फरक पडला आहे. तुर्कांचें तोंड मांगोलियन तोंडासारखेंच आहे. त्याचप्रमाणें डोक्याचा आकार आणि गालाचीं हाडें यांतही साम्य आहे. पण तुर्कांचें नाक चपटें नाहीं; त्याचप्रमाणें त्यांचे डोळे मोठे असून दृष्टीही सरळ असते. आर्य आणि सेमिटिक या दोन वंशांच्या रक्ताचें थोडेंबहुत मिश्रण तुर्कवंशांत झालें असावें असें मानण्यास जागा आहे. प्राचीन काळापासून तुर्क लोक युद्धप्रिय आहेत; आणि त्यांच्या रक्ताचें जें मिश्रण संस्कृतोद्भव भाषा बोलणाऱ्या लोकांशीं झालें, त्यांतून अफगाण, खिलजी, हजारा इत्यादि लढाऊ शाखा निर्माण झाल्या. या लोकांत युद्ध ही एक मोठ्या शोकाची बाब आहे. याच जातीच्या लोकांनीं हिंदुस्थानावर वारंवार स्वाऱ्या केल्या. फार प्राचीन काळीं या तुर्कवंशानें पश्चिम हिंदुस्थानांतील बराच प्रांत जिंकून एक बरेंच मोठें राज्य स्थापन केलें होतें. हिंदुस्थानांत येऊन राहिल्यानंतर त्यांनीं बौद्ध धर्माचा स्वीकार केला. हुश्क, युश्क, कनिष्क हे सारे तुर्की राजे काश्मीरच्या प्राचीन इतिहासांत नमूद झालेले आहेत. बौद्ध धर्मांतील महायान पंथाची स्थापना कनिष्कानें केली. यानंतर बऱ्याच काळानें हे लोक पुन्हां मुसलमान झाले; आणि बौद्ध धर्माचीं प्रमुख स्थानें त्यांनीं उध्वस्त केलीं. काबूलकंदाहारपर्यंत बौद्ध धर्म पूर्वी पसरला होता; पण या लोकांनीं पुढें त्याचा मागमूसही राहूं दिला नाहीं. मुसलमानी धर्म स्वीकारण्यापूर्वी या लोकांनीं जेथें जेथें प्रवेश केला, तेथल्या चालीरीती, तेथील विद्या आणि संस्कृति यांचा स्वीकार ते करीत असत. पण महंमदी धर्माचा स्वीकार केल्यानंतर फक्त तरवारीचाच धंदा त्यांनीं केला. त्या वेळीं त्यांच्यांत एवढीच उपजत बुद्धि होती. हळूहळू पूर्वसंस्कृतीचा आणि विद्येचा त्यांना विसर पडत चालला; आणि कालांतरानें या गोष्टींची ओळखही त्यांना राहिली नाहीं. इतकेंच नव्हे तर ज्या ज्या देशावर त्यांची तरवार गाजली तेथील मूळची संस्कृतीही उध्वस्त होत गेली. अर्वाचीन अफगाणिस्थान व कंदाहार इत्यादि भागांत प्राचीन काळचे स्तूप, मठ, विहार, देवळें, पुतळे इत्यादि वस्तू अद्यापिही आढळतात. त्यांच्या ज्या पूर्वजांनीं बौद्ध धर्म स्वीकारला होता, त्यांच्याच हातचीं हीं कामें आहेत. पुढें तुर्की रक्ताचें मिश्रण

त्यांच्यांत झालें. त्यांनीं मुसलमानी धर्म स्वीकारला आणि त्यानंतर पूर्वजांनीं केलेलीं हीं कृत्यें उध्वस्त होत गेलीं. त्यांच्यांतील संस्कृति नष्ट होत चालली आणि सांप्रत खुद्द अफगाणिस्थानांतील रहिवाशी आणि आजूबाजूच्या मुलखांतील लोक हे निवळ अक्षरशत्रु आणि असंस्कृत आहेत. स्वतःच्या पूर्वजांच्या विद्येची, धर्माची, संस्कृतीची आणि शिल्पकलेची किंमत करण्याची अक्कल त्यांना नाहीं. हीं कामें यक्षगंधर्वांनीं केलीं असावीं असा त्यांचा समज आहे. असले प्रचंड उद्योग मनुष्याच्या सामर्थ्याच्या बाहेरचे आहेत अशी त्यांची पक्की खात्री आहे. इराणची अवनति इतकी होण्याचें कारण हेंच कीं, तेथील राजघराणें रानटी तुर्की वंशाचें आहे आणि प्रजाजन जुन्या इराणी शाखेचे आहेत. ही शाखा आर्यवंशीय आहे. त्याचप्रमाणें ग्रीक व रोमन साम्राज्यें जाऊन तेथें तुर्कांची सत्ता स्थापन झाल्याबरोबर त्या संस्कृतीहि नामशेष झाल्या. कॉन्स्टँटिनोपल हें ग्रीक व रोमन संस्कृतींचें अखेरचें माहेरघर होय. तेथें रानटी तुर्कांचे पाय लागल्याबरोबर या प्राचीन संस्कृतींना भूमातेच्या पोटांत ठाव घ्यावा लागला. तुर्कांचा हल्ला म्हणजे शुद्ध प्रचंड वादळ; ते जेथें जेथें गेले तेथें तेथें मूळच्या जमिनीशिवाय त्यांनीं कांहींहीं उरूं दिलें नाहीं. या नियमाला मोगल घराणें मात्र अपवाद आहे. यामुळें हिंदुस्थानांत मात्र केवळ असा प्रकार घडला नाहीं. कदाचित् हिंदु संस्कृतीचें आणि हिंदु रक्ताचें मोगलांशीं झालेलें मिश्रण हेंही या गोष्टीचें कारण असूं शकेल. जितक्या मुसलमानी वंशांनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या, त्या साऱ्यांचाच अंतर्भाव तुर्क या एका शब्दांत रजपूत भाटांनीं आणि कवींनीं केला आहे. त्यांचें हें करणें वस्तुतः अगदीं योग्य आहे. कारण, या मुसलमानी सैन्यांत वेगवेगळ्या शाखांचे लोक असले तरी सैन्याचा मुख्य अधिकार तुर्कांच्याच हातीं असे.

मुसलमानी तुर्क म्हणजे जुन्या बौद्धधर्मीयांचे धर्मभ्रष्ट वंशज; उलटपक्षीं ज्यांवर स्वारी करून त्यांनीं हिंदुस्थानांत विजय मिळविले तेही जुन्या बौद्धधर्मीयांचे तसेच भ्रष्ट वंशज. जेथें तुर्की अंमल सुरू झाला तेथील प्रजा जुलमानें बाटविण्यांत आली. हा प्रकार केवळ तरवारीच्या धारेवरच घडला. ह्या तुर्कांची भाषा आणि त्यांची चेहरेपट्टी यांत रक्ताच्या भेसळीमुळें आतां पुष्कळच फरक पडलेला आहे. विशेषतः अस्सल जन्मभूमीपासून ज्या शाखा लांबवर गेल्या, त्यांच्यांत हा फरक मोठ्या प्रमाणावर पडला. या शाखांच्या भाषेंतही अनेक भाषांचें मिश्रण झालेलें आहे.

यंदांच्या सालीं इराणचा शहा पारिस येथें प्रदर्शन पाहाण्याकरितां आला होता. तेथून कॉन्स्टँटिनोपल येथें जाऊन तेथून खुष्कीचे मार्गानें तो इराणला परत गेला. कॉन्स्टँटिनोपल येथें असतां तेथील सुलतानाची व त्याची भेट झाली, त्या वेळीं दोघांनींही जुन्या तुर्की भाषेचा उपयोग केला होता. तथापि सुलतानाच्या भाषेंत फारशी, अरबी आणि क्वचित् ग्रीक शब्दांचेंही मिश्रण होतें. सुलतानाच्या भाषेच्या मानानें शहाची भाषा बरीच शुद्ध होती.

प्राचीन काळीं मूळ तुर्क लोकांत दोन शाखा झाल्या. यांचीं नांवें पांढरीं मेंढरें आणि काळीं मेंढरें अशा अर्थाचीं होतीं. काश्मीरच्या उत्तरेकडील मूल स्थानांतून निघून एक शाखा कास्पियन समुद्राच्या किनाऱ्यापर्यंत पोंचली. चारा असेल तेथें कांहीं दिवस मुक्काम करावा व तो संपला कीं पुढें चालूं लागावें, अशा तऱ्हेनें कास्पियन समुद्राचा किनारा तिनें गांठला. कास्पियन समुद्राच्या उत्तर किनाऱ्याच्या बाजूनें ही पांढऱ्या मेंढरांची शाखा युरोपांत पोंचली. या वेळीं रोमन साम्राज्य बहुधा मोडकळीस येऊन पोंचलें होतें. त्या साम्राज्यांतील हंगेरीचा मुलूख बळकावून ही शाखा तेथें ठाणें देऊन बसली. हळूहळू तेथें हंगेरीचें राज्य सुरू झालें. इकडे काळीं मेंढरें कास्पियनच्या दक्षिण किनाऱ्यानें निघालीं तीं इराणच्या पश्चिम भागापर्यंत पोंचलीं व कॉकेशस पर्वत ओलांडून अरबस्थान, आशियामायनर वगैरे प्रांतांची मालकी तीं बळकावून बसलीं. हळूहळू खलिफाचें सिंहासनही त्यांनीं आपलेंसें केलें; आणि रोमन साम्राज्याचा पश्चिमेकडील भाग हळू हळू त्यांनीं गिळंकृत केला. फार प्राचीन काळीं तुर्क लोक सर्पपूजक होते. यांपैकीं कांहीं लोक हिंदुस्थानांतही आले होते, आणि त्यांनाच नाग, तक्षक अशा संज्ञा आमच्या लोकांनीं दिल्या असाव्यात. हिंदुस्थानांत वस्ती केल्यावर या तुर्क लोकांनीं बौद्ध धर्माचा स्वीकार केला. इतर प्रदेशांत जे तुर्क लोक गेले त्यांनीं तेथील धर्माचा स्वीकार केला. अशा रीतीनें हंगेरींत शिरलेल्या पांढऱ्या मेंढरांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारला व काळीं मेंढरें मुसलमान झालीं. तथापि या दोन्ही शाखांत धर्माचे म्हणून जे विधी अजूनही चालू आहेत, त्यांच्या पोटांत सर्पपूजा आणि बौद्ध धर्म यांचे अवशेष बारीक दृष्टीनें पाहाणारास अजूनही आढळतात.

सांप्रतचे हंगेरियन लोक वंशानें आणि भाषेनें तुर्क असले तरी धर्मानें ते रोमन कॅथॉलिक पंथाचे ख्रिस्ती आहेत. प्राचीन काळीं धर्मवेड कळसास पोंचलें

होतें. त्याचें वारें एकदां शिरलें कीं जातगोत, भाषा, रक्तसंबंध इत्यादि बंधनांचा विचार कोणाच्या मनांत राहात नसे. हंगेरियन लोक आतां ख्रिस्ती असल्यामुळें ते तुर्कांचे कट्टे वैरी बनले आहेत. या हंगेरियनांची मदत नसती तर आजूबाजूंचीं बारीकसारीक संस्थानें तुर्कांच्या कचाट्यांतून कधींच सुटलीं नसतीं. तुर्कांच्या तडाख्यांत त्यांचें अस्तित्वही आज आपणांस दिसलें नसतें. आतां शिक्षणाचा प्रसार चोहोंकडे झाला आहे. प्राचीन काळाबद्दलचे शोध करावे, अशी जिज्ञासा सर्वत्र उत्पन्न झाली आहे. प्राचीन काळच्या भाषा, प्रदेश, अवयवविशेष इत्यादिकांच्या द्वारें सांप्रतच्या लोकांचे पूर्वसंबंध कसे होते हें पाहाण्याची इच्छाही सर्वत्र उद्भवली आहे. धर्मवेडाचा जोरही आतां पूर्वींसारखा राहिलेला नाहीं. यामुळें सुशिक्षित हंगेरियन आणि तुर्क यांच्यांत स्नेहसंबंध आतां उत्पन्न होऊं लागला आहे. प्राचीन काळीं केव्हां तरी आपण एकाच वंशाचे होतों ही जाणीव त्यांच्यांत उत्पन्न झाली आहे.

हंगेरियन देश अद्यापिही ऑस्ट्रियन साम्राज्याचाच एक भाग म्हणवितो. तथापि त्या साम्राज्याशीं त्याची ताटातूट पूर्वीं अनेकवार झाली आहे. अनेकवार बंडें आणि क्रांत्या होऊन आजमितीस त्या साम्राज्याचें हंगेरीवरील स्वामित्व नांवापुरतें मात्र उरलें आहे. आपला अंतर्गत कारभार आपल्या प्रतिनिधीसभेच्या द्वारें हंगेरी स्वतःच पाहातो. या बाबतींत साम्राज्यसत्ता यत्किंचितही ढवळाढवळ करूं शकत नाहीं. ऑस्ट्रियाचा बादशहा हा हंगेरीचा नांवाचा मात्र राजा आहे; आणि ही नांवाची सत्ताही पुढें कितपत चालेल हा प्रश्नच आहे. युद्धचातुर्य आणि शौर्याबरोबर सामान्यतः असणारा दिलदारपणा हे अस्सल तुर्क वंशाचे गुण हंगेरियन लोकांत अद्यापिही आढळतात. मुसलमानी धर्माचा स्वीकार त्यांनीं केला नसल्यामुळें साहित्यसंगीतादि कला म्हणजे सैतानांचें जाळें हा मुसलमानांचा समज त्यांच्यांत नाहीं. हंगेरियन लोक स्वभावतःच संगीतभक्त असल्यामुळें त्यांच्यांत उत्तमोत्तम गवई आज किती तरी आहेत. गायनवादनाबद्दल त्यांची ख्याति साऱ्या युरोपभर पसरली आहे.

शीतकटिबंधांतील लोक मिरची खात नसावे, असा पूर्वीं माझा समज होता. आमच्या उष्ण कटिबंधांतच ही दुष्ट संवय चालू असावी असें मला वाटे; पण हंगेरींत आल्यानंतर हा समज अगदीं खोटा आहे असें मला दिसून आलें. हंगे-

रींत तिखट खाण्याचा प्रघात आहे, आणि रुमानिया, बल्गेरिया इत्यादि मुलखांतील लोक तर तुमच्या मद्राशांवरही मात करितात.

कॉन्स्टँटिनोपल शहराचें पहिलें दर्शन आम्हांस गाडींतूनच झालें. हें शहर फार पुरातन काळचें आहे. त्याचा जुनाटपणा त्याच्या रचनेंत आजही तसाच कायम आहे. लांकडी घरें, घाणीनें भरलेल्या वांकड्यातिकड्या गल्ल्या आणि भिंतींच्या बाजूनें वाहाणारीं घाणेरडीं गटारें आज सर्वत्र दिसून येतात. तथापि युरोपांत असला प्रकार दुसऱ्या कोठें नसल्यामुळें नाविन्य म्हणून या शहरांतील ही बाबसुद्धां प्रेक्षणीयच बनली आहे. आमच्याजवळ बरींच पुस्तकें असल्यामुळें स्टेशनावर आम्हांस फार त्रास सोसावा लागला. तेथील कस्टम्सच्या अधिकाऱ्यांची समजूत पाडण्याची खटपट आम्हीं पुष्कळ केली, पण तिचा कांहींच उपयोग न होतां अखेरीस हें प्रकरण तंट्यावर गेलें; पण अखेरीस मुख्य तुर्की अधिकाऱ्याला जेवण तयार असल्याची वर्दी आल्यामुळें अधिक भानगड न करितां त्यानें आम्हांस जाऊं दिलें. आमच्या पुस्तकांपैकीं दोनच पुस्तकें ठेवून घेऊन बाकीचीं नेण्यास आम्हांस परवानगी मिळाली. या दोन पुस्तकांची तपासणी झाल्याबरोबर तीं आमच्या पथिकाश्रमांत पाठविण्यांत येतील, असें त्या अधिकाऱ्यानें आम्हांस सांगितलें; पण या पुस्तकांचें दर्शन आम्हांस केव्हांच परत झालें नाहीं.

आम्ही इस्तंबूलच्या बाजारांतून आणि शहरांतून फिरून आलों. इस्तंबूल हें सध्यांच्या कॉन्स्टँटिनोपलचें जुनें नांव आहे. या शहराचा 'पेरा' म्हणून जो भाग आहे, तो सामुद्रधुनीच्या पलीकडे असून त्यांत मुख्यतः युरोपियनांची वस्ती आहे. मोठाले पथिकाश्रम वगैरे तेथेंच आहेत. संध्याकाळीं वुडस्पाशा यांच्या भेटीला आम्ही गेलों होतों. दुसऱ्या दिवशीं बोटींतून बास्फोरसच्या सामुद्रधुनींत हिंडावयास गेलों. थंडी अतिशय पडली होती आणि वाराही झपाट्याचा होता. यामुळें फार दूरवर न जातां पहिल्याच मुक्कामाला आम्ही जमिनीवर उतरलों. तेथून स्कुटारीला जाऊन पेरी हायसिंथ यांची भेट घ्यावी असें आम्हीं ठरविलें. स्थानिक भाषा आम्हांस येत नव्हती. यामुळें आमचा व्यवहार खाणाखुणांवरच चालला होता. तेव्हां तशाच साधनांनीं एक बोट भाड्यानें ठरवून खाडीच्या पलीकडे आम्ही गेलों; आणि भाड्याची गाडी करून स्कुटारीला जावयास निघालों. वाटेंत एका सुफी फकीराची मठी पाहिली. छांछूं करून लोकांचे

रोग बरे करण्याचा धंदा हे फकीर करतात. रोगी आला म्हणजे प्रथम कुराणाचा थोडासा भाग ते वाचतात. हा पाठ होत असतां ते मागें पुढें झुलतात. मग उभे राहून पिंगा घातल्यासारखें ते करतात. हळूहळू त्यांच्या अंगांत वारें येतें; मग रोग्याच्या शरीरावर पाय ठेवून त्याला ते बरा करितात.

पेरी हायसिंथ यांजबरोबर अमेरिकन पाठशाळांबद्दल आमची बरीच भवति न भवति झाली. थोड्या वेळानें तेथून आम्ही परत जाण्यास निघालों, आणि पहिल्यासारखीच भाड्याची बोट करून आम्ही इस्तंबूलला आलों. प्राचीन काळच्या ग्रीक बादशहांच्या वसतिस्थानांत हल्लीं एक पदार्थसंग्रहालय स्थापिलें आहे. पूर्वी कधीं न पाहिलेल्या अशा कांहीं वस्तू आमच्या पाहाण्यांत आल्या. हा भाग उंचवट्यावर असल्यामुळें तेथून शहराचा देखावाही फार सुंदर दिसतो. येथेंच एका पथिकाश्रमांत आम्हीं भोजन केलें. येथें वाटाण्याचे फुटाणे मला खावयास मिळाले. त्याचप्रमाणें तुर्की पद्धतीचा मसालेभातही मिळाला; आणि मींही या वस्तूंवर यथेच्छ ताव मारला. प्राचीन काळच्या तटबंदीचे अवशेष स्कुटारी येथें अद्यापिही आहेत. इस्तंबूलचा तुरुंगही येथेंच आहे.

कांहीं विशिष्ट माणसांची भेट घेत घेत संध्याकाळीं आम्ही फ्रेंच वकिलातींत पोंचलों. आमचें संध्याकाळचें भोजन तेथेंच झालें. आमच्या पंक्तीला एक ग्रीक पाशा आणि एक अल्बेनियांतील गृहस्थ होता. येथें धर्मावरील व्याख्यानालाही बंदी होती. यामुळें मला तेथें बोलतां आलें नाहीं. चोबेजी या नांवाचा एक गुजराथी ब्राह्मण आम्हांला भेटला. उत्तर हिंदुस्थानांतील हिंदु आणि मुसलमान यांची वस्ती येथें बरीच आहे. नूरबे या नांवाचा प्रख्यात भाषापंडित आहे. याजबरोबर आमचें बरेंच संभाषण झालें. या गृहस्थाचा आजा फ्रेंच होता. त्यामुळें या मिश्रणांतून त्याची पुढील प्रजा काश्मिरी वळणाची आणि रूपानें देखणी झाली असें म्हणतात. येथें पडद्याची पद्धत आम्हांस आढळून आली नाहीं. वारयोषितांचा धंदा करणाऱ्या मुसलमानी स्त्रिया येथें फार आहेत असें म्हणतात. या धंद्यांत इतर देशांतील स्त्रिया येथें फार करून नाहींत. तुर्कस्थानांतील आर्मीनियन प्रजेवर फार जुलूम होत असून पुष्कळ वेळां त्यांच्या कत्तलीही घडतात असा प्रवाद आमच्या कानांवर आला. आर्मीनियन लोकांना स्वतःचा असा देश नाहीं. ते जेथें राहातात तेथें मुसलमानांची वस्ती त्यांच्याहून अधिक असते. आर्मीनिया

असा कांहीं आंखलेला म्हणून मुलूख नाहीं. तुर्की साम्राज्यांत कुर्द या नांवाची एक रानटी मुसलमानी धर्माची जात आहे. ही जात अतिशय कडवी शूर आहे. आणि कुर्द लोकांचें एक स्वारांचें पथक बनविण्याची खटपट सुलतान हल्लीं करीत आहे. रशियांतील कोझॅक स्वारांच्या वळणावर यांना शिकवून तयार करण्यांत येतें.

ग्रीक आणि आर्मीनियन या लोकांचे मुख्य धर्माचार्य येथें आहेत. ग्रीक आणि आर्मीनियन लोकांना येथें डोईपट्टी द्यावी लागते. हा कर उठवावा म्हणून या लोकांनीं सुलतानाकडे खटपट केली, तेव्हां त्यांच्या धर्माध्यक्षांना बोलावून त्यांजपुढें एक सूचना मांडली. आर्मीनियन आणि ग्रीक लोक लष्करांत भरती करून घेण्यास तयार असतील तर हा कर माफ होईल अशी ही सूचना होती. या सूचनेवर धर्माध्यक्षांनीं एक शंका काढली. ते म्हणाले, 'मुसलमानी लष्करा-बरोबर लढणारे ग्रीक अथवा आर्मीनियन शिपाई रणांगणीं पडले तर त्यांच्या दफनाच्या वेळीं मोठा घोंटाळा होईल.' यावर सुलतान म्हणाला, 'एवढीच अडचण असेल तर प्रत्येक पलटणीबरोबर मुसलमानांप्रमाणें आर्मीनियन आणि ग्रीक भटही ठेवूं. लढाईच्या वेळीं फारसा भेदभाव करतां येणें शक्य नसतें. एकाच खाड्यांत पुष्कळशीं प्रेतें पुरणें भाग पडतें. तेव्हां प्रेतें पुरतांना आमच्या भटां-बरोबर तुमचेही भट आपला पाठ म्हणत राहातील. एका धर्माच्या उत्तरक्रियेच्या पाठाबरोबर दुसऱ्या धर्माची उत्तरक्रिया कानीं पडली तरी त्यांत फारसें बिघडत नाहीं.' पण सुलतानाचें हें म्हणणें ख्रिस्त्यांना पटलें नाहीं. यामुळें ही डोईपट्टी अद्याप तशीच चालू आहे. मुसलमानी शिपायांच्या संगतींत फार दिवस राहिल्यानें आपल्यांतील लोक कदाचित् मुसलमान होतील अशी भीति त्यांना वाटली.

हल्लींचा सुलतान हा मोठा मेहनती माणूस आहे. राजवाड्यांतील साऱ्या कामा-वर त्याची जातीनें देखरेख असते. येथें होणाऱ्या नाचनाटकांची व्यवस्थाही तो स्वतः पहातो. याच्या आधींचा सुलतान मुराद हा खरोखर अगदीं नालायक मनुष्य होता; पण सध्याचा सुलतान बुद्धिमान् आहे, असें म्हणतात. यानें आपल्या कारकीर्दींत संस्थानांत केलेल्या सुधारणा खरोखरच आश्चर्यजनक आहेत. लोक-प्रतिनिधींच्या द्वारें राज्यकारभार चालवावा अशी लायकी येथील प्रजेंत अद्यापि आलेली नाहीं.

सकाळीं दहा वाजतां आम्हीं कॉन्स्टँटिनोपल शहर सोडलें, आणि एक रात्र व

एक दिवस आम्हीं समुद्रावर काढली. समुद्र अगदीं शांत होता. हळू हळू सुवर्णशृंग नांवाच्या शिखराच्या बाजूनें जात जात आम्ही मार्मोराच्या समुद्रांत आलों. या समुद्रांत लहान लहान पुष्कळ बेटें आहेत. यांपैकीं एका बेटांत जुन्या ग्रीक धर्माचा एक मठ आम्हीं पाहिला. धर्मतत्त्वांचा अभ्यास करण्याची सोय या मठांत पूर्वी पुष्कळ होती. कारण, हें बेट आशिया आणि यूरोप या दोन्ही खंडांच्या सीमेवर आहे. सकाळीं आम्ही फिरावयास निघालों असतां प्रोफेसर लायपर यांची अचानक भेट झाली. त्यांना पूर्वी मद्रासच्या पचाप्पा कॉलेजांत मी भेटलों होतों. या द्वीपसमूहापैकीं एका बेटांत एका जुन्या देवळाचे अवशेष आम्हांला आढळले. हें देऊळ नेपच्यून देवाचें असावें असा तर्क आहे.

संध्याकाळीं आम्ही अथेन्स शहरीं पोंचलों; आणि एक रात्र क्वारंटाईनमध्यें काढल्यानंतर सकाळीं धक्कयावर उतरण्यास आम्हांस परवानगी मिळाली. पिरॉस बंदर हें मध्यम प्रतीचें गांव आहे. पण तें युरोपांतील शहरांच्या धर्तीवर बांधिलें असल्यामुळें फार सुंदर आहे. गांवांत गेल्यानंतर मात्र लांब झगे घातलेले ग्रीक कोठें कोठें आढळतात. यामुळें त्या गांवाच्या युरोपियनपणास थोडी उणीव येते. येथून पांच मैलांवर अथेन्सच्या प्राचीन तटबंदीचे अवशेष आहेत. हें पाहाण्यास आम्ही गेलों होतों. या गांवांतील रस्ते, पथिकाश्रम, घरें वगैरे फार टापटिपीचीं आणि स्वच्छ दिसलीं. आथेन्स येथील राजवाडा लहानच आहे. त्याच दिवशीं बाजूच्या एका टेकडीवर जाऊन तेथून गांवाचा एकंदर देखावा मीं पाहिला. कित्येक ठिकाणीं प्राचीन इमारतींचे नुसते खांबच राहिले आहेत. दुसऱ्या दिवशीं ओलिंपियन झूज या देवाचें देऊळ आम्हीं पाहिलें. त्याचप्रमाणें एल्यूसिस् याचेंही एक देऊळ आहे. या ठिकाणीं प्राचीन काळीं धर्मतत्त्वांच्या अभ्यासाकरितां एक मोठें विद्यापीठ होतें. जुन्या काळीं ओलिंपिया नांवाच्या एका प्रचंड खेळखान्यांत नाना प्रकारचे शरीरसामर्थ्याचे खेळ होत असत. त्या काळचा हा प्रघात आतां युरोपनेंसुद्धां उचलला आहे. ग्रीसांतही असे खेळ चालू असतात. खेळांच्या नाना प्रकारांत बहुधा अमेरिकन लोकांचीच सरशी आजवर होत आली आहे. पण यंदांच्या सालीं धांवण्याच्या शर्यतींत ग्रीकांनीं अमेरिकनांवर मात केली. धांवण्याच्या कामांत तुर्क मोठे पटाईत असा त्यांचा लौकिक आहे. पण या वर्षी ग्रीकांनीं त्यांनाही मागें टाकिलें.

अथेन्स शहरीं तीन दिवस काढून चौथ्या दिवशीं सकाळीं दहा वाजतां झार नांवाच्या रशियन बोटीवर आम्ही चढलों. ती बोट इजिप्त ( मिसर ) देशाला जात होती. आम्ही बंदरावर दाखल झालों, तेव्हां दुपारीं चार वाजेपर्यंत बोट सुटत नाहीं असें आम्हांस समजलें. बोटींत चढावयाचा कांहीं माल शिल्लक होता, तेव्हां बोटींतून उतरून आम्हीं जुन्या काळचे कांहीं दगडी पुतळे पाहिले. हे पुतळे अडीच हजार वर्षांपूर्वी घडविले आहेत असें म्हणतात. दुपारची वेळ झाल्यामुळें उन्हाचा ताप अतिशय होऊं लागला, म्हणून आम्ही बोटींत येऊन बसलों; पण बोटींतही उकाडा फार होत होता. रशियन बोटीवर पहिला वर्ग पंख्याच्या बाजूला असतो; आणि बाकीचा सगळा मजला तिसऱ्या वर्गाच्या उतारूंनीं भरलेला असतो. यांतच एका बाजूस गुरेंढोरें आणि बकरींही भरलेलीं असतात. यामुळें बोटीवर स्वच्छता कमी होऊन उकाडा अधिकच असह्य होऊं लागतो. बोटीवर बर्फ मिळण्याचीही सोय नसते.

पॅरिस येथील अजबखाना मीं पाहिला, तेव्हां ग्रीक कलेच्या तीन पायऱ्या असल्याचें मला आढळून आलें. कलाकौशल्याचा मूळ उगम आशिया खंडांत होऊन तेथून त्या ग्रीसच्या लहानसहान बेटांत प्रथम पसरल्या. त्यांच्या प्रथमावस्थेंत फक्त मुळाचें अनुकरण होतें. स्वतंत्र बुद्धीची छाया त्यांत नव्हती. यानंतर बाबिलोन आणि इजिप्त यांच्यांतील तंटा सुरू झाला; आणि या कालानंतर ग्रीक कलाकौशल्याचा उदय झाला. हळूहळू या कलाकौशल्याच्या जन्मस्थानाची छाया त्याजवरून निघून जाऊं लागली. स्वतंत्र बुद्धीचा उदय झाला. सृष्टीचाच कित्ता पुढें ठेवून तिचें यथातथ्य अनुकरण ग्रीक कला करूं लागली. ग्रीक कला आणि इतर देशांतील कला यांत एक फरक प्रामुख्यानें दिसतो. ग्रीक कलेंत सृष्टीच्या देखाव्याचें यथातथ्य प्रतिबिंब असतें. मनुष्याच्या कल्पनेची भेसळ तींत नाहीं. इतर देशांत हा विशिष्टपणा नाहीं.

यानंतर शिल्पकलेचा उदय झाला. अगदीं आरंभींचे पुतळे पाहिले तर त्यांत जिवंतपणाची छाया बहुधा आढळत नाहीं. मूर्तींचे अवयव ताठल्यासारखे दिसतात. मूर्तींचे ओंठ बहुधा एकमेकांपासून विभागलेले असतात. जणूं काय ती हंसत आहे अशी कल्पना व्हावी. या बाबतींत मिसरी कलेशीं ग्रीक कलेचें साम्य आहे. उभ्या मूर्तींचे पाय ताठल्यासारखे दिसतात. मस्तकावरील केंस व दाढीचे

केंसही अगदीं सरळ दाखविलेले असतात. मूर्तींच्या आंगावरील वस्त्र घट्ट लपेटल्यासारखें दाखविलेलें असतें.

यानंतर या कलेला तिसरी अवस्था प्राप्त झाली. हिला अभिजात अवस्था असें नांव तज्ज्ञांनीं दिलें आहे. आथेन्स संस्थानाची भरभराट आणि शिकंदर बादशहाचा मृत्यु या दरम्यानच्या कालांत या अवस्थांतराचा उदय झाला. पेलोपोनिसस आणि अटिका या दोन संस्थानांत ही अवस्था विशेष भरभराटीस आली. ग्रीक कलेसंबंधीं एका फ्रेंच तज्ज्ञानें पुढील मजकूर लिहिला आहे: ‘ ग्रीक कलाकौशल्य अत्युच्च स्थितीला पोंचलें तेव्हां जुन्या रूढी व जुने नियम त्यानें पार झुगारून दिले होते. दुसऱ्या कोणत्याही देशाचें अनुकरण त्यांत नव्हतें. परकीय कलाशास्त्राचीं कोणतींही बंधनें त्यानें पाळलीं नाहींत. ख्रिस्ती शकापूर्वी पांचशें वर्षें ग्रीक कला अत्युच्च स्थितीस पोंचली होती. कोणतींही जुनीं बंधनें न पाळल्यामुळेंच तिच्यांत स्वतंत्र जोम येऊन ती फोफावली.’

पुतळे घडविण्याच्या कलेचे आद्यजनक दोन होते. पॉलिक्लेटस आणि लिसिपस अशीं त्यांचीं नांवें होतीं. मनुष्याच्या देहाचे अवयव जसे प्रत्यक्ष सृष्टींत असतील तसेच ते हुबेहुब दाखविले पाहिजेत असा त्यांचा कटाक्ष होता.

यानंतर ग्रीक कलाकौशल्याच्या अवनतीचा काल आला. शिकंदर बादशहा मृत्यु पावल्यानंतर रोमन लोक उदयास येऊन त्यांनीं ग्रीक संस्थानांचा पाडाव केला. या कालांतील ग्रीक पुतळे पाहिले तर त्यांत दोन विशिष्ट गोष्टी आढळून येतात. बाह्य भपकेदार अलंकारांनीं पुतळा सजविणें आणि प्रत्यक्षापेक्षां पुतळ्याचा आकार अधिक भव्य ठेवणें. ग्रीस देश पुढें रोमन साम्राज्याचा एक भाग बनला, तेव्हां राजकीय स्वातंत्र्याबरोबर कलाकौशल्याचेंही स्वातंत्र्य नष्ट झालें. यानंतर बापदाद्यांच्या कलेचें अनुकरण करणें एवढेंच काम या कालांतील शिल्पकारांनीं केलें आहे. तथापि यांतही नवीनपणाचा एक भाग उदयास आला. कोणा तरी व्यक्तीच्या चेहऱ्याबरहुकूम पुतळ्याचा चेहरा बनविण्याची कला या कालांत उदयास आली.

समाप्त.

५७१३

Printed and Published by M. N. Kulkarni, at the Karnatak
Printing Press, 318A, Thakurdwar, Bombay

REFBK-0005713